06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
RDB/ KGS/ MAP/ 10:30 वा.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी )**

**पृ.शी.** : राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिकपासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व गोंधळ.

**मु.शी.** : राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिकपासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व गोंधळ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, डॉ. नीलम गोऱ्हे व श्री. अनिल परब, वि. प. स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात शि□□ □त्रात प्राथमिकपासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व □ोंधळ, यापुढे शाळा, महाविद्यालये व □ी□तु□ड्या यां□ □यम वि□अ□ुदा□ तत्वावर मा□यता दे□, □ु□वत्ते□ुसार तु□ड्या □ पाड□याच्या शास□च्या □□□यामुळे महाराष्ट्रातील सर्वच शाळांमधू□ तीव्र प्रति□िया उमट□, विदर्भात दरवर्षीप्रमा□ 1 जुलै ऐवजी 12 जू□पासू□ शाळा सुरु □र□याचा घेतलेला □□□य, त्यामुळे विदर्भातील पाल□ व विद्यार्थ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, मुलांमध्ये आ□ि शि□□ांमध्ये संभ्रम □िर्मा□ □र□ारी परिस्थिती, त्यातू□ शि□□ अभ्यास□मात मूलभूत फर□ □र□याची □िर्मा□ झालेली आवश्य□ता, शि□□ तज्ज्ञां□ी व्यक्त □लेली मते, □ु□वत्ता वि□ास चाच□यांमुळे जिल्हापरिषदा, □□रपालि□ व महा□□रपालि□ शाळांमधील विद्यार्थ्यांवर □िर्मा□ झालेला मा□सि□ ता□व, त्यातू□ सर्व शि□ अभिया□ांतर्□त दिलेल्या □िर्देशांची विसं□ती, उपलब्ध □िधीचा □रवापर, महात्मा फुले सर्व शि□ अभिया□ांतर्□त □िर्मा□ झालेला आर्थि□-□ैति□ भ्रष्टाचार, शाळा महाविद्यालयांत अशै□□□ तत्वांचा प्रभाव वाढ□, □िश्चित मा□□ □ तपासता शाळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

महाविद्यालयां□ परवा□□ दे□, शास□स्तरावरू□ घे□यात आलेल्या चु□च्या □□यामुळे विद्यार्थ्यांचे हो□ारे हाल, □यायालयां□ वारंवार हस्त□प □रावा ला□□, त्यामुळे पाल□ व□त वाढलेला म□स्ताप, विद्यापीठ प्रशास□तील □धळ, विद्यापीठातील आर्थि□ □रशिस्त, शै□□□ दर्जातील घसर□, □ाज□ महाविद्यालयातील भरमसाट प्रवेश शुल□ व अवाजवी शि□□ शुल□ रच□, विद्यापीठ व मंडळ स्तरावरील सदोष पेपर तपास□, बो□स □□वाढ □रू□ उत्ती□ □रावयाचे व □ंपी □र□याचे वाढते प्र□र, परि□मी संपू□ शि□□□त्राचीच विश्वस□यता संपुष्टात ये□, त्यामुळे याबाबत □रावयाची उपाययोज□ विचारात घे□यात यावी."

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास 60 वर्षे पूर्ण होत आहेत आणि या 60 वर्षामध्ये महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत अशा प्रकारची गंभीर चर्चा करण्याची पाळी यावी हे खरे म्हणजे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. आपण आता एकविसाव्या शतकात वाटचाल करीत आहोत. एकविसाव्या शतकात वाटचाल करीत असताना या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज यांच्यासारखे तपस्वी जन्माला आले आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रातील चळवळीचे रोपटे 100 वर्षापूर्वी या महाराष्ट्रामध्ये लावले तसेच त्या रोपट्याची जोपासना करीत करीत या महाराष्ट्रातील दीनदलित, रंजलेगांजले, अज्ञानी साक्षर व्हावेत, महाराष्ट्र हा अज्ञानी राहता कामा नये, महिलांमध्ये सुध्दा शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार व्हावा असे उदात्त धोरण ठेऊन शिक्षणाची चळवळ सुरु केली. शिक्षणाचा पाया भक्कम झाला पाहिजे असाही त्यांनी प्रयत्न केला. परंतु शाहू महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची चळवळ त्यांनी सुरु केलेली असताना व त्यांनी ही चळवळ चालविलेली असताना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांवर अस्वस्थ होण्याची वेळ आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. शिगम ....

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिक्षण क्षेत्राबद्दल काय मत व्यक्त केले ते दैनिक "लोकमत"मध्ये छापून आलेले आहे आणि ते मी येथे वाचून दाखवितो. दैनिक "लोकमत"मध्ये असे म्हटलेले आहे, "सध्याच्या ढिसाळ प्राथमिक शिक्षण पध्दतीमुळे राज्यात आणि देशात निरक्षरांच्या पिढ्याच निर्माण होतील की काय या भीतीने मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना ग्रासले आहे. मुलांवर अभ्यासाचा बोजा नको, परीक्षांचे अवडंबर नको, बालमनावर परिणाम होईल अशा शिक्षा नको्त आणि हे कमी की काय म्हणून अध्यापन ही बांधिलकी समजणारे शिक्षकही विरळा झाल्याने ही परिस्थिती अधिकच हाताबाहेर जाऊ लागल्याचे त्यांना वाटते.

इयत्ता तिसरी पर्यत परीक्षाच नसल्याने विद्यार्थी चौथीत गेल्यानंतरच लक्षात येते की, त्यांना लिहिता-वाचताही येत नाही. हे मीच म्हणतो असे नव्हे तर शासनाने केलेल्या सर्वेक्षणात हे विदारक सत्य समोर आले आहे. तरीही कित्येक शिक्षणतज्ज्ञ मानसशास्त्रज्ञ आणि सो कॉल्ड इंटलेक्च्युअल्स अजूनही या परिस्थितीकडे गांभीर्याने बघायला तयार नाहीत, अशी खंतही मुख्यमंत्र्यांना आहे. "लोकमत"कडे आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, "आमच्या वेळी दर आठवड्याला शाळेत परीक्षा होत असत, दररोज शाळा सुटण्याअगोदर पाढे म्हणणे, हस्ताक्षर गिरविणे याची सक्ती होती. चौथीच्या परीक्षेसाठी मी बाभूळगावहून लातूरला परीक्षा देण्यासाठी आलो होतो. हे मला अजूनही आठवते. चौथीची तशीच सातवीची बोर्डाची परीक्षा होती, शिक्षकांचा दरारा होता. अशा शिस्तीत झालेल्या शिक्षणामुळेच आपल्या देशातील मुले अमेरिकेत जाऊन सहज नोक-या मिळवू शकली.मुख्यमंत्रीपदाच्या माझ्या पहिल्या कारकीर्दीत मी आणि माझे शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांनी चौथीची परीक्षा अनिवार्य केली होती. परंतु अनेकांनी या विरोधात दिल्लीपर्यन्त आंदोलने केल्यामुळे आम्हाला हा निर्णय दुर्दैवाने मागे घ्यावा लागला. अलीकडे आपल्याकडील तज्ज्ञ मंडळी सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे अमेरिकन शिक्षण पध्दतीचा पुरस्कार करु लागली आहेत. शिक्षण पध्दतीमध्ये वारंवार होत असलेल्या बदलांमुळे शिक्षणाचा दर्जा खालावू लागला आहे. याबाबत सर्व विचारवंतांनी एकत्र बसून यावर मार्ग काढायला हवा आणि तोही ताबडतोब".

माननीय उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेले मत दैनिक "नवशक्ती"मध्येही छापून आलेले आहे.त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "शिक्षणासाठी राज्यशासन दरवर्षी 7 हजार कोटी रुपये खर्च करीत असताना शासकीय तसेच पालिका शाळांमधील चवथीच्या दीड लाख मुलांना स्वत:चे नाव

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

लिहिता येत नाही तर सातवीच्या दोन लाख मुलांना पुणे शहराची माहिती नाही, अशी अवस्था सध्या असताना महाराष्ट्र कसा पुढे जाईल अशी चिंता माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी भाईंदर येथील एका शाळेच्या उद्‌घाटन समारंभाप्रसंगी व्यक्ती केली."

सभापती महोदय, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी शिक्षणाच्या संदर्भात अशा प्रकारे मत व्यक्त करणे हे महाराष्ट्राचे दुर्दैवच आहे.. खरे म्हणजे मागील अधिवेशनामध्येच या शिक्षण क्षेत्रासंबंधीची चर्चा उपस्थित व्हावयास पाहिजे होती. परंतु काही कारणास्तव ती चर्चा उपस्थित होऊ शकली नाही. शिक्षण क्षेत्र हा माझा विषय नाही. या सदनातील शिक्षकांचे तसेच पदवीधरांचे प्रतिनिधी या विषयावर अधिक प्रकाश टाकतील. मी ग्रामीण भागातील कार्यकर्ता आहे. ग्रामीण भागातील शिक्षण पध्दतीबद्दल मी थोडक्यात विवेचन करणर आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांनी नुकताच एक आदेश जारी केला. त्या आदेशानुसार त्यांनी राज्यात 12 जून 2006 पासून शाळा सुरु करण्यास सांगितले. विदर्भामध्ये मे आणि जून या दोन महिन्यामध्ये प्रखर उन्हाळा असतो. जवळ जवळ 48 अंश सेल्सियस पर्यन्त तापमान असते. असे असतानाही शिक्षण मंत्र्यांनी अशा प्रकारचे आदेश काढलेले आहेत. विदर्भामध्ये वर्षानुवर्षे 1 जुलै पासून शाळा सुरु होण्याची पध्दत आहे. मग असे काय घडले की, 12 जून पासूनच शाळा सुरु करण्याचे आदेश मंत्री महोदयांना काढावे लागले ? हे आदेश काढल्यानंतर ज्या शाळा 12 जूनला सुरु होणार नाहीत त्या शाळांवर देखरेख ठेवून त्यांच्यावर कारवाई करण्यासंबंधीचे आदेश माननीय शिक्षण मंत्र्यांनी दिले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 10:40

श्री.पांडुरंग फुंडकर.........

याचा परिणाम असा झाला की, या 12 जूनच्या तुघलकी निर्णयामुळे विदर्भातील चार जण मृत्युमुखी पडले. विशाखा राऊत ही कळमेश्वरची विद्यार्थीनी होती, तिला उष्माघात झाला. प्रा.वासनिक, बाजारगांव, अमित दुर्वे हा नागपूर जिल्हयातील, मनोहर हर्णे हे ते चार लोक आहेत. सभापती महोदय, 12 जूनला शाळा सुरु करणे हा निर्णय किती धोकादायक ठरला आहे. सन्माननीय मंत्री महोदय हे विदर्भातील आहेत, ग्रामीण भागाची परिस्थिती त्यांना माहिती आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांमध्ये प्यायच्या पाण्याची सोय नाही. गावेच्या गावे पिण्याच्या पाण्यासाठी तळमळतात. तरी आपण त्यांना पाणी देऊ शकत नाही. 2-2, 4-4 कि.मी.वरुन पाणी आणावे लागते. शहरात पाण्याची व्यवस्थाच नसते. मुलांना तहान लागली की पाणी पिण्यासाठी ती घरी जातात. अशा अवस्थेत आपण हा निर्णय का घेतला हे आम्हाला समजू शकत नाही. पंख्याची व्यवस्था दूरच राहिली. शाळांना छत चांगले नाही. पिण्याचे पाणी नाही. अशा अवस्थेत आपण 12 जूनला शाळा सुरु करण्याचा हेका का घेतला हे न समजणारे कोडे आहे. अशा पध्दतीने जर शाळा सुरु करणार असाल तर ते कष्टदायक ठरणार आहे. या राज्यात विदर्भात आंदोलने झाली, अजूनही आंदोलन चालू आहे. लोक, शिक्षक, विद्यार्थी उपोषणाला बसले, त्याची तमा न बाळगता निर्णय का घेतला हे समजू शकले नाही. हा आदेश शासनाने मागे घेतला पाहिजे. जो तुघलकी निर्णय घेतला आहे तो मागे घेतला पाहिजे. सभापती महोदय, शिक्षण हा देशाच्या विकासातील महत्वाचा टप्पा आहे. आजच्या घडीला शिक्षण क्षेत्रात अतिशय वेगाने प्रगती होत आहे. एकविसाव्या शतकातील माहिती आणि तंत्रज्ञान याचा काळ आहे. या तंत्रज्ञानाने शिक्षणाला वेगळी दिशा दिलेली आहे. त्यामुळे यामध्ये आमुलाग्र बदल होत आहेत. 25-30 वर्षापूर्वीचा काळ या महाराष्ट्रामध्ये असा होता की, सातवीची परीक्षा पास झाल्यानंतर त्याने फायनलची परीक्षा पास केली असे म्हटले जात होते. त्यानंतर मॅट्रिकच्या परीक्षेला महत्व आले. त्या काळी जुनी मॅट्रिक परीक्षा होती, ग्रामीण भागात जुनी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर फार शिकला असे इतके त्या परीक्षेला महत्व होते. तोही काळ गेला. त्यानंतर बी.ए., बी.कॉम. झाल्यानंतर ग्रॅज्युएटला महत्व आले. ग्रॅज्युएट झाल्यानंतर हमखास नोकरी मिळते अशी धारणा ग्रामीण भागात होती. बी.कॉम.झाल्यानंतर हमखास बँकेत नोकरी मिळेल अशी धारणा होती.आज काय चित्र आहे? बी.ए., बी.कॉम., बी.ई. ही इंजिनिअरिंगची परीक्षा पास झालेले विद्यार्थीही बेकारांसारखे फिरत आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

त्यांना कोणत्याही पध्दतीचे महत्व नाही. आज शाळेची परिस्थिती ग्रामीण भागामध्ये काय आहे? सभापती महोदय, शिक्षणमंत्री महोदय हे शिक्षण खात्यातून आलेले आहेत. शिक्षकी पेशातून आलेले, ग्रामीण भागातून, आदिवासी भागातून आलेले आहेत. वर्ग तितक्या खोल्या आणि वर्ग तितके शिक्षक हे तत्व युती सरकारने मान्य केले होते. आज काय स्थिती आहे? सभापती महोदय, वर्ग तितक्या खोल्या नाहीत आणि वर्ग तितके शिक्षकही नाहीत. ग्रामीण भागातील चित्र अतिशय वाईट आहे. सातवीच्या वर्गापर्यंत शाळा असेल तर 3 शिक्षक, 4 शिक्षक व खोल्या 3 ते 4 असतात. मंत्रीमहोदय, आपण अकोला जिल्हयाचे पालकमंत्री आहात, त्याठिकाणची घटना मी सांगणार आहे. शाळेची अवस्था काय आहे? त्या जिल्हयात दौऱ्यावर असताना दुपारची वेळ होती. तहान लागली म्हणून गाडी थांबविली आणि ड्रायव्हरला सांगितले, शेजारी घर आहे, पाणी मिळते का बघ. तो म्हणाला, साहेब घर नाही. शाळा आहे. एकच खोली होती. मी गाडीतून उतरल्यानंतर शाळा असेल तर बघू म्हणून शाळेत शिरलो. मी शाळेत गेल्यानंतर तेथील शिक्षकांनी मला ओळखले. त्यांनी सांगितले, या भाऊसाहेब! कसे काय येणे केले? मी म्हटले, तहान लागली त्यामुळे पाणी प्यायचे म्हणून उतरलो. ते म्हणाले, बसा, मी पाणी आणतो. शाळेत जायला लागलो तर शाळेचा व्हरांडा होता तो थोडासा झुकलेला होता. मी शिक्षकाला विचारले, हा व्हरांडा का झुकला? ते म्हणाले, जमिनीत खांब घातला आहे तो सडला असल्यामुळे व्हरांडा झुकला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

सभापती महोदय, तो व्हरांडा पडू नये म्हणून त्याला दोराचा ताण लावण्यात आला होता. मी शिक्षकाला म्हणाला या व्हरांडयाला दोराचा ताण लावून व्हरांडा पडायचा कसा काय थांबेल तेव्हा तो शिक्षक म्हणला मग मी काय करु. मी त्या शिक्षकाला म्हणालो की, हा दोराचा ताण कोणी बांधलेला आहे त्या शिक्षकाने मला सांगितले की, मी स्वत:च्या घरातून दोरी आणून हा ताण बांधलेला आहे, तसेच व्हारांडयाच्या संदर्भात जिल्हा परिषदेला सांगितलेले आहे परंतु अजून काहीही कार्यवाही झालेली नाही. मी त्या शिक्षकाला विचारले की, या ठिकाणी कितवी पर्यंत शाळा आहे? तेव्हा त्याने सांगितले की, या ठिकाणी चवथी पर्यंत शाळा आहे. मी जेव्हा वर्गात गेलो तेव्हा मला फक्त एकच खोली दिसून आली त्यावेळी मी त्याला विचारले की, चार वर्गापर्यंत शाळा असून एकच खोली ? तेव्हा तो फक्त "हो" म्हणाला. मी त्याला पुन्हा विचारले की, या ठिकाणी एकूण किती शिक्षक आहेत? तेव्हा शिक्षकाने सांगितले, येथे एकूण दोनच शिक्षक आहोत. मी सुट्टीवर असलो की, दुसरे शिक्षक शिकवितात आणि दुसरे शिक्षक सुट्टीवर असले की, मी शिकवतो. मी त्याला पुन्हा विचारले की, एकाच खोलीत जर चार वर्ग भरतात तर तुम्ही पहिली ते चवथीच्या वर्गाला कसे काय शिकविता त्यावेळेस त्याने सांगितले की, पहिल्यांदा पहिलीच्या वर्गाला शिकविण्यास सुरुवात केल्यानंतर दुसरी, तिसरी आणि चवथीच्या विद्यार्थ्यांना तोंड बंद करावयास सांगतो. पहिलीच्या विद्यार्थ्यांना शिकवून झाल्यानंतर त्याच पध्दतीने दुसरी, तिसरी आणि चवथीच्या मुलांना शिकविले जाते. सभापती महोदय, जर ग्रामीण भागात अशा प्रकारचे शिक्षण गरीब शेतक-याच्या, शेतमजुराच्या मुलाला मिळत असेल तर त्यांचे पुढे काय होईल याचा विचारच केलेला बरा. आज शहरी आणि ग्रामीण भागात शिक्षणाची मोठया प्रमाणात दरी पडत आहे. शहरी भागातील के.जी. च्या मुलाला इंग्रजी बोलता येते परंतु ग्रामीण भागातील सातवी-आठवीच्या विद्यार्थ्याला स्वत:चे नाव सुध्दा इंग्रजीमध्ये काढता येत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आज ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूराची आपल्या मुलाला शिकविण्याची कितीही हौस असली तरी हे लोक आपल्या मुलांना डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस, आयपीएस कधीही बनवू शकणार अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागात एकंदर संख्येपैकी 70 टक्के जनता राहते. ग्रामीण भागातील शेतक-याजवळ 100 एकर जमीन असली तरी सुध्दा तो आपल्या मुलाला डॉक्टर, इंजिनिअर बनवू शकणार नाही कारण

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

डॉक्टर बनविण्यासाठी त्या शेतक-याजवळ डोनेशनसाठी 25 लाख रुपये नाहीत. आज शिक्षण क्षेत्रामध्ये डोनेशनचा बाजार मांडला गेला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील मुले यापुढे कधीही डॉक्टर, इंजिनिअर होऊ शकणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज ग्रामीण भागातील शिक्षण पध्दतीत सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांचे वाढीव पगाराच्या संदर्भात आम्ही कधीही विरोध केलेला नाही. परंतु आज ग्रामीण भागात काय चालले आहे? एका बाजूला तुम्ही शिक्षकांचे अजून दोन तास वाढवून दिलेले आहे. आज शिक्षकांवर केवळ विद्यार्थ्यांना शिकविण्याचेच काम नाही तर अजून सुध्दा त्यांच्याकडून काहीना काही कामे करुन घेतली जातात त्यामुळे शिक्षकांना आता त्रास होऊ लागला आहे. आता शाळा सकाळी सात वाजताच सुरु केली जाते. पाच पंचवीस वर्षापूर्वी जी शिक्षण पध्दती होती तीच शिक्षण पध्दती अंगिकारली तर तुम्हाला शिक्षकांच्या कामाचे तास सुध्दा वाढवावे लागणार नाहीत व विद्यार्थ्यांनाही चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळून त्यांचेही भले होईल. सभापती महोदय, पूवी ख्रिसमस सणाला शाळेसाठी एक दिवसाची सुट्टी दिली जात होती परंतु आता या सणासाठी 10 दिवसांची सुट्टी दिली जात आहे. एका बाजूला भर उन्हाळयात शाळा 12 जूनला सुरु करावयाच्या आणि हिवाळयात ख्रिसमसच्या सणाला 10 दिवस सुट्टी द्यावयाची हा कोणता न्याय? पुरोगामी म्हणविणा-या महाराष्ट्राला हे शोभते काय? त्यामुळे सुट्टीच्या संदर्भातही पूर्वी सारखाच निर्णय केला तर ते चांगले होईल. खरे म्हणजे शिक्षण पध्दतीवर बरेच काही बोलता येईल. आज शिक्षणासाठी शासन सात-आठ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. परंतु हा खर्च कोणासाठी केला जात आहे हे समजत नाही. एका बाजूला जे धनदांडगे आहेत, करोडपती आहेत, ज्यांना 50-50 हजार रुपये पगार आहे अशा लोकांना आपण याचा फायदा देणार आहात काय? सभापती महोदय, जे गरीब आहेत त्यांना याचा फायदा मिळणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रात एक बातमी छापून आलेली आहे. मला असे वाटत होते की, शेतकरीच आत्महत्या करतात.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे... 10:50

श्री.पांडुरंग फुंडकर.........

या राज्यात कामगार आत्महत्या करीत आहेत, शेतकऱ्यांचे कुटुंब आत्महत्या करीत आहेत. परंतु आता राज्यात विद्यार्थी देखील आत्महत्या करीत आहे हे वाचून अत्यंत वाईट वाटले. माझ्या 25 वर्षाच्या राजकीय वाटचालीमध्ये मी अशी बातमी कधीही वाचली नाही. मराठवाड्यातील मानवत तालुक्यामध्ये एका विद्यार्थ्याने त्यास पुस्तक मिळाले नाही म्हणून आत्महत्या केली. त्या विद्यार्थ्याचे वडील मजूर होते. ते मुलाला पुस्तक विकत घेऊन देऊ शकत नव्हते. वर्गामध्ये त्या विद्यार्थ्याला मुले हिणवत होती तेव्हा पुस्तक न मिळाल्यामुळे शेवटी त्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. मी माननीय मंत्री श्री.पुरके यांना विचारु इच्छितो की, ही घटना आपल्याला भूषणावह आहे का ? आपण किती विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप केले ? हे सर्व थोतांड चालू आहे. आता आपण शिक्षकांना एक बिल्ला दिलेला आहे. त्यावर लिहिले आहे "एकच ध्यास गुणवत्तेचा". मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, अशाप्रकारचे बिल्ले देऊन आणि त्यावर मजकूर छापून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता येत नाही. आज ग्रामीण भागात सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले लिहिता वाचता येत नाही. शिक्षकांनी छातीवर बिल्ला लावला म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आली असे काही होत नाही. त्यासाठी एक चांगल्या तऱ्हचे धोरण आखले पाहिजे, कडक नियम केले पाहिजेत, तरच गुणवत्ता वाढणार आहे. बिल्ला लावून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढणार नाही. सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. माझे काही सहकारी हे शिक्षक प्रतिनिधी आहेत ते त्यावर जास्त चांगल्या तऱ्हेने बोलतील. या पुरोगामी महाराष्ट्रात शिक्षणाच्या बाबतीत अशी चर्चा उपस्थित व्हावी हे आपणास शोभनीय नाही. आज शिक्षणाचे धिंडवडे उडाले आहेत. आज विनाअनुदानित शाळांमध्ये इमारती नाहीत, विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यासाठी जागा नाही, त्यांना गोठ्यात बसविले जाते, तरी सुध्दा शाळा काढण्याची परवानगी दिली जाते. असे प्रकार होत असतील तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी सुधारणार ? आपणास ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या बरोबरीने आणावयाचा असेल तर त्यासाठी कडक नियम केले पाहिजेत. मागेल त्याला शाळा असे धोरण स्वीकारण्यात येऊ नये. गरज असेल तेथे शाळा असा धोरण स्वीकारले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

..2..

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सुरुवातीस धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात शिक्षण महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या नावाने केली. विधानपरिषद सभागृहात शिक्षण विभागावर नेहमी चर्चा घ्यावी अशी माझी धारणा आहे आणि त्याप्रमाणे मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे आग्रह धरतो. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यात येते. परंतु विधानपरिषद सभागृहामध्ये शिक्षक प्रतिनिधी असल्यामुळे शिक्षण विषयावर चांगल्या तऱ्हेने चर्चा होऊ शकते असे मला वाटते. सभापती महोदय, महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान आहे. परंतु महात्मा जोतिबा फुले यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचे योगदान फार मोठे आहे असे माझे मत आहे. शिक्षण महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 125 वर्षापूर्वी पुण्यामध्ये महिलांसाठी शिक्षणाचा वृक्ष लावला. त्या काळामध्ये महिलांना घराचा उंबरठा ओलांयडला सुध्दा परवानगी नव्हती. त्याकाळामध्ये सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षण दिले. शिक्षण महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 125 वर्षापूर्वी शिक्षणाचा जो वृक्ष लावला त्यामुळे आज कित्येक महिला इंजिनियर, डॉक्टर्स झाल्या आहेत. आज विविध क्षेत्रांमध्ये महिलांसाठी खास जागा निर्माण झाल्या आहेत.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

म्हणून त्यांच्या नावाच्या उल्लेखाने आजच्या भाषणाला सुरुवात केली त्याबद्दल मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना धन्यावाद देऊ इच्छितो. माननीय शिक्षण मंत्रिमहोदय, आज शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या दळभद्री राजकारणाचा शिरकाव का होत आहे ? हे राज्य सेक्युलर आहे असे आपण म्हणतो. त्याचा अर्थ धर्म मानण्याची मुभा आहे, धर्म गुंडाळण्याची मुभा नाही. आज शाळांमध्ये हजारो वर्षे सरस्वती देवतेचे वंदन केले जायचे. परंतु मला कळत नाही की, कोणत्या दळभद्र्याला हे जाचले, बोचले आणि त्यांना हे विचार हिंदूसाठी आहेत असे वाटले व आपण 12 तारखेपासून शाळा सुरु केल्यानंतर शाळांतील सरस्वती वंदन बंद करण्याचे आदेश काढले. माननीय शिक्षणमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, लहान मुलांना धर्म नसतो. त्याठिकाणी त्यांना शिक्षकच वंदनीय असतात. त्यांच्यावर धर्माचे, जातीचे कुठलेही संस्कार नसतात. ते शाळेमध्ये आल्यानंतर सरस्वती देवतेची वंदना करुन प्रार्थना घेतली जाते. ती वंदना अशी आहे,

"य: कून्देन्दू तुषदार हार धवल :
य: शुभ्र वस्त्रावृत :
य: वीणा वर दंडमंडित कर :
य: शुभ्र वस्त्रा वृत्त :
या ब्रम्हाच्युत शंकर प्रभुतीकार :
देवै : सदा वंदिता :
स:माम् पातु सरस्वती भगवती
निषेश: जाडया पहा !!

संकटांचा सदैव सामना करण्याच्या दृष्टीनेच देवी देवतांचे वंदन करीत असतात, एवढीच त्यामागची भूमिका आहे. त्यामध्ये येशूचा उल्लेख आला नाही का ? ज्या ज्या धर्मांचे श्रेष्ठत्व आहे त्या त्या धर्मांच्या देवी देवतांचे सामर्थ्य निर्माण झाले म्हणून आपण विद्येला वंदन करतो. त्यामुळे मला याठिकाणी प्रश्न पडला की, आपण ही प्रार्थना का बंद केली ? ती बंद करुन आपण त्यातून काय निर्माण करीत आहात ? आपण यामध्ये असे सांगितले की, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, क्रांतीवीर भाऊराव पाटील, मौलाना आझाद यांचे पुजन करा, असे आपण म्हणता. परंतु यातून आपण काय साध्य वा निर्माण करणार आहात ? हे मला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

कळत नाही. शाळांमध्ये दलित मुलगा असेल तर तो आंबेडकरांचे नांव घेईल, श्री.भुजबळांच्या ओ.बी.सी. कुटुंबातील मुलगा असेल तर तो जोतीबा फुले यांचे नांव घेईल, मुस्लीम असेल तर तो मौलाना आझाद यांचे नांवे घेईल. मुस्लीम मुलाच्या घरामध्ये मोठे भेदभाव करत असतील परंतु तो लहान मुलगा शाळेमध्ये इतर मुलासोबतच एकत्रित बसलेला असतो. त्यामुळे या माध्यमातून भेदभाव निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, अशा प्रकारे आपण शिक्षणाच्या बाबतीत सरस्वती वंदनेची भावना का नष्ट करीत आहात ? हे मला समजत नाही. अशा प्रकारचे आचरट विचार कोणाच्या सडक्या मेंदूतून आले. अशा प्रकारे हिंदुत्व संपवून टाकण्याची ही भयानक घाणेरडी भावना घेऊन आपण शाळांमध्ये का जात आहात ? अशा प्रकारे आपण शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव का निर्माण करीत आहात ? शिक्षण क्षेत्रामध्ये सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी फार मोठे काम केले. आगरकरांसारखे जोतीबा फुले यांनीही समाजसुधारणेचे फार मोठे काम केले.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

या अनिष्ट प्रथा, अनिष्ट पायंडे गाडून टाकण्याचे कामे ज्योतिबा फुल्यांनी केले. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनाही तुम्ही विसरला. देशाचे पहिले राष्ट्रपती म्हणून त्यांचेही योगदान काही कमी नाही. सध्याचे आपले महनीय राष्ट्रपती श्री.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची तरी आठवण ठेवायची होती. निश्चितच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे देशासाठी दीपस्तंभ आहेत, त्याबद्दल वाद नाही. पण तुम्ही हे सर्व का केले ? याचा खुलासा आज या सभागृहात झाला पाहिजे. हिंदुत्वाच्या व्देषातून केवळ हिंदुत्व गाडून टाकण्याचा हा प्रकार केला असेल तर त्याचा या ठिकाणी निषेध केला पाहिजे. मी याबद्दलचा निषेध या ठिकाणी नोंदवून ही चर्चा पुढे सुरु करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माननीय मुख्यमंत्री व शिक्षण खात्याच्या मंत्रीमहोदयासंबंधीचे बोल या ठिकाणी वाचून दाखविले, त्याची पुनरावृत्ती करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. युतीच्या नावाने टाहो फोडून तुम्ही सत्तेवर आला त्याला किती वर्षे झाली ? तुमच्या हातात सत्ता आली, धोरण ठरविण्याचे अधिकार आले, येणारी पीढी घडविण्याचे काम आले. गेली 8 वर्षे झाली तुम्ही सत्तेची खुर्ची उबवित आहात. ज्या राज्यकर्त्यांना जीवन घडवावयाचे आहे, भविष्यातील मार्ग काढावयाचा आहे त्यांच्याबद्दल अशा प्रकारे बोलण्याची पाळी येते की, राज्याच्या शिक्षणाचे 3/13 वाजले. मी सर्व शैक्षणिक क्षेत्रातील विषयांना माझ्या भाषणात हात घालणार नाही. केवळ प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात बोलणार आहे. कारण, विठ्ठलाची भक्ती करावयाची असेल तर अगोदर नामदेवाची पायरी चढावी लागते त्याशिवाय विठ्ठलाची भक्ती पूर्ण होत नाही. दर्जेदारपणे प्राथमिक शिक्षण मिळत नसल्यामुळे भविष्यात तयार होणारा नागरिक समर्थपणे देशाची, कुटुंबाची सेवा करु शकत नाही. शिक्षणाच्या बाबतीतील खर्च मी आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय, प्रा.पुरकेसाहेबांनी राजीनामा द्यावा अशा प्रकारची विनंतीही मी करणार आहे. व्यक्तिगत तुमच्याबद्दल मला आदर आहे. परंतु, या शासनाने तुमच्या खात्यावर जो अन्याय केला आहे त्यासाठी तुम्ही राजीनामा दिला पाहिजे. प्राथमिक शिक्षणावरील खर्च ही देशाची गुंतवणूक आहे. अशा प्राथमिक शिक्षणावर सन 1999-2000 मध्ये 11.87 टक्के, सन 2000-2001 मध्ये 16.46 टक्के, सन 2001-2002 मध्ये 15.39 टक्के, सन 2002-2003 मध्ये 12.71 टक्के, सन 2003-2004 मध्ये 11.87 टक्के एवढा खर्च झाला आहे. तर सन 2004-2005 मध्ये 11.94 टक्के, सन 2005-2006 मध्ये 12.40 टक्के

..2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आणि सन 2006-2007 मध्ये 13.52 टक्के एवढा खर्च झालेला आहे. युतीचे शासन जेंव्हा सत्तेवर होते त्यावेळी 16 टक्के खर्च प्राथमिक शिक्षणावर होत होता. हा खर्च घसरुन 13 टक्क्यांवर आला आहे. कोणत्या प्रगतीची अपेक्षा आम्ही या सरकारकडून करायची ? राज्याच्या एकूण खर्चापैकी केवळ 3.25 टक्के खर्च हा शिक्षणावर होत आहे. मी एका महापालिकेचा महापौर होतो, विविध समित्यांवर होतो, मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, महापालिकेला सर्वात जास्त उत्पन्न मिळवून देणारे खाते हे कर वसूली किंवा जकात खाते आहे आणि या खात्यांच्या आस्थापनेवरील खर्च केवळ 3 टक्के एवढा आहे. ही खाती खूप कमावितात आणि महापालिका पोसतात असे म्हटले जाते. शासनाचे मात्र नेमके उलटे आहे. सन 1999-2000 ते सन 2005-2006 या कालावधीमध्ये राज्य शासनाने आपल्या एकूण खर्चाच्या केवळ 3.25 टक्के एवढा खर्च शिक्षणावर केला आहे. राज्याच्या एकूण योजनेच्या खर्चापैकी शिक्षणावरील सन 2001-2002 मध्ये 18.10 टक्के असणारा खर्च सन 2004-2005 पर्यन्त 12.57 टक्क्यांवर घसरला आहे. शिक्षणावरील खर्चाची घसरण चालू आहे आणि दुस-या बाजूला विद्यार्थी वाढत आहेत, शाळा वाढत आहेत. सन 1999-2000 मध्ये 6185.46, सन 2000-2001 मध्ये 756.50, सन 2001-2002 मध्ये 8184 असे करीत करीत सन 2004-2005 मध्ये 751 कोटी रुपये असा खर्च होत आहे. ही रक्कम जरी वाढीव दिसत असली तरी राज्याचे बजेट लक्षात घेतले तर ही टक्केवारी केवळ 4 टक्के एवढीच येते.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

सभापती महोदय, लोकशाही आघाडी शासनाने सन 2000 मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान 7 टक्के रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी 75 टक्के रक्क्म प्राथिमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल असे मंत्री महोदयांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये म्हटले होते. तसे घडले आहे काय ? तसे घडत नाही. सन 1999 मध्ये 2.93 टक्के खर्च होता तो आता सन 2006 मध्ये 2.36 टक्के झालेला आहे. म्हणजे वाढण्याऐवजी घसरत गेलेला आहे. सन 2000 मध्ये एकूण खर्चापैकी 53 टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आल्यानंतर एकूण खर्च 45 टक्क्याच्या आसपास राहिला. तत्कालीन शिक्षणमंत्री माननीय श्री.रामकृष्ण मोरे होते तेव्हा पासून ही घसरण चालू होती ती आपल्या काळातही चालूच आहे. सभापती महोदय, शाळा हा सर्वांचाच विषय आहे. ग्रामीण भागातील, शहरातील सर्वांचाच हा विषय आहे. सभापती महोदय, सन 2002-03 मधील 15 लाखांची शाळाबाहय मुलांची संख्या कमी कशी केली जाईल याची माहिती शिक्षण सचिवांनी नोव्हेंबर, 2002 मध्ये केंद्र शासनाला दिली होती. त्यानुसार 15 लाख शाळाबाहय मुलांपैकी 10 लाख 2 हजार मुलांना नियमित शाळेत, 1 लाख 30 हजार मुलांना वस्तीशाळेत, 3 लाख 3 हजार मुलांना महात्मा फुले शिक्षण हमी योजनेंतर्गत शिकविण्यात येणार होते व केवळ 1 लाख 10 हजार मुले शाळाबाहय राहणार होती. प्रत्यक्ष काय झाले ? हा दावा खोटा ठरला. सचिवांनी दावा केल्याप्रमाणे सन 2003-04 मध्ये 4 लाख 33 हजार मुले महात्मा फुले शिक्षण योजनेत आणि वस्तीशाळांमध्ये दाखल झाली. नियमित शाळांची पटसंख्या 10 लाखांनी वाढली असे दाखविण्यात आले. सन 2004-05 मध्ये 2,29,224 मुले शाळाबाहय राहिल्याचा दावा शासनाने केला. मात्र डिसेंबर, 2004 मध्ये पुन्हा 4,28,798 मुले शाळाबाहय असल्याचे शासनाला आढळले. केंद्र सरकारकडून पैसे आणण्यासाठी धडपड चालू आहे. परंतु प्रत्यक्ष तसे घडत नाही. याचा जाब आपण अधिका-यांना विचारणार आहात की नाही ? असा प्रश्न मी उपस्थित करतो. शिक्षणाचे अशा प्रकारे आर्थिक धिंडवडे निघत आहेत. आर्थिक धिंडवडे हा शब्द वापरतांना मला दुःख होत आहे. तरी देखील हा शब्द मला वापरावा लागत आहे. उद्दाम माणसाला शासन केले जाते तेव्हा त्याला धिंडवडे काढणे असे म्हणतात. प्राथमिक शाळेच्या शिक्षकांची संख्या 2,83,462 एवढी आहे आणि

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची संख्या 2,18,082 इतकी आहे. खाजगी अनुदानित शाळांचा यामध्ये समावेश नाही. महाराष्ट्रामध्ये 5,01,544 शिक्षक आहेत. शिक्षणमंत्री प्रा.पुरकेसाहेबांना मी दोष देणार नाही. त्यांनी अनेक शाळांना भेटी दिल्या. त्यांना असे दिसून आले की, 8 लाख मुलांना लिहिता वाचता येत नाही. मग यावर मार्ग काय ? मंत्री जर सचिवांवर अवलंबून राहिला तर त्याचा कार्यभार संपला. मी पुन्हा सांगतो की, मंत्री जर सचिवांवर अवलंबून राहिला तर त्याचा कार्यभार संपला. शिक्षण विभागाच्या सचिवांची 8 दिवसापूर्वी बदली झाली. पूर्वी ते अमरावतीला विभागीय आयुक्त असतांना त्यांनी शाळांना भेटी देऊन मुलांची परिस्थिती बधितली. मागच्या 10 वर्षामध्ये त्यांना जो अनुभव आला त्यामध्ये बदल करण्याचा घाट त्यांनी शिक्षण सचिव झाल्यानंतर घातला.

यानंतर श्री.सुंबरे .....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

परिणाम असा झाला की, आपण मुलांच्या नैदानिक म्हणजे डायग्नोस्टिक चाचण्या घेण्याचे ठरविले. वास्तविक या नैदानिक चाचण्यांचा उद्देश संपादणूक मोजणे हा नसून संपादन प्रक्रियेतील त्रुटी शोधणे, त्रुटींचे विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार सामान्यीकरण करणे, त्यावर उपचारात्मक अध्यापन संस्कार करणे व त्यातून संपादनाची उच्च पातळी गाठणे हा असतो. it's a process. ही वैधानिक प्रोसेस आहे. परंतु शासनाकडे उपचारात्मक अध्यापनाचा कोणताही आराखडा तयार नाही. किंबहुना प्रत्येक विद्यार्थी हा घटक स्वतंत्र असून त्याच्यातील त्रुटींचा स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज असते याचीही कल्पना शासनाच्या गावी नाही. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने आखलेल्या चाचण्या या कसोट्यांवर नैदानिक चाचण्यांचे कोणतेही गुण दर्शवित नाही. यामध्ये ही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद हा एक मोठा गमतीचा भाग आहे. केंद्र सरकारचे जे पैसे आलेले आहेत ते वापरण्यासाठी एक स्वतंत्र घटक असावा म्हणून ही शिक्षण परिषद आहे. आखलेल्या कसोट्यांवर दैनिक चाचण्या घेणे बसत नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात या अपरिपक्व चाचणी परीक्षांमुळे पालक, शिक्षक आणि विद्यार्थी गोंधळामध्ये पडले असून त्यात अध्यापकांचा वेळ फुकट गेलेला आहे. अध्ययन आणि अध्यापन या पैकी काहीच नीट होत नाही. ज्यावेळी खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि अध्यापन सर्वोच्च पातळीवर असते त्या काळात सरकारी व निमसरकारी शाळांतील विद्यार्थी व शिक्षक या निरर्थक चाचण्यांमध्ये अडकून पडल्यामुळे गेल्या तीन महिन्यात अध्ययन आणि अध्यापनाचा वेळ वाया गेला आहे. त्यामुळे या संदर्भात मुंबई महापालिकेतील शिक्षक सभा ही शिक्षकांची संघटना कोर्टामध्ये गेली. तिने ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणली आहे. त्याच्या सुनावणी दरम्यान जस्टीस रिबेरो आणि जस्टी मोहता यांच्या कोर्टाने 22 मार्च ला सरकारला तंबी दिली. ही तंबी का दिली ? यांनी काय केले ? महापालिकांच्या शाळांमध्ये जाऊन वार्षिक चाचण्या घेतल्या. त्यावेळेस वार्षिक परीक्षा चालू होत्या. त्या बंद केल्या. हे सारे आपल्या सचिवांचे काम. कलम 61 क्यू प्रमाणे महापालिकेचे शिक्षण क्षेत्र हे स्वायत्त आहे. त्यावर कारवाई करण्याचा अधिकार हा केवळ महापालिका आयुक्तांचा वा शिक्षणधिकाऱ्याचा आहे. परंतु तरीही आपल्या सचिवांनी त्यांच्या शाळांमध्ये जाऊन परीक्षा चालू होत्या त्या बंद केल्या आणि काही चाचण्या घेतल्या. त्यातून त्यांनी महापालिका शिक्षकांना मेमो दिले, अधिकार नसताना मेमो दिले. मग प्रकरण कोर्टामध्ये गेले आणि मग या साऱ्या प्रकरणची चिरफाड व्हायला सुरूवात झाली. त्यात

....... आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

कोर्टाने यांना तंबी दिली. एवढे होऊनही हे गप्प बसले नाहीत. 22 मार्च ला कोर्टाने तंबी दिली आणि 24 मार्चला हे सचिव शाळांमध्ये गेले. कोर्टाला आडवे मारून आपले काम करावयाचे असे जणू काही आपल्या अधिकाऱ्यांनी ठरविले आहे. सगळेच खोत बनू पहात आहेत. आपले सचिव महापालिका शाळांमध्ये गेले. तेथे नियम 61 प्रमाणे अधिकार वापरले तर ते तुमच्या अंगावर येणारच. त्याप्रमाणे ते आले देखील. मग त्यांनी कोर्टामध्ये या संबंधात ॲफिडेविट केले. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, या चाचण्या योग्य आहेत म्हणून आम्ही या संदर्भात समिती नियुक्त करतो. आपल्याला यासाठी तज्ज्ञांची समितीच करावयाची होती तर आपण आम्हाला सांगितले असते तरी आम्ही आपल्याला यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांची अगदी विभागवार नावे दिली असती. प्रत्येक विभागातील तज्ज्ञ व्यक्ती आम्ही आपल्याला दिली असती की ज्यांनी आपले सारे आयुष्य या शिक्षण क्षेत्रामध्ये झोकून दिलेले आहे. ही 17 सदस्यांची समिती आहे. त्यात 13 सदस्य 'डाएट' या संस्थेचे घेतलेले आहेत आणि ही संस्था सरकारी संस्था आहे. म्हणजेच आपण 13 सदस्य सरकारी अधिकारी घेतले आहेत आणि 14वे सदस्य एका डीएड कॉलेजचे प्राचार्य आहेत. ...

( यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/ 11:15

श्री. दिवाकर रावते...

15 वे सदस्य श्री. शरद पाटील हे सरकारी अनुदानाचे लाखो रुपये घेऊन संस्था चालविणारे सरकारचे मिंधे आहेत. 16 व्या सदस्या फरीदा लांबे यांची मुंबईमध्ये एन.जी.ओ. आहे. गेली दहा वर्षे त्यांनी शालाबाहय मुलांवर संशोधन करण्यासाठी लाखो रुपये घेतले आहेत. आतापर्यंत गेल्या दहा वर्षामध्ये त्यांनी किती प्रयोग केले ते आपण जाहीर करा. अशाप्रकारे ही एक संस्था शासनाकडून कसा पैसा घेत आहे, कुणाच्या मर्जीवर घेत आहे? आतापर्यंत आपण त्यांना 75 लाख रुपयांचे अनुदान दिले. अशी व्यक्ती या कमिटीवर आहे. 17 वे सदस्य वझे महाविद्यालयाचे माजी प्राचार्य असून त्यांचा प्राथमिक शिक्षणाशी काहीही संबध नाही. या समितीने आपला एक पानी अहवाल 19 एप्रिलला कोर्टामध्ये सादर केला. त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षण सचिवांना अहवाल देऊन सांगितले की, अशाप्रकारे धोरण असले पाहिजे. आणि आपले सरकारी अधिकारी त्यांचे मिंधे आहेत. त्यांनी अहवाल देऊन जे सांगितले ते या सचिवांना बरोबर वाटते. सभापती महोदय, कोर्टाने विचारणा केली की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार या चाचण्या बरोबर आहेत काय? कमिटीचे म्हणणे "होय" असे आहे. तुम्ही नेमलेल्या विद्वानांची ही कमिटी आहे. माननीय प्रा. पुरके साहेब आपल्या प्रामाणिकपणावर, आपल्या चांगुलपणावर कोर्टाने मारलेली ही चपराक आहे. तुम्ही या करीता तुमच्या अधिकाऱ्यांना जाब विचारणार आहात की नाही? तुमचा आदर करुन सांगतो की, तुमचा वचक या शिक्षणाधिकाऱ्यांवर नसेल तर काय करणार? त्यांनी विचारले की, तुमचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काय? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेप्रमाणे केंद्राने कायदा बनविल्यानंतर राज्यानी कायदा बनवायचा.आणि केंद्राचा कायदा फॉलोअप करावयाचा. घटनेतील शेडयुल्ड 1, 2, 3 आणि कंकरन्स लिस्टप्रमाणे आतापर्यंत केंद्र धोरण आखते आणि त्याप्रमाणे राज्य सरकार त्याची अंमलबजावणी करते. त्याप्रमाणे केंद्राच्या धोरणाप्रमाणे राज्य सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काय आहे असे कोर्टाने त्यांना विचारले. त्यावेळी दोन आठवडयांनी माहिती सादर करतो असे वकिलांनी कोर्टाला सांगितले. आणि 25 एप्रिलला कोर्टापुढे शासनाची भूमिका मांडली. भूमिका अशापध्दतीने मांडली की, प्रा. पुरके साहेब तुम्हाला पाढे देखील लिहिता येत नाहीत काय? असे आम्हाला विचारावे लागेल. जर या राज्याचे शैक्षणिक धोरण त्या खात्याच्या मंत्र्यांना कळत नसेल तर त्यांनी या खात्यावर राहू नये असे माझे मत आहे. तुम्ही कोर्टामध्ये जे सांगितले त्याबद्दल मी तुम्हाला बोलतो. तसे झाले नसेल तर आज संध्याकाळ पर्यंत तुम्ही राजीनामा सादर करा. तुम्ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे काय सांगितले? "सर्वशिक्षा अभियान".

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) J 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही केंद्र सरकारची योजना आहे, हे धोरण असू शकत नाही. त्या दिवशी कोर्टाने याच्या विरोधात जज्जमेंट डिटेक्ट करावयास घेतले, त्या दिवशी ॲडव्होकेट जनरल श्री. रवि कदम हे कोर्टामध्ये हजर होते. त्यांनी सांगितले की, मी नुकताच माझ्या पदाचा कार्यभार स्वीकारला असल्यामुळे आपण मला दोन आठवडयांचा वेळ द्या, मी अभ्यास करुन येतो, Please do not dictate the judgement . "सर्व शिक्षा अभियान" ही केंद्र सरकारची योजना असून त्यामध्ये काय काय घडते? या योजनेमध्ये राज्यातील प्राथमिक शिक्षणासाठी शाळा खोल्या बांधणे, अपंगांसाठी रॅम्प बांधणे, शिक्षण साहित्य पुरविणे, 500 ते 2000 रुपयापर्यंत मिसलेनियस अकाऊंटमधून खर्च करणे. अशाप्रकारच्या 28 बाबी त्यामध्ये अंतर्भूत आहेत. शैक्षणिक इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यासाठी हा पैसा ऑगस्टपर्यंत खर्च करावयाचा आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

हे तुमचे धोरण आहे काय ? तुम्ही हे कोर्टामध्ये मांडले. तुम्ही महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव घेता, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेता, सावित्रिबाई फुले यांचे नाव घेता आणि त्या मुलांना वंदन करायला लावता. शिक्षण क्षेत्रातील जे अत्युच्च असेल ते महाराष्ट्राने दाखवून दिलेले आहे. राज्याचे शिक्षणाचे धोरण कोर्टात मांडता की ते धोरण असू शकत नाही. कशासाठी तुम्ही हे सगळे केले ? सभापती महोदय, या सर्व प्रकरणामध्ये महानगरपालिकेच्याबाबतीत आणि तुमच्या खर्चाच्याबाबतीत मी आकडेवारी देऊन सांगतो. न्यायालयानेही शासनाने याचा पुनर्विचार करावा असे निर्देश दिले आहेत. परंतु सत्तेच्या उन्मादात याची दखल घेण्याचेही सौजन्य शासनाने दाखविलेले नाही. सन्माननीय श्री. पुरके साहेब मी रोज बारकाईने पहातो की, या सभागृहामध्ये एक दिवस असा जात नाही की शिक्षणाच्या संबंधात शिक्षक प्रतिनिधी प्रश्न उपस्थित करत नाहीत. हा तुमचा दोष आहे. शिक्षक प्रतिनिधींचे जेव्हा प्रश्न संपतील तो तुमचा सुदिन आणि त्यांचे प्रश्न वाढतील तो दिवस तुमच्याकरिता कलंक असेल. सन्माननीय सदस्य प्रा.बी.देशमुख हे सर्वस्व पणाला लावून शिक्षणाचे प्रश्न उपस्थित करतात. सभापती महोदय, महाराष्ट्र शिक्षण परिषद या नावाची संस्था आहे. 'शिक्षण परिषद' ही काय आहे ? शिक्षण मंत्री हे त्याचे अध्यक्ष आहेत, शालेय शिक्षण सचिव हे सचिव आहेत आणि इतर सरकारी अधिकारी आहेत. ही संस्था सोसायटी ॲक्टनुसार नोंदलेली आहे. सर्व शिक्षण अभियान राबविण्यासाठी सरकारचा हस्तक्षेप टाळण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली आहे. हा नवीन उपक्रम घेतलेला आहे. परंतु शेवटी राज्याचा उपक्रम असायला पाहिजे तो येथे दिसत नाही. अपंगांचे रॅम्प तयार करणे, शिक्षण ट्रेनिंगसाठी खर्च करणे, इत्यादि बाबी या शिक्षण अभियानामध्ये आहेत. ही शिक्षकांच्या दृष्टीने चांगली व्यवस्था केलेली आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी यंत्रणा उभी केलेली आहे. परंतु दूरदर्शनवरुन बुलढाण्याचे दृश्य पहायला मिळाले. त्या शाळांमध्ये मुतारी नाही, संडास नाही, झोपण्याची व्यवस्था नाही त्या ठिकाणी शिक्षक कसे जातील ? पैसे कोठे जातात, कोणाच्या खिशामध्ये जातात असा प्रश्न पडतो. त्याचबरोबर दिनांक 26 एप्रिल 2006 नवीन जी.आर काढून गुणवत्ता वर्धन नियंत्रण कक्ष निर्माण केलेला आहे. त्यामध्ये निवृत्तांची व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर साहेब हे नेहमी नाना-नानी पार्कचा उल्लेख करुन त्या ठिकाणी सकाळी वयोवृध्द कसे आनंदित असतात याबाबत सांगतात. श्री.अभ्यंकर हे अधिकारी 31 मे रोजी निवृत्त झाले त्यांची तत्पूर्वीच ही व्यवस्था केली. निवृत्त अधिकारी श्री.भाऊ गवंडे, श्री.मस्के यांची यामध्ये व्यवस्था करण्यात आली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

मला शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठांबद्दल बोलणे बरोबर वाटत नाही.

सभापती महोदय, शिक्षण खात्याच्या शिक्षण परिषदेच्या कार्यक्षमतेवर नजर टाकतो. सन्माननीय मंत्री श्री.पुरके साहेब हे त्याचे अध्यक्ष आहेत. खरे तर त्यांनी कोर्टामध्ये अफिडेव्हीट केलेले आहे त्या संदर्भाने राजीनामा दिला पाहिजे. त्याचबरोबर खर्चाची जबाबदारी स्वीकारुन त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्याही कार्यक्षमतेकडे एक नजर टाकणे अप्रस्तुत ठरणार नाही. सन 2002-2003 साली मंजूर झालेल्या 431.21 कोटी रुपयांपैकी केवळ रु.95.21 कोटी म्हणजे अवघे 22 टक्के निधी खर्च झाला आहे. सन 2003-2004 या वर्षसाठी 757 कोटी रुपये मंजूर झाले आणि त्यापैकी केवळ 363.63 कोटी म्हणजे 44 टक्के रक्कम खर्च झ ाली.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सन 2004-05 या कालखंडामध्ये 856 कोटी रुपये मंजूर होते. त्यापैकी केवळ 45 टक्के रकमेचा विनियोग झाला. सन 2005-06 मध्ये जेमतेम 50 टक्के पर्यंतच निधी खर्च झाला. त्यापैकी 19.25 कोटी रुपये तर 31 मार्चला खर्च करावयाचे म्हणून जिल्ह्याला चेक पाठवून दिला. हे खोटे असेल तर सांगावे. जिल्ह्याची मागणी नव्हती. जिल्ह्याची मागणी नसताना चेक पाठविण्यात आले आहेत. अशा प्रकारे शासकीय खात्यातून केवळ पैसे काढणे आणि जिल्ह्यांना पाठवणे म्हणजे प्रत्यक्ष खर्च करणे नव्हे. असे असतानाही ही धूळफेक आपण केलेली आहे. मुंबई महापालिकेमध्येही हीच अंदाधुदी आहे. मुंबई महापालिकेमध्ये सन 2004-05 मध्ये 31.49 कोटी रुपये मंजूर झाले. त्यापैकी 5,99,93,165 रुपये खर्च झाले. म्हणजे केवळ 19 टक्के निधी खर्च झाला. सन 2005-06 मध्ये तर 35.24 कोटी रुपये मंजूर होते. त्यापैकी 14.18 कोटी रुपयेच खर्च पडल्याचे दाखविण्यात आले. हाही आपल्या अपरिपक्व, अशास्त्रीय आणि अतार्किक चाचण्यांना भरीस घालून आणि त्याबद्दल कोणत्याही प्रकारचा उपचारात्मक प्रशिक्षणाचे नियोजन न करता त्यांना 50 टक्क्याहून कमी संपादणुकीसाठी ब्लॅक डॉट आणि शिक्षा जाहीर करणाऱ्या शासनाने मात्र सर्व शिक्षा अभियानाचे करोडो रुपये 50 टक्केही खर्च करु न शकणाऱ्या कार्यक्षमतेबद्दल शिक्षा करण्याऐवजी सेवानिवृत्तीनंतरही गुणवत्ता वर्धनाच्या कार्यक्रमाची सोय निर्माण करुन देण्याचा आदर्श निर्माण केला आहे. सेवानिवृत्त लोकांचा वृध्दाश्रम सुरु केला आहे.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकणी )** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे. 1.00 वाजता ही चर्चा संपवावयाची आहे. अजून 14 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला वेळ द्यावा. हा प्रस्ताव चर्चेला घेण्यासंबंधी मी आग्रही होतो. उत्तर आम्ही दुपारी ऐकू. सभापती महोदय, मराठी तरुणांना महाराष्ट्राचा इतिहास ठाऊक नाही. हे शिक्षक विद्यार्थ्यांना काय शिकवतात ? पंचायती राज समितीच्या दौऱ्याच्या निमित्ताने मी एका शाळेच्या एका वर्गात गेलो होतो. त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांचे फोटो लावलेले होते. विद्यार्थ्यांना त्या फोटोंची ओळख करुन देऊन नंतर शाळा सुरु करावयास पाहिजे. मला असे दिसून आले की, तेथील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

विद्यार्थी फोटोतील कोणालाही ओळखत नव्हते. त्या शिक्षकांना मेमो द्यावयाचे काय ? त्यांना निलंबित करावयाचे काय ? तुमच्या शिक्षण क्षेत्राचे धिंडवडे काढणारी ही बाब आहे. सभापती महोदय, आपण मघाशी घंटा वाजवली म्हणून मी ते सर्व वाचून दाखवत नाही. माननीय मंत्रिमहोदयांच्या स्टेटमेंटवर वर्तमानपत्रामध्ये एक पत्र छापून आले ते मी वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "अलीकडेच वृत्तपत्रांमधून वाचण्यात आले की, मुंबई महापालिकेत शिक्षण घेणाऱ्या इयत्ता 1 ली ते 7 वी पर्यंतच्या 40 हजार 114 विद्यार्थ्यांना काहीच येत नसून ते विद्यार्थी निरक्षरच राहिले आहेत. अर्थात विद्यार्थ्यांना काहीएक कळत नसूनही प्रत्येक वर्गात उत्तीर्ण केले गेले असाच अर्थ निघतो. मग महापालिकेचे शिक्षणसंबंधात असलेले अधिकारी काय करीत होते ? हे प्रकार वर्षानुवर्षे चालत असणार, मग पालकही स्वस्थ कसे ? शिक्षण क्षेत्रातही अशी अंदाधुंदी असावी याचे आश्चर्य वाटते. याबाबतीत संबंधित शिक्षक तसेच तपासणी अधिकारी यांना जाब का विचारु नये ? म्युनिसिपल शाळेत जाणारे विद्यार्थी हे अत्यंत गरीब परिस्थितीतील असतात." माननीय श्री. पुरके साहेब, आपल्यांकडून आम्हाला एक पत्र आलेले आहे. आपण सर्वांना ते पत्र पाठविलेले आहे. आपण फार मोठे जादूगार आहात. हा चमत्कार तुम्हाला कसा काय जमतो हे कळत नाही. मी या पत्रातील सर्व मजकूर वाचून दाखवत नाही. आपण जादूगार आहात असे मी म्हणालो. आपल्याला नेमके आकडे कसे मिळतात ? अधिकारी कशीही बनवाबनवी करतात आणि तुम्ही ते मान्य करता. त्या पत्रामध्ये असा उल्लेख आहे की, गतवर्षी केलेल्या एका सर्वेक्षणानुसार इयत्ता 2 री ते 7 वीच्या वर्गात शिकणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील 8,31,075 विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नसल्याचे व साधे गणित करता येत नसल्याचे आढळून आले. हा नेमका आकडा कसा काय मिळाला ? साडेआठ लाख असे म्हटले असते तर समजू शकतो. पुढे असे म्हटले आहे की, लेखन-वाचन व साध्या गणिताचे पाठ नित्यनियमाने दिले जातात किंवा नाही, हे पाहण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा गावोगावी फिरली व प्रत्येक शाळेतील लेखन-वाचनाच्या सरावाची खात्री करुन घेतली. त्यामध्ये साडेसात लाखाच्या वर मुलामुलींनी लेखन-वाचन व साध्या गणिताची कौशल्ये आत्मसात केलीत. पायाभूत चाचण्या घेण्यात आल्या असे पुढे म्हटले आहे. पायाभूत अभ्यासाची स्थिती अत्यंत दयनीय असल्याची वस्तुस्थिती समोर आली. पुढे आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. दिवाकर रावते ....

जी आकडेवारी दिलेली आहे त्याबाबत आपले कौतुक करावे की, त्याला आपले अपयश म्हणावे ? अधिकाऱ्यांनी काही तरी चित्र उभे करुन आम्ही शिक्षण क्षेत्राकडे किती पाहात आहोत, आमचे किती लक्ष आहे हे दाखवण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, इयत्ता 1 ली ते 4 थी मधील 64 टक्के विद्यार्थी पायाभूत चाचणीमध्ये उत्तीर्ण झाले आणि 36 टक्के विद्यार्थी अपात्र ठरले. इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये पायाभूत चाचणीत 59 टक्के विद्यार्थी पात्र तर अपात्र विद्यार्थी 41 टक्के असल्याचे दिसून आले.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:30

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

पायाभूत चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या सुमारे 60 टक्के विद्यार्थ्यांपैकी जवळपास 60 टक्केच विद्यार्थी आयोजित केलेल्या तिस-या आशयज्ञान चाचणीत उत्तीर्ण झाले. याचा अर्थ आशयज्ञान चाचणीत उत्तीर्ण होणारे विद्यार्थी 40 टक्के पेक्षाही कमी आहेत. 6 x 4 हा गुणाकार, साध्या शब्दाचा वाक्यात उपयोग आणि इयत्ता तिसरीत असूनही वडिलांचे इंग्रजीत नाव न लिहिता येणा-या मुलांची संख्या 9,14,183 आढळून आली. इयत्ता चवथी मधील 5,24,881 विद्यार्थी 165 भागिले 3 अथवा 483 भागिले 7 हा भागाकार करु शकले नाहीत अथवा CAT या शब्दाशी यमक जुळणारा शब्द लिहू शकले नाहीत. इयत्ता सहावीतील 2,52,358 विद्यार्थी आपल्या शाळेविषयी कोणतेही एक वाक्य लिहू शकले नाहीत. तसेच अपूर्णांकाची वजाबाकी करु शकले नाहीत. थोडक्यात पायाभूत चाचणीमुळे इयत्ता पहिली ते सातवीमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे इंग्रजी, गणित आणि भाषा विषयामधील अत्यंत असमाधानकारक प्रगतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. ही स्थिती अत्यंत चिंतनीय असून समाजातील प्रत्येक जबाबदार व्यक्तीला अस्वस्थ करणारी आहे. सभापती महोदय, विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी यासारखे विषय येत नसतील तर इतर विषय देखील त्याला येणार नाहीत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी आम्हाला पत्र लिहून शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात आमची मदत मागितली आहे. त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे.

माननीय तालिका सभापती महोदय, एका शिक्षिकेने वर्तमानपत्रातून जे मत प्रसिध्द केलेले आहे ते काही बरोबर नाही. त्यांनी असे म्हटलेले आहे की, "जे विद्यार्थी अभ्यासात ढ आहेत त्यांना शाळा सुरु होण्याच्या आधी वा शाळा सुटल्यानंतर एक तास शिकवा, असा आदेश पुरकेच्या खात्याने काढला आहे. शाळा 10 वाजता असते. त्याआधी एक तास म्हणजे सकाळी 9 ला शिक्षकांना शाळेत पोहोचावे लागेल. म्हणजे 8.30ला घरुन निघावे लागेल. पुरके यांनी आमच्या घरची कामे करावीत मग आम्ही सकाळी 7 ला शाळेत जाऊ." आमच्या राज्याच्या शिक्षण मंत्र्यांविषयी अशा प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त करणे योग्य नाही. ही शिक्षिका नोटा मोजून पगार घेते. पुरुषांपेक्षा कमी पगार ती घेत नाही. तर जी जबाबदारी तिच्यावर सोपविली जाते ती तिने पार पाडायला पाहिजे.

माननीय तालिका सभापती महोदय, वर्षा सहस्त्रबुध्दे या लेखिकेने असे म्हटलेले आहे की, मुलांचं अनुभवविश्व, त्यांची भाषा, त्यांच्या वापरातले शब्द यांना सुरवातीच्या वाचन साहित्यात स्थान





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

मिळत नाही. प्रमाण भाषेपेक्षा बोली भाषा कमी दर्जाची असते असेही नकळत मुलांच्या मनावर ठसविले जाते. आपली मराठी भाषा आणि तिचे उच्चार हे प्रदेशानुसार बदललेले आहेत. ग्रामीण भागामध्ये "ओलं" या शब्दा ऐवजी "वंल" असेही म्हणतात. एका विद्यार्थ्याने "ओलं" या शब्दाऐवजी "वंल" असा शब्द लिहिला, ती त्याची चूक धरण्यात आली.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी 40 मिनिटे घेतलेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी दोन-तीन मिनिटांमध्ये माझे भाषण संपविणार आहे.

...नंतर श्री.भोगले..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 11:35

श्री.दिवाकर रावते............

मी शिक्षण क्षेत्रात जो क्रांतीकारी निर्णय घेतला आहे त्याबाबत बोलत आहे. या संदर्भात लोकसत्ता या वृत्तपत्राने एक विचारवंतांचे व्यासपीठ उभे केले होते. अनेक प्राध्यापक, शिक्षक प्रतिनिधी यांचे लेख प्रसिध्द झाले आहेत. वेळेअभावी मी ते वाचणार नाही. परंतु त्यामध्ये एक पत्र अतिशय बोलके आहे. न्यूनगंड विद्यार्थ्यांपेक्षा पालकांमध्ये आहे, परंतु त्यामागे पालक व विद्यार्थी यामध्ये उच्च शिक्षण व नोकरी/रोजगाराविषयी असणारी असुरक्षितता व भयगंड आहे. हा भयगंड शिक्षणाचे बाजारीकरण, शासनाचे धरसोडीचे धोरण व त्यामुळे शिक्षणाचा झालेला खेळखंडोबा यामुळे आहे. मराठी शाळांचे आजी/माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी या पध्दतीला आजवर विरोध केल्याचे दिसत नाही. अन्यथा ही पध्दती इतकी वर्षे अविरोध चालू राहिली नसती. निवडक,गुणवान विद्यार्थ्यांना अधिक मार्गदर्शन देणे व प्रोत्साहन देणे यास फाजील लाड म्हणता येणार नाही. तरीदेखील याला कारणीभूत विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी शासनाने घोषित करणे, वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांनी मुलाखती छापणे, क्लासेस व इतर संस्थांनी बक्षिसे देणे हे फाजील लाड नव्हेत काय? ते काय शाळा करतात? या परिस्थितीत आपले विद्यार्थी गुणवत्ता यादीत यावेत म्हणून शाळांनी लातूर पॅटर्न वा इतर प्रयोग केले तर त्यात गैर काय आहे? त्याच शाळा आपला निकाल 100 टक्के लागावा यासाठी प्रयत्न करतात तेव्हा त्या इतरांकडे दुर्लक्ष करतात असे मानता येणार नाही. परीक्षा पध्दत सुधारण्याची गरज निश्चितच आहे. परंतु आज परीक्षांच्या गुणांवरच सर्व व्यवहार चालत असताना शाळांनी मात्र तुकडया ठरविताना परीक्षेतील गुणांचा आधार घेऊ नये व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वेगळया मार्गाने तपासावी, अशी अपेक्षा ठेवणे अन्यायकारक आहे. एकीकडे खाजगी शिक्षण सम्राटांना मोकळे रान देणाऱ्या शासनाने मराठी माध्यमाच्या शाळांच्या बारीकसारीक गोष्टींमध्ये हस्तक्षेप करावा व त्यांना अडचणीत आणावे हा दुटप्पीपणा आहे. यामागे बोलविता धनी वेगळाच असल्याचा संशय येतो.

सभापती महोदय, एक महत्वाचा व ज्वलंत विषय आहे. ज्या यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा व कार्याचा वारसा आमच्या सभागृहातील हे सर्व नेते सांगतात त्या महान यशवंतरावांनीच सातारच्या सैनिकी शाळेची स्थापना 1960 साली केली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील हुशार, धाडसी, कर्तबगार परंतु गरीब कुटुंबातील मुलांना संरक्षण खात्यातील अधिकारी पदावर नोकरी मिळावी याच एकमेव हेतूने ही शाळा सुरु केली.

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, पाचव्या वेतन आयोगाने शिक्षण क्षेत्राचे कसे वाटोळे केले ते मी थोडक्यात सांगतो. पाचवा वेतन आयोग आणि सेवानिवत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन यामुळे शाळेची फी भरमसाठ वाढविण्यात आली. ती 62 हजाराच्या आसपास आता येऊन पोहोचली. यापुढे ती आणखी वाढेल. त्यामुळे गरीब मराठी मुलांनीही सैनिकी शाळेत शिकून अधिकारी व्हावे हे यशवंतराव चव्हाणांचे स्वप्न भंगले. यापुढे परप्रांतातून श्रीमंत धनदांडग्यांची मुले सातारच्या सैनिकी शाळेत पैशांच्या जोरावर घुसतील व देशात रुबाब गाजवतील.

शाळेचे अधिकारी नामदार अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांना भेटले. यशवंतरावांनी स्थापन केलेले सैनिक स्कूल निधीअभावी बंद पडू देणार नाही. सैनिकी शाळेस कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही असे त्यांनी सांगितले. 5 जानेवारी, 2000 रोजी राज्याच्या अर्थमंत्र्यांनी केलेली ही घोषणा. आज 2006 साल उजाडले तरी अंमलात येऊ शकली नाही. "यशवंतरावांचे स्वप्न, सातारच्या सैनिकी शाळेची शोकांतिका!" या हेडींगने आमच्या दैनिक सामना या वृत्तपत्रात श्री.संजय राऊत यांनी सच्चाई या सदरामध्ये मांडली. आता तरी शासन याकडे लक्ष देईल का?

सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे, आठवीपासून गणिताचा विषय ठेवावा की ठेवू नये याबाबत विचार झाला पाहिजे. गणित असावे की असू नये यावर वाद निर्माण झाले. सन्माननीय शिक्षणमंत्री हे अकोला जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. महात्मा फुले शिक्षण हमी केंद्राबाबत मोठा भ्रष्टाचार चालू आहे. एकाच अधिकाऱ्याने पत्नीच्या नावाने 4-4 शाळा घेतल्या. लाखो रुपयांचे चेक घेतले. एकही विद्यार्थ्याला मुख्य प्रवाहामध्ये आलेला नाही. अशी लयलूट सुरु आहे. मी आपल्याकडे कागदपत्री देतो. आपण पालकमंत्री असल्यामुळे यामध्ये लक्ष घालावे आणि कधीतरी या सभागृहात या संदर्भात कोणती कारवाई केली, वास्तविक क्रिमिनल कारवाई करावी अशी विनंती आहे. 18 वर्षाचा समाजसेवक, त्याने 20 विद्यार्थी आणावेत आणि या पध्दतीने चेक घ्यावेत. नावानिशी भ्रष्टाचाराची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. 10 वी व 12 वी परीक्षा जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्याच्या संदर्भात चर्चा आहे. तेथे होणारा भ्रष्टाचार, त्या संदर्भात तुम्ही जर सी.डी.केली, कॅसेट काढली आणि तेथील पोलीस हवालदार, शिक्षक व त्या भागातील पालक यांना तुरुंगात टाकण्यास सुरुवात केली तर आपोआप भ्रष्टाचार बंद होईल.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

परंतु आपण ते करीत नाहीत. वर्षानुवर्षे जे चालले होते तेच पुन्हा सुरु आहे. यासंदर्भात तुम्ही काहीच करीत नाही. त्यामुळे आता जरी शिक्षणातील उध्दवस्तपणा थांबविला गेला नाही तर त्याचे फार भयानक परिणाम होतील. नवीन पिढीला चांगले शिक्षण कसे मिळेल हे पाहिले पाहिजे, नवीन पिढी जर नामदेवारची पायरी झाली तरच त्यांना विठ्ठलाचे दर्शन मिळू शकेल. असे झाले नाही तर आपल्याला सर्वस्व गमवावे लागेल. आम्ही आपल्याला चांगल्या प्रकारे ओळखतो. आपण ग्रामीण भागातील आहात, आदिवासी आहात, प्राध्यापक आहात, आपले सर्व गुण चांगले आहेत याची आम्हाला माहिती आहे. जर तुम्ही शिक्षण अधिका-यावर विसंबून राहिलात तर आपल्या हातात झोळी घेण्याची पाळी हेच शिक्षण अधिकारी आणतील. तसेच कोर्टात आपल्या विरुध्द जे अफेडेविट झालेले आहे ते चांगले लक्षण नाही. यामध्ये अधिका-यांचा कोणताही संबंध येणार नाही तर याला सर्वस्वी आपणच जबाबदार राहणार आहात. आपली कोर्टापुढे बदनामी होण्यापेक्षा आपण आजच्या आज राजीनामा दिला तर ते उचित होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, विरोधीपक्ष नेते माननीय फुंडकर साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठरावाच्या संदर्भात माझ्या अगोदर माननीय फुंडकर साहेब, दिवाकर रावते यांनी विचार मांडलेले आहेत तसेच माझ्या नंतर सुध्दा अनेक सन्माननीय सदस्य या विषयावर आपले विचार व्यक्त करतील. या ठिकाणी शिक्षणाच्या संदर्भात जे विचार व्यक्त करण्यात आलेले आहे त्यावरुन मला असे वाटते की, राज्याच्या शैक्षणिक धोरणाचे पोस्टमार्टेम करण्याची वेळ आलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वारंवार घेतले जाते. शिक्षणाशिवाय विकास नाही, प्रगती नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. डॉ. बाबासाहेबांनी संपूर्ण देशाला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र दिला होता. ज्या देशाची शैक्षणिक प्रगती चांगली तो देश चांगला असे मानले जाते. खरे म्हणजे शिक्षण हे देशाच्या प्रगतीचे मोजमाप आहे, मापदंड आहे. परंतु या राज्याच्या शिक्षण विभागाने, आघाडी सरकारने आणि शिक्षण मंत्री माननीय पुरके साहेबांनी शिक्षणाच्या संदर्भात काही निर्णय घेतलेले आहेत. राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ कशी होईल? समता, बंधुत्व, न्याय आणि स्वातंत्र्य ही भावना शालेय विद्यार्थ्यांच्या अंतकरणात आणि मनामध्ये कशी निर्माण होईल या दृष्टीकोनातून काही महत्वपूर्ण निर्णय मंत्रीमहोदयांनी घेतलेले आहेत. या ठिकाणी सरस्वती पुजनाच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. आमच्या देशाची अवस्था अशी आहे की, या देशामध्ये एका विशिष्ट वर्गाला शिक्षणाचे अधिकार होते आणि त्यांची ती देवी होती. खरे म्हणजे केवळ ब्राम्हण वर्गालाच शिक्षणाचे अधिकार होते आणि त्यांची ती देवी होती. एक विषमतेचे प्रतिक, या देशातील बहुजन समाजाला दलित, आदिवासी समाजाला ...... ( अडथळा)

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, सरस्वती देवी ही काही विशिष्ट जातीची देवी नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जातीचा उल्लेख करु नये.

**तालिका सभापती** ( ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ) : कृपाकरुन सन्माननीय सदस्यांनी जातीचा उल्लेख करु नये.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ठीक आहे. मी जो ब्राम्हण शब्द वापरला होता तो मागे घेतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

शिक्षण क्षेत्रावर बोलताना बाकीचे लोक वाटेल तसे बोलतात. मी काय बोलतो त्याबद्दल ते त्यांच्या भाषणात खुलासा करु शकतात. या देशामध्ये,राज्यामध्ये विशिष्ट समाजाला शिक्षणाची मुभा आहे. वाटल्यास "ब्राम्हण" हा शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शिक्षण हे विशिष्ट जातीच्या वर्गासाठी होते असे आपण मत मांडले. आम्हालाही आमचे मत मांडता येईल. परंतु "सरस्वती" एका विशिष्ट जातीच्या लोकांसाठी होती अशाप्रकारचे त्यांचे वक्तव्य हे चुकीचे आणि विषयाला सोडून आहे. सन्माननीय सदस्य सुज्ञ आहेत. तेव्हा ते अशाप्रकारचे वक्तव्य करणार नाहीत, असे मला वाटते.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक प्रकारच्या उणिवा, अनेक प्रकारची बजबजपुरी माजली असताना देखील शासनाने एक चांगला निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कालपर्यंत शिक्षण क्षेत्र हे विशिष्ट वर्गासाठी खुले होते. काही वर्गाला ही सरस्वती देवी माहिती नव्हती. सभापती महोदय, आपल्या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये जे थोर पुरुष होऊन गेले त्यांनी वर्ग, वर्ण, जात, शोषणमुक्त समाज व्यवस्था, शोषणमुक्त, समतामूलक, एकसंध समाज निर्माण केला. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषणमुक्त समतामूलक एकसंघ समाज रचनेचे स्वप्न पाहिले होते. या सरकारने घटनेच्या माध्यमातून सर्व थरांतील लोकांना शिक्षण उपलब्ध करुन समान न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच नवीन पिढीमध्ये स्वातंत्र्य, समता आणि समान न्याय ही भावना रुजविण्याचा निर्णय शिक्षणाच्या माध्यमातून उशिरा का होईना पण शासनाने घेतला त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आज शिक्षणाची अवस्था काय आहे ? मग ती प्राथमिक शिक्षण असो, माध्यमिक शिक्षण असो वा महाविद्यालयातील शिक्षण असो या शिक्षण पध्दतीमध्ये अनेक प्रकारची सुधारणा करण्याची आवश्यता आहे. आमच्या दुर्दैवाने शिक्षणक्षेत्रामध्येच केवळ प्रयोग केले जातात. पूर्वीची शिक्षणपध्दती कशी होती हे आपणास माहीत असेलच. पूर्वी एस.एस.सी.नंतर कॉलेज असा पॅटर्न होता. मग एस.एस.सी.नंतर प्री,व नंतर कॉलेज असा पॅटर्न आला. आता 10+2+3

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

अशा प्रकारचा पॅटर्न आला. हे नवीन नवीन बदल फक्त शिक्षण क्षेत्रात होत आहेत. हे सर्व प्रयोग सुरु असताना मुख्य प्रवाहामध्ये अद्यापि बहुसंख्य समाज आलेला नाही, अशी परिस्थिती आहे. जे शिक्षण तज्ज्ञ मंत्रालयामध्ये बसले आहेत त्यांनी या गोष्टीचे भान ठेवणे आवश्यक आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे शिक्षणक्षेत्रामध्ये बजबजपुरी वाढली आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

ज्याप्रमाणे रेल्वेमध्ये ए.सी. क्लास, सेकंड क्लास, जनरल क्लास अशी व्यवस्था आहे त्याच पध्दतीची व्यवस्था शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेमध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमातून, शहरातील नगपालिकांच्या, खाजगी संस्थाच्या माध्यमातून व मोठ-मोठया शहरामध्ये मात्र हायफाय शाळा, कॉन्व्हेंट, कोचिंग क्लासेस अशा प्रकारची शिक्षण व्यवस्था आहे. अशा प्रकारची शिक्षण क्षेत्रामध्ये जी विषमता निर्माण झाली आहे, त्यामुळे एक विशिष्ट अशा प्रकारचा वर्ग वर जात आहे व बहुसंख्य वर्गातील मुलांना मात्र पुढे जाण्याची संधी प्राप्त होत नाही. त्यामुळेच आज शिक्षण क्षेत्रामध्ये समानता नाही. परंतु याठिकाणी गुणवत्तेच्या गोष्टी केल्या जातात. आरक्षणाचा आणि गुणवत्तेचा संबंधच कुठे येतो ? आज गुणवत्तेच्या नावाखाली आरक्षणास विरोध केला जात आहे, हे योग्य नाही. शिक्षण व्यवस्थेमध्ये आज विशिष्ट वर्गालाच पुढे जाण्याची संधी असून बहुसंख्य समाजास पुढे जाण्यास संधी दिली जात नाही. त्यामुळे ही जी व्यवस्था निर्माण झाली आहे, ती बदलणे अत्यंत आवश्यक आहे. आज जात आणि पैसा जेथे आहे तेथेच गुणवत्ता आहे, अशा प्रकारचा गुणवत्तेचा बागुलबुवा करुन मागासवर्गीयांच्या आरक्षणास विरोध केला जात आहे. मूठभर समाजाचे लोक आरक्षणाला विरोध करीत आहेत. आज मागासवर्गीयांच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत अनेक प्रकारचे अडथळे निर्माण करण्यात येते आहे, ही अतिशय चिंताजनक बाब आहे. त्यामुळे याबाबतीत गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. आत्तापर्यंत आपण एक जुलैला शाळा सुरु करीत होतो. परंतु आता ती 12-15 जूनला सुरु केली. याबाबतीत आपण शिक्षकांशी चर्चा करुन त्यांच्या सोयीचा विचार करुन शाळा कधी सुरु करावयाची हे ठरवावे. आज प्राथमिक शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत 8,31,075 मुलांना साधे लिहिता-वाचताही येत नाही, अशा प्रकारची भयानक अवस्था आहे. परंतु वर्ग एक ते सात व आठ ते दहावीच्या शिक्षणाच्या बाबतीत गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने आपण जी प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहात, त्याबद्दल मी शासनास व माननीय शिक्षणमंत्र्यांस धन्यावाद देऊ इच्छितो. परंतु याबाबतीत आपण कोणत्याही प्रकारची हयगय करता कामा नये. आज प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत अनेक प्रकारचे घोटाळे होतात. याबाबतीतील मेरीटची जी यादी प्रसिध्द होते, त्याबाबत कोणाला मेरीटमध्ये आणावयाचे व कोणाला नाही, हेसुध्दा ठरविले जाते. अशा प्रकारचे आरोप अनेक माध्यमातून सतत होतात. विद्यापीठातील बोगस डीग्रीच्या बाबतीतही अनेक घोटाळे होतात. नागपूर विद्यापीठातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

श्री.कोहताळे यांचे आताचे एक ज्वलंत उदाहरण आपल्यापुढे आहे. ते नागपूर विद्यापीठामध्ये असिस्टंट रजिस्टार होते, त्यांनी बोगस डीग्री व बोगस मार्कशीट वाटल्या. अशा प्रकारचे घोटाळे अनेक ठिकाणी चालू आहेत. एम.पी.एस.सी.च्या परीक्षांमध्येही अशा प्रकारचे घोटाळे केले जातात. याबाबतीत कोर्टामध्ये केस चालू असून अनेकांना अटक होऊन जेलमध्येही जावे लागले आहे. त्यामुळे आज शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक प्रकारचे दोष निर्माण झाले आहेत. आज खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या बाबतीत आत्मीयता असावयास पाहिजे, अर्थकारण नव्हे. शासनामध्ये व शिक्षणाच्या बाबतीत चांगल्या प्रकारचा समन्वय असावयास पाहिजे. शिक्षणाच्या बाबतीत आपुलकीची भावना असणे आवश्यक असून ती आपण निर्माण करण्याची अत्यंत गरजेचे आहे. तसेच गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्टा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे........

सभापती महोदय, मागेल त्याला शाळा देता कामा नये तर गरज असेल त्याला शाळा दिली पाहिजे, असे जे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडले त्याच्याशी मी सहमत आहे. कारण, जिकडे-तिकडे पैसे कमावण्यासाठी, धंदा करण्यासाठी आणि राजकारण खेळण्यासाठी शिक्षण संस्थांचा वापर केला जात आहे. राजकीय हिताने शिक्षण क्षेत्रामध्ये वावर केला जात आहे आणि त्यामुळे शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र कलंकित होत आहे. हे सर्व थांबविले गेले पाहिजे. या देशामध्ये, या सरकारमध्ये बहुसंख्य समाजाचे प्रतिनिधत्व करणारी मंडळी निवडून येतात. मंत्री आहेत, आपणही आहोत. मग समाजाचे दु:ख यांना का कळू नये ? त्यांना समाजाचे दु:ख, कष्ट, वेदना का कळत नाहीत ? आणि या दु:खावर प्रेमाने फुंकर मारण्याचे काम सरकारने का करु नये ? असा माझा सवाल आहे. शाळांमध्ये आल्यानंतर कोणती प्रार्थना म्हटली पाहिजे ते आपण ठरवावे. परंतु, मला या ठिकाणी एक सांगावयाचे आहे की, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.खोब्रागडे यांनी एक नवीन उपक्रम त्यांच्या क्षेत्रातील सर्व जिल्हा परिषदांच्या शाळेत सुरु केला होता. भारतीय घटनेच्या प्रिॲम्बलचे वाचन सर्व शाळांमध्ये सुरु केले. त्यानंतर हाच उपक्रम राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या शाळेत सुरु झाला.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : मला सभागृहाच्या हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, या चर्चेसाठी आता केवळ 30 मिनिटांचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे आणि अजून 10 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे उर्वरित 10 सदस्यांनी किती वेळ बोलावे हे त्यांनी स्वत:च ठरवावे व केवळ मुद्दे मांडावेत, अशी माझी विनंती आहे. कारण, ही चर्चा आपल्याला 1 वाजता संपवावयाची आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही चर्चा 1 वाजता स्थगित करुन पुन्हा नंतर घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : परंतु हे कोणी ठरवावयाचे आहे ? किमान 4 वेळा घंटी वाजवून देखील सन्माननीय सदस्य आपले भाषण आटोपते घेत नाहीत. सर्व सन्माननीय सदस्यांनी केवळ मुद्दे मांडले तर हा वेळही आपल्याला पुरेसा होऊ शकतो.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार, अनागोंदी, होणारा गोंधळ संपुष्टात आला पाहिजे आणि त्यासाठी राज्याचे शैक्षणिक धोरण सक्षम कसे होईल, समाजातील सर्व थरातील लोकांना शैक्षणिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासन काय करु शकते, यासाठी खालच्या सभागृहातील व या सभागृहातील सन्माननीय सदस्य, देश व राज्य पातळीवरील शिक्षण क्षेत्रातील तज्ञ यांची एक बैठक घेऊन दिशा देण्याचे काम या सरकारने केले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. यासंदर्भात हे शासन काही करणार आहे काय ? नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.खोब्रागडे यांनी सुरु केलेला भारतीय घटनेच्या प्रिॲम्बल वाचनाचा उपक्रम ज्या प्रमाणे जिल्हा परिषदांच्या शाळेत सुरु झाला आहे त्याचप्रमाणे तो राज्यातील सर्व शाळांमध्ये सुरु करावा, एवढी विनंती मी या निमित्ताने शासनाला करतो आणि वेळेअभावी माझे भाषण आटोपते घेतो.

---------------------

..3............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MHM/

श्री.व्हि.यु.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मला माहित आहे की, आपण मला बोलण्यासाठी जास्त वेळ देऊ शकणार नाही. परंतु, ज्या पध्दतीने शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्तावाढीची प्रक्रिया या शासनाने सुरु केली आहे किंवा सुरु केल्याचे भासविले जात आहे हे आम्हाला कळत नाही. म्हणून मी काही ठराविक मुद्दे या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे ज्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणातून द्यावे, अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, असे भासविले जाते की, शिक्षक काम करीत नाहीत. शिक्षकांना कामाला लावण्यासाठी नैदानिक चाचण्या आणि इतर उपक्रम राबविले जात आहेत, असे शिक्षण मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले आहे व शिक्षकांमध्ये नैराश्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. निश्चितच शिक्षक हे काम करीत आहेत. गुणवत्तावाढीला आमचा पाठिंबा आहे, आपण म्हणाल ते करण्याची आमची तयारीही आहे. परंतु, ज्या पध्दतीने शिक्षकांना नामोहरम केले जात आहे ते दुर्लक्षित करण्याजोगे नाही आणि त्याचा विचार या शासनाने करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ..... 12:00

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे ........

कोणत्याही संघटनांनी शिक्षकांना सुटया वाढवून द्या असे म्हटलेले नाही. आपल्याला क्लोजिंग डे आणि ओपनिंग डे ठरविण्याचा अधिकार नाही. आपण क्लोजिंग डे 2 मे ठरविला आणि ओपनिंग डे 12 जून ठरविला आहे. त्या त्या भागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन क्लोजिंग डे आणि ओपनिंग डे ठरविला जावा. अशा प्रकारचा प्रचार केला गेला की, शिक्षक फक्त सुटया मागतात. सभापती महोदय, क्लोजिंग डे आम्हाला मान्य आहे. परंतु विदर्भाच्या शाळांच्या बाबतीत ओपनिंग डे आम्हाला अजिबात मान्य नाही. कारण जून महिन्यात विदर्भात फार उष्ण तापमान असते. आपण ओपनिंग डेची तारीख पश्चिम महाराष्ट्रामध्ये लावून दाखवा. ओपनिंग डेची 12 जून ही तारीख कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये होती. 12 जून ही तारीख मराठवाडयासाठी योग्य आहे. 12 जूनचा आग्रह न धरता पूर्वीचेच धोरण ठेवण्यात यावे. नैदानिक चाचण्या किती घ्याव्यात ? सकाळी 9.30 वाजता सुरुवात झाली तर संध्याकाळ पर्यंत चालू असतात. याचा मानसिक ताण विद्यार्थ्यांवर पडतो. जो टाईम टेबल ठरविण्यात आलेला आहे तो अजिबात फिजीबल नाही. एवढया मोठया प्रमाणामध्ये चाचण्या घेतल्या तर केवळ चाचण्या होतील, मुलांना शिकविणे कमी होईल.आपल्या काळामध्ये हेच होत आहे. फॉर्मचे रकाने भरले काय एवढेच गट विकास अधिकारी शिक्षकांना विचारत असतात. सभापती महोदय, यामुळे गुणवत्ता वाढणार नाही. नैदानिक चाचण्या कमी करण्यात याव्यात.असे निर्णय घेणारे शिक्षण सचिवांची आता बदली झालेली आहे. विदर्भामध्ये आणि मराठवाडयामध्ये शिक्षकांना मुंडन करावे लागले. 12 शिक्षकांनी मुंडन केले. 20 तारखेला मोर्चा काढण्यात येणार आहे. 1 जुलैला मोर्चा काढयात आला होता. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये मोर्चे निघत आहेत. चाचण्यांच्या संदर्भात संघटनांना, प्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. आपण देखील प्राध्यापक होते. आपण आपल्या कॉन्शसला विचारा की हे योग्य आहे किंवा नाही. सुप्रिम कोर्टाच्या निर्णया प्रमाणे शिजविलेले अन्न द्यावयाचे आहे. प्रा.रामकृष्ण मोरे शिक्षण मंत्री असतांना ..... आपण लादलेली योजना फिजीबल नाही. आता शाळेमध्ये काय सुरु आहे तर खिचडी शिजविणे ? 3-3 महिने ग्रॅन्ट मिळत नाही. भंडारा जिल्हयातील पवनी तालुक्याचे गट शिक्षणाधिका-यांची चौकशी करण्यात यावी. त्यांनी माया जमा केली आहे. ते मुख्याध्यापकांना सांगतात की, 3 महिन्यांचा ॲडव्हान्स शिजविलेल्या अन्नासाठी द्यावयाचा आहे. 10 टक्के पैसे मागतात. ते सांगतात

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे ........

की, शिजविलेल्या अन्नाचा 3 महिन्यांचा ॲडव्हान्स द्यावयाचा आहे. आपण शिजविलेल्या अन्नासाठी निधी देता. पण हा निधी योग्य कामा करिता खर्च होत नाही.याची आपण चौकशी करावी.माझ्र याकडे मुख्याध्यापकांची सही असलेले पुरावे आहेत.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये गांभीर्याने लक्ष घालावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अतिशय गांभीर्याने याकडे लक्ष दिले जाईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे पैसे स्वतंत्र विभाग करुन खर्च करतात. रिटायर्ड झालेल्या लोकांना 30 हजार रुपये पगार दिला जातो. प्रशिक्षणाच्या नावाखाली वर्षभरामध्ये 24 प्रशिक्षण दिले जातात. प्रशिक्षणासाठी एक-दोन शिक्षकांना बोलाविले जात नाही. प्रशिक्षणासाठी 5 वी ते 10 वीच्या सर्व शिक्षकांना बोलाविले जाते. म्हणून प्रशिक्षण देणे थांबवा आणि योग्य असेल तरच प्रशिक्षण द्या. फक्त पैसे खर्च करण्यासाठी प्रशिक्षण देऊ नका. गरज नसतांना विना अनुदानित शाळांचे वाटप केले.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डायगव्हाणे ....

सभापती महोदय, 'कायम' असा बोर्ड हे लावत नाहीत तर खाली बारीक अक्षरामध्ये तसे लिहितात. बोलणे बरोबर नाही पण ही वस्तुस्थिती आहे. लोक म्हणतात की, एक एक शाळा किती मध्ये विकली हे सांगा. आता या बाबतीत कोर्टामध्ये जे काही व्हायचे ते होऊ द्यात. परंतु बाहेर चर्चा आहे की, कमीत कमी दोन तीन लाख रूपये तरी यासाठी घेतले जातात. ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी संबंधितांची नावे दिली तर त्याची गांभीर्याने दखल घेता येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, गरज नसताना याचा मास्टर प्लॅन बदलला. श्री.फाटक साहेब या विभागाचे सचिव असताना त्यांनी जे सांगितले होते ते बदलले आणि यांनी आपल्या मर्जीतच्या, आप्तांच्या वगैरे संस्थांना शाळा दिल्या. त्यामध्ये मग यांच्या पी.ए.ने देखील जमवून घेतले. आप्तांच्या संस्थांना शाळा दिल्या गेल्या आहेत. असे दलाल तुम्ही नेमत असाल तर....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी हेही नाव सांगितले तर बरे होईल, मला त्याची दखल घेता येऊ शकेल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, श्री.पाटील नावाचे यांचे पी.ए. आहेत. आता पी.ए. जिल्ह्यासाठी देखील नियुक्त करावे लागत आहेत., मग हे पी.ए. आमच्या शिक्षणाधिकाऱ्यांना म्हणतात मी माझ्यासाठी देखील पहा ना, मी मंत्र्याचा पी.ए. आहे. मी आमच्या लोकांना सांगितले की, तुम्ही अजिबात या गोष्टी मानू नका. मी येथेही स्पष्टपणे सांगू इच्छितो की, आपण अशा प्रकारे दलाली करणाऱ्यांना जवळ घेत असाल तर आम्ही ते अजिबात सहन करणार नाही. सभापती महोदय, मी येथे पीए चे नाव घेऊन उल्लेख केलेला आहे. आमचे शिक्षणाधिकारी वर्ग 1 चे अधिकारी आहेत आणि हे पीए पट्टीवाले. पण तरीही त्यांचा मान मोठा कारण म्हणे मी साहेबांचा पी.ए. आहे. सभापती महोदय, शाळांच्या बाबतीत सांगावयाचे तर आपण आवश्यक तेथे जरूर शाळा द्या. पण मास्टर प्लॅन प्रमाणे द्या. आता तर अनुदानित शाळा बंद होऊन राहिल्या आहेत आणि विना अनुदानित शाळांचे पेव फुटलेले आहे. त्यामुळे आपण दिलेल्या शाळांच्या बाबतीत आपण पुनर्विचार करावा. 1400-1500 शाळा देऊ नका. दुसरे असे की, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत जो निधी केंद्र सरकारचा येतो, प्रशिक्षणासाठी तो निधी उपलब्ध होतो. पण तो आपण बीडीओला देत

..... टी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. राईट पर्सनला देत नाही. तुम्ही सादील खर्च देखील अजिबात देत नाही. सादील खर्च म्हणून यांना दरडोई 15 रूपये देता येतात. त्यामध्ये एक चहा 2 रूपयांचा आणि नाष्टा 3 रूपयांचा वरचे 10 रूपये यांच्या खिशात जातात. आम्ही म्हणतो कशासाठी याचा धंदा करता आहात ? याने गुणवत्ता वाढत नाही. पण आपले अधिकारी म्हणतात आम्ही वर पैसे द्यावे लागतात. म्हणून मग हे असे पैसे घेतले जातात. तेव्हा यामध्ये केवळ केंद्राचा पैसा आहे, तो मिळतो आहे म्हणून असे आपण समजू नका. ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासंबंधातील नावे सन्माननीय सदस्यांनी दिली तर दखल घेणे सोयीचे होईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, प्रशिक्षणाची संख्या कमी करावी, वैधानिक चाचण्या कमी कराव्यात. तसेच शाळांची तारीख जी आपण बदलली आहे त्याचा फेरविचार करावा. सर्व शिक्षा अभियान संबंधात हिशोब घेऊन चौकशी करावी. तसेच आपण ज्या शाळा देत आहात त्याबाबत देखील फेरविचार करावा एवढे सांगून मी माझे भाषण थांबवितो.

**तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) :** यानंतर सन्माननीय सदस्य श्री.तावडे बोलतील. ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या प्रस्तावावरील चर्चेनंतरचे मंत्र्यांचे उत्तराचे भाषण आपण नंतर घ्यावे. कारण अजून बरेच सदस्य या चर्चेमध्ये भाग घेऊ इच्छित आहेत.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपल्या प्रतोदां मार्फत नावे पाठवावयाची असतात. आपल्यापैकी अनेकांची नावे माझ्याकडे आलेली नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण या चर्चेवरील उत्तर दुपारी घ्यावे ...

**तालिका सभापती :** ते शक्य होणार नाही. कारण दुपारी पुन्हा नियम 260 खाली चर्चा आहे. तेव्हा आता आपल्याला वेळ कमी असल्याने आपण देखील अधिक भाषण न करता मुद्दे मांडावेत. मी आपणास एवढेच सांगू इच्छितो की, ज्या चर्चेला जेवढा वेळ द्यायचा आहे तो दिला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शिक्षणावरील चर्चेला तरी आपण महत्त्व द्यावे.

**तालिका सभापती :** आपण आपले भाषण लवकर सुरू करावे.

( यानंतर श्री.सरफरे .... यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज सभागृहामध्ये या महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित झाली हे बरे झाले आहे. कारण ही चर्चा आज जर काही कारणामुळे पुढे ढकलली गेली असती तर आपल्याला ही चर्चा ठाण्याच्या कारागृहामध्ये किंवा जे. जे. हॉस्पिटलमध्ये घ्यावी लागली असती. उच्च न्यायालयाने माननीय श्री. सुरुपसिंग नाईक यांना कोर्टाचा अवमान केल्याबद्दल जी शिक्षा दिली होती, त्यानंतर ते ठाणे कारागृहामध्ये आजारी पडल्यामुळे जे.जे. हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्यामुळे ते ठाणे कारागृहामध्ये कमी परंतु जे.जे. हॉस्पिटलमध्ये जास्त काळ होते. त्याप्रमाणे प्रा. पुरके साहेबांना देखील आज कोर्टाच्या निकालाला सामोरे जावे लागणार आहे. माननीय श्री. सुरुपसिंग नाईक यांच्याप्रमाणे त्यांनी कोर्टाच्या आदेशाचा अवमान केल्याबद्दल ठाणे कारागृहामधून जे.जे. हॉस्पिटलमध्ये जावे लागले तर आपल्याला ही चर्चा जे.जे. हॉस्पिटलमध्ये घ्यावी लागली असती. माननीय उच्च न्यायालयाने बंदी घातली असतांनाही त्यांनी वडिलांच्या नावाने काढलेल्या संस्थांना परवानगी देऊन उच्च न्यायालयाचा निर्णय धाब्यावर बसविला. आणि म्हणून या प्रकरणासंबंधी त्यांनी आजच्या चर्चेच्या वेळी उत्तर दिले पाहिजे. तेव्हा हे वास्तव असेल तर हायकमांडचा आदेश येण्यापूर्वी प्रा.पुरके साहेबांनी या पदावरुन गेलेले बरे.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी हे आणि मी विद्यार्थी चळवळीमध्ये काम करीत होतो. त्यावेळी या देशातील शैक्षणिक स्थिती कशी आहे यासंबंधी आम्ही एकमेकांना किस्से सांगायचो? अशाप्रकारे एका शाळेमध्ये इन्स्पेक्शन होणार असते त्यावेळी शाळेतील शिक्षक मुलांना आपल्या शाळेमध्ये उद्या इन्स्पेक्शन होणार असल्यामुळे आणि इन्स्पेक्टर तीन प्रश्न विचारणार असल्यामुळे उद्या तीन प्रश्नांची उत्तरे पाठ करुन या असे सांगतात. त्या वर्गामधील मुलांची स्थिती शिक्षकाला माहीत असते. त्या वर्गामध्ये नंबर 1 वर पास होणारा विद्यार्थी आहे त्या विद्यार्थ्याला इन्स्पेक्टर विचारणार असलेल्या तीन प्रश्नाची उत्तरे पाठ करुन येण्यास सांगितले जाते. 1 नंबरचा विद्यार्थी शिक्षकांना मी नक्की ही उत्तरे पाठ करुन येतो असे सांगून घरी जातो. त्याला घरी गेल्यानंतर उद्या भारत-पाकिस्तानमध्ये वन डे मॅच असल्याचे समजते. त्यामुळे तो विद्यार्थी शाळेला दांडी मारुन घरी राहतो. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे इन्स्पेक्टर शाळेमध्ये येतात. त्यावेळी नं. 24 वर असलेल्या विद्यार्थ्याला इन्स्पेक्टर प्रश्न विचारतो. परंतु त्या विद्यार्थ्याला प्रश्नाची उत्तरे देता येत नाहीत. त्यावेळी इन्स्पेक्टर नंबर 1 ने उत्तीर्ण होणारा विद्यार्थी कोण

श्री.विनोद तावडे....

आहे? असे विचारतो. नंबर 24 वर असलेला विद्यार्थी मी नंबर 1 ने उत्तीर्ण होणारा विद्यार्थी असल्याचे सांगतो. इन्स्पेक्टरने प्रश्न विचारतांना क्रम बदलून नंबर 3, त्यानंतर 2 व नंतर नंबर 1 चे प्रश्न विचारतो. परंतु विद्यार्थ्याला यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. इन्स्पेक्टर वर्ग शिक्षकाला विचारतो की, खरा नंबर 1 चा विद्यार्थी कुठे आहे? शिक्षक सांगतात की, खरा नंबर 1 चा विद्यार्थी घरी टी.व्ही. वर मॅच बघत आहे. त्यानंतर इन्स्पेक्टर नंबर 24 चा विद्यार्थी कोण आहे ते सांगा असे विचारतात. त्यावेळी वर्गशिक्षक नंबर 24 चा खरा विद्यार्थी कोण आहे हे मला माहीत नाही. कारण खरा वर्गशिक्षक हा घरी टी.व्ही. वर मॅच बघत आहे, त्याच्या ऐवजी मी या वर्गामध्ये आलो आहे असे सांगतात. त्यावेळी इन्स्पेक्टर म्हणतो की, तुमचे नशीब समजा खरा इन्स्पेक्टर घरी राहून मॅच बघत राहिला नसता तर तुमची नोकरी गेली असती. अशाप्रकारच्या घटना माननीय श्री. सुरेश शेट्टी आणि आम्ही सांगत असू. यामधील वास्तव असे आहे की, ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये किती रस आहे, आणि ज्या शिक्षकांना मुलांना शिकवायचे आहे ते किती प्रामाणिकपणे शिकवितात हे जर आपण पाहावयाचे ठरविले तर त्यामध्ये आपल्याला वास्तवता दिसेल. त्यामध्ये काही अपवादही असतील. परंतु ज्यांनी ही वास्तवता अनुभवली आहे ते ही गोष्ट अमान्य करणार नाहीत.

सभापती महोदय, शिक्षणाच्या विकासाकरीता 5 टक्के रक्कम खर्च केली पाहिजे.माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाल्याप्रमाणे 2.1 टक्क्यावर हा खर्च आलेला आहे. दहाव्या पंच वार्षिक योजनेमध्ये शिक्षणासाठी अडीच हजार कोटींची तरतूद केली आहे. त्यामधील 1 हजार कोटी रुपये पाटबंधारे आणि पूर नियंत्रणाच्या कामाकडे वळविले आहेत. ही वास्तविक आकडेवारी बजेटचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला दिसेल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 12:15

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु....

म्हणजे अडीच हजार कोटी नियतव्यय होता. त्यातील एक हजार कोटी रुपये पाटबंधारे विभागाकडे वळविले. कोणत्याही विभागाकडे रक्कम कमी पडली, की शिक्षण विभागाचा गळा कापायचा आणि या विभागाची रक्कम कमी करुन दुसऱ्या विभागाला द्यायची, असा प्रकार चाललेला आहे. शिक्षण मंत्री साधे आहेत, त्यांचे राजकीय वजन आहे असे वाटत नाही. सन्मानीनय श्री.अटलबिहारी वाजपेयी साहेब पंतप्रधान असताना त्यांनी 'सर्व शिक्षण अभियान' सुरु केले. सर्व शिक्षण अभियानामार्फत जे पैसे आले, त्यातील निधी कधी 22 टक्के, कधी 44 टक्के, कधी 19 टक्के असा खर्च केलेला आहे. मंजूर केलेला निधीसुध्दा आपण पूर्ण खर्च करु शकलेला नाही. कारण राज्य सरकारला यामध्ये 25 टक्केचा निधी द्यावयाचा असतो. तो 2002-2003 मध्ये साडे चार टक्के, सन 2003-2004 मध्ये साडे अकरा टक्के दिलेला आहे. यामध्ये राज्य शासनाने जो निधी द्यायला पाहिजे होता तो निधी कधीच दिलेला नाही. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये 86 टक्के निधी वापरलेलाच नाही. शहरी शिक्षणाच्याबाबतीत 73 टक्के निधी वापरला नाही. सर्व शिक्षण अभियानामध्ये 44 टक्के 19 टक्के निधी खर्च झाला. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सांगितले की, सन्माननीय मंत्री श्री.पुरके साहेब हे संत आहेत. परंतु याची जबाबदारी अधिकाऱ्यांकडे जात नाही, तर शिक्षणमंत्र्यांकडे जाते. त्यांना पैसा खर्च करता आलेला नाही, हे त्यांचे अपयश आहे. सन्माननीय मंत्री हे साधे, सरळ, संत आहेत असे म्हणून चालणार नाही. ते अकार्यक्षम असतील तर त्यांनी खूर्ची सोडावी आणि त्या खुर्चीवर कार्यक्षम व्यक्तीला बसू द्यावे. त्यांनी आमच्या पिढीचे नुकसान करु नये.

सभापती महोदय, राजीव गांधी सुरक्षा विमा योजना आपण सुरु केली. त्यासाठी अडीच कोटीची तरतूद केली. त्यापैकी फक्त 80 लाख रुपये खर्च केलेले आहेत. ही योजना चांगली आहे. सायकल खराब झाली तर विद्यार्थ्याला या योजनेतून दुरुस्त करुन मिळणार होती. विद्यार्थ्यांचे प्रिमियम भरले गेलेले आहे. या संबंधात मी सर्व्हे करण्याचा प्रयत्न केला असता शाळेच्या मुख्याध्यापकांना याची काहीही माहिती नसल्याचे आढळले. याचा फायदा आपण किती मुलांना देऊ शकलेला आहात ? बजेटमध्ये मात्र यावर आपण मोठमोठी भाषणे केली. अशाप्रकारे कोणाचा क्लेम आला नसेल तर हा पैसा वाया घालविण्याचे कारण काय आहे ? सभापती महोदय, शालेय शिक्षणाच्या विषयामध्ये अनेक गोष्टींचा उल्लेख या पूर्वीच्या वक्त्यांनी केला. शिक्षणाच्याबाबतीत सांगायचे तर ग्रामीण भागातील शालेय शिक्षण असेल, उच्च शिक्षणाचा विचार करावयाचा असेल तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे(पुढे सुरु....

त्या स्तरावर शासनाची ग्रॅन्ट येत नाही. मुंबईपासून कोकणापर्यन्तचा 730 कि.मी.च्या भागामध्ये वर्सोवा सोडला तर एकही फिशरीजची युनिव्हर्सिटी नाही, कॉलेज नाही. बी.एड, बी.कॉम, याची कॉलेजेस खूप काढलेली आहेत.

श्री.दिलीप देशमुख (बसून) : मासे कसे पकडावयाचे याचे शिक्षण देणार आहात काय ?

श्री.विनोद तावडें : फिश एक्स्पोर्ट केल्यानंतर किती पैसे मिळतात, याची आपल्याला माहिती आहे काय ? आपण वित्त राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे, त्यामुळे आपल्याला त्याची माहिती असायला पाहिजे. फिशच्या व्यवसायावर मच्छिमारांचे जीवन अवलंबून असते. त्या ठिकाणी मच्छिमारांच्या मुलांना सहा महिन्याचे, चार महिन्याचे शिक्षण मिळाले असते. फक्त एम.आय.डी.सी.चे प्लॉट घेऊन त्या ठिकाणी संस्था काढायच्या एवढाच पयत्न होतो.

श्री.दिलीप देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. मला उद्देशून सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयाचा उल्लेख तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

श्री.विनोद तावडे : एमआयडीसीच्या प्लॉटवर शिक्षण संस्था काढल्या जातात, एवढेच मी म्हणालो. मला त्यांनी डिवचले नसते तर हा प्रश्न आला नसता.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

त्यामुळे गप्प बसणे कधीही हिताचे असते. माननीय मुख्यमंत्री काहीही झाले तरी शांत बसतात तसे आपण करा. त्यामुळे कोणी आपल्या अंगावर येणार नाही. सभापती महोदय, मुंबई हे महानगर आहे. दूरदर्शवर खूप चॅनेल्स सुरु झालेले आहेत. आमची फिल्म इन्स्टिटयूट पुण्यामध्ये आहे. लाखो लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळतो. अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून नव्हे तर बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणून लाखो लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. परंतु त्यांच्या प्रशिक्षणाची कोणतीही ठोस योजना नाही. या ठिकाणी महामुंबई येणार आहे. ते जनतेच्या किती फायद्याचे आहे याचा विचार करावा. मुंबई आता हळूहळू सर्व्हिस इंडस्ट्री म्हणून डेव्हलप होत आहे. त्या सर्व्हिस इंडस्ट्रीसाठी आवश्यक असणारे शिक्षण मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये उपलब्ध करुन देणार काय ? ती व्यवस्था कलकत्ता, दिल्ली या ठिकाणी असल्यानंतर तिकडचे बिहार आणि उत्तरप्रदेशचे लोक त्या ठिकाणी शिकतात आणि या ठिकाणी येतात. या महाराष्ट्रातील माणसे तशीच बेरोजगार राहतात. आयपीसीएलमध्ये सगळे बाहेरचे लोक आहेत. त्या ठिकाणी महाराष्ट्रातील किती भूमिपुत्रांना नोकरी मिळाली ? पाच वर्षानंतर जो विकास करावयाचा आहे त्याच्या शिक्षणाची व्यवस्था आज करणार आहात काय ? याचा नक्की विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जे.जे.हॉस्पिटल आहे. महाराष्ट्रातून, बाहेरगावाहून जे पेशन्ट्स येतात त्यामध्ये प्रत्येक आमदाराला दोन चार पेशन्ट्सना जे.जे.हॉस्पिटलमध्ये पाठवावे लागते. जे.जे. हॉस्पिटलला एम्सचा दर्जा दिला पाहिजे अशी आम्ही सातत्याने मागणी करतो. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने आवश्यक तो निधी देण्याची गरज आहे. त्याचा ठोस विचार सरकारने केला आहे काय ? जे.जे.हॉस्पिटला एम्सचा दर्जा दिल्यानंतर त्यातून आरोग्याच्या सुविधा, शिक्षणाच्या सुविधा प्राप्त होणार आहेत. जे.जे.हॉस्पिटल केवळ मुंबईमध्येच नाही तर ते महाराष्ट्रातील हॉस्पिटल आहे. महाराष्ट्रातील सामान्य माणसांचे उपचारासाठी येण्याचे ते ठिकाण आहे. त्यासाठी विशेष योजना करण्याची गरज आहे. याचा विचार शासनाने केला पाहिजे. ते विचार का होत नाही ? आमच्याकडे मास एज्युकेशन आहे पण आमच्याकडे पैसा नाही. सर्व शिक्षा अभियानामध्ये पैसे आले परंतु आम्ही एवढे कर्मदरिद्री आहोत की, आम्ही त्याचा उपयोग करु शकलो नाही.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. विनोद तावडे.....

बाकीच्या राज्यांनी सर्व पैसे उचलले. आंध्र प्रदेशने 100 टक्के पैसे उचलले. मध्यप्रदेशने पैसे उचलले. गुजरात राज्य नेहमीच पैसे घेऊन जातात. त्यामुळे मी भारतीय जनता पक्षाची राजवट असलेल्या राज्यांचा उल्लेख करीत नाही. आपण योजना केल्यानंतर 80 टक्के रक्कम परत का जाते ? आपण अहवालात सांगितले आहे की, जिल्हाधिकारी हे कमिटीचे अध्यक्ष आहेत आणि त्यांना बैठक घेण्यास वेळ मिळत नाही आणि त्यामुळे योजनेची पूर्तता करता आली नाही. मग जिल्हाधिकाऱ्यांना अध्यक्ष म्हणून का नेमले ? ज्यांना वेळ देता येत नाही त्यांना अध्यक्ष म्हणून का ठेवले ? या सगळ्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. हे सरकार विद्यार्थ्यांच्या पिढ्या न पिढ्यांचा बळी देत आहे. ज्या पिढ्या घडवावयाच्या आहेत त्या न घडविता केवळ आपली अकार्यक्षमता दाखवतात. अकार्यक्षमता हा सुध्दा भ्रष्टाचारच आहे. मिळालेल्या संधीचा उपयोग न करणे, जनतेला त्याचा फायदा करुन न देणे यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये पिढ्याच्या पिढ्या बरबाद होत आहेत. त्यामुळे त्या खुर्चीवर बसणाऱ्या व्यक्तीला दुसरे चांगले खाते द्यावे. शिक्षणासारख्या खात्यामध्ये विद्यार्थ्यांच्या पिढ्या न पिढ्या बरबाद करण्याचे काम चालले असेल तर ते ताबडतोब थांबवावे एवढेच या प्रस्तावाच्या निमित्ताने सांगून मी माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : या प्रस्तावावरील चर्चेची 36 मिनिटे उरलेली आहेत. उत्तरासाठी माननीय मंत्रिमहोदयांना किती वेळ लागणार आहे ?

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, उत्तर दुपारी ठेवावे.

**उपसभापती** : या प्रस्तावावरील चर्चेसाठी अडीच तासाचा वेळ दिलेला होता. सकाळी 10.30 वाजता चर्चा सुरु झाली.

श्री. अरविंद सावंत : या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर संध्याकाळी ठेवावे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:25

श्री. दिवाकर रावते : या प्रस्तावावरील माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर निवृत्त होणा-या माननीय सदस्यांना द्यावयाच्या निरोपानंतर घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : माननीय उपसभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. शिक्षण हा विषय खूप मोठा असला तरी शिक्षण क्षेत्राचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात मी काही सूचना करणार आहे आणि माननीय मंत्री महोदयांकडून काही अपेक्षाही व्यक्त करणार आहे.

पाहिला मुद्दा असा आहे की, प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील राज्याच्या 7 विभागापैकी 6 विभागातील मुलींनी शिक्षणामध्ये जी प्रगती केलेली आहे तिची दखल घेणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीमुळे मुलींची शिक्षणामध्ये गळती होते. इयत्ता 10वी पर्यन्तच्या शिक्षणामध्ये मुलांची 50 टक्के आणि मुलींचे 55 टक्के गळती होते असे महाराष्ट्राच्या आर्थिक पाहाणी अहवालामध्ये म्हटलेले आहे. या पार्श्वभूमीवर रात्रशाळा, अपंग शाळा या प्रत्येक क्षेत्रामध्ये मुलींनी खूप मोठी आगेकूच केलेली आहे. प्राथमिक शिक्षण परिषद आम्ही तयार करणार आहोत असे शासना तर्फे वारंवार जाहीर करण्यात आलेले आहे. या प्राथमिक शिक्षण परिषदेमध्ये कोणकोणते तज्ज्ञ घेण्यात येणार आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट केले तर बरे होईल. शिक्षणाच्या दर्जा संदर्भात "असर" या संस्थेने असे म्हटलेले आहे की, प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना वजाबाकी आणि भागाकार येत नाही. 6 ते 14 वयोगटातील 5 लाख मुले शाळेत जात नाहीत. 1 टक्का मुलांनी शाळेत पाऊल टाकलेले नाही. माननीय मंत्री महोदय हे प्राध्यापक आहेत. त्यांनी श्री.भालचंद्र नेमाडे या सर्जनशील साहित्यिकाने ग्रामीण भागातील प्राध्यापकाची होणारी कोंडी यासंबंधी चार कांदब-या लिहिलेल्या आहेत. त्या वाचल्या तर शिक्षण क्षेत्रातील बारकाव्यांची अधिक उमज होईल. शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात काय काय केले पाहिजे यासंबंधी श्रीमती मेधा लिमये यांनी दै. "लोकसत्ता"मध्ये लेख लिहून त्यांनी त्यांचे अनुभव कथन केलेले आहेत. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये ज्या तज्ज्ञांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावले जाते त्यांनाच त्या विषयाचे सखोल ज्ञान नसते. त्यामुळे शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या कामातील चैतन्य हळूहळू कमी कमी होत चाललेले आहे. तेव्हा शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी कोणते ठोस प्रयत्न केले जाणार आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी सांगणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 12:30

डॉ.निलम गोऱ्हे...........

दुसरा भाग आहे त्यामध्ये आपण जे इन्स्पेक्शन करतो, त्यावेळी मोठमोठया शहरातील महानगरपालिकेच्या शाळा पाहिल्या किंवा खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळा पाहिल्या. किती मुले, मुली आहेत, तेथे काय सोयी-सुविधा दिल्या जातात याचे व्यस्त प्रमाण दिसते. ज्या शाळा चांगल्या ट्रडिशनच्या आहेत तेथे शेकडो विद्यार्थ्यांच्या संख्या वाढून सुध्दा स्वच्छतागृहांची संख्या अपुरी, खिळखिळी, गलिच्छ असल्यामुळे त्या शाळेतील मुले आसपासच्या भिंती रंगवतात. या वरवर छोट्या गोष्टी वाटल्या तरी पावसाळ्याच्या दिवसात ग्रामीण व शहरी भागामध्ये दुर्लक्षित मुद्दा वाटला तरी अतिशय महत्वाचा आहे. सभापती महोदय, शिक्षण विभागाकडून सातत्याने दोन घोषणा होतात. इंग्रजी आणि गणित काढून टाकणार. दुसरीकडे घोषणा होते की, पहिलीपासून गणित आणि विज्ञान इंग्रजीतून केले जाईल. नक्की काय करणार आहात? आपण सगळेजण जे शिकलेले लोक आहोत, त्यांना माहिती आहे की, एकच भाषा सहा वर्षापर्यंत शिकली तर त्या मुलाची बुध्दी आणि मेंदूचा विकास चांगल्याप्रकारे होऊ शकतो. एकाच वेळी दोन-तीन भाषा सहा वर्षाच्या आत शिकण्यास ठेवल्या तर मेंदूवर ताण येतो. ज्ञान वाढविण्यापेक्षा भाषांतर करुन एकच शब्द जसे वाघाला टायगर असे शब्द लक्षात ठेवण्यात वेळ जातो. सहा वर्षापर्यंत एकच भाषा असली पाहिजे. त्यानंतर वेगवेगळया भाषांचा उपयोग करु शकतो हे तज्ज्ञांनी सांगितले. अनेक तज्ज्ञांमुळे गोंधळला असाल. परंतु ही आवश्यक गोष्ट आहे. याबाबत ठोस भूमिका घेतली पाहिजे. सभापती महोदय, 108 शिक्षकांना कॉपी करताना पकडले असे वाचनात आले. शिक्षक मतदारसंघामध्ये खोटी नावे नोंदविली गेली या गंभीर गोष्टी आहेत. म्हणून प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढवित असताना प्रशिक्षणाचा दर्जा वाढवावा लागेल. माध्यमिक शिक्षण त्याचबरोबर महाविद्यालयाबाबत एक बातमी नुकतीच चॅनेलवर पाहिली. विल्सन महाविद्यायातील प्रा.आठवले यांना एनएसयुआयच्या प्रतिनिधींनी तोंडाला काळे फासल्याची घटना घडली. दोन मते सातत्याने येतात. विद्यार्थी संघटनेने या संदर्भात प्राध्यापकांची भूमिका घेतली आहे. 10 जागा दरवर्षी विद्यार्थी संघटना-एनएसयुआयला मिळत होत्या, त्या मिळणार नाहीत म्हणून ही घटना घडली काय याबद्दल काय चौकशी केली? यु.जी.सी.च्या नियमानुसार प्रत्येक विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील मुलींची छेडछाड रोखणे याबाबत उपाययोजना केली पाहिजे. ही स्थिती असताना विल्सन महाविद्यालयातील समिती काय करीत होती? विद्यार्थ्यांनी कायदा आपल्या हातात

..2..

SGB/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 12:30

डॉ.निलम गोऱ्हे..........

घेतल्यानंतर प्राध्यापकांची धिंड काढली जाते. शिक्षक आणि पोलीस बघ्याची भूमिका घेतात आणि स्वत: धिंडीमध्ये सहभागी असल्यासारखे वागतात. म्हणून मला असे वाटते की, विल्सन महाविद्यालयातील घटनेच्या संदर्भात चौकशी समिती नेमून ज्या विद्यार्थ्यांनी या प्रकारची गुंडगिरी कॅम्पस्वर 10 जागांचे प्रवेश मिळविण्यासाठी केली असेल त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. प्रत्येक महाविद्यालयामध्ये समिती करुन हे गैरव्यवहार टाळले पाहिजेत. मुलींच्या संख्येचे प्रमाण शाळेत वाढले आहे याला महत्वाचे कारण म्हणजे उपस्थिती भत्ता हे आहे. सावित्रीबाई फुले दत्तक योजना यासारख्या योजनेची माहिती बचत गटांमध्ये पोहोचल्यामुळे संख्या वाढली आहे. पुण्यामध्ये भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांनी पहिली शाळा सुरु केली. त्या शाळेची इमारत बिल्डरकडे गेल्यामुळे महानगरपालिकेने हस्तक्षेप न केल्यामुळे ती शाळा आणि वास्तू उद्ध्वस्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली असून हा प्रश्न अनिर्णीत आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने महानगरपालिकेला अनुदान देण्यास भाग पाडून या शाळेचे जतन केले पाहिजे एवढे सांगावेसे वाटते. विल्सन महाविद्यालयाच्या घटनेबद्दल चौकशी समिती नेमून याबद्दलची वस्तुस्थिती समोर आली पाहिजे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

---------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) :सभापती महोदय, सन्माननीय विरोधीपक्ष नेते फुंडकर साहेबांनी शिक्षणाच्या संदर्भात जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी व काही सूचना करण्यासाठी मी उभा आहे. जेव्हा विद्यापीठाच्या संदर्भात बील आले होते त्यावेळेस सुध्दा मी शिक्षणाच्या संदर्भातील माझे विचार व्यक्त केले होते. आजच्या ठरावावरील सर्वात प्राथम्य हे प्राथमिक शिक्षणाला आहे. जर विद्यार्थ्यांचा प्राथमिक शिक्षणाचा पाया व्यवस्थित नसेल तर त्याला काहीही अर्थ राहणार नाही. प्राथमिक शिक्षणाचे महत्व किती आहे हे प्रथम महात्मा फुले यांनी विल्सन हंटर आयोगास 1882 साली सादर केलेल्या शैक्षणिक कैफियतमध्ये सांगितले आहे. महात्मा फुले यांनी स्वत: स्त्री शिक्षणाच्या संस्था काढल्या होत्या. शिक्षणाच्या संदर्भात त्यांचे एक ब्रह्म वाक्य आहे.

" विद्ये विना मती गेली,
मती विना निती गेली,
निती विना गती गेली,
गती विना वित्त गेले,
वित्त विना शुद्र खचले
एवढे अनर्थ एका अविद्येने केले."

सभापती महोदय, जसा मातीला आकार दिला जातो त्या प्रमाणे लहान मुलांना प्राथमिक शिक्षणानेच आकार दिला जातो. परंतु आता प्राथमिक शिक्षणात दोन पध्दती अवलंबविण्यात आलेल्या आहेत. एक म्हणजे विना अनुदानित शाळा व दुसरे म्हणजे खाजगी शाळा, इंटर नॅशनल शाळा. सभापती महोदय, इंटरनॅशनल शाळेत तर के.जी. साठी 2-2 लाख रुपये डोनेशन घेतले जाते अशी परिस्थिती आहे आणि दुस-या बाजूला जिल्हा परिषदेच्या, महानगर पालिकेच्या शाळेतील 2500 रुपये एवढया कमी वेतनावर शिक्षकांना काम करावे लागते. आज शिक्षणामध्ये ही जी काही विषमता आहे त्या विषमतेचे दूरगामी परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहेत. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला विचार करण्याची आवश्यकता आहे. मला सांगावयास अभिमान वाटतो की, मी महानगर पालिकेच्या शाळेतून शिक्षण घेतलेले आहे. त्यावेळी महानगर पालिकेच्या शाळेत फार जबरदस्त शिक्षक होते. आताही जबरदस्त शिक्षक असतील परंतु त्यांची संख्या मात्र फार कमी असेल. सभापती महोदय, माझ्या गावातील शाळेचा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Z-2

SGJ/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. भोगले ... 12:35

श्री. अरविंद सावंत ......

एसएससीचा रिझल्ट 100 टक्के लागतो. या शाळेचा रिझल्ट 100 टक्के लागतो यामध्ये खरे म्हणजे शिक्षकांचाच सिंहाचा वाटा आहे. पूर्वी ज्या पध्दतीचे शिक्षक दिसत होते त्या पध्दतीचे शिक्षक मात्र आता फार कमी दिसतात. आता शाळेतील शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाहीत तसेच शिक्षकांना शैक्षणिक कामात न गुंतवता अशैक्षणिक कामात गुंतविले जात आहे त्यामुळे या गोष्टीचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. जे शिक्षक मराठी माध्यमातून शिकलेले आहेत त्यांच्याकडून काही विषय इंग्रजी माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु ज्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहेत ते शिक्षक कसे काय इंग्रजी शिकवू शकतील . असे जर झाले तर शिक्षणाचा बो-याच वाजेल. शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये वेळ जाऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल. आता चाऊस डिक्शनरी सुध्दा उपलब्ध आहे. आम्हाला आमच्या शाळेत तरखडकराचे इंग्रजी ग्रामर सुध्दा शिकविले जात असे. आम्ही जेव्हा महानगर पालिकेच्या शाळेतून हायस्कूलमध्ये गेलो तेव्हा सुध्दा मी वर्गात हायस्कूलच्या मूळच्या विद्यार्थ्यांच्या पुढे होतो. अशा प्रकारचे प्राथमिक शिक्षण त्यावेळी मिळत होते. आज शाळा बाहय मुलांचे प्रमाण धक्कादायक आहे. ज्या शाळेतील शिक्षकांना पगार मिळतो त्या ठिकाणी शिकविले जाते व ज्यावेळेस शिक्षकांना पगार मिळत नाही तेव्हा शिक्षणाचे काम बंद होते, शाळा बंद होतात. माननीय शरद पवार साहेबांनी सांगितले आहे की, महाराष्ट्र साक्षरतेच्या संदर्भात नागालँड पेक्षाही मागे आहे. आज शाळा बाहय मुलांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण बिहार राज्यामध्ये 13.5 टक्के, उत्तर प्रदेश 7.3 टक्के, राजस्थानमध्ये 10.4 टक्के, आंध्र प्रदेशमध्ये 7.4 टक्के, ओरिसामध्ये 8.9 टक्के, गोव्यामध्ये 0.3 टक्के, केरळमध्ये 1.6, कर्नाटमध्ये 1.9, उत्तरांचलमध्ये 2 टक्के आपल्याकडे हे प्रमाण 2.8 टक्के आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण नंदूरबार जिल्ह्यात 16.38 टक्के, ठाणे जिल्ह्यात 7.21 टक्के, बीड जिल्ह्यात 6.54 टक्के, गडचिरोली जिल्ह्यात 6.21 टक्के आणि औरंगाबाद जिल्ह्यात 5.74 टक्के आहे. सभापती महोदय, मी काल इंडिया टी.व्ही. या न्यूज चॅनेलवर एक न्यूज पाहिली. मुंबईत झ ालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. काही झ ोपडपट्टयांमध्ये पाणी साचल्याचे दृश्य दाखविण्यात आले. त्याठिकाणी एका कुटुंबातील व्यक्तीला विचारण्यात आले की, तुमची मुले शाळेत गेली काय ? त्यावर त्या व्यक्तीने उत्तर दिले की नाही, आमची मुले कधीच शाळेत जात नाही. अशी आपल्याकडे शिक्षणाच्या बाबतीत अवस्था आहे. आपण सर्वशिक्षा अभियान राबविले. सर्व थरातील मुलांना शाळेत आणले पाहिले हा त्यामागील उद्देश आहे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण देणे हा सुध्दा या अभियनाचा संकल्प आहे. याचा देखील आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मला चांगले आठवते की, आमच्या वेळेला अकरावी एस.एस.सी. होती आणि गणितामध्ये दोन प्रकार होते. एक हायर मॅथॅमॅटीक्स आणि लोअर मॅथॅमॅटीक्स. मला सांगावयाचे आहे की, आजच्या काळात विद्यार्थ्यांना व्यवहारिक गणित आले पाहिजे. विद्यार्थ्यांना गणिताची गोडी लागावी म्हणून शिक्षकांनी त्यांना खेळीमेळीने गणित शिकविले पाहिजे. फिजिक्स विषयाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर आपण कॅरम खेळताना सोंगटीला अशा विशिष्ट दिशेने मारल्यास ती सोंगटी पॉकेटमध्ये जाते. ही बाब फिजिक्स विषयाशी निगडीत आहे. तेव्हा विद्यार्थ्याला फिजिक्स शिकविण्यापूर्वी विद्यार्थ्यांना कॅरम खेळण्यास दिल्यास त्याचा फायदा त्यांना होऊ शकतो. आताचे युग हे आय.टी.चे आहे. गणित विषयाने केवळ व्यावहारिक फायदे होतात असे नव्हे तर संपूर्ण व्यक्तीमत्व सुधारते, स्वावलंबन, आत्मविश्वास, विचारांचा नेमकेपणा, एकाग्रत कल्पकता, शोधकता, परिपूर्णता अशा अनेक गुणांची जोपासणे होते. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र या सारख्या अत्यंत वेगाने प्रगती करणा-या ज्ञानशाखांमध्येही गणिताचीच भाषा आहे.

..2..

श्री.अरविंद सावंत...........

सभापती महोदय, कला आणि हस्तकला हे विषय हद्दपार होत आहेत. हे विषय सुध्दा विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजेत. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण दिले पाहिजे. सैनिकी शिक्षण शाळांकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. महाराष्ट्रात सैनिकी शाळा कमी आहेत. महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतीत मागे आहे हे मंत्रिमहोदयांनी स्वत: मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, आता शिक्षणक्षेत्रामध्ये टक्केवारीची स्पर्धा सुरु झालेली आहे. विद्यार्थ्यांना कमी टक्के मिळाले की त्यांना नैराश्य येते. तेव्हा विद्यार्थ्यांना रोजगार सदृश्य शिक्षण देण्याची गरज आहे. शेवटी जाता जाता एकच सांगतो की, प्राथमिक शिक्षणामध्ये हमाल निर्माण करु नका. शैक्षणिक क्षेत्रामध्ये धंदा निर्माण करु नका. शिक्षण हे व्यवसाय होता कामा नये. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो शिक्षण विषय प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, सुरुवातीस विचार व्यक्त करताना मी अण्णासाहेब कर्वेंचा उल्लेख करणार आहे, त्यांनी महिलांच्या शिक्षणास प्राधान्य दिले. सावित्रीबाई फुले यांनी सन 1948 मध्ये मुलींसाठी सर्वप्रथम भिडेवाडा येथे पहिली शाळा सुरु केली. तो दिवस महिला मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. परंतु आज प्रत्यक्ष अशी परिस्थिती आहे की, अनेक जिल्हयांमध्ये 50 टक्केपेक्षाही अधिक मुली अजूनही अशिक्षीत आहेत. गळतीच्या प्रमाणातही मुलींचे प्रमाण जास्त असल्याचे आपणांस दिसून येते. खरे म्हणजे, मुलींची शिकण्याची इच्छा असते, परंतु त्यांना शाळेमध्ये जाता येत नाही. आताच 10-12 वीचा निकालातील गुणवत्ता यादीमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त असल्याचे आपणांस दिसून आले. 7 विभागांपैकी 6 विभागांतून मुली प्रथम आलेल्या असून त्यांनी आपली गुणवत्ता सिध्द केलेली आहे. परंतु मागसवर्गीय जिल्हयांतील मुलींची शिकण्याची इच्छा असते, परंतु त्यांना शाळेमध्ये जाता येत नाही. त्यावर उपाययोजना म्हणून सर्व शिक्षा अभियान आणले, परंतु त्याचे धिंडवडे निघाले. याबाबतीत श्रीमती संजीवनी बोकील या कवयत्रीने आपल्या कवितेच्या माध्यमातून फार सुंदर वर्णन केले आहे. ती कविता मी वाचून दाखवते..

"माये ग माये नग तोडू माजी साळा
लई लई शिकुन मोठ व्हायचय मला
परवा आमच्या बाई, म्हनल्या का नाई
तुमची पोर डोक्यान लई बेस हाई
तवादूर एकच सपान पडतय मला
लई लई....
बेबीताई देनार हाईत त्यांची बुकं
वहयानाच पडतील बघ तेवढ पैकं
रिबीन नगं, नग पैक खायाला
लई लई....

(..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

फाट उठीन रंग्या-मंग्याला बगीन
भाकरी बी भरा-भर थापून टाकीन
अन बकरीची घाण लोटून
जाईन पाण्याला
लई लई....
मी जाणते ग माये
तुज्या काळजाच्या कळा
पाच कच्ची-बच्ची अन
दारुडा दादला, पन
मी हाये ना, तुझ्यासंग दु:ख झेलाया
माये ग माये....
अन माये,
जवा लई शिकून
नंबर काडीन मी पयला
तवा तुझ्या डोळ्यात
आसू येतील घळाघळा
तुजा आसु माज्यासाठी
हाय सोन्याची गोळा.
माये ग माये....

अशा प्रकारे अनेक मुली आपल्या आई-वडिलांकडे आग्रहाची मागणी करीत असतात, परंतु पालक हताश असल्यामुळे त्यांना पुढे शिकवू शकत नाहीत. अशावेळी शासनाने अशा गोष्टीकडे गांभीर्याने पहाण्याची आवश्यकता असते. आताच सांगितल्याप्रमाणे आपल्या देशाच्या कृषिमंत्र्यांनी खंत व्यक्त केली की, महाराष्ट्र साक्षरतेच्या बाबतीत नागालँडच्याही मागे आहे. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनीही लोकमतला बोलताना खंत व्यक्त केली की, तिसरीपर्यंत परीक्षाच नसल्याचे विद्यार्थी चौथीत गेल्यानंतरही त्यांना लिहिता वाचता येत नाही, हे मीच म्हणते असे नाही तर शासनाने

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे....

केलेल्या सर्वेक्षणामध्ये आले आहे. अशा प्रकारची दशा आज शिक्षणाच्या बाबतीत झालेली आहे. स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 31 लाखांच्या वर विद्यार्थ्यांना साधे लिहिता आणि वाचताही येत नाही वा त्यांना अंकाची ओळखही नाही. आम्ही पंचायती राज समितीच्या माध्यमातून राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांना भेटी दिल्या, त्यावेळी आम्हाला राज्यातील शाळांची परिस्थिती दिसून आली. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून केंद्र शासनाकडून करोडो रुपये आले, परंतु त्याचा योग्य उपयोग होत नाही, याबाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज शाळांमध्ये मुलांना बसण्यासाठी बस्तर पट्टया नाहीत, वर्गांमध्ये फळे नाहीत, मुलांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही वा मुलांना पोषण आहारही मिळत नाही. मुलांना मापाचे युनिफॉम दिले जात नाहीत, अशा प्रकारचे विदारक चित्र आज आपल्या शाळांमध्ये पहावयास मिळते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानण्याची संकल्पना पुढे आली असताना आपण गुणवत्तेकडे दुर्लक्ष करीत आहात.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे..........

गुणवत्तेकडे दुर्लक्ष करुन पैसा हा केंद्रबिंदू करु लागलो आहोत की काय अशी शंका येते. शाळेमध्ये शिक्षकही काही प्रमाणात पाटया टाकण्याचे काम करीत आहेत. ठाणे ग्रामीण भागामध्ये मला जाण्याचा योग आला. त्या ठिकाणी एका शिक्षिकेने अशी खंत व्यक्त केली की, विस्तार अधिकारी शाळेमध्ये येणार असल्यामुळे त्यांना शाळेचा निकाल चांगला लागला आहे असे भासावे म्हणून मुख्याध्यापिकेने त्या शिक्षिकेला नापास विद्यार्थ्यांचे पेपर्स डाव्या हाताने लिहिण्याची सूचना केली. मी त्या शाळेचे नांव माननीय मंत्रीमहोदयांकडे पाठविणार आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानाचा 85 टक्के निधी पडून आहे. शिक्षणात आमुलाग्र बदल करणार अशी घोषणा शासनाने केलेली आहे. प्रत्यक्षात गरज तेथे शाळा याऐवजी मागेल त्याला शाळा अशा प्रकारे शाळांची खिरापत वाटण्याचे काम सुरु झालेले आहे. शिक्षणामध्ये सुधारणा करण्याऐवजी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या संस्था चालकांना शाळांचे बेसुमार वाटप चालले आहे. अशा प्रकारे वाटप झालेल्या शिक्षण संस्था मात्र शिक्षकांवर अत्याचार करीत आहेत. एवढया संख्येने शाळांचे वाटप झालेले आहे की, शिक्षकांना एप्रिल व मे महिन्यांमध्ये घरोघरी जाऊन आमच्या शाळेमध्ये प्रवेश घ्या असे पालकांना सांगावे लागते अन्यथा त्यांची नोकरी टिकत नाही. याकडेही शिक्षण मंत्र्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शासनाने परिपत्रके काढण्याचा सपाटा लावला आहे, परिपत्रकांचा नुसता भडिमार सुरु आहे परंतु प्रत्यक्षात कोणत्या परिपत्रकानुसार कामकाज करावयाचे हे न समजल्यामुळे आजही 55 टक्के विद्यार्थी 10 वी इयत्तेपर्यन्त पोहोचू शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे. मराठी शाळांमध्ये गणित आणि विज्ञान पहिलीपासून इंग्रजीत शिकविण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मांडलेला आहे. एकिकडे गणित ऐच्छिक विषय असावा, अशा प्रकारची मागणी होत असतांना अशा प्रकारे विसंगत भूमिका शासन का घेत आहे ? याचे उत्तर माननीय शिक्षण मंत्र्यांनी आपल्या उत्तरात दिले पाहिजे. इंग्रजी शाळेतील विज्ञान आणि गणित यासारख्या मुलभूत विषयातील संकल्पना या भिन्न बाबी आहेत. त्यामुळे याचाही विचार करणे गरजेचे आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी असे म्हटले आहे की, मुलांना मातृभाषेत लिहिता वाचता येत नाही. मग जर मातृभाषेतच त्यांना लिहिता-वाचता येत नसेल तर पहिलीपासून इंग्रजीमध्ये ही मुले कसे काय शिकणार आहेत ? असा प्रश्न निर्माण

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS/

श्रीमती कांता नलावडे.........

होतो. गळतीचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही आणि शिक्षकांच्या कामाच्या बोजाबाबत पाहिले तर शासनाच्या प्रत्येक मोहिमेमध्ये अगदी नशाबंदी, निवडणुकीपासून ते केबल सर्वेक्षणापर्यन्त शिक्षकांचा सहभाग असतो, त्यांना ही कामे दिली जातात. शिक्षकांमध्ये सुध्दा आता कंत्राटी पध्दत आल्यामुळे शिक्षण सेवक या गोंडस नावाने वेठबिगारीची प्रथा पुन्हा सुरु झाली आहे किंवा कसे ? असा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही. शिक्षकांची मानसिकता सुदृढ असेल तर ते विद्यार्थ्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देऊ शकतात. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत क्रमिक पुस्तकांबरोबरच व्यावसायिक शिक्षण देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर हस्तकला आणि कार्यानुभव या विषयांचा देखील समावेश करणे गरजेचे आहे. केवळ समावेश करुन भागणार नाही तर हे विषय सक्तीचे केले पाहिजे आणि या विषयांसाठी वेगळया शिक्षकांची नेमणूक केली पाहिजे. शासनाने पर्यावरण हा विषय सक्तीचा केलेला आहे. परंतु, या विषयाची पुस्तके अद्याप उपलब्ध झालेली नाहीत. त्याचप्रमाणे या विषयांसाठी वेगळया शिक्षकांची नेमणुकही केलेली नाही. अशी परिस्थिती असेल तर पर्यावरण हा विषय सक्तीचा करुन काय उपयोग होणार आहे ? त्यामुळे शाळेमध्ये काय शिकविले जाते याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. 'शिक्षणाचा विकास' हा केंद्रबिंदु मानून 'विकास शाळा' नावाची एक संस्था ग्रामीण भागातील वाडयावस्त्यांमध्ये राहणा-या मुलांना 7 वी पर्यन्त शिक्षण मिळावे म्हणून मोठया प्रमाणावर काम करीत आहे. अशा विकास शाळांना शासनाने प्राधान्य दिले तर शाळाबाहय मुले या विकास शाळांमध्ये येऊ शकतात व आपले शिक्षण पूर्ण करु शकतात. त्याचप्रमाणे डॉ.उदय निरगुडकर यांनी 'मल्टिनॅशनल युनिव्हर्सिटी' अशा प्रकारचे एक आर्टिकल वर्तमानपत्रात लिहिले आहे. या लेखामध्ये दूरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमातून मुलांना शिक्षण देऊ शकतो असा एक नवीन कार्यक्रम त्यांनी सूचविलेला आहे. यासंदर्भात मंत्रीमहोदयांना काही करता आले आणि वाडयावस्त्यांमधील मुलांना शिक्षणाची संधी निर्माण करता आली तर पहावे, अशी माझी विनंती आहे. आज आपण पाहिले तर शिक्षण क्षेत्राचा खेळखंडोबा चालला आहे. शिक्षणा संदर्भात शासनाचे नक्की धोरण काय आहे ? याबद्दल माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात स्पष्टिकरण करावे, अशी मी विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

----------------

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ..... 12:55

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमचा अनुभव असा आहे की, आम्ही दिलेली नावे आपल्याकडे दिली जात नाहीत. आपण वेळ ठरवून दिली पाहिजे.

**उपसभापती** : वेळ ठरवून दिल्यानंतर वेळेचे पालन होत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सकाळी 10.30 वाजता आम्ही सदस्यांच्या नावांचा क्रम दिलेला आहे. आम्ही 3 तासापासून सभागृहामध्ये बसलेलो आहोत. सचिव आपल्याकडे नावे देत नाहीत.

**उपसभापती** : दिलेला क्रम पाळावयाचे म्हटले तर एखाद्या सदस्याची विनंती येते की, मला गाडी पकडावयाची असल्यामुळे मला बोलण्याची संधी द्यावी.

श्री.मधुकर चव्हाण : काल आम्ही नावे दिली होती. आम्ही दिलेली नावे आपल्याकडे देण्यात आली नव्हती.

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, मी फक्त सूचना करणार आहे. विना अनुदानित शाळांचे महाराष्ट्रामध्ये पेव फुटलेले आहे. एका शाळेला भेट देण्याचा मला प्रसंग आला होता. त्यावेळी मी त्या शाळेतील शिक्षकांना विचारले की, तुम्हाला किती पगार मिळतो ? त्यावर ते शिक्षक असे म्हणाले की, पगाराचे तर सोडूनच द्या, आम्ही स्वत:च्या पैशातून ही शाळा चालवित आहोत. आपण आमदार आहात. आपण आमची तक्रार सरकारपर्यंत पोहोचवा. घर चालविण्या इतका पगार या शाळेतील शिक्षकांना द्यावा, अशी आमची विनंती आहे. या शाळेतील 90 टक्के शिक्षक ट्रेनी आहेत. या ट्रेनी शिक्षकांकडून मुलांना कशा प्रकारचे शिक्षण दिले जाणार आहे ? याचा आपण विचार करावा. शालेय पोषण आहार पाचवी पर्यंत दिला जातो. माझी अशी विनंती आहे की, शालेय पोषण आहार सातवी पर्यंत देण्यात यावा. तसेच, शालेय पोषण आहारामध्ये होणारा भ्रष्टाचार थांबविणे देखील तितकेच गरजेचे आहे. शहरातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार मुलांपर्यंत पोहोचत नाही. फक्त बिले तयार केली जातात. शहरातील मुलांपर्यंत शालेय पोषण आहार पोहोचत नाही. महात्मा फुले शिक्षा अभियान फक्त कागदोपत्रीच आहे. हे अभियान मुलांपर्यंत कसे पोहोचेल यासाठी योजना आखण्यात यावी. भटक्या विमुक्त जातीच्या ऊस तोड

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ........

कामगारांच्या मुलांसाठी शासनाने सुविधा सुरु केलेल्या आहेत. धनगर समाज महाराष्ट्रातील कानाकोप-यामध्ये फिरत असतो. त्यांचा संसार घोडयावर असतो. हजारो धनगरांची मुले आजही शिक्षणापासून वंचित आहेत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या मुलांसाठी आपण डोंगर शाळा सुरु कराव्यात किंवा मोबाईल शाळा त्यांना उपलब्ध करुन द्याव्यात. प्रत्येक मुलांना सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे असे सरकारचे धोरण आहे. हे सक्तीचे शिक्षण या भटक्या धनगर समाजातील मुलांना दिले गेले पाहिजे अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे. सभागृहाची वेळ संपली आहे..

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षांपासून एसएससी चे निकाल पाहिल्यास ग्रामीण भागातील मुले ही जास्तीत जास्त प्रमाणात, जवळपास लाखाच्या वर मुले नापास झालेली आहेत. ती कोठे कमी पडली ? त्या मागील महत्त्वाचे कारण म्हणजे लोड शेडींग. 12-12 तास घरात अंधार असेल तर त्या मुलांनी अभ्यास करायचा कसा ? तेव्हा या मुलांच्या आयुष्यात उजेड आपण आणावा अशी विनंती मी करतो आणि शेवटी मुंबईतील झोपडपट्टयांतील मुलांची एक मागणी आहे ती सांगून मी भाषण संपविणार आहे. ...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता 1 वाजून गेला आहे. 1.00 वाजता सभागृहाची ही विशेष बैठक संपणार होती. मध्ये 15 मिनिटांचा गॅप घेऊन सभागृहाची नियमित बैठक आपल्याला सुरू करावयाची आहे, त्यात प्रश्नोत्तराचा तासाने सुरूवात करावयाची आहे. तेव्हा मला वाटते की, आता सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांचे भाषण मी येथे थांबवितो.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्या विभागाशी संबंधित केवळ एकच मुद्दा या चर्चेमध्ये मांडला गेला आहे, तेव्हा त्यावर दोन वाक्यामध्ये उत्तर देण्याची आपण मला परवानगी द्यावी.

**उपसभापती** : आता सभागृहाच्या या विशेष बैठकीची वेळ संपली आहे आणि 1.15 वाजता आपल्याला प्रश्नोत्तरापासून सभागृहाच्या नियमित बैठकीला सुरूवात करावयाची आहे. तेव्हा या प्रस्तावावरील ही चर्चा आणि त्यावरील मंत्र्यांचे उत्तर हे सभागृहाच्या नियमित बैठकीचे कामकाज संपल्यानंतर पुढे घेण्यात येईल.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर ही चर्चा घ्यावी. कारण नंतर उशीराने चर्चा घेतल्यास, माझ्या उत्तराच्या भाषणाच्या वेळी सर्व सदस्य येथे असतीलच असे नाही. अनेकांनी या चर्चेत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. तेव्हा त्यांच्या समोर मला त्याबाबत खुलासा करता येईल.

**उपसभापती** : याबाबतीत मी माननीय सभापतींशी बोलतो आणि नंतरच तसे ठरविता येईल. परंतु आता सभागृहाची ही विशेष बैठक मी स्थगित करतो आणि सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल असे जाहीर करतो.

(सभागृहाची बैठक 1.02 वाजता स्थगित झाली.) (यानंतर श्री.सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल सभागृहाचे कामकाज सुरु होते आणि मुंबईमध्ये धो-धो पाऊस पडत होता. त्यावेळी भिवंडी शहराच्या मध्यवर्ती भागातील क्वॉर्टर गेट परिसरामध्ये पोलीस स्टेशन आणि एस.पी. कार्यालयाचे बांधकाम सुरु होते. हे सुरु असलेले पोलीस स्टेशनचे बांधकाम तोडण्यासाठी शकीब रझाक याच्या नेतृत्वाखाली दुपारी अडीच वाजता हजारो कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या विरोधात मोर्चा काढला. हा मोर्चा बांधकाम थांबविण्यासाठी होता. पोलिसांनी त्यांना खूप समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु जमाव हिंसक झाला होता. "अल्ला हो अकबर" अशाप्रकारे नारे देत त्या मोर्च्याने हिंसक वळण घेतले. पोलिसांनी समजाविण्याचा प्रयत्न करुनही त्यांना न जुमानता त्यांनी पोलिसांवर हल्ला केला. त्यामध्ये पोलीस आयुक्त श्री.देशभ्रतार, पोलीस उपायुक्त श्री. शिंदे, व दोन पोलीस अधिकाऱ्यांना मार लागला. फावडे आणि इतर शस्त्रांनी पोलिसांना मारहाण करण्यात आली. यामध्ये 2 उपायुक्त, 2 सहआयुक्त, 4 पोलीस निरीक्षक, 35 पोलीस कर्मचारी इतके जखमी झाली. त्यानंतर हा जमाव निजामपूर पोलीस स्थानकावर चालून गेला. भिवंडी येथील क्वॉर्टर गेट भागातील जागेवर रझा अकादमी कब्रस्तान कमिटीने दावा सांगितला आहे. पोलिसांचे म्हणणे असे की, ही जागा पोलिसांच्या मालकीची आहे. गेल्या 50 वर्षापासून पोलिसांची मालकी या जागेवर आहे. तरीसुध्दा ही जागा मशिदीसमोर असल्यामुळे त्या जागेवर आमचा हक्क आहे, तेव्हा पोलिसांनी बांधकाम करु नये. रझा अकादमी कब्रस्तान कमिटी या संघटनेने त्या ठिकाणी मुस्लिम बांधवाना भडकवून आणि कायदा हातामध्ये घेऊन पोलीस स्टेशनवर हल्ला केला. मशिदीसमोर पोलीस स्टेशन झाले तर त्याठिकाणी ज्या धर्मांध कारवाया चालतात त्या बंद होतील या भीतीने त्यांनी विरोध केला. यापूर्वी या राज्यामध्ये अनेक वेळा मुस्लिमांच्या भावना भडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. वेगवेगळया संघटनांच्या माध्यमातून अतिरेकी कारवायांनी महाराष्ट्र व्यापून टाकला आहे. औरंगाबाद, मालेगाव सारख्या ठिकाणी आरडीएक्स सापडले आहे. अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये स्फोटक परिस्थिती असतांना सरकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

जागेवरील बांधकाम जबरदस्तीने थांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशाप्रकारचा मेसेज महाराष्ट्रामध्ये गेला तर मशिदीसमोरील सरकारी जागेवर अतिक्रमण करुन त्याठिकाणी अनेक इमारती उभ्या राहतील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

जमावाने पोलिसांवर दबाव आणला आणि पोलिसांवरच हल्ला केलेला आहे. ही गंभीर घटना आहे. भिवंडी येथे 144 कलम लावलेले आहे, जमाव बंदी आहे, हे सकाळी दूरदर्शनवर पहायला मिळाले. लोकांच्या भावना भडकविण्याचा काहींनी प्रयत्न केल्याचे बोलले जाते. जोपर्यन्त त्या ठिकाणचे बांधकाम थांबविण्याचा सरकार निर्णय घेणार नाही, तोपर्यन्त दंगल थांबणार नाही, अशाप्रकारची धमकी दिली जाते. तेव्हा आजचे सभागृहाचे सर्व कामकाज थांबवून या विषयावर चर्चा करावी, अशी आपल्याला विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजचा दिवस भयानक बातमीने उजाडला. खरे म्हणजे काल हा प्रकार घडला. पोलीस स्टेशन हे जनतेच्या संरक्षणासाठी असते. अनेक वेळा पोलीस स्टेशनची मागणी लोकप्रतिनिधींच्या भूमिकेतून केली जाते. त्याप्रमाणे त्या ठिकाणी पोलीस स्टेशन आणि पोलिसांची इमारत बांधण्याचे काम चालले असताना, हे काम त्या ठिकाणी होऊ नये म्हणून हजारो मुस्लीम गुंड आले. एक प्रकारचे जातीय वळण संपूर्ण प्रकरणाला दिले गेले. त्यांनी त्या ठिकाणचे काम जबरदस्तीने थांबविले. बांधकाम करणाऱ्यांना धमक्या दिल्या,जबरदस्तीने काम थांबवायला लावले. अशा परिस्थितीमध्ये पोलिसांनी हस्तक्षेप करण्यासाठी म्हणून उपायुक्त दर्जाचे अधिकारी त्या ठिकाणी गेले, त्यांच्याबरोबर 30-35 पोलीस गेले असता, त्या ठिकाणच्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये पोलीस उपायुक्तांचे चार दात पडले असल्याची माहिती मिळाली. पोलीस अधिकारी अतिशय गंभीररित्या जखमी झालेले आहेत. दोन पोलीस मृत्यूमुखी पडलेले आहेत, एवढी भयानक घटना घडलेली आहे. महाराष्ट्र सरकारला हे आव्हान आहे. महाराष्ट्र शासनाने हे आव्हान स्वीकारणार असेल तर ते गृहखात्याने घ्यावे. धर्मनिरपेक्ष म्हटल्या जाणाऱ्या जमावाने, निधर्मी म्हटल्या जाणाऱ्या जमावाने पोलिसांवर हल्ला केला. समाजवादी पक्षाचे खासदार, श्री.अबु आझमी हे त्या ठिकाणी उपस्थित होते असे बातमीमध्ये समोर आलेले आहे. ते त्या ठिकाणी गेलेले होते. त्यांच्या उपस्थितीमध्ये हा प्रकार घडलेला आहे. तेथील समाजाला त्यांनी धमकावले, अशाप्रकारची बातमी प्रसिध्द झालेली आहे. हा प्रकार गंभीर आहे. ही बाब निकडीची आहे, त्यामुळे आमची अशी विनंती आहे की, आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करावा आणि ही चर्चा प्रथम घ्यावी. चर्चेच्या अनुषंगाने शासनाचे उत्तर आल्यानंतर सदनाचे काम पुढे चालू ठेवावे. तोपर्यन्त हा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन,या प्रश्नावर चर्चा घ्यावी अशी नियम 93 अन्वये विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या महत्वाच्या विषयावर तातडीने चर्चा घ्यावी, अशी मागणी करणारा तहकुबीचा प्रस्ताव दिलेला आहे. सभापती महोदय, या घटनेचे सविस्तर वर्णन सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी केलेले आहे. मला एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, अशाप्रकारे पोलिसांना भोसकून पूर्णपणे त्यांना समाप्त करण्याची ताकद जमावामध्ये कोठून आली ? क्रूरपणे मेंदू काढून त्यांना जाळण्याचा प्रयत्न केला गेला, 35 पोलीस जखमी झाले,असा प्रकार या महाराष्ट्रामध्ये सुरु झालेला आहे. ही जी घटना घडली त्याला जबाबदार मुस्लीम नेते श्री.अबु आझमी, रजाक अकादमी, पीपल ॲक्शन संघटनेमधील लोक नसून याला महाराष्ट्र सरकार जबाबदार आहे. आपल्याला माहीत आहे की, परवाच अमेरिकेचे अध्यक्ष श्री.जॉर्ज बुश यांच्या विरोधात कायदा मोडून लोक आझाद मैदानावर जमा झाले. त्यांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या कार्यालयाची मोडतोड केली, आजूबाजूच्या गाडया पेटविण्याचा प्रयत्न केला, परंतु या षंढ शासनाने त्यांच्याबाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. त्यांच्यावर कडक कारवाई केली असती तर गाडया जाळण्याची त्यांची हिंमत झाली नसती.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. किल्लेदार 13:25 वा.

श्री. नितीन गडकरी ...

ही अतिशय भयंकर घटना आहे. हे कायदा व सुव्यवस्थेचे अपयश आहे. सरकारच्या तुष्टीकरणाच्या नीतीचा हा परिणाम आहे. त्यामुळे या राज्याच्या अतिशय महत्वाच्या विषयावर प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन ही चर्चा ध्यावी अशी आमची मागणी आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी जी मागणी केलेली आहे त्याबाबतीत चर्चा होता कामा नये ही आमची बिलकुल भूमिका नाही. आज सभागृहासमोर जे कामकाज आहे त्यामध्ये प्रश्नोत्तराचा तास आपण पूर्ण करावा. त्यानंतर आपण कोणत्या वेळी ही चर्चा घ्यावयाची हे ठरवून द्यावे. आमची त्याला हरकत राहणार नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनाचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, या संदर्भातील चर्चा करण्याची शासनाची पूर्णपणे तयारी आहे. या चर्चेच्या संदर्भात माझी एक विनंती आहे. विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा यासंदर्भातील प्रस्ताव मांडला गेला होता आणि प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर चर्चेसाठी वेळ ठरवून दिला होता. विधानसभेमध्ये माननीय गृहमंत्री चर्चेला उत्तर देणार आहेत आणि या सभागृहामध्ये सुध्दा त्यांच्याकडूनच उत्तर येणे अपेक्षित आहे. या महत्वपूर्ण चर्चेला सन्माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी भावना असणे साहजिकच आहे. म्हणून माझी विनंती आहे. सरकारच्या वतीने चर्चा करण्याची तयारी आहे. परंतु आपण प्रश्नोत्तराचा तास संपवावा. त्यानंतर निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम सुध्दा आहे. त्यामुळे आपण चर्चेची वेळ निश्चित करावी. त्याप्रमाणे चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे.

**सभापती** : या ठिकाणी नियम 93 अन्वये जी सूचना प्राप्त झालेली आहे त्या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी यातील गांभीर्य या ठिकाणी विशद केलेले आहे. ही गंभीर घटना आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मी आज या सभागृहामध्ये नियम 97 अन्वये या चर्चेला परवानगी देण्याचे निश्चित केलेले आहे. आपण प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करु. त्याचबरोबर आज निवृत्त होणारे जे सदस्य आहेत...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी ....

**सभापती** : ते माझ्या लक्षात आहे. I am coming to that point. जे निवृत्त होणारे सदस्य आहेत त्याच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम आहे, तो आपण पूर्ण करु. त्यानंतर ही नियम 97 अन्वयेची चर्चा सुरु करु. ही चर्चा संपल्यानंतर नियम 260 अन्वये असलेल्या प्रस्तावावरील जे उत्तर व्हावयाचे आहे ते उत्तर देण्याची व्यवस्था करु. या पध्दतीने आपणास कामकाज सुरु करावयाचे आहे. याचा अर्थ अन्य जे कामकाज आहे ते आज होणार नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ते कामकाज लॅप्स होईल काय ?

**सभापती** : ते कामकाज लॅप्स होईल किंवा सभापतींनी फेरविचार करावयाचे म्हटले तर ते कामकाज पुन्हा येईल.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MHM/ MAP

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

तारांकित प्रश्न क्रमांक - 17341

( श्री. रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता )

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, गेल्या चार अधिवेशनांमध्ये हा प्रश्न या सभागृहात विचारण्यात आलेला आहे आणि प्रत्येक वेळी सारखीच उत्तरे आलेली आहे. या सभागृहात ही प्रथा झालेली आहे. मार्चच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जो प्रश्न विचारला असेल त्यावेळचे उत्तर आणि आता प्रश्नाला दिलेले उत्तर हे सारखेच आहे. आरोग्य विभागातील शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येणाऱ्या 4 अधिकाऱ्यांची नावे काय आहेत ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, एका अधिकाऱ्यासंबंधी अंतिम अहवालानुसार शासनास झालेले नुकसान वसूल करण्याची बाब विचाराधीन आहे. एका प्रकरणी चौकशी अहवाल अप्राप्त आहे. एका प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर दोषादोपपत्रे बजावण्यात आली आहेत. एका अधिकाऱ्याविरुध्द ॲन्टी करप्शनबाबत दोन प्रकरणे असून दोन्ही प्रकरणी त्यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या चार अधिकाऱ्यांची नावे काय आहेत ? एका प्रकरणी चौकशी अहवाल अप्राप्त आहे. तो अहवाल अप्राप्त असण्याचे कारण काय ?

यानंतरश्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:30

(ता.प्र.क्र.17341 ....) (श्री. विलास अवचट...)

अहवाल प्राप्त न झाल्याबद्दल संबंधित अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

डॉ. विमल मुंदडा : यामध्ये 4 अधिकारी आहेत. डॉ. एस.व्ही.सावंत, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सिंधुदुर्ग येथे असताना औषध खरेदीमध्ये अनियमितता केलेली आहे. डॉ.सानप, उप संचालक यांनी अधिकार नसतानाही नेमणुका केलेल्या आहेत. डॉ.एस.अे.धोत्रे, उप संचालक हे अकोल्याला असताना त्यांनी वर्ग 3च्या कर्मचा-यांच्या नेमणुकीमध्ये अनियमितता केलेली आहे. डॉ.गुप्ता, तत्कालीन सहसंचालक, यांच्याकडे ॲडिशनल चार्ज होता. त्यांच्या काळात औषध खरेदीमध्ये अनियमितता झालेली आहे. डॉ. सावंत यांच्याबाबतीत वसुलीची कारवाई केलेली आहे. डॉ. सानप हे निवृत्त झालेले आहेत. त्यांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागा मार्फत चौकशी सुरु असून अंतिम अहवाल अद्याप आलेला नाही. डॉ. धोत्रे यांचे अभिवेदन प्राप्त झालेले असून, डी.ई. सुरु करावयाची आहे. डॉ. गुप्ता यांच्याबाबतीत दाखल केलेले दोषारोप पत्र रद्द करावे अशी आरोग्य महासंचालक डॉ.साळुंखे यांनी शिफारस केलेली आहे. डॉ. पांडे हे यवतमाळ आणि अमरावतीमध्ये कार्यरत असताना त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली. त्याबाबतीत अभियोग चालविण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. या सर्वांची एक दोन महिन्याच्या कालावधीत विशेष अधिकारी नेमून चौकशी केली जाईल.

ॲड. अनिल परब : संबंधित अधिका-यावर कधी दोषारोप पत्र बजावले ? ॲण्टी करप्शनशी संबंधित असलेल्या दोन प्रकरणी न्यायालयात अभियोग दाखल करण्यास केव्हा मंजुरी देण्यात आली ? या दोन्ही प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? तसेच चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले ?

डॉ. विलम मुंदडा : डॉ. सावंत यांच्यावर दि.24.10.04 रोजी दोषारोप पत्र बजावले असून वसुलीची कारवाई पूर्ण करीत आहोत. डॉ. सानप यांच्यावर देखील दोषारोप पत्र बजावलेले असून त्यांच्या बाबतीत प्रधान सचिवांनी विशेष चौकशी अधिकारी नेमलेले आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त होणार आहे. डॉ. धोत्रे यांच्यावर दि.17.4.06 रोजी दोषारोप पत्र बजावलेले आहे.डॉ. गुप्ता यांच्या संदर्भातील दोषारोपपत्र परत घ्यावे अशी तत्कालीन महासंचालकांनी शिफारस केलेली आहे. डॉ. पांडे यांची ॲण्टी करप्शन ब्युरो मार्फत चौकशी चालू आहे.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.17341..

श्री. श्रीकांत जोशी : शासनाने काम करण्यासंबंधीचे प्रोसिजर तयार केले पाहिजे. ज्या अधिका-यांची चौकशी चालू आहे अशा अधिका-यांना नॉन एक्झीक्युटीव्ह आणि ज्या ठिकाणी खरेदीचे अधिकार नाहीत अशा ठिकाणी पोस्टिंग दिली पाहिजे. हे 4 अधिकारी आता कोठे कार्यरत आहेत. त्यांची नॉन एक्झीक्युटीव्ह म्हणून पोस्टिंग करण्यात येईल काय ?

डॉ. विमल मुंदडा : निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. सध्या हे अधिकारी कोठे कार्यरत आहेत त्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवीन.

डॉ. नीलम गो-हे : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अतिशय महत्वाचे असे प्रश्न विचारले जातात. माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. म्हणून तोच प्रश्न मी पुन्हा विचारते. हे अधिकारी त्याच ठिकाणी कार्यरत असतील आणि गोंधळ घालत असतील तर त्यांच्यावर कारवाई करुन काहीही उपयोग होणार नाही.

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17341.................... डॉ.निलम गोऱ्हे....

आणि दुसरा माझा मूळ प्रश्न असा आहे की, ब मध्ये म्हटले आहे की एका प्रकरणी चौकशी अहवाल अप्राप्त आहे. हा चौकशी अहवाल कोणत्या प्रकरणाबद्दल अप्राप्त आहे? ज्यावेळी 2-3 विभागाशी संबंधित चौकशी असते तेव्हा विलंब होतो हे आम्ही समजू शकतो. एका विभागाशी संबंधित चौकशी अहवाल 6 महिने होऊनही प्राप्त होत नाही. अशी चौकशी किमान किती महिन्यात पूर्ण झाली पाहिजे, केव्हापर्यंत ही चौकशी पूर्ण होणार याबाबत निदेश व्हावेत, अन्यथा पुन्हा पुढील अधिवेशनात प्रश्न उपस्थित करावा लागतो.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, लवकरात लवकर चौकशी पूर्ण करण्यात येईल.

**सभापती** : मंत्रीमहोदयांनी एवढेच सांगावे, लवकरात लवकर या शब्दाला काही मिनिंग नाही. तातडीने चौकशी पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, तातडीने चौकशी पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील. नॅचरल जस्टीसच्या तत्वावर त्यांचे जे म्हणणे आहे ते ऐकून घेण्याच्या प्रोसीजरला वेळ लागतो. विशेष अधिकारी यासाठी नेमून चौकशी लवकरात लवकर पूर्ण होईल. आपण निदेश दिलेले आहेत. सहा महिन्यात पूर्णपणे चौकशी करुन जी योग्य आहे ती कारवाई केली जाईल.

**सभापती** : मंत्रीमहोदया, प्रश्न असा आहे की, 2-3 वेळा हा प्रश्न याठिकाणी विचारला गेला आहे, त्याला महत्व या अनुषंगाने आहे की, ही जी चौकशी आहे ती तातडीने पूर्ण करण्यासाठी आपण उच्चतम प्राधान्य द्यावे अशी सदनाची अपेक्षा आहे. ती पूर्ण होईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

डॉ.विमल मुंदडा : होय. आपण दिलेले निदेश मला मान्य आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : अशा रितीने अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे राहिले तर मला पुढील प्रश्न पुकारावा लागेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहासमोर एक संकट उभे राहिले आहे. आम्ही सर्व सदस्य एखादा प्रश्न विचारल्यानंतर त्याच्या उत्तराची अपेक्षा करतो. उत्तर स्पेसिफिक असावे असा आग्रह असतो. कारण त्या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. म्हणून आपण ज्या पध्दतीने आमच्या सदस्यांविषयी बोललात, आपण जर सगळे उभे राहून प्रश्न विचारला तर मी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

पुढील प्रश्नाकडे जाईन. याचा अर्थ आम्ही एखाद्या प्रश्नाचा आग्रह धरणे उचित नाही, योग्य नाही, नियमात बसत नाही. आपल्याकडून आम्ही संरक्षणाची अपेक्षा करतो. अशा प्रकारची अपेक्षा आम्ही आपल्याकडून करीत नाही हे मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे.

**सभापती** : याबाबत माझी अपेक्षा अशी आहे की, आपण जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे अचूक उत्तर या सभागृहात सन्माननीय मंत्रीमहोदयांकडून अपेक्षित आहे. त्याप्रमाणे प्रयत्न झाला पाहिजे म्हणून किमान 5 उपप्रश्न, 6 उपप्रश्न, 7 उपप्रश्न विचारण्याची संधी देतो. ही संधी देत असताना मंत्रीमहोदयांचे उत्तर जर आपण सहज तपासून पाहिले तर त्यांनी असे सांगितले की, याबाबत विशिष्ट मर्यादेत ही ॲक्शन पूर्ण करण्यासाठी विशेष अधिकारी सुध्दा नेमण्याची व्यवस्था करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, जर अशी ॲक्शन पूर्ण झ ाली नाही तर काही अधिकारी निवृत्त होण्याची सुध्दा शक्यता आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून एखादा अधिकारी निवृत्त होण्याची शक्यता असली तरी देखील त्याच्यावर प्रोसिडिंग दाखल होते आणि त्यानंतर तो काही वेळेत निवृत्त होतो. ही प्रोसेस तातडीने व्हावी ही अपेक्षा आहे. तीच माझीही अपेक्षा आहे. एकाच वेळी 7, 8, 10 सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी उभे रहावयाचे ठरविले तर त्यांना उत्तर देणे शक्य नाही यादृष्टीने हे मी सांगितले आहे. किंबहुना परवाच्या दिवशी आपली याठिकाणी चर्चा झाली. एका तासामध्ये 10 ते 12 प्रश्न पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करावयाचा आहे. पण तरीही आपण पाहिले तर गेल्या दोन दिवसात सुध्दा काही प्रश्नाना आपण 15 ते 20 मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) KK-1

SGJ/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. भोगले ... 13:40

**ता.प्र.क्र. : 17341** .......

**सभापती**......

हा प्रश्न सुध्दा महत्वाचा आहे. या महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर जर योग्य असेल तर आपण पुढे गेले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी प्रामाणिक उत्तर दिलेले आहे. त्या अनुषंगाने ज्या पध्दती आहेत त्या पध्दती प्रमाणे तातडीने सर्व कामे पूर्ण करण्यात येतील असे माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याची माझी नेहमी भूमिका असते. असे असतांनाही अनेक सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी उभे राहून प्रश्न विचारले तर या प्रश्नालाही न्याय मिळणार नाही आणि पुढच्या प्रश्नालाही यामुळे न्याय मिळणार नाही . आता आपण पुढील प्रश्न विचारात घेऊ.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( ता.प्र.क्र. : 18829 )

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, हा प्रश्न 4-5 अधिवेशनापासून उपस्थित होत आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी डॉ. पुरंदरेंच्या संदर्भात अर्धातास चर्चा उपस्थित केली होती व या अर्धातास चर्चेला उत्तर देतांना माननीय मंत्रीमहोदयांनी आश्वासनही दिले होते. डॉ. पुरंदरे यांनी जो गैरव्यवहार केलेला आहे त्यासाठी श्री. नगराळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती परंतु डॉ. पुरंदरे हे त्या समिती समोर आले नाहीत तर डॉ. पुरंदरे यांनी या समितीला पत्र पाठविले. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, डॉ. पुरंदरे यांनी श्री.नगराळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीला जे पत्र पाठविले होते त्यामुळे नगराळे समिती डॉ. पुरंदरे यांच्यावर कोणती कारवाई करणार आहे व कारवाईसाठी किती वेळ लागणार आहे?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, एलसीपीएस च्या अभ्यासक्रमात प्रवेश देणे व अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या संदर्भातील ही केस आहे. यासंदर्भातील तक्रार 15.4.2004 मध्ये शासनाला प्राप्त झाली होती. या तक्रारीमध्ये डॉ. पुरंदरे यांनी काही विद्यार्थ्यांना पास करण्यामध्ये अनियमितता केली होती अशा प्रकारचे आरोप डॉ. पुरंदरे यांच्यावर करण्यात आले होते. त्यामुळे राज्यसरकारने यासंदर्भात डॉ. वासे यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. यासंदर्भात समिती चौकशी करीत असतांना यामध्ये काही अनियमितता झाल्याचे तसेच यामध्ये अजून एक-दोन डॉक्टरांचेही नाव पुढे आले होते. यामध्ये काही डॉक्टरांचे नाव पुढे आल्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता शासनाला वाटू लागली. कारण अगोदरची चौकशी वरिष्ठ प्राध्यापकांकडून करण्यात आली होती. त्यामुळे यासंदर्भात अधिक चौकशी करण्यासाठी श्री. नगराळे, सहसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली. या समितीसमोर डॉक्टरांना आपले म्हणणे मांडण्यास सांगितले गेले तेव्हा त्या डॉक्टरांनी आपले म्हणणे लेखी स्वरुपात दिले. हा खुलासा राज्यसरकारकडे प्राप्त झाल्यानंतर हा खुलासा तपासण्याचे काम डायरेक्टर स्थरावर झाला आणि या बाबतचा प्रस्ताव राज्यसरकारकडे सादर झाला. खरे पाहिले तर यामध्ये राज्य सरकारचा काहीही संबंध नाही. सीपीएस कॉलेजमध्ये फेलोशिप देण्यात आली होती व परीक्षा घेणे किंवा गाईड करणे अशा पध्दतीचे वेगवेगळे आरोप आहेत त्यांच्यावर आहेत.

यानंतर श्री. अजित...

ता.प्र.क्र. 18829.....

श्री.दिलीप वळसे-पाटील........

राज्य सरकारने आपली भूमिका नाकारलेली नाही. डॉक्टरांविरुध्द कारवाई करावयाची असेल तर मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाला कळवावे लागते. तेव्हा सरकारने घेतलेला निर्णय रिव्हेट बॅक होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागते. राज्य सरकारकडे प्रस्ताव प्राप्त झालेला असून त्याची तपासणी चालू आहे. याबाबत लीगल ओपिनियन घ्यावे लागणार आहे. त्यानंतरच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : डॉ.नगराळे समितीने चौकशीचे आदेश दिल्यानंतरही डॉक्टर्स चौकशीसाठी येत नाहीत याचा अर्थ ते या समितीला जुमानत नाहीत. अनेक डॉक्टर्सनी पत्राने उत्तरे दिली आहेत. तेव्हा डॉक्टर्सची लेखी स्वरुपात उत्तरे प्राप्त झाल्यानंतर डॉ.नगराळे समितीने कोणता निष्कर्ष काढला ? समितीच्या निष्कर्षानुसार सरकार संबंधितांवर किती दिवसांत कार्यवाही करणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, डॉ. नगराळे समितीचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून अनियमितता झाली असल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. जरी डॉक्टर्स चौकशीसाठी उपस्थित झाले नाहीत तरी त्यांना नॅचरल जस्टीसच्या नियमाप्रमाणे संधी देणे आवश्यक आहे. अशाप्रकारच्या केसेस कोर्टामध्ये रिफर होतात त्यावेळी अतिशय अडचणीला सामोरे जावे लागते. हा विषय महत्वाचा असला तरी घाईघाईने कार्यवाही करणे योग्य नाही. तरी सुध्दा येत्या सहा महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, मला डॉ.पुरंदरे भेटले होते. हे प्रकरण मी सुध्दा ऐकले आहे. तेव्हा माझ्या लक्षात आले की, सर्वात जास्त राजकारण हे डॉक्टरांमध्ये आहे. आमच्यासारख्यांना भेटून एकमेकांना शह प्रतिशह द्यायचा असा त्यांचा धंदा सुरु आहे. मी अनेक तक्रारीची दखल घेतो. पण सरकारी डॉक्टर्सकडून तक्रार आल्यास त्याची दखल घेत नाही. त्या डॉक्टर्सची मिस्टेक बोनाफाईड आहे की मालाफाईड आहे हे पाहिले पाहिजे. जर मिस्टेक बोनाफाईड असेल तर no enquiry, nothing doing, ती





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18829....

श्री.नितीन गडकरी..........

फाईल बंद करा. जर मालाफाईड असेल तर चौकशी करुन ताबडतोब ॲक्शन घेतली पाहिजे. पण आपल्या लेव्हला याचा तपास झाला पाहिजे. मी मंत्री असताना मराठवाडा आणि धुळे येथील दोघेजण काही खोटी तक्रार लिहून त्याच्या 400-400 कॉपीज काढायचे आणि त्या वाटायचे. अशाप्रकारे ते इंजिनियर्स व अन्य लोकांना ब्लॅकमेल करायचे. त्यांच्याकडे मर्सिडीज गाडी होती. जेव्हा मला ही गोष्ट समजली तेव्हा मी लोकांना सांगितले की, त्यांना मारा. लोकांनी त्यांना चांगलेच झोडपले. तेव्हा जे दोषी असतील त्यांचेवर आपण कारवाई करणार का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी गोष्ट सांगितली त्यामध्ये तथ्य आहे. मला सुध्दा अशा तऱ्हेचा अनुभव आला आहे. उच्च पदस्थ डॉक्टर्स आणि प्राध्यापकांमध्ये अशातऱ्हेचे राजकारण चालत आहे. माझ्याकडे जेव्हा हा विषय आला तेव्हा ही केस moral turpitude ची आहे की अन्य काही आहे, हे मी समजावून घेतले. तीन डॉक्टर्सपैकी दोन डॉक्टर्स हे ऑननरी डॉक्टर्स आहेत तर एक डॉक्टर निवृत्त झाला आहे. त्यांचे रजिस्ट्रेशन कॅन्सल करावे अशी मागणी आहे.

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18829...

श्री.दिलीप वळसे-पाटील....

याबाबतीत कुठल्या स्टेजला निर्णय घेतला, हे सर्व पाहण्याची आवश्यकता असून याबाबतीत सर्व शहानिशा केल्याशिवाय निष्पन्न होणार नाही. रिपोर्टनुसार तीन लोकांवर सारखे आरोप असतानाही दोन लोकांना वेगळा न्याय देण्यात आला व एकास वेगळा न्याय देण्यात आला. त्यामुळे याबाबतीत सर्व शहानिशा करण्यात येईल व यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना सोडण्यात येणार नाही.

-----

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(ता.प्र.क्र.17342)**

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, हायकोर्टाने आदेश दिल्यानंतरसुध्दा अनारक्षित पदे भरण्यात आलेली नाहीत. आताच घटना घडलेली आहे की, हायकोट व सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या विरुध्द वागल्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याला व अधिकाऱ्यास एक महिना जेलमध्ये जावे लागले. याठिकाणी माझा एवढाच प्रश्न आहे की, आपण जी लवकरात लवकर कारवाई करु असे जे म्हटले आहे ती कारवाई आपण लवकरात लवकर म्हणजे किती दिवसांत करणार ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभपती महोदय, मागच्यावेळीही हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आला होता. त्यावेळी या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहात चर्चा झाल्यानंतर आपल्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. या विषयाचा संबंध इतर विभागांशी येत असल्यामुळे याबाबतीत सचिव स्तरावर बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. हा अनारक्षित पदांचा विषय समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभागांशीही संबंधित येतो. त्यामुळे त्या विभागांचाही याबाबतीत सल्ला घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने दिनांक 25 ऑगस्ट,2005 रोजी एक शासन निर्णयही काढलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात या सर्व पाचही प्रकरणांचा अभ्यास करुन राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. याबाबतीत राज्य सरकार तीन महिन्यांमध्ये अंतिम निर्णय घेईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभपती महोदय, ही दुर्दैवाची गोष्ट आहे की, हायकोर्टाने निर्णय देऊनसुध्दा आपले अधिकारी विरोधात पत्रक काढतात व सभागृहाला चुकीची माहिती देतात. या प्रश्नासंबंधी मागे सभागृहामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, विभागाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव दिनांक 5.12.1994 चा शासन परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर कारवाई करणे शक्य झ ाले नाही. माननीय सभापती महोदय, यासंदर्भात ज्यावेळी आपल्या दालनामध्ये बैठक झाली त्यावेळी 2-3 अधिकाऱ्यांनी सांगितले की, 1994 च्या शासन निर्णयानुसार कारवाई झाली नाही. हायकोर्टामध्ये त्यांच्या वकिलांनी हे म्हणणे मांडलेले आहे की, सन 1994 चा शासन निर्णय लागू

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. परंतु आपल्या विभागाच्या वकिलांनी सांगितले की, 1994 चा शासन निर्णय लागू होत नाही, त्यास 1990 चा शासन निर्णय लागू होतो. हायकोर्टाने त्यावर दिनांक 3 जून,2001 रोजी व 6 फेब्रुवारी,2004 रोजी निकाल दिला. निकालाच्या पॅरा पाचमध्ये असा म्हटले आहे की,

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.17342 पुढे सुरु</u>**............

प्रा.बी.टी.देशमुख.........

"Provisions of Government Resolution dated 5th December, 1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively" पध्दत अशी आहे की, एकदा कोर्टाने निर्णय दिला की, सरकारी वकील प्रतिवाद करीत नाहीत. जसे या सभागृहात आपण निर्णय दिल्यानंतर आम्ही तेथेच थांबतो. पुढचा निर्णय क्रमांक 241 of 2003/2-9-2004 यामध्ये कोर्टाने असे म्हटले आहे की, "No one has disputed the entitlement of the Petitioner to be regularized in the post in the sixth year as provided in the G.R. dated 25-1-1990" हे सर्व झाल्यानंतर 'केंद्रे' म्हणून जे अधिकारी आहेत ते सन 1994 चा जी.आर.लागू करीत आहेत. म्हणून या अधिका-यांवर सर्वप्रथम कारवाई करण्याची गरज आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर अशा प्रकारे आदेश देणारे हे 'केंद्रे' नावाचे अधिकारी काय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश आहेत काय ? सभापती महोदय, हा अतिशय खेळखंडोब्याचा प्रकार आहे. अर्धा डझन प्रकरणांमध्ये हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा 1994 च्या जी.आर.चे पालन करणे हे सर्वस्वी चूक आहे. तेंव्हा, हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे मंत्रीमहोदय 3 महिन्याच्या आत लवकरात लवकर निर्णय घेणार काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात दिनांक 18 एप्रिल 2006 रोजी या सभागृहात चर्चा झाली होती. त्यानंतर दिनाक 27 एप्रिल 2006 रोजी आपल्या दालनात चर्चा झाली. ही चर्चा झाल्यानंतर त्याच दिवशी सर्व सचिवांबरोबर बैठक घेण्यात आली. असे आहे की, सरकारमध्ये procedure to be followed. त्याप्रमाणे प्रोसिजर पूर्ण होऊन सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक 19/06/2006 रोजी हे प्रकरण आमच्या विभागाकडे प्राप्त झाले आहे. जी.आर.चे मेरिट, हायकोर्टाच्या निर्णयाच्या मेरिटमध्ये मी जात नाही. परंतु, या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. म्हणून मी असे सांगितले की, 3 महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर गरज असेल तर सुप्रिम कोर्टामध्ये अपील दाखल करावयास हवे अन्यथा हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास हवी. कारण, हायकोर्टाचा निर्णय जीवंत आहे.

..NN-2

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-2

SRR/ SBT/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी......

त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारवर बंधनकारक आहे. नाही तर कन्टेम्ट ऑफ कोर्ट होऊ शकतो. हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे परिपत्रक काढणे हे खरे कायदेशीर आहे. त्यामुळे सभागृहात अशा प्रकारची चर्चा आपण होऊ देता कामा नये. त्यांना जर हायकोर्टाचा निर्णय मान्य नसेल तर त्यांनी सुप्रिम कोर्टात जावे. परंतु, सुप्रिम कोर्टात न जाता हायकोर्टाची अंमलबजावणी न करणे हे बेकायदेशीर आहे आणि म्हणून आपले संरक्षण आम्हाला हवे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : देशाच्या घटनेप्रमाणे हायकोर्टाने दिलेल्या निर्णयावर या ठिकाणी चर्चा करता येत नाही. 'केंद्रे' किंवा 'उपकेंद्रे' नावाच्या अधिका-याने हायकोर्टाच्या निर्णयाविरोधी परिपत्रक काढलेले आहे, जो त्यांचा अधिकार नाही. एकदा हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रीमहोदय जी सामान्य प्रशासन विभाग वगैरे प्रोसिजर सांगत आहेत त्याचे कौतुक करता येत नाही. म्हणून आपण याबाबत ठामपणे सांगितले पाहिजे की, हायकोर्टाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी झाली पाहिजे. एकदा तुमचे म्हणणे हायकोर्टात अमान्य झाल्यानंतर, हायकोर्टाने अर्धा डझर निर्णय दिल्यानंतर केंद्रेंसारख्या अधिका-याने जो हायकोर्टाच्या निर्णया विरोधी जी.आर.काढला आहे त्यामुळे या सभागृहाची प्रतिष्ठा कमी होत होती आणि त्यामुळे सभापती महोदय, आपण हा प्रश्न मागच्या वेळी राखून ठेवला होता.

**सभापती** : सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी त्यांच्या विवेचनावरुन सप्लिमेंटरी माहिती, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, तो या ठिकाणी दिली आहे. त्यांचे जे मत आहे तेच माझेही मत आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते, हे गृहीत असते आणि तो निर्णय स्वीकारणे गरजेचे आहे. या अनुषंगाने शासनाला काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे. माझ्या दालनामध्ये 27 एप्रिल 2006 रोजी सविस्तर चर्चा झाली त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे, असे मी बोललो होतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोरले..........

**ता.प्र.क्र.17342** .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे बोलणे Contempt of court आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा करता येत नाही, हा जो आपला समज आहे तो आपण काढून टाका. न्यायालयाच्या निर्णयावर ॲनॅलिसीस करता येत नाही. न्यायालयाच्या निर्णयावर विरोधी मत व्यक्त करता येत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे आणि तो आपल्यावर बंधनकारक आहे. तो निर्णय आपल्याला आवडला नसेल तर आपण सुप्रिम कोर्टामध्ये अपिल करा आणि हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती मिळवा. आपण हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती घेतलेली नाही. हायकोर्टाचा निर्णय अजून जीवंत आहे. आपण असे सांगत आहात की, आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे फाईल पाठविलेली आहे. आपण त्यावर क्रिटीसाईज करणारा जी.आर. काढलेला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, केस समजून न घेता भूमिका मांडली जात आहे. ज्यावेळी एखाद्या विद्यापीठामध्ये किंवा एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये आरक्षित पदे असतात त्या आरक्षित पदांसाठी उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ...(अडथळा) तुम्ही जे बोलता ते रेकॉर्डवर आले पाहिजे आणि मी जे बोलतो ते रेकॉर्डवर येऊ नये काय ? मी हायकोर्टाचा कन्टेम्प्ट करीत असेल तर I am ready to face it. Why the hon. members are worried?

Shri Nitin Gadkari: It is difficult for us to allow you in this House. Shri Dilip-Valse Patil : Let the House allow you in this regard. जसा हायकोर्टाचा निर्णय आहे तसा सुप्रिम कोर्टाचा सुध्दा निर्णय आहे. आपण हायकोर्टाच्या निर्णयाची चर्चा करीत आहोत. मागच्या अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा झाली. सभागृहामध्ये हा विषय कनक्ल्यूड होत नाही असे ज्यावेळी निदर्शनास आले त्यावेळी माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले. हायकोर्टाने दिलेला निर्णय काय आहे आणि सुप्रिम कोर्टाने दिलेला निर्णय काय आहे हे त्यावेळी आपल्या निदर्शनास आणून दिले. ॲडव्होकेट जनरलला आपण निमंत्रित केले तरी त्यास माझी काही हरकत नाही.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17342** .....

प्रा.बी.टी.देशमुख : माननीय मंत्री महोदय जे म्हणतात ते देखील आम्हाला मान्य आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हायकोर्टाच्या निर्णयाचा जो अर्थ लावत आहेत तो त्यांच्या दृष्टीने बरोबर असला तरी सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची भूमिका आपल्याला समजून घेतली पाहिजे. मुद्दा असा आहे की, एखाद्या विद्यापीठामध्ये किंवा एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेली पदे अनारक्षित करण्याबाबतचा हा मुद्दा आहे. जर आरक्षित पदासाठी 5 वर्षामध्ये उमेदवार मिळाला नाही तर ते पद अनारक्षित केले जाते. परंतु दुसरी व्यवस्था अशी आहे की, आरक्षित पदासाठी उमेदवार मिळाला नाही तर विदीन कॅटॅगरीचा उमेदवार उपलब्ध असल्यास ते पद भरले जाते. अमरावती विद्यापीठातील 5 शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आता तात्पुरत्या स्वरुपामध्ये तेथे काही कर्मचारी नोकरीला लागलेले आहेत. जर सुप्रिम कोर्टाचा निर्णय अनारक्षित पदांच्या बाजूने लागला तर आता जे लोक नोकरीला लागलेले आहेत त्यांना कन्टीन्यू करता येईलच असे नाही. नवीन लागलेल्या लोकांना कन्टीन्यू करता येईल.

यानंतर श्री.सुंबरे .....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 17342 ...

येथे आग्रह असा दिसतो आहे की, जे सेवेमध्ये कर्मचारी आहेत त्यांनाच कायम करावे. त्याला देखील माझी काही हरकत असण्याचे कारण नाही. परंतु हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय यामध्ये जो काही आहे त्याचा विचार करून, सामान्य प्रशासन विभागाने आमच्याकडे फाईल पाठविली आहे. त्यामध्ये लीगल ओपिनियन घेण्यासाठी देखील वेळ लागणार आहे, त्यासाठी सुमारे 3 महिने लागतील. म्हणूनच मी सांगितले की, त्या 3 महिन्यामध्ये आम्ही यामध्ये अंतिम निर्णय घेऊ.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये 18 एप्रिलला या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झाली होती आणि त्यात समाधान न झाल्याने पुन्हा 28 एप्रिलला आपल्या दालनामध्ये या संबंधात चर्चा झालेली आहे. याबाबतीत वारंवार आम्ही आपली भूमिका मांडलेली आहे. आरक्षित वर्गातील पदांच्या बाबतीत मला नामदार मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, अशी आरक्षित पदे सर्वसाधारण वर्गासाठी अनारक्षित करता येतात काय ? नसेल करता येत तर यामध्ये आता आपण ज्याप्रमाणे नियम सांगितला त्याप्रमाणे आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार मिळत नसेल तर ती आरक्षित पदे त्याच वर्गवारीतील दुसऱ्या कॅटेगरीतील उमेदवारांना देण्यात यावीत. ही बाब आपण हायकोर्टाया निदर्शनास आणून दिली आहे का ? सभापती महोदय, आरक्षित पदे कोठल्याही परिस्थितीत अनारक्षित केली जाऊ नयेत अशी आमची ठाम भूमिका आहे हेही मला येथे सांगितले पाहिजे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संबंधात हायकोर्टामध्ये काय युक्तीवाद केला गेला आहे याची माहिती आता माझ्याकडे नाही. ती मी रेकॉर्ड पाहून सांगू शकेन. परंतु आपल्या राज्यामध्ये जे या संबंधातील नियम आहेत त्यानुसार एखाद्या कॅटेगरीतील पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर पुढे पाच वर्षे पर्यंत दरवर्षी त्या पदांसाठी जाहिरात देऊन त्या कॅटेगरीतील पात्र उमेदवार मिळविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत आणि पाच वर्षामध्ये असे प्रयत्न करूनही पात्र उमेदवार मिळाला नाही तर पाचव्या वर्षी ते पद त्या पुढील आरक्षित कॅटेगरीतील पात्र उमेदवारातून, म्हणजे within category मध्ये भरण्याचा प्रयत्न करावा आणि तेही जमले नाही तर 6व्या वर्षी ते पद आदिवासी कल्याण, समाजकल्याण, सामान्य प्रशासन या विभागांच्या सल्ल्याने अनारक्षित करण्यात येईल. तर त्या दृष्टीने प्रोसिजर सुरू आहे.

****

...... पीपी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 19114**

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

**तारांकित प्रश्न क्रमांक 17348**

( श्री. सुरेश शेट्टी, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता.. )

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा प्रश्न मागील अधिवेशनामध्ये देखील उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळीही जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मिळालेला नाही असेच उत्तर आलेले होते. तेव्हा माझा आता असा प्रश्न आहे की, जिल्हाधिकारी,ठाणे यांच्याकडून अंबरनाथ पुरातन शिवमंदिराचा परिसर सुशोभित करण्याबाबतच्या आवश्यक त्या प्रस्तावाची मागणी केव्हा करण्यात आली ? आणि अद्याप हा प्रस्ताव सादर न करण्यात येण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अंबरनाथ येथील पुरातन शिवमंदिराचा परिसर सुशोभित करण्याचा जो प्रश्न आहे तो आमच्या पर्यटन विभागाकडे येत नाही. आपल्या 17.5.1996 च्या शासन निर्णयानुसार शहर विभागातील जी तीर्थक्षेत्रे आहेत त्या संबंधातील बाबी नगरविकास विभागाकडून आणि ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र असल्यास ग्रामीण विकास विभागाकडून पाहिल्या जातात. तरीही मी या संबंधात ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेतली तेव्हा त्यांचे या विषयी असे म्हणणे आहे की, डीपीडीसी मार्फत नगरविकास विभागाकडे प्रपोजल पाठविले आहे आणि नगर विकास विभाग त्याचे प्रोसेस करून काम पूर्ण करील.

( यानंतर श्री. सरफरे .... क्यूक्यू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17348...

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता उत्तर दिले की, डी.पी.डी.सी. मार्फत हा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. गेल्या महिन्यामध्ये बैठक झाली होती त्यावेळी लवकरात लवकर प्रस्ताव तयार करण्यात येत आहे असे सांगण्यात आले. तर मग तशाप्रकारे लेखी उत्तर कां देण्यात आले नाही?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी कालच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून माहिती घेतली. त्यांनी DPDC/Tourism/2005-06/P3/81 dt.18.1.2006 अन्वये प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अंबरनाथ येथील शिवमंदिर परिसर सुशोभित करण्याचा प्रस्ताव आहे. सुशोभिकरणाचे काम करण्यासाठी शासनाने काही निधी उपलब्ध करुन दिला आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे काही प्रमाणात निधी दिला आहे, तेव्हा तो किती आहे? जिहाधिकाऱ्यांकडून किती दिवसात प्रस्ताव अपेक्षित आहे?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे. ही बाब पर्यटन विभागाशी संबंधित नाही. नगर विकास विभागाने प्रस्तावाची तपासणी करावयाची आहे. माननीय सदस्यांना जर अधिक माहिती हवी असेल तर नगर विकास विभागाकडून माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हे हेमाडपंथी असे पुरातन मंदीर असून अशाप्रकारचे मंदिीर गोपूर येथे आहे. येथील परिसर अतिशय अप्रतिम आहे. आपण 18 जानेवारी 2006 रोजी प्रस्ताव पाठविला असे सांगितले. तर मग तशाप्रकारे या उत्तरामध्ये कां नमूद करण्यात आले नाही?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले आहे की, हा प्रस्ताव पर्यटन खात्याकडे आलेला नाही. मी ही बाब तपासल्यानंतर तो प्रस्ताव नगर विकास विभागाकडे गेल्याची माहिती मिळाली. तीर्थस्थळाचे काम पर्यटन खात्याकडे येत नाही. ग्रामीण भागातील तीर्थस्थळांचे काम ग्राम विकास विभागाकडे आणि नागरी विभागातील तीर्थस्थळांचे काम हे नगर विकास विभाग करते. त्यामुळे हे प्रकरण आमच्याकडे आलेले नाही.

श्री. अरविंद सावंत : आपण हा प्रश्न नगर विकास विभागाकडे डायव्हर्ट केला तर या प्रश्नाला समर्पक असे उत्तर मिळेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मंत्रिमहोदयांनी जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून संपूर्ण माहिती घेतली आहे. आणि त्यांनी डी.पी.डी.सी. मध्ये प्रस्ताव मांडून त्याबाबतची शिफारस नगर विकास विभागाकडे केली आहे.

श्री. अरविंद सावंत : त्या प्रस्तावामध्ये काय म्हटले आहे ते मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी दूरध्वनीव्दारे माहिती घेतली आहे. माननीय सदस्यांना हवी असेल तर अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्ही एक महिन्यापूर्वी प्रश्न देतो. त्यावेळी तो प्रश्न कोणत्या विभागाकडे वर्ग करावयाचा ही आमची जबाबदारी नाही. एक महिन्यापूर्वी प्रश्न दिल्यानंतर सुध्दा या प्रश्नाशी आमच्या विभागाचा संबंध नाही असे सांगितले जात आहे, हा आमच्यावर अन्याय आहे.

**सभापती** : आपण म्हणत आहात ते बरोबर आहे. फक्त याबाबतीत एकच करता आले असते की, त्यांच्याकडे हा प्रश्न आल्यानंतर त्यांनी तो नगर विकास विभागाकडे ट्रान्सफर केला असता तरी चालले असते. परंतु त्यांनी आज इथे प्रश्न आल्यानंतर त्यांच्या विभागाशी संबंधित असलेली व त्यांच्याकडे उपलबध असलेली माहिती देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी त्याबाबतीत बोलत नाही. विधानमंडळ सचिवालयाकडून विभागाकडे प्रश्न पाठविले जातात त्यासंबंधी मला बोलावयाचे आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या शिवमंदिराच्या बांधकामासाठी इतका घोळ घालण्याची गरज नाही. डी.पी.डी.सी.च्या बैठकीला पालक मंत्री आणि डी.पी.डी.सी. चे सदस्य सचिव म्हणून जिल्हाधिकारी उपस्थित असतात. त्यांनी त्यांच्या फंडामधून व्यवस्था केली तर शिवमंदिराचा जीर्णोध्दार होऊ शकतो. त्यासंबंधी शासनाने निर्णय घ्यावा.

श्री. सुरेश शेट्टी : तेथील स्थानिक आमदारांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीमधून निधी उपलब्ध करुन दिल्यास डी.पी.डी.सी. हरकत घेणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17348.......

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण नगर विकास विभागाला यासंबंधात माझे निदेश आहेत असे सांगावे. तसेच याबाबत जी तरतूद करावयाची आहे, त्याबाबत डी.पी.डी.सी.कडे अगोदरच शिफारस केली असल्याचे आपण सांगितले आहेच. तेव्हा आपण त्याचा पाठपुरावा करावा. ही बाब नगर विकास विभागाच्या अखत्यारित येत असल्याने या विषयावरील अर्धातास चर्चा मी मान्य करणार असल्याने, ती जेव्हा सभागृहात येईल त्यावेळेस दोन्ही विभागांनी त्या संबंधात उत्तर द्यावे, म्हणजे हा प्रश्न सुटू शकेल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**तारांकित प्रश्न क्रमांक 18551**

(श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 27-1-2006 रोजी सखोल चौकशी करण्याकरिता प्रस्ताव सहायक आयुक्त यांच्याकडे पाठविलेला आहे. त्यावर किती दिवसामध्ये निर्णय घेतला जाईल ?

श्री.रणजित कांबळे : लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

SKK/ MHM/ SBT/

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 17350</u>**

(श्री.सुरेश शेट्टी, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता)

काही सन्माननीय सदस्य : आता प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने 10 मिनिटे चर्चा झाली. त्यामुळे मी आता प्रश्नोत्तरासाठी सात मिनिटाचा वेळ वाढवून देण्याचे ठरविलेले आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, एकंदरीत पर्यटन क्षेत्रामध्ये महाराष्ट्राचे काय स्थान काय आहे ? या दृष्टीने पश्न विचारलेला आहे. सन 2004-2005 आणि सन 2005-2006 या वर्षामध्ये नवीन प्रकल्पांचे प्रस्ताव केंद्र सरकारला सादर केलेले आहेत. या सर्व ठिकाणी किती पर्यटक येणार आहेत, त्या ठिकाणचे मार्केट ॲनलिसीस झालेले आहे काय ? भारतातून किती पर्यटक येतील, परदेशातून किती पर्यटक येतील, याचा सर्व्हे झालेला आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, अशाप्रकारचा प्रस्ताव सादर करत असताना कोणत्या कन्सल्टंट एजन्सीचा, एक्सपर्ट बॉडीचा सल्ला घेतलेला आहे? प्रस्ताव सादर करताना यासंबंधीचा अभ्यास कोणी केलेला आहे ? कोणत्या आधारावर प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेले आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत साहेबांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पर्यटनाचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविताना महाराष्ट्र शासनाने टाटा कन्सल्टंट ही एजन्सी नेमून संपूर्ण राज्यातील पर्यटन स्थळांचे प्रोजेक्ट आयडेंटीफाय केलेले आहेत आणि त्या अनुषंगाने प्रकल्प तयार करुन प्रस्ताव पाठविलेले आहेत. सन्माननीय सदस्य हे सिंधुदुर्ग, रत्नागिरी विभागातील असल्यामुळे त्यांना सांगू इच्छितो की, एक महिन्यापूर्वी सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेबांकडे यासंबंधात एक बैठक घेतलेली होती. त्यामध्ये नवीन कन्सल्टंट नेमून मार्केट फिजिबिलिटीचा अभ्यास करण्यासाठी नवीन एजन्सी आयडेंटीफाय करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17350 .....

श्री. संजय दत्त : कोकण पर्यटन मंडल-2 (कोकण रिव्हेरा सर्किट-2) करिता 5 कोटी 48 लाख 70 हजार एवढया मंजूर निधीमधून प्रगतिपथावर असलेली कामे कोणती ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जी कामे सुरु झालेली आहेत आणि पूर्ण झालेली आहेत त्याची संपूर्ण यादी माझ्याकडे आहे. ती यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांचा निषेध व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या महाराष्ट्रामध्ये विदर्भ आणि मराठवाडा आहे की नाही ? या प्रपोजल्समध्ये मोझरीचे एक प्रपोजल सोडले तर विदर्भ आणि मराठवाड्यातील दुसरे एकही प्रपोजल नाही. आपण जेव्हा केंद्र सरकारकडे शिफारस करता तेव्हा आमच्याकडे पर्यटन स्थळे नाहीत काय ? हे कितपत योग्य आहे ? सरकारने ज्या शिफारशी केंद्र सरकारकडे पाठविल्या त्या विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय करणाऱ्या आहेत. हे धोरण बरोबर नाही. यानंतर प्रपोजल्स पाठविताना विदर्भ आणि मराठवाड्याचा विचार करणार की नाही ? या प्रपोजल्समध्ये तुम्ही विदर्भ आणि मराठवाड्याचा विचार का केला नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अजंठा, एलोरा आणि लोणार सर्किटचे डेव्हलपमेंट करण्यासाठी जापनीज मदत घेऊन....

श्री. नितीन गडकरी : ते माझ्या वेळचे आहे. त्याचे क्रेडिट तुम्ही कशाला घेत आहात ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, श्री. नितीन गडकरी साहेबांच्या पुढाकाराने ते सुरु झाले आणि पूर्ण झाले. जे दुसरे फेज आहे ते सुरु करीत आहोत. विदर्भामध्ये इको-टुरिझमसाठी स्पेशल प्रोजेक्ट तयार करण्याबाबत वन खात्याबरोबर चर्चा करीत आहोत. ते प्रोजेक्ट लवकर तयार होतील आणि त्यासाठी केंद्र सरकारकडून निधी येणार आहे.

श्री. नितीन गडकरी : तुम्ही जर शिफारसच केलेली नाही तर मग निधी कसा येणार ?

श्री. सुरेश शेट्टी : शिफारस कधीही करु शकतो. प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यासाठी काही वेळ लागणार आहे. विदर्भामध्ये स्पेशल इको-टुरिझम प्रोजेक्ट तयार करण्यासाठी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करीत आहोत आणि ते तयार झाल्यानंतर केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवू. इको-टुरिझमसाठी केंद्र सरकार सुध्दा प्रायोरिटीने मंजुरी देते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

ता. प्र. क्र. 17350 .....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मुंबई महोत्सव म्हणजे काय ? त्याचे स्वरुप काय आहे ? मुंबई महोत्सव शासनाच्या वतीने साजरा होतो काय ? कोकण रिव्हेरा अंतर्गत 5 कोटी रुपये सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील 3 किल्ल्यांच्या परिसर विकासासाठी मंजूर झालेले आहेत. आज त्याचे स्टेटस काय आहे ? तुमच्याकडे एजन्सी नाही. ते पैसे पडून आहेत. हे पैसे खर्च करण्यासाठी किती कालावधीमध्ये काम सुरु करुन पूर्ण करणार ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न मुंबई फेस्टिवलसंबंधी विचारलेला आहे. दोन वर्षापासून मुंबईमध्ये मुंबई फेस्टिवल सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत आयोजित करतात.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : तो त्यांचा महोत्सव आहे. तो महोत्सव शासनाचा आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत साहेबांनी पुढाकार घेऊन दोन वर्षापूर्वी पहिल्यांदा मुंबई फेस्टिवल आयोजित केला. मी स्वतः त्या फेस्टिवलमध्ये गेलो होतो. त्यामध्ये जे प्रोजेक्ट घेतले होते ते फारच यशस्वी झाले असे मला वाटते. मुंबईतच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये मुंबई फेस्टिवल प्रसिध्द झाले. खूप चांगल्या प्रकारे ते फेस्टिवल आयोजित केले होते. गेल्यावर्षी परत फेस्टिवल आयोजित केले होते. पहिल्या वर्षी त्यांना काहीही पैसे दिले नव्हते. दुसऱ्या वर्षी ते आमच्याकडे आर्थिक मदतीसाठी आले होते. गेल्यावर्षी सुध्दा त्यांना पैसे दिलेले नाहीत. पूढच्या वर्षासाठी त्यांचे प्रपोजल घेतलेले आहे. अजूनपर्यंत त्यांना आम्ही काहीही पैसे दिलेले नाहीत.

श्री. श्रीकांत जोशी : वर्ल्ड हेरिटेज सेंटर असलेल्या मराठवाडयातील अजंठा एलोरा या ठिकाणी जगातील टुरिस्ट आकर्षित करण्यासाठी तेथील उद्योगपती दरवर्षी 1 कोटी रुपये जमा करतात आणि एलोरा फेस्टिवल साजरा करतात.

यानंतर श्री. किल्लेदार ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 14:25

(ता.प्र.क्र.17350.... (श्री.श्रीकांत जोशी...)

या फेस्टिव्हलसाठी एमटीडीसी फक्त 5 लाख रुपये मदत देते. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, उद्योपतींची ऑर्गनायझेशन आणि पर्यटन विभागाचे मंत्री यांची एकत्र बैठक होऊन या एलोरा महोत्सवास आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी देण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : अशा प्रकारची बैठक औरंगाबादमध्ये आयोजित करण्याची माझी तयारी असून मी त्या बैठकीस हजर राहीन.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रस्तावामध्ये विदर्भातील एकाही पर्यटन स्थळाचा उल्लेख नाही. माझी अशी मागणी आहे की, 2004-05 आणि 2005-06 मध्ये जे प्रस्ताव केन्द्र शासनाकडे पाठविलेले आहेत त्या प्रस्तावाला जोडून विदर्भातील पर्यटन स्थळाचा प्रस्ताव केन्द्राकडे पाठविण्यात येईल काय ? तसेच त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर महोत्सोवाचाही समावेश करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : हे अधिवेशन संपल्यानंतर विदर्भ आणि मराठवाड्याच्या संदर्भात जे प्रस्ताव आम्ही तयार करीत आहोत त्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन त्यांच्या सूचना विचारात घेऊन नवीन प्रस्ताव तयार करुन तो केन्द्राकडे पाठवू.

श्री. प्रकाश शेंडगे : महाबळेश्वर विकास निधी 4 कोटी रु.चा आहे. जे पर्यटक महाबळेश्वरला जातात ते प्रतापगडाला भेट देत असतात. आता प्रतापगडाची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. तेथील बगीचाही सुकून गेलेला आहे. तेव्हा या ऐतिहासिक गडाचे जतन आणि संवर्धन करुन तेथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महाबळेश्वर विकास निधी मधून काही निधी प्रतापगडाच्या विकासासाठी वळविण्यात येईल काय? किंवा त्यासाठी स्वतंत्र निधी मंजूर करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सजेशन फॉर ॲक्शन.

कर्नल सुधीर सावंत : मुंबई हे सांस्कृतिक केन्द्र बनविण्याच्या दृष्टीने मुंबई फेस्टिव्हलसाठी शासनाकडे अनेक वर्षे प्रयत्न केले होते. परंतु ते घडू शकले नाही. त्यामुळे अनेक संघटना एकत्र येऊन हा फेस्टिव्हल आयोजित करतात. एमटीडीसीचा एकही पैसा या मुंबई फेस्टिव्हलसाठी मिळालेला नाही. जो काही खर्च दाखविलेला आहे. तो एमटीडीसीने स्वत: केलेला आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, या सदनाचे 14 सन्माननीय सदस्य अनुक्रमे येत्या 7 व 27 जुलै 2006 रोजी निवृत्त होणार आहेत. नेहमीच्या प्रथेप्रमाणे निवृत्त होणा-या सदस्यांना भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम होईल व त्यानंतर विधान भवनाच्या दुस-या मजल्यावरील विधानपरिषदेच्या बाहेरच्या लॉबीमध्ये चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सबब खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासंबंधीची बाब आता घेण्यात येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर, डॉ. अशोक मोडक, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री. विलास अवचट, गोविंदराव आदिक, शांताराम करमळकर, नतिकोद्दीन खतिब, श्रीमती कांता नलावडे, डॉ.वसंत पवार, सर्वश्री. जयंत प्र. पाटील, दयानंद म्हस्के, विनायक मेटे आणि डॉ. दीपक सावंत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहातील सदस्यांना निरोप देत असताना सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्य मंत्री आणि माननीय श्री. संसदीय कार्य मंत्री यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यांच्यापैकी एकाने तरी उपस्थित राहाणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 14:30

**सभापती** : संसदीय कामकाजमंत्री मला भेटले, त्यांनी माझ्या दालनात असे सांगितले की, सन्माननीय जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्या निरोप समारंभाकरीता सन्माननीय महसूलमंत्री श्री.नारायण राणे हे याठिकाणी उपस्थित राहतील आणि त्याला मी मान्यता दिली.

श्री.नितीन गडकरी : या सभागृहाचे नेते उपस्थित नाहीत, मुख्यमंत्री नाहीत, संसदीय कार्यमंत्री नाहीत. महसूल मंत्री उपस्थित आहेत हे ठीक आहे. परंतु ही पध्दत योग्य नाही.

**सभापती** : सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे विधानसभा सभागृहात चर्चेच्या निमित्ताने उपस्थित आहेत. माजी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री हे या निरोप समारंभासाठी निश्चित याठिकाणी उपस्थित आहेत.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो, माझी अर्धी हयात मी या सभागृहात काढली. गेली 35 वर्षापेक्षाही जास्त काळ मी या सभागृहात आहे. अनेक निरोप घेतले, ते निरोप घेऊन माझे पोट भरले आहे. त्यामुळे हा औपचारिकपणा नको. आपल्या घरी समारंभ असला, तुम्ही भोजनाकरीता बोलावले आणि दरवाजामध्ये स्वागताला आचाऱ्याला उभे करायचे असा प्रकार आहे. या सभागृहाची परंपरा आहे. वेळ नसेल तर अर्ध्या तासाने, एक तासाने निरोप द्यावा. हा निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा अपमान आहे. वेळ नाही म्हणून मुख्यमंत्री नाहीत, उपमुख्यमंत्री नाहीत, संसदीय कामकाज मंत्री देखील नाहीत. एवढे काय अडले आहे की, आम्हाला निरोप देण्यासाठी येत नाहीत. मी हात जोडून विनंती करतो, निरोप नको. काय फरक पडणार आहे? काही फरक पडणार नाही अशा पध्दतीने निरोप देण्याने. आम्हाला भेटायला वेळ नाही. हा अपमान नको. मी स्वत:च जातो. तुम्ही निरोप द्यायची गरज नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

**सभापती** : मी आपल्याला असे सांगितले की,संसदीय कामकाजमंत्री हे माझ्या दालनात आले, त्यांनी असे सांगितले की, माजी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री जे ज्येष्ठ मंत्री आहेत ते आज या निरोप समारंभाचा ठराव मांडतील आणि त्याला मी परवानगी दिली आहे.

श्री.नितीन गडकरी : हा असंस्कृतपणा आहे.

**सभापती** : माजी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री हे सुध्दा राज्याचे मंत्री असून शासनाच्या वतीने याठिकाणी उपस्थित आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर हे निर्णय काहीही घेऊ शकतात परंतु दोन मिनिटे माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आजपर्यंत असे कधी घडले नाही, आज घडत आहे. याठिकाणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा संसदीय कामकाजमंत्री उपस्थित नसल्यामुळे आम्ही बहिर्गमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, या विधानपरिषदेतून निवृत्त होणा-या सभासदांना निरोप देण्याची प्रथा-परंपरा आहे. या निरोप समारंभाला राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित रहावेत अशी भावना या ठिकाणी व्यक्त करण्यात आलेली आहे. काल भिवंडी येथे जी घटना घडली त्यासंदर्भात खालच्या सभागृहात स्थगन प्रस्ताव स्विकारण्यात आलेला असल्यामुळे त्या ठिकाणी स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. त्यामुळेच विधान परिषदेच्या सदस्यांना निरोप देण्याची जबाबदारी माझ्यावर देण्यात आलेली आहे. निरोप समारंभाच्या प्रथा-परंपरा मोडीत काढण्याचा राज्यसरकारचा उद्देश नाही. सन्माननीय सदस्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला गेला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी संसदीय लोकशाही समृध्द करण्यासाठी सहयोग दिलेला आहे, काम केलेले आहे. ही लोकशाही समृध्द करण्यासाठी या संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून त्यानी या सदनात अभ्यासपूर्वक विचार मांडलेले आहेत, सरकारला मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे त्यांचा गौरव करावा या उद्देशाने निरोप समारंभाची प्रथा आपल्याकडे सुरु झाली. निरोप देण्याच्या संदर्भात सरकारचा हेतू स्पष्ट असल्यामुळे कालच्या कामकाज पत्रिकेत निरोप समारंभ दाखविण्यात आला होता. परंतु सतत पडत असलेल्या पावसामुळे काल सभागृहात सन्माननीय सदस्यांची उपस्थिती कमी असल्या कारणाने व निरोप समारंभाला जास्त सन्माननीय सदस्य उपस्थित असले पाहिजेत. सदस्यांचा सन्मान पूर्वक गौरव झाला पाहिजे म्हणून हा समारंभ आज न घेता उद्या प्रश्नोत्तराचा तासानंतर निरोप समारंभ घेण्यात यावा अशी सूचना मी काल आपल्याकडे केली होती. म्हणून राज्य सरकार तर्फे सन्माननीय सदस्यांच्या गौरवाचा प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी माझ्याकडे दिलेली आहे. विरोधी पक्षाने आम्हाला हा निरोप नको असे या ठिकाणी विचार व्यक्त केलेले आहेत. परंतु 14 सन्माननीय सदस्यांपैकी 4 सन्माननीय सदस्य या सदनामध्ये परत निवडून आलेले आहेत व उरलेले 10 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत.

**सभापती** : सभागृहातील परिस्थिती विचारात घेऊन मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 2.38 वाजता 25 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली. )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 3 वाजून 3 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 15.25

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या अनुषंगाने जो निर्णय झाला तो अशा पध्दतीचा आहे की, सभागृहामध्ये विशेषत: प्रश्नोत्तराच्या तासाव्यतिरिक्त लक्षवेधी सूचनेपर्यंत त्यांना याठिकाणी रेकॉर्डींग करता येईल. परंतु या व्यतिरिक्त अन्य कुठल्याही ठिकाणी अशा पध्दतीने त्यांनी रेकॉर्डींग करणे म्हणजे त्यांना जी परवानगी दिली आहे त्याचे पूर्णपणे उल्लंघन करणे होईल याबाबत त्यांनी नोंद घ्यावी. या सभागृहाच्या व्यतिरिक्त अन्य कुठेही त्यांनी असे रेकॉर्डींग केले असेल... मग, ते लॉबीत असेल किंवा अन्य कुठेही असेल तर ते त्यांना प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्द करता येणार नाही. असे केले तर सभागृहाच्या ज्या काही प्रथा, परंपरा, नियम आहेत त्याचे काटेकोरपणे पालन करण्याऐवजी त्याचे उल्लंघन केल्यासारखे होणार आहे याची इलेक्ट्रॉनिक मिडियाने नोंद घेणे गरजेचे आहे. या सभागृहामध्ये जे कामकाज होते त्यानुषंगाने पत्रकारांनासुध्दा या पत्रकार कक्षामध्ये आपण प्रवेश देतो. त्या लॉबीमधून त्यांनी या सभागृहाच्या कामकाजाची नोंद घ्यावी, कामकाज जवळून पहावे व त्याचा रिपोर्ट प्रसिध्दी माध्यमातून द्यावा अशी अपेक्षा आहे. या सभागृहाव्यतिरिक्त अन्य कुठेही अशा पध्दतीने एखादे वृत्त त्यांना मिळाले तर त्यांनी ते वृत्त छापण्याकरिता देणे हेसुध्दा संकेताच्या दृष्टीने चुकीचे आहे. किंबहुना विधीमंडळ सचिवालयाच्या अनुषंगाने जे नियम आपण केलेले आहेत त्या नियमांच्या विरुध्द ही बाब आहे. त्याची सुध्दा त्यांनी नोंद घ्यावी व त्यांनी गॅलरीव्यतिरिक्त अन्य ठिकाणी असे वृत्त जर घेतले असेल तर त्या दृष्टीने त्यांनी त्याची नोंद घेणे गरजेचे आहे.

याठिकाणी संसदीय कार्यमंत्री हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून आहेत. आज याठिकाणी सदनातील 14 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहे. त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम आता आपण सुरु करु.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये सरकारच्या वतीने माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेबांनी जो निरोप समारंभाचा प्रस्ताव मांडला, तो प्रस्ताव या सदनाने संमत करावा व त्या प्रस्तावावर ज्यांना कोणाला आपले विचार मांडावयाचे असतील त्यांनी ते मांडावेत, अशा पध्दतीची भूमिका संसदीय कार्यमंत्री म्हणून घेण्यासाठी मी उभा आहे. माननीय राणे साहेबांनी जो प्रस्ताव मांडला तो सरकारच्या वतीने मांडला. मला याठिकाणी समजले की, निरोप समारंभाचा प्रस्ताव मांडताना सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असावेत, अशा प्रकारची वक्तव्ये याठिकाणी करण्यात आली.

नंतर श्री.रोझेकर....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/ प्रथम श्री.पुरी.... 15:30

श्री.हर्षवर्धन पाटील...........

वास्तविक पाहता मी या सदनाला सांगू इच्छितो की, आपल्या शासनाच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूर येथे शासकीय महापुजा होत असते आणि राज्याचे मुख्यमंत्री या महापुजेस जात असतात. याची कल्पना विरोधी पक्षनेते आणि गटनेत्यांना सुध्दा आहे तसेच यासंदर्भातील चर्चा सुध्दा झाली होती. सभापती महोदय, याची आपल्यालाही कल्पना आहे की आजच माननीय मुख्यमंत्री महोदय हे दुपारी पंढरपुरला शासकीय महापुजा करण्यासाठी रवाना झाले आहेत. या सदनामध्ये सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी उपस्थित रहावे अशा पध्दतीने सुध्दा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आपल्याला माहित आहे की, भिवंडी येथे झालेल्या घटनेसंबंधीचा स्थगन प्रस्ताव विधानसभेमध्ये स्वीकृत करण्यात आला असून दीड वाजेपासून या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली आहे आणि दुपारी साडेतीन वाजता त्यासंदर्भातील उत्तर माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना द्यावयाचे आहे म्हणून ते त्या सभागृहात उपस्थित आहेत. संसदीय कार्यमंत्री म्हणून मी तात्काळ या सदनामध्ये येण्यास निघालो होतो. मला असे समजले की, विधान परिषदेतील कामकाज स्थगित करण्यात आले आहे. वास्तविक पाहता सन्माननीय महसूल मंत्री, श्री.नारायण राणे यांनी निरोप समारंभासंबंधी प्रस्ताव मांडला. यापूर्वीची सर्व उदाहरणे पाहिली तर सरकार म्हणून जी जबाबदारी असते ती जॉईंट रिस्पोन्सिबिलिटी आहे आणि त्या पध्दतीनेच आपण ही जबाबदारी पार पाडतो. याच पध्दतीचा अवलंब करुन सन्माननीय श्री.राणेसाहेबांनी या सरकारच्या वतीने निरोप समारंभाचा प्रस्ताव मांडला आहे.

सभापती महोदय, आज जवळपास 14 सन्माननीय सदस्य या सदनातून निवृत्त होत आहेत. या 14 सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्य उद्या 7 जुलैला निवृत्त होणार आहेत तर काही सन्माननीय सदस्य 27 जुलैला निवृत्त होणार आहेत. अशा प्रकारे या 14 सन्माननीय सदस्यांचा कार्यकाळ या महिन्यात संपत आहे. यामधील 4 सन्माननीय सदस्य हे पुन्हा नव्याने या सदनाचे सदस्य म्हणून निवडून आले आहेत, त्यांचे मी प्रथम अभिनंदन करतो. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.प्रमोद नवलकर, डॉ.अशोक मोडक, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.विलास अवचट, श्री.गोविंदराव आदिक, श्री.शांतारामबापू करमळकर, श्री.सय्यद खतिब, श्रीमती कांता नलावडे, श्री.उल्हास पवार, श्री.जयंत पाटील, श्री.दयानंद म्हस्के, श्री.विनायक मेटे, डॉ.दीपक सावंत असे एकूण 14 सन्माननीय सदस्य या सदनातून निवृत्त होत आहेत.

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.हर्षवर्धन पाटील.............

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.प्रमोद नवलकर यांचा आणि माझा परिचय सन 1995 साली झाला. आम्ही एकाच मंत्रीमंडळामध्ये होतो. मी राज्यमंत्री म्हणून आणि श्री.नवलकरसाहेब मंत्री म्हणून आम्ही एकत्र काम केले आहे. तसेच, सन्माननीय श्री.नवलकरसाहेब हे कोल्हापूर व पुणे जिल्हयाचे पालकमंत्रीही होते. या सदनाला त्यांच्या कार्याची अतिशय जवळून माहिती आहे. त्यांनी आतापर्यन्त जे जे कार्य या सदनाच्या माध्यमातून केले ते सर्व सांगून मी सदनाचा अधिक वेळ घेणार नाही. एक अभ्यासू, सर्वांना हवाहवासा वाटणारा, एक कार्यक्षम आमदार म्हणून त्यांनी आतापर्यन्त काम केले आहे. परंतु, या सदनात येथून पुढच्या काळामध्ये ते आपल्याला पहावयास मिळणार नाहीत.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 15:35

श्री.हर्षवर्धन पाटील .........

त्यांची पोकळी सभागृहाला नेहमीच जाणवेल अशा पद्धतीचे उत्कृष्ट कार्य आणि काम सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांच्या माध्यमातून झालेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अशोक मोडक हे या सभागृहाचे अनेक वर्षापासून सदस्य आहेत. त्यांनी देखील अनेक महत्वपूर्ण विषयांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोकणातील विकासाचे प्रश्न सोडविण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केलेला आहे. इतर जे सन्माननीय सदस्य आहेत त्यांच्यासंदर्भात आपणा सर्वांना माहीत आहे. संसदीय कार्य मंत्री म्हणून मी या 14 सन्माननीय सदस्यांना सरकारच्यावतीने निरोप देऊ इच्छितो. या सभागृहामध्ये 4 सन्माननीय सदस्य नव्याने निवडून आलेले आहेत, त्यांचे मी अभिनंदन करतो आणि राहिलेले 10 सदस्य या ना त्या माध्यमातून या सभागृहामध्ये पुन्हा येतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेला दिशा दाखविण्याचे काम केलेले आहे. सभागृहाच्या माध्यमातून त्या सन्माननीय सदस्यांनी जे काम केलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अंत:करणपूर्वक आभार मानतो आणि त्यांच्या पुढच्या कार्यास सरकारच्यावतीने व माझ्यावतीने शुभेच्छा देतो आणि निवृत्त होणा-या सदस्यांच्या निरोपाचा प्रस्ताव मांडतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी दिनांक 7 जुलै व 27 जुलै, 2006 रोजी निवृत्त होणा-या या सभागृहातील 14 सन्माननीय सदस्यांच्या निरोप समारंभासंदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहातील चित्र स्पष्ट आहे. ज्या सन्माननीय सदस्यांना निरोप द्यावयाचा आहे त्यांच्या पैकी काही सन्माननीय सदस्य सरकारच्या बाजूच्या बेंचवर बसलेले आहेत आणि विरोधी पक्षाच्या बाजूच्या बेंचवर बसणारे सन्माननीय सदस्य आजच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाच्या वेळी सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. निरोप समारंभाचा कार्यक्रम काल होणार होता. कार्यक्रमपत्रिकेवर काल हा कार्यक्रम दाखविण्यात आला होता. मुंबई शहरामध्ये 2-4 दिवसांपासून धो-धो पडणा-या पावसामुळे मुंबई शहरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही सन्माननीय सदस्यांनी काल सभागृह लवकर तहकूब करण्याची मागणी केल्यामुळे आपल्याला काल सभागृह लवकर तहकूब करावे लागले. त्यामुळे निरोप समारंभाचा कार्यक्रम काल पार पडू शकला नाही म्हणून हा कार्यक्रम आपण आज चर्चेला घेत आहोत. दुर्दैवाने विरोधी बाकावरील सन्माननीय सदस्य या कार्यक्रमास अनुपस्थित आहेत. निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप देण्याची या सभागृहाची ही चांगली प्रथा आहे. खालच्या सभागृहामध्ये अशी प्रथा नाही. विधान सभेतील सन्माननीय सदस्यांचा कालावधी 5 वर्षाचा असतो. त्यानंतर त्यांना पुन्हा निवडणूकीला सामोरे जावे लागते. विधान सभेतील सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळी निवडून येतात आणि शपथ घेतात. विधान सभेतील सन्माननीय सदस्यांचा कार्यकाळ एकाच वेळी संपत असल्यामुळे निरोप देण्याची प्रथा त्या सभागृहामध्ये नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे ........

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 15:00

श्री. कुलकर्णी ....

परंतु या सभागृहामध्ये वर्षानुवर्षे ही प्रथा कायम ठेवण्यात आलेली आहे आणि या प्रथेला उत्तेजन देण्याचे काम देखील सातत्याने करण्यात आलेले आहे. कारण या सभागृहामध्ये दर दोन वर्षांनी सदस्य मंडळी निवडून येत असतात. मग ते विधानसभा सदस्यांकडून निवडून येणारे असोत वा पदवीधर मतदारसंघ, शिक्षक मतदारसंघ, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून निवडून येणारे असोत. 30 सदस्य अशा तऱ्हेने सदनामध्ये येत असतील तर त्यापैकी एक तृतियांश सदस्य हे दर दोन वर्षांनी निवृत्त होत असतात आणि त्यांच्या जागी नव्याने सदस्य निवडून येत असतात. एकदा निवडून आल्यानंतर सहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यावर ते सदस्य येथून परत जातात आणि अशा जाणाऱ्या सदस्यांना, म्हणजे या सदनातून निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम येथे होत असतो. सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आता येथे सांगितल्याप्रमाणे सभागृहाच्या या प्रथा व परंपरा या वेळेस काही कारणांनी पाळणे दुर्दैवाने शक्य झाले नाही. त्याचे स्पष्टीकरण देखील त्यांनी येथे केलेले आहे. सभापती महोदय, उद्या आषाढी एकादशी असल्याने, त्या निमित्त पंढरपूर येथे राज्य शासनाच्या वतीने जी महापूजा केली जाते त्यासाठी माननीय मुख्यमत्री मुंबई बाहेर गेलेले आहेत. तसेच काल भिवंडी मध्ये निर्माण झालेल्या परिस्थिती एसंबंधत खालच्या सदनामध्ये अचानक चर्चा उपस्थित झाली असल्याने त्या चर्चेला उत्तर देण्याकरिता राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, जे या सदनाचे नेते आहेत, तेही येथे निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्यासाठी येऊ शकले नाहीत आणि तिसरे संसदीय कार्यमंत्री, ज्यांना या सदनामध्ये निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्यासाठी म्हणून येणे आवश्यक होते ते खालच्या सदनामध्ये होते आणि त्यांना तेथून येथे येण्यास थोडा वेळ लागल्याने ज्यावेळेस या सदनामध्ये निरोप देण्याचा कार्यक्रम सुरू झाला त्यावेळेस ताबडतोब येथे येणे जमले नाही त्यामुळे या सदनात सरकार पक्षातील एक ज्येष्ठ मंत्री श्री. नारायण राणे, जे महसूल मंत्री आहेत आणि माजी मुख्यमंत्री आहेत, निवृत्त सदस्यांना निरोप देण्यासाठी उपस्थित असताना विरोधकांच्या बाकांवरून त्यांना आणि शासनाला सहकार्य करायला पाहिजे होते ते दुर्दैवाने केले गेले नाही. म्हणून आज या ठिकाणी या निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्याच्या समारंभाच्या वेळी विरोधी बाकांवर कोणीही सदस्य उपस्थित नसताना हा निरोप देण्याचे काम आपण येथे करीत आहोत.

...... 3ए 2 ..

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3A 2

श्री. कुलकर्णी ....

सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी पहिले सदस्य म्हणजे सन्माननीय श्री.प्रमोद नवलकर. श्री.प्रमोद नवलकर ही एक व्यक्ती नाही तर एक संस्था आहे असे मी म्हणेन. मला आठवते की, आम्ही ज्यावेळेस कॉलेजमध्ये होते त्यावेळेस 'दैनिक नवशक्ती' या वर्तमानपत्रातून "भटक्याची भ्रमंती" या सदरातून या मुंबई शहरामध्ये काय काय प्रकार चालले आहेत वा चालतात याची खडान् खडा माहिती येत होती. हे सदर लिहिणाऱ्याचे नाव 'भटक्या' म्हणून येत होते. त्यामुळे हा 'भटक्या' कोण हे आम्हाला समजत नव्हते पण ते एक आमचे आवडते सदर होते. हा 'भटक्या' म्हणजेच श्री. प्रमोद नवलकर हे आम्हाला काही वर्षांनी समजले. सभापती महोदय, गेली 34 वर्षे ते या विधीमंडळाचे सदस्य राहिलेले आहेत म्हणजे प्रथमतः 1972 मध्ये ते विधानसभेमध्ये निवडून आले आणि त्या पाच वर्षांनंतर मध्ये एक वर्षाची विश्रांती घेतल्या नंतर सातत्याने गेली जवळ जवळ 28 वर्षे ते या विधान परिषदेमध्ये निवडून येत आहेत आणि तेही एकाच मतदारसंघामधून, त्यांचा तो ठरलेला मतदारसंघ आहे .. 'मुंबई पदवीधर मतदारसंघ'. खालच्या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे किती वर्षे सदस्य आहेत ते मला माहीत नाही पण ते त्या सदनातील एक ज्येष्ठ सदस्य आहेत तसेच या सदनातील आजच्या घडीला सर्वात ज्येष्ठ सदस्य म्हणून श्री.प्रमोद नवलकर आहेत, इतका त्यांना या सदनातील अनुभव आहे. या सदनाची तोंडओळख होत असताना सन्माननीय श्री.प्रमोद नवलकर यांनी येथे ज्या चर्चा केल्या, जी भाषणे करून निरनिराळ्या विषयांवर बोलण्याचा प्रयत्न केला ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

त्यामुळे या सभागृहामध्ये नव्याने आलेल्या माननीय सदस्यांना अचूक मार्गदर्शन करणे, प्रत्येक प्रश्नावर स्पष्ट भूमिका आणि विचार मांडणे. आणि त्यामधून माननीय सदस्यांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन होईल, त्यांना शिक्षण मिळेल अशापध्दतीने मी त्यांचे सभागृहातील कामकाज पाहिले आहे. आज वयाच्या 69 व्या वर्षी ते या सभागृहामधून निवृत्त होत आहेत. जरी ते या सभागृहामधून निवृत्त होत असले तरी त्यांचा एकंदर स्वभाव पाहिला, त्यांचे निरनिराळया क्षेत्रातील काम पाहिले आणि त्यांचे छंद पाहिले तर त्यांचा शेवटचा श्वास असेपर्यंत ते सामाजिक जीवनामध्ये काम करीत राहतील. आतापर्यंत या सभागृहातील कामकाजामुळे त्यांना अन्य ठिकाणी वेळ देता येत नव्हता. परंतु यापुढे ते आपल्या सामाजिक कार्याकरता भरपूर वेळ देऊ शकतील. त्यांना त्यांचे पुढील सामाजिक व राजकीय काम करण्यासाठी दीर्घायुष्य लाभो अशी मी प्रार्थना करतो. तसेच, यापुढील त्यांचा काळ अत्यंत चांगला जाईल अशाप्रकारची सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. अशोक गजानन मोडक हे गेली 12 वर्षे कोकण पदवीधर मतदारसंघामधून निवडून येत होते. मागील निवडणुकीच्या वेळी माननीय सदस्य डॉ. मोडक यांच्याविरुध्द निवडणूक लढविण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. परंतु त्या निवडणुकीमध्ये आम्हाला यश मिळाले नाही. माननीय सदस्य डॉ. मोडक यांनी आपल्या मतदारसंघाची बांधणी अत्यंत चांगल्या प्रकारे केली आहे. त्यांचा मतदारसंघ हा उच्चभ्रू, सुशिक्षित मतदारांचा असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली 12 वर्षे ते काम करीत होते. त्यांनी या सभागृहामध्ये कोकणातील निरनिराळया प्रश्नांची सोडवणूक केली आहे. त्यामध्ये सुपारीवर पडलेला रोग, उपकर, शिक्षण, नोकऱ्या, सिंचन,रस्ते इत्यादी विषयासंबंधीच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचे काम सतत 12 वर्षे त्यांनी केले आहे. यावेळेस ते निवडणुकीला उभे न राहता त्यांचे जवळचे कार्यकर्ते श्री. संजय केळकर हे उभे राहिले व ते निवडून आले आहेत. या सभागृहामध्ये ते लवकरच येऊन शपथ ग्रहण करतील व सदस्य म्हणून काम करतील. माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांना सुध्दा पुढील सामाजिक कार्य करण्याकरीता दीर्घायुष्य लाभावे अशी मी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नानासाहेब चिमणराव बोरस्ते हे पी.डी.एफ. चे लोकशाही शिक्षक आघाडीचे आमदार म्हणून नाशिक पदवीधर मतदारसंघामधून निवडून आले. यावेळेस आम्ही पी.डी.एफ. च्या उमेदवारास मदत करण्याची भूमिका घेऊन आमच्या पक्षाच्या वतीने

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

निवडणूक लढविली नाही. आणि त्यामुळे माननीय श्री. बोरस्ते यांच्याकरीता पहिल्या पसंतीचे मत देण्याबाबत आमच्या कार्यकर्त्यांना निर्देश दिले होते, व आमच्या पक्षाचा संपूर्ण पाठिबा त्यांना दिला होता. आणि दुसऱ्या पसंतीचे मत श्री. सोनवणे या उमेदवारांना देण्याचे निर्देश दिले होते. परंतु दुर्दैवाने माननीय श्री. बोरस्ते हे फार थोडया मतांनी पराभूत झाले. आणि ज्यांना दुसऱ्या पसंतीचे मत दिले होते ते माननीय श्री. सोनावणे हे निवडून आले. . माननीय सदस्य श्री. नानासाहेब बोरस्ते यांना त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक जीवनामध्ये मी त्यांना सुयश चिंतितो, आणि ईश्वराने त्यांची प्रकृती उत्तम ठेवावी अशी मी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर या बाहेर आपल्याला भेटल्यानंतर त्या काय बोलतात, त्यांचा आवाज ऐकायला येत नसे. परंतु गेली साडे चार वर्षे आपण या सभागृहामध्ये पहात आहोत की, अत्यंत मृदू आवाजामध्ये त्यांना जे सांगावयाचे आहे ते स्पष्टपणे सांगतात. कोणत्याही शिक्षकावर अन्याय झाल्यावर त्यांनी प्रश्न उपस्थित केलेला नाही अशी घटना घडलेली नाही. प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षक संघटनेच्या प्रश्नावर त्या पोटतिडिकीने उभे राहून बोलतात व त्यांचे प्रश्न सोडविण्याचा ते सातत्याने प्रयत्न करतात. त्यांनी गेली 18 वर्षे शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्या सुध्दा आज या सभागृहामधून निवृत्त होत आहेत. काही लोकांनी त्यांना निवडणुकीला उभे राहण्यासाठी विनंती केली तरी देखील त्या उभ्या राहिल्या नाहीत. त्यांच्या जागेवर एक तरुण पत्रकार श्री. कपिल पाटील शिक्षक मतदार संघामधून भाजपच्या उमेदवाराचा पराभव करुन निवडून आले आहेत. माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांना त्यांच्या पुढील आयुष्यामध्ये सुयश चिंतितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे.. 15:50

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु..

सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट हे निवृत्त होत आहेत. उत्तम लोकप्रतिनिधी कसा असला पाहिजे त्याबाबतचे चांगले उदाहरण सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांचे देता येईल. मुंबई महानगरपालिकेमध्ये सातत्याने नगरसेवक म्हणून त्यांनी काम केलेले आहे. ते कोणत्या पक्षाचे आहेत हा प्रश्न निराळा आहे. पण त्यांना संधी मिळाल्यानंतर महानगरपालिकेमध्ये अत्यंत चांगल्या पकारे नगरसेवकाकडून काम केले. त्यांनी निरनिराळ्या समित्यांवर काम केलेले आहे त्यामुळे त्यांना त्यांच्या पक्षाने या सभागृहामध्ये येण्याची संधी दिली. त्यांनी या सभागृहामध्ये चांगल्या प्रकारे काम करुन दाखविलेले आहे. त्यांच्या पक्षाच्या वतीने त्यांना सभापती तालिकेवर घेण्यासाठी त्यांची शिफारस केली, त्यांची तालिका सभापती म्हणून यावेळीही निवड केली. त्यांच्या पुढील जीवनासाठी सुयश चिंतितो.

सन्माननीय सदस्य श्री.गोविंदराव आदिक हे दिनांक 27 जुलै रोजी निवृत्त होत आहेत. ते काँग्रेसचे जुने जाणते नेते. ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते,त्यांनी मंत्री म्हणून काम केलेले आहे, त्यानी यापूर्वी विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये काम केलेले आहे. सुदैवाने त्यांना पुन्हा या ठिकाणी संधी दिलेली आहे. त्यांचे देखील मी स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य श्री.शांतारामबापू करमळकर हे अत्यंत कर्मठ कार्यकर्ते आहेत. ते एका बाजूच्या कोपऱ्यात बसलेले असायचे. केवळ आवश्यक असेल तर आपला प्रश्न पामाणिकपणे मांडण्याचा ते प्रयत्न करत. सुरुवातीपासून ते शेवटपर्यन्त कोणी बसेल, नाही बसेल याची त्यांनी चिंता केली नाही परंतु ते शेवटपर्यन्त बसत. ते निवृत्त होत आहेत. त्यांना देखील त्यांच्या जीवनामध्ये सुयश चिंतितो.

सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दिन खतिब हे निवृत्त होत आहेत. माननीय खतिब साहब आप 6 साल बाद आज रिटायर हो रहे है.त्यांनी कधी मोठे भाषण केले नसेल पण पक्षाचे प्रतोद म्हणून त्यांनी सहा वर्षे चांगले काम केलेले आहे. ज्या ज्या वेळेला सभागृहामध्ये कोरमचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा प्रतोद म्हणून खालपासून वरपर्यन्त धावपळ करावी लागते याची मला माहिती आहे. माननीय खतिब साहब की आगे की बेहतर जिंदगी के लिए मैं शुभकामना व्यक्त करता हूं.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ....

सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे या निवृत्त होत आहेत. त्या थोडया त्यांच्या पक्षाबद्दल नाराज आहेत. पक्षाने त्यांना संधी सहा वर्षाची संधी दिलेली होती. मी आज अभिमानाने सांगेन की, या सभागृहातील 78 सन्माननीय सदस्यांमये आज विरोधी बाकावर त्यांच्या पक्षाच्या एकच महिला आहेत. आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन महिला आमदार आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी सभागृहामध्ये चांगले काम केलेले आहे. निरनिराळया प्रश्नांना त्यांनी वाचा फोडण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या जीवनाला मी सुयश चिंतितो.

सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे माझे जुने जाणते मित्र आहेत. त्यांना पुन्हा सदस्य म्हणून सहा वर्षाचा कालावधी मिळालेला आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे कोठेही गेले आणि आजूबाजूला पाहिले तर सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार दिसणारच असे समीकरण निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

त्यामळे सुदैवाने दोन्ही वेळेला जेव्हा विधान परिषदेच्या जागा भरण्याची वेळ आली तेव्हा पहिल्या वेळी श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असल्याने श्री. उल्हास पवार यांना अडचण निर्माण झाली नाही. यावेळी सुध्दा जेव्हा त्यांच्या निवृत्तीची वेळ आली तेव्हा पुन्हा त्यांचे मित्र श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असल्याने त्यांना पुन्हा या सभागृहात सदस्य म्हणून येण्यास अडचण निर्माण झ ाली नाही. त्यामुळे श्री. उल्हास पवार यांचे मी स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य म्हणून या सभागृहामध्ये बसतात. श्री. जयंत पाटील हे हिकमतगार आहेत. सहा वर्षापूर्वी जेव्हा विधान परिषदेची निवडणूक झाली त्यावेळी श्री. जयंत पाटील हे सर्वात जास्त मते मिळविणारे सदस्य होते. यावेळी सुध्दा ते निवडून आले आहेत. चमत्कार कसा घडून येतो हे कळत नाही. काल आपण एका ठरावावर चर्चा केली. कायद्यामध्ये बदल करण्यासंबंधीची चर्चा आपण केली. ते मते कोठून आणतात या प्रश्नावर चर्चा झाली. श्री. जयंत पाटील हे यासंदर्भातील एक चांगले उदाहरण आहे. सुदैवाने श्री. जयंत प्र. पाटील हे परत या सभागृहामध्ये सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत. यावेळी त्यांना पहिल्या फेरीत 17 मते मिळाली. त्यानंतर नववी फेरी झाली, दहावी फेरी झाली. श्रीमती उषाताई दराडे या सोळाव्या फेरीत निवडून आल्या. श्री. जयंत पाटील हे सतराव्या फेरीत निवडून आले. त्यांचेही मी स्वागत करतो. आता ते जसे कामकाज करीत आहेत तसेच कामकाज यापुढेही करतील.

सन्माननीय सदस्य श्री. दयानंद मस्के निवृत्त होत आहेत. ते या ठिकाणी बसलेले आहेत. ते शिक्षक होते. ते कलावंत होते. मला एवढे मोठे व्हावयाचे आहे अशी अपेक्षा त्यांनी कधी केली नाही. परंतु त्यांनी समाज जीवनामध्ये आणि राजकारणामध्ये प्रामाणिकपणाने काम केले. पक्ष त्यांना किती शक्ती देईल यापेक्षा त्या पक्षाच्या नेत्याबरोबर एकनिष्ठ राहण्याचे काम त्यांनी केले. श्री. चंद्रकांत हंडोरे मुंबईचे महापौर झाले. खरे म्हणजे त्यावेळी श्री. चंद्रकांत हंडोरे हे मुंबईचे महापौर होणार नव्हते तर श्री. दयानंद मस्के हे मुंबईचे महापौर होणार होते. परंतु उजव्या बाजूला काय आहे ? डाव्या बाजूला काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते. त्यावेळी ते शिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांनी म्युनिसिपालटीच्या शिक्षक पदाचा राजीनामा दिला नाही या एका

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

पार्श्वभूमीवर त्यांना डिसकॉलिफाय केले. त्यामुळे ते मुंबईचे महापौर होऊ शकले नाहीत. श्री. रामदास आठवले यांनी त्यांना या ठिकाणी येण्याची संधी दिली. त्यांचे आणि आमचे चांगले जमते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत आरपीआयचे सदस्य म्हणून श्री. दयानंद मस्के या सभागृहामध्ये आले आणि मंत्री म्हणून चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. ते निवृत्त होत आहेत. परंतु त्यांना घटनेने एक अधिकार दिलेला आहे. कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसलेली व्यक्ती सहा महिने मंत्री पदावर राहू शकते. आमच्या नेत्यांनी मान्य केले तर मंत्री म्हणून ते काम करतील आणि आपल्या बरोबर राहतील. मी त्यांना या निमित्ताने शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे निवृत्त होत आहेत. काही लोकांच्या पाठीमागे आई-वडिलांची पुण्याई असते. परंतु घरात कोणीही मोठा पुढारी किंवा नेता नसताना हा रस्त्यावरचा माणूस या सभागृहामध्ये सदस्य म्हणून आलेला आहे. ज्यावेळी ते आपल्या गावाहून या ठिकाणी आले तेव्हा कारपेंटरीचे काम करणे, इमारतीची रंगरंगोटी करणे अशी कामे त्यांनी केली. असा मनुष्य एवढ्या उंचीवर येऊ शकतो काय ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

स्वत:चे श्रम, स्वत:चे परिश्रम आणि त्यांनी केलेली मेहनत यांच्या जोरावर येथे पर्यन्तची उंची गाठणारे व्यक्तिमत्व म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे हे होत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना पुनश्च आमदारकी द्यावी असे आमच्या पक्षाला वाटत होते. परंतु आमच्या पक्षामध्ये दोन जागांसाठी 40 अर्ज आले होते. त्यामधून आमच्या पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्षांना आमदारकी देण्याचे पक्षाने ठरविले असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे आमच्या जवळचे असले तरी आम्ही त्यांना याबाबतीत मदत करु शकलो नाही. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे खालच्या सभागृहामध्ये येतील अशी मला खात्री आहे.तसा या सभागृहाचा पूर्वानुभव देखील आहे. तेव्हा त्यांनी त्यादृष्टीने प्रयत्न प्रयत्न करावेत, आमची संपूर्ण शक्ती त्यांच्या पाठिमागे राहील एवढेच मी त्यांना सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे देखील निवृत्त होत आहेत. परंतु ते मुंबई पदवीधर मतदारसंघातून पुनश्च निवडून आलेले आहेत. त्यांचे देखील मी स्वागत करतो आणि माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी याठिकाणी आणलेल्या ठरावाला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपल्या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर, सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, सन्माननीय सदस्य श्री. नानासाहेब बोरस्ते हे दिनांक 7 जुलै रोजी निवृत्त होत आहेत. तसेच दिनांक 27 जुलै रोजी सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट, सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक, सन्माननीय सदस्य श्री.शांताराम करमळकर, सन्मानीय सदस्य श्री. नतिकोद्दीन खतिब, सन्माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे असे एकूण 14 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. या सदस्यांना निरोप देण्यासंबंधीचा जो प्रस्ताव माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी मांडलेला आहे त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर म्हणजे आपल्या सभागृहातील एक अनमोल ठेवा. त्यांनी गेली 34 वर्षे हसत खेळत या सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम केले. अत्यंत प्रसन्न अशा प्रकारचे हे व्यक्तिमत्व. त्यांच्या बद्दल अनेक गोष्टी सांगता येतील. साहित्य, वाड.मय, नाटय-कलाकृती, प्रवास या माध्यमातून त्यांनी जे अनुभव विश्व निर्माण केलेले आहे त्याचा लाभ त्यांनी या सभागृहाला देखील मिळवून दिलेला आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात एक अफलातून कार्य केले. बॅ.अे.आर.अंतुले हे आपल्या राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांना आपल्या सोबत घेऊन रात्रीची मुंबई कशी असते हे त्यांनी दाखविले. त्यावेळी रात्रीची मुंबई कशी असते याचा साक्षात्कार बॅ. अे.आर.अंतुलेसाहेबांना झाला. त्यांचा आणि माझा चारच वर्षाचा संबंध. एक प्रतिभाशाली, बहुआयामी आणि सर्वगुणसंपन्न अशा प्रकारचे हे व्यक्तिमत्व. या सभागृहामध्ये जेव्हा जेव्हा टेन्शन निर्माण व्हायचे त्या त्या वेळी ते टेन्शन त्यांनी आपल्या वक्तृत्वाच्या माध्यमातून निरस्त्र केले. त्यांचा एक सततचा आग्रह असायचा की, गोरेगावचे जे नाना-नानी पार्क आहे .....

...यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

या नाना-नानी पार्कमध्ये सकाळच्या वेळी सदस्यांनी फिरायला यावे असा बऱ्याचदा त्यांनी आग्रह केला. आम्हाला जाता आले नाही ही गोष्ट वेगळी. लिखाणाच्या बाबतीत भ्रमंतीसारखे सदर नवशक्ती, महाराष्ट्र टाईम्स, सामना यासारख्या दैनिकामधून त्यांनी प्रसारित केले. भटक्या या नावाने त्यांनी संपूर्ण मुंबई शहराची भ्रमंती केली आणि जे लिखाण केले तो विलक्षण अशा प्रकारचा साहित्यप्रकार म्हणावा लागेल. हरफन मौला व्यक्तिमत्व असलेली व्यक्ती आज सदनातून निवृत्त होत आहे, त्यांनी जे साहित्य निर्माण केले त्यामध्ये अनेक कथा, कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांनी जे काही कथासंग्रह लिहिले ते वाचताना पु.लं.च्या व्यक्ती आणि वल्ली याची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही. त्यांनी अडगळ नावाचा कथासंग्रह लिहिला आहे. तो वाचल्यानंतर मला असे वाटले की, माझ्या घराचे चित्र पहातो की काय? प्रत्येकाने तो वाचल्यानंतर आपल्या घराचेच वर्णन आहे की काय एवढे जिवंत चित्रण या अडगळ कथेमध्ये त्यांनी मांडले आहे. हा जिवंतपणा मराठी साहित्यामध्ये अभावानेच जाणवतो. वेगवेगळया कथा आणि साहित्याच्या माध्यमातून प्रमोदजींनी जे चित्र रंगविले आहे ते खरोखरच अविस्मरणीय व कौतुकास्पद आहे. असे सर्वांना सातत्याने सोबत घेऊन जाणारे, निरंतर चालणाऱ्या या सभागृहाची 34 वर्षे निरंतर सेवा करणारे असे आपले ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर आज निवृत्त होत आहेत. त्यांच्या भावी जीवनास मी शुभेच्छा देतो. त्यांना सुदृढ दीर्घायुष्य लाभावे अशी तथागताच्या चरणी प्रार्थना करतो.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे अत्यंत मुद्देसूद आणि विद्वत्तापूर्ण भाषण या सभागृहात करीत असतात. आमच्यासारख्या सदस्यांसाठी त्यांचे भाषण नेहमीच मार्गदर्शक ठरत असते.

सन्माननीय सदस्य श्री.नानासाहेब बोरस्ते हे शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेले होते. यावेळी ते सदनामध्ये येऊ शकले नाहीत याबद्दल दु:ख वाटते. साधाभोळा, शेतकरी धाटणीचा माणूस, शेतकरी बाण्याचा शिक्षक याठिकाणी निवडून आला. त्यांनी त्यांच्या माध्यमातून या सभागृहामध्ये योगदान दिले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनीताई रायकर यांनी शिक्षकांच्या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा केला आणि अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला अत्यंत मोलाचा वाटा या सभागृहात उचलला आहे. त्यांचे देखील कार्य आपल्याला विसरता येणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांच्याबद्दल सांगावयाचे झाले तर शिवसेना पक्षाचे हे सदस्य नगरसेवक म्हणून मुंबई महानगरपालिकेत निवडून आलेले होते. ते नंतर विधानपरिषदेवर नियुक्त झाले. विधानपरिषदेच्या सदस्यांकडून जे जे काही शिकता येण्यासारखे असेल त्यामध्ये श्री.विलास अवचट यांचे व्यक्तिमत्व अत्यंत महत्वपूर्ण आहे.

सन्माननीय सदस्य श्री.गोविंदराव आदिक निवृत्त होत असले तरी ते पुन्हा निवडून आलेले आहेत, त्यांच्याबद्दल जास्त काही बोलण्याची गरज नाही.

सन्माननीय सदस्य श्री.शांताराम करमळकर हे वयोवृध्द सदस्य सभागृहातून निवृत्त होत आहेत. आमच्यासारख्या सदस्यांना त्यांनी जे मार्गदर्शन केले त्याचे देखील आम्ही स्मरण ठेवतो.

सन्माननीय सदस्य श्री.सय्यद नतिकोद्दीन खतीब हे आमचे चांगले मित्र आहेत. अकोला जिल्हयातील बाळापूरचे ते आहेत. बाळापूर नगरपालिकेच्या सदस्य पदापासून अध्यक्ष पदापर्यंत व त्यानंतर विधानपरिषद अशी त्यांची वाटचाल झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून त्यांच्या खानदानीमध्ये ही एक परंपरा आहे असे हे व्यक्तिमत्व आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

त्यांचा स्वभाव अतिशय शांत, सालस आणि मनमिळाऊ आहे. त्यांनी काँग्रेस पक्षाचे प्रतोद म्हणून जे कार्य केलेले आहे ते काँग्रेसचे सदस्य कधीही विसरु शकणार नाहीत. या सदनामध्ये जेव्हा कोरमचा अभाव असायचा, कॅबिनेट मंत्र्यांचा अभाव असायचा तेव्हा विरोधी पक्ष कामकाज स्थगित करण्याच्या संदर्भात सूचना करीत असे, परंतु अशावेळी माननीय खतिबसाहेब धावपळ करुन कोरम पूर्ण करीत असत, कॅबिनेट मंत्र्यांना सभागृहात बोलावत असत त्यामुळे त्यांचे कार्य काँग्रेस पक्षाचे सदस्य कधीच विसरु शकणार नाहीत. त्यांनी या सभागृहासाठी जे काही काम केलेले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो व त्यांच्या उज्वल भविष्याच्या संदर्भात प्रार्थना करतो तसेच त्यांनी या सभागृहात लवकरात लवकर येण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना करतो.

श्रीमती कांता नलावडे या सालस, प्रेमळ स्वभावाच्या आमच्या भगिनी आहेत. त्यांनी सुध्दा मोलाचे कार्य केलेले आहे. श्रीमती कांता नलावडे या लक्षात राहण्याचे कारण म्हणजे जेव्हा बजेट वर चर्चा सुरु व्हायची तेव्हा त्या कवितेच्या रुपाने मार्मिक विश्लेषण करीत असत. कोणत्याही विषयावर बोलण्यासाठी त्या उभ्या राहिल्या की, कवितेच्या रुपाने समर्पक मुद्दे उपस्थित करीत असत. ज्या प्रमाणे व्यंग चित्रकार ब्रशच्या दोन-चार फटक्यात चित्र रंगवितो, ज्या प्रमाणे कवी दोन चार ओळीत समर्पक कवितो करतो त्याच पध्दतीने श्रीमती कांता नलावडे कवितेच्या रुपाने बजेटचे विश्लेषण करीत असत. कविता करुन विश्लेषण करण्याण्याचा त्यांचा हातखंडा आहे. श्रीमती कांता नलावडे यांनी जे काम केलेले आहे ते आम्ही कधीही विसरु शकणार नाही.

श्री. उल्हास पवार यांच्या बाबत बोलण्याचीच आवश्यकता नाही. ते पुन्हा विधान परिषदेवर निवडून आलेले आहेत. ज्यावेळी त्यांचा निरोप समारंभ होईल त्यावेळी त्यांच्याबाबत बोलणे उचित होईल असे मला वाटते.

श्री. जयंत पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य आहेत. त्यांना क्रांतीकारी संघर्षाचा वारसा लाभलेला आहे. दिवंगत नेते प्रभाकर पाटील यांचे ते सुपुत्र आहेत. दिवंगत प्रभाकर पाटील यांनी जे कार्य केलेले आहे ते कार्य पुढे नेण्याचे काम ते करीत आहेत. श्री. जयंत पाटील हे कोणाचीही तमा न बाळगता आपले विचार व्यक्त करीत असतात. श्री. जयंत पाटील हे पुन्हा विधान परिषदेवर निवडून आल्यामुळे त्यांचे मी स्वागत करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के यांनी आंबेडकरी चळवळीत, नामांतराच्या चळवळीत, पँथरच्या प्रत्येक चळवळीत काम केलेले आहे. श्री. दयानंतद मस्के यांनी राज्यातील दलित, शोषित, पिडीत, अल्पसंख्यांकांना न्याय मिळवून देण्याचे काम केलेले आहे. प्रत्येक आंबेडकरी चळवळीत त्यांनी सहभाग घेतलेला आहे. त्यांना श्रेष्ठ कवी, चित्रकार, लेखक या गुनाचा वारसा लाभलेला आहे. त्यांनी रमाबाई आंबेडकर झोपडपट्टीतून आपल्या आयुष्याला सुरुवात करुन ते येथपर्यंत आलेले आहेत. त्यामुळे मला वाटते त्यांनी विधान परिषदेवर लवकरात लवकर येण्यासाठी प्रयत्न करावेत.

श्री. विनायक मेटे हे एक वादग्रस्त व्यक्तिमत्व आहे. ते जेव्हा सभागृहात आपले विचार मांडण्यासाठी उभे राहत तेव्हा विरोधी पक्ष काहीना काही टोणपे मारुन त्यांना खाली बसविण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु त्यांनी कधीही याची चिंता केली नाही. आपले म्हणणे ठामपणे मांडण्याचे त्यांनी काम केलेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

अखिल भारतीय मराठा महासंघाचे ते उपाध्यक्ष व सरचिटणीस होते. शिवसेनेचे अनुकरण करुन त्यांनी महाराष्ट्रात शिवसंग्राम ही संस्था उभी करण्याचे काम केलेले आहे. ते आज जरी निवृत्त होत असले तरी त्यांनी पुन्हा सभागृहात लवकरात लवकर यावे अशी माझी सदिच्छा आहे.

डॉ.दीपक सांवत हे पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आलेले आहेत.

सर्व निवृत्त होणाऱ्या सदस्यांना मी हार्दिक शुभेच्छा देता आणि त्यांना सुदृढ स्वास्थ्य लाभावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नतिकोद्दीन खतिब ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) :सभापति महोदय, मैं सबसे पहले यह कहना चाहुंगा कि कांग्रेस पार्टी की अध्यक्षा माननीया श्रीमती सोनिया गांधी, माननीय मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पार्टी के भूतपूर्व अध्यक्ष श्री गोविंदराव आदिक जी और माननीय गुलाम नबी आजाद जी का मैं हमेशा शुक्रगुज़ार रहूंगा क्योंकि उन्होंने मुझ जैसे एक छोटे कार्यकर्ता को विधान परिषद के सदस्य के रुप में इस सदन में भेजा. वैसे मुझे नगरपरिषद के कार्य का अनुभव है, लेकिन यहां विधान परिषद में आने के बाद मुझे बहुत कुछ सीखने को मिला. यह अनुभव मुझे आगे की जिंदगी में काम आएगा. निवृत्त होने वाले सदस्यों को निरोप देने का आज यहां जो कार्यक्रम हो रहा है, उसके अन्तर्गत संसदीय कार्य मंत्री माननीय श्री हर्षबर्धन पाटील जी,माननीय श्री गुरुनाथ कुलकर्णी जी और माननीय श्री जोगेन्द्र कवाड़े जी ने हम निवृत्त होने वाले सदस्यों के बारे में बहुत अच्छी बात कही, इसके लिए मैं उनका आभारी हूं. इस सदन में मुझे सभी सम्माननीय सदस्यों ने सहयोग दिया है, इसके लिए भी मैं सब का आभारी हूं. काँग्रेस पार्टी का प्रतोद होने के नाते मुझे अक्सर माननीय मंत्रियों को और माननीय सदस्यों को सदन में उपस्थित रहने के लिए बुलाना पड़ता था और वे सदन में आते थे. कभी कभी कुछ काम के लिए वे बाहर जाना चाहते थे लेकिन मैं उन्हें रोक लेता था. कभी किसी माननीय मंत्री जी को रोस्टर के अनुसार सदन में टर्न न होने के बावजूद भी उनको सदन में उपस्थित रहने के लिए विनती करता था, तो वे बुरा न मानते हुए सदन में उपस्थित रहते थे.यह हो सकता है कि किसी मंत्री जी को या किसी माननीय सदस्य को बुरा लगा होगा, लेकिन मैं उसके लिए उनसे माफी चाहता हूं. मुझे इस बात की खुशी है कि सभी मंत्रियों ने और माननीय सदस्यों ने मुझे सहयोग दिया. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं. शुक्रिया.

......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...3

श्री.दयानंद मस्के ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, प्रत्येकाच्या जीवनामध्ये अनेक वेळा अनेक ठिकाणी असे निरोपाचे प्रसंग येत असतात. त्यामुळे त्यास निरोप समारंभ म्हणावयाचा की नाही, असा प्रश्न निर्माण होतो. आपण श्रध्दांजली अर्पण करताना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहतो. आज आमच्या निरोप समारंभाच्यावेळी दोन वेळा सभागृहाची बैठक स्थगित झाली. या निरोपाला मी निरोप मानत नाही. आपण जोपर्यंत हयात आहोत तोपर्यंत असे समारंभ होतच राहणार आहेत. तुम्ही आम्हाला विसरणार नाही आणि आम्हीही तुम्हाला विसरणार नाही. आपल्या गाठीभेटी होतच राहणार. तेव्हा यास निरोप म्हणता येणार नाही. आताच सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपल्या भाषणात असे म्हणाले की., जेव्हा श्री.हंडोरे मुंबई महानगरपालिकेचे महापौर झाले त्यावेळी मी महापौर झालो असतो. परंतु मी शिक्षक पदाचा राजीनामा न दिल्यामुळे मला महापौर होता आले नाही. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, याठिकाणी शिक्षणमंत्री उपस्थित आहेत. प्राथमिक शाळेतील शिक्षकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. मी ज्या शाळेत शिक्षक होतो ती शाळा कॉर्पोरेशन चालवित होती. Run by corporation and not part of Corporation. शिक्षकाला शिक्षक प्रतिनिधीसाठी मतदान करणे आणि निवडणुकीसाठी उभे राहणे, हा घटनेने अधिकार दिलेला आहे. त्याचा वापर करुन मी कॉर्पोरेशनच्या निवडणुकीसाठी उभा राहिलो होतो. ज्या राजकीय घडामोडी घडल्या जातात त्यामुळे नर्व्हस न होता येणाऱ्या प्रत्येक प्रसंगांना हसत सामोरे गेलो तर आपण चांगली प्रगती करु शकतो असे मला वाटते.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 16:20

श्री.दयानंद मस्के...

सभापती महोदय, मी शेतकरी कुटुंबात वाढलो व माझा जन्म मागासवर्गीय समाजात झाला. माझे जीवन शेतकऱ्यांच्या कुटुंबात गेल्यामुळे मला अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न माहीत आहेत. माझा जन्म 1942 साली झाला. तो काळ स्वातंत्र्याच्या वातावरणातील होता. त्यावेळी सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर हा भाग स्वातंत्र्य आंदोलनाचा अग्रगण्य भाग होता. त्या वातावरणातील संस्कारांचा माझ्या जीवनावर परिणाम झाला आहे. कै.यशवंतराव चव्हाण, श्री.बाळासाहेब देसाई, श्री.राजाराम बापू पाटील व माननीय विधान परिषदेचे सभापती श्री.शिवाजीराव देशमुख हे सर्व त्या परिसरातील असून हे सर्व लोकांच्या प्रगतीच्या, विकासाच्या दृष्टीने कार्य करीत असत. या सर्वांच्या कार्याकडे पाहून मी माझी वाटचाल करीत राहिलो. त्या सर्वांचे ऋण याप्रसंगी व्यक्त करणे मला आवश्यक आहे. आज निरोपाच्या प्रसंगी मी माझ्या जीवनामध्ये एक चित्रकार, कवी, लेखक, शिल्पकार या सर्व भूमिकेतून गेलो त्यामध्ये राज्यमंत्री हे पद ॲड झाले. महत्वाचा मुद्दा असा की, जीवनातील प्रत्येक क्षण आनंदाने स्वीकारुन पुढे गेले पाहिजे. माझ्या अनेक सहकारी मित्रांनी याठिकाणी भावना व्यक्त केल्या की, आपण अजून याठिक्राणी असावयास पाहिजे होता. परंतु तो प्रसंग जीवनामध्ये एक दिवस येणारच आहे. कोणत्याही क्षणाला सामोरे जाण्याची आपली मानसिकता असावयास पाहिजे. जे काम हातामध्ये येईल ते मी हातात घेऊन त्याचे शिल्प कसे होईल या दृष्टीने सतत प्रयत्न केला. पेन्सिल हातामध्ये आली तर त्या माध्यमातून सुंदर चित्र कसे होईल, पेपर हातामध्ये आला तर त्या माध्यमातून सुंदर कविता कशी करता येईल, या दृष्टीकोनातून मी प्रयत्न केला. त्याचप्रमाणे या सभागृहामध्ये गृहनिर्माण खात्याचा राज्यमंत्री म्हणून आल्यानंतर आपल्या खात्याला जास्तीत जास्त वेळ देऊन लोकांचे प्रश्न कसे सोडवता येतील, यादृष्टीने प्रयत्न केला. आज मुंबईमध्ये गृहनिर्माण खात्याचे फार मोठे प्रश्न आहेत, ते सोडवताना कितीही वेळ असला तरी तो अपूरा पडतो. हे खाते मिळाल्यानंतर थोडा का होईना समाजाची सेवा मी करु शकलो, हा माझ्या जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा क्षण आहे. आज याठिकाणी आपण सर्वांनी माझ्या बद्दल ज्या भावना व्यक्त केल्या व जे सहकार्य केले ते मी कायमस्वरुपाची शिदोरी समजतो व ती सोबत घेऊन मी आपला निरोप घेतो.

धन्यवाद !

------

(..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय महसूल मंत्री आणि संसदीय कार्यमंत्री यांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीतील जो प्रस्ताव मांडला त्यावर मी माझे विचार मांडणार आहे.

संसदीय लोकशाहीच्या परंपरेनुसार विधान परिषदेमध्ये सर्वात मोठा व पवित्र कार्यक्रम हा सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा आहे. या पध्दतीने आपण या सदनामध्ये काम केलेल्या सनमाननीय सदस्यांना अत्यंत भावपूर्ण पध्दतीने निरोप देत असतो. अशी पध्दत विधानसभेमध्ये नसते. या दृष्टीने पाहिले तर विधान परिषदेमध्ये सन्माननीय सदस्यांचा गौरव करणे, त्यांना भावपूर्ण शुभेच्छा देणे, त्यांनी याठिकाणी ज्या पध्दतीने काम केले त्याचा अत्यंत अभिमानाने उल्लेख करणे, अशा पध्दतीचा हा कार्यक्रम आहे. निरोप समारंभाचा कार्यक्रम कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आला होता, परंतु काल मुंबईमध्ये पावसाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे काल हा कार्यक्रम होऊ शकला नाही. माननीय संसदीय कार्यमंत्र्याच्या विनंतीवरुन हा कार्यक्रम आज घेण्याचे निश्चित झाले व त्याप्रमाणे हा कार्यक्रम आज होत आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**.........

सदनामध्ये सत्तारुढ पक्षाचे कुणी नाही याकरिता कुणी रागावले तर मी समजू शकतो. पण याबाबत सामुदायिक जबाबदारी म्हणून या सदनामध्ये सन्माननीय महसूल मंत्री उपस्थित होते, त्यांनी चर्चेचा सुरुवात केली आणि त्यानंतर विरोधी बाकावरील आपले सर्वांचे सहकारी नकळत काही प्रमाणात नाराज झाले. त्यांची नाराजी ही मी समजू शकतो. सन्माननीय श्री.राणेसाहेबांनी ठराव मांडला आणि 10 मिनिटे आपले मनोगत व्यक्त केल्यानंतर मी सभागृह 15 मिनिटांकरिता तहकूब केले. दरम्यानच्या काळात संसदीय कार्यमंत्री हे सुध्दा या ठिकाणी उपस्थित झाले. निरोप समारंभासारख्या पवित्र समारंभाला राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संसदीय कार्यमंत्री उपस्थित असावेत ही जी अपेक्षा आहे ती अपेक्षा तर निश्चित योग्य आहे. पण त्याचबरोबर सामुदायिक जबाबदारीचे जे संकेत आहेत ते विधानसभेत, विधानपरिषदेत पाळले जातात एवढेच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर सुध्दा त्या त्या संसदीय संस्थेमध्ये पाळले जातात. या अनुषंगाने आपण प्रयत्न केला आणि पुन्हा संसदीय कार्यमंत्री सभागृहात आल्यानंतर 2 वेळा सदनाचे कामकाज तहकूब झाले आणि आता निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांच्या निरोपाच्या अनुषंगाने या ठिकाणी आपण उपस्थित राहिलो आहोत.

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.प्रमोद नवलकर ही ख-या अर्थाने व्यक्ती नसून महाराष्ट्राचा बुलंद आवाज आहे. सलग 50 वर्षे महाराष्ट्रातील अनेक समस्या वेशीवर टांगण्याची उमेद असणारा, परखड विचार या ठिकाणी आणि बाहेरही मांडणारा, परखड म्हणण्यापेक्षा त्यांची जी जबरदस्त जिद्द आहे त्या जिद्दीकडे महाराष्ट्रातील आम जनता आदराने पाहते आणि त्यांच्या माध्यमातून सातत्याने गोरगरीब जनतेला न्याय देण्याची प्रक्रिया आज सुरु आहे आणि उद्याही सुरु राहणार आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य, श्री.प्रमोद नवलकर यांनी 30 वर्षापेक्षा अधिक काळ विधानसभा, विधान परिषदेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून काम केले आणि आज ते या सदनातून निवृत्त होत आहेत. त्यांना उदंड आयुष्य मिळो. असंघटीत, सामान्य, कष्टकरी, कामगार यांच्या कल्याणाच्या अनुषंगाने आज ज्या उमेदीने ते काम करीत आहेत तीच उमेद त्यांना शेवटच्या क्षणापर्यन्त रहावी, परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो, अशी प्रार्थना करतो.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

**सभापती**...........

सन्माननीय सदस्य, डॉ.अशोक मोडक हे एक अत्यंत तडफदार, कुशाग्र व्यक्तिमत्व मानावे लागेल. या सदनामध्ये त्यांची अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण भाषणे झाली. संसदीय इतिहासामध्ये अत्यंत मोलाची भर घालतील या पध्दतीने अनेक विषयांवर त्यांनी विचार मांडले. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे जे काम आहे ते मान्यता पावलेले आहे. अनेक देशांमध्ये त्यांनी यापूर्वी प्रवास केलेला आहे. आज जरी एका क्षणाकरिता ते या सदनाच्या बाहेर गेले असतील पण कधीही ते पुन्हा लोकप्रतिनिधी म्हणून येऊ शकतात आणि या माध्यमातून समाजाची मोलाची सेवा करु शकतात.

सन्माननीय सदस्य, श्री.नानासाहेब बोरस्ते हा एक हाडाचा कार्यकर्ता आहे. नाशिक जिल्हयात माध्यमिक शिक्षणाच्या चळवळीमध्ये उमेदीने काम करणारे नेतृत्व आहे. हे नेतृत्व मितभाषी आहे परंतु ते जे बोलतात ते अत्यंत परखडपणे आणि ठामपणे बोलतात. असा हा माझा सहकारी आहे. त्यांनाही उदंड आयुष्य लाभो, अशी मी प्रार्थना करतो.

सन्माननीय सदस्या, श्रीमती संजीवनी रायकर यांचा माझ्या दालनातील आवाज अतिशय हळूवार असतो. परंतु, या सदनामध्ये बसल्यानंतर त्यांचा आवाज अत्यंत स्पष्ट आणि जो मुद्दा त्यांनी हाती घेतलेला असतो तो शेवटपर्यन्त न सोडता तो प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने त्या सतत त्या प्रश्नाच्या भोवती असतात.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ......... 16:30

**सभापती** ...............

आज आमच्या या भगिनी विधान परिषदेच्या सदस्या म्हणून निवृत्त होत असल्या तरी त्यांना भावी आयुष्यात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये काम करण्याची संधी मिळावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांना अत्यंत विचारी असे तरुण नेतृत्व म्हणावे लागेल. मुंबईतील समस्या मग त्या नागरी समस्या असतील किंवा इतर कोणत्याही समस्या असतील त्यावर आत्मविश्वासाने बोलणारे आणि सातत्याने त्या मुद्याचा पाठपुरावा करणारे असे हे व्यक्तिमत्व आहे. आज ते तरुण वयामध्ये निवृत्त होत आहेत. त्यांना भावी आयुष्यामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारची संधी मिळावी, अशा मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री.गोविंदराव आदिक हे पुन्हा या सभागृहाचे नव्याने सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत. महाराष्ट्रातील शेतक-यांचे अत्यंत उमेदीने नेतृत्व करणारा महाराष्ट्र काँग्रेसचा ज्येष्ट नेता, माझा ज्येष्ट सहकारी महाराष्ट्रातील शेतक-यांचे प्रश्न मांडण्यासाठी पुन्हा या सभागृहामध्ये आलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.शांताराम बापू करमळकर हे आवश्यक तेवढेच बोलत होते. परंतु बोलत असतांना परखडपणे बोलण्याची त्यांची परंपरा होती.

सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब यांच्या बाबतीत मी एवढेच सांगेन की, हाडाचा कार्यकर्ता कसा असावा यादृष्टीने त्यांच्याकडे बघितले पाहिजे. कितीही आनंद झाला तरी बेहोश न होणे आणि कितीही मोठी अडचण आली तरी हबकून न जाणे, असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. पक्षाकरिता ते सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. पक्षाने दिलेले काम त्यांनी त्यांच्या जिल्हयामध्ये, विदर्भामध्ये आणि सभागृहामध्ये देखील चांगल्या प्रकारे पार पाडलेले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांच्या बाबतीत मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी असे सांगितले की, श्रीमती कांता नलावडे या सभागृहाच्या कामकाजामध्ये हिरिरीने भाग घेत होत्या. त्यांना पुढच्या काळामध्ये या सभागृहामध्ये येण्याची संधी मिळावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .........

सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे पुन्हा नव्याने निवडून आलेले आहेत. श्री.उल्हास पवारांना महाराष्ट्राच्या कानाकोप-यामध्ये कष्ट करणा-या युवकांचे आदर्श नेतृत्व म्हणावे लागेल. संत वाड्.मयावर जबरदस्त पकड असणारे हे व्यक्तिमत्व आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील पुन्हा नव्याने निवडून आलेले आहेत. श्री.जयंत पाटील हे त्यांच्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेऊन कार्य करीत आहेत. ज्यावेळी शेतक-यांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित होतात त्यावेळी आक्रमक पद्धतीने प्रश्न मांडण्याची त्यांची हातोटी आहे.

सन्माननीय राज्यमंत्री श्री.दयानंद मस्के यांच्या बाबतीत मी एवढेच सांगेन की, मी ज्यावेळी प्रदेश कॉंग्रेसचा अध्यक्ष होतो त्यावेळी या हाडाच्या कार्यकर्त्यासमोर मुंबईचे महापौरपद आले होते. परंतु दुर्दैवाने त्यावेळी या हाडाच्या कार्यकर्त्यावर नियतीने घाला घतला आणि त्यांना ते पद मिळू शकले नाही. मुंबईचे महापौरपद राजकीय दृष्टया महत्वाचे मानले जाते.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

ते पद त्यांच्यापासून बाजूला गेले, दूर गेले. त्यामागे एखादे तांत्रिक कारण असेल वा अन्य काहीही कारण असेल. पण तरीही अत्यंत खुल्या मनाने काम करणारा असा हा माणूस आहे. आजही आपण पाहिले की, येथून जात असताना, निरोप घेताना आपल्या मनाला हूरहूर वाटते आणि मग एखादा सदस्य एखाद्या अशा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे कटाक्षाने टाळतो. पण श्री. दयानंद म्हस्के यांनी मघाशी जे भाषण केले त्यातून त्यांची उमेद दिसून येते. मला खात्री आहे की, त्यांना देखील त्यांच्या भावी आयुष्यात यापेक्षा उत्कृष्ट काम करण्याची संधी परमेश्वर जरूर देईल.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हेही आज आपल्यातून निवृत्त होत आहेत. त्यांनी आजवर येथे अनेकदा चांगले विचार मांडले आहेत. सातत्याने धडपड करणाऱ्या तरूणांपैकी ते एक आहेत. परखड बोलणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. एकदा बोलत असताना कोणी त्यावर टीका-टिपणी केली तर मर्यादा ठेवून त्या टीकेला उत्तर देण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. त्यांचे भावी आयुष्य निश्चितपणे चांगले आहे, त्यांना अनेक उत्कर्षाच्या संधी मिळतील अशी माझी खात्री आहे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हेही आज आपल्यातून निवृत्त होत आहेत पण ते पुन्हा येथे निवडून आलेले आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील हा माणूस राज्यातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सुविधा सुलभतेने, सहजतेने उपलब्ध व्हाव्यात म्हणून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. या क्षेत्रात अतिशय चांगले काम ते करीत आहेत. ते पुन्हा येथे निवडून आलेले आहेत.

अशा प्रकारे या ठिकाणी हे 14 सदस्य आपल्यातून निवृत्त होत आहेत आणि त्यापैकी 4 सदस्य पुन्हा येथे निवडून आलेले असल्याने त्यांचे मी पुन्हा स्वागत करीत आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये, असंघटित सामान्य समाज आहे, जो तुमच्या आमच्या सर्वांचाच केंद्रबिंदू आहे त्यांच्या सेवेसाठी आपल्याला उदंड आयुष्य लाभो अशी मी या निमित्ताने शुभेच्छा देतो.

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा व त्यानंतर विधान भवनाच्या दुसऱ्या मजल्यावरील विधान परिषद सभागृहाच्या बाह्य लॉबीमध्ये चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कृपया सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे. त्यासाठी सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन 5.05 मिनिटांनी पुन्हा सुरू होईल.

...... 3एल 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्यापूर्वी मी एवढेच सांगेन की, या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मिडियाला या सदनामध्ये होणाऱ्या कामकाजाचे विशेषत: प्रश्नोत्तराचा तास तसेच लक्षवेधी सुचनेवरील चर्चा आहेत त्या मर्यादेपर्यंत छायाचित्रण करण्यास परवानगी आपण दिली आहे. मात्र या सदनाच्या माध्यमातून इतर कोणत्याही प्रकारचे छायाचित्रण व्हावे यासाठी त्यांना परवानगी नाही याची नोंद इलेक्ट्रॉनिक मिडियाने घेण्याची आवश्यकता आहे. तसेच सन्माननीय पत्रकारांनादेखील मला सांगितले पाहिजे की, पत्रकार गॅलरीमध्ये बसून आपण या विधान परिषदेच्या कामकाजाचे अवलोकन करून त्याचे रिपोर्ट करणे या पद्धतीचे काम करीत असता. मला खात्री आहे की, या अनुषंगाने अन्य ठिकाणची चर्चा मग ती कोणत्याही विषयाची असली तरी त्याचा उल्लेख आपल्याकडून होणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आता मी सभागृहाची बैठक तहकूब करीत आहे. सभागृहाची बैठक 5 वाजून 05 मिनिटांनी पुन्हा सुरू होईल.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 39 मिनिटांनी स्थगित झाली. )

( यानंतर श्री.सरफरे .... 3एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)**

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**

**तालिका सभापती** : आता नियम 97 अन्वये चर्चेला सुरुवात होईल. ही चर्चा संपल्यानंतर सकाळच्या सत्रातील नियम 260 अन्वये घेण्यात आलेल्या चर्चेला मंत्रिमहोदय उत्तर देतील.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने अत्यंत खेदपूर्वक एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. या सदनामध्ये एक अभूतपूर्वक प्रकार घडला. त्याला आपण साक्षीदार असल्यामुळे त्यावर वेगळे बोलण्याची गरज नाही. त्यावेळी आम्ही सर्वजण नाईलाजाने सभागृहाबाहेर गेलो. आणि मग आम्हाला लॉबीमध्ये बसण्याशिवाय दुसरा उपाय नाही. आणि मग जे बोलावयाचे होते, गप्पा मारावयाच्या होत्या, सुसंवाद साधावयाचा होता तो साहजिकच एका शिस्तीत राहून साधला. आपण देखील आपला मोठेपणा म्हणून काही काळ आमच्यामध्ये सहभागी झाला होता. आणि मग साहजिकच असे घडले की, पत्रकारांना कोणत्याही गोष्टींचे आकर्षण असते. मी देखील 50 वर्षे पत्रकार होतो. पत्रकारीता हा त्यांचा पिंड असतो. असे काही वेगळे घडले की, पत्रकार त्या ठिकाणी उपस्थित राहतात. त्यामुळे काही पत्रकार त्या ठिकाणी आले व ते शांतपणे उभे होते. त्यांनी त्याठिकाणी काहीही गडबड केली नाही. आणि आम्ही देखील घटनाबाह्य किंवा आपल्या घटनेमध्ये न बसणारे अशाप्रकारचे भाष्य केले नाही. असे असतांना सुध्दा त्या ठिकाणी असलेल्या काही गार्डसना त्या पत्रकार मंडळींना बाहेर काढा अशाप्रकारचा संदेश आपल्या खुर्चीमधून गेला. एवढयावरच हे संपलेले नाही. त्यानंतर आम्हाला जे समजले आणि या सभागृहामध्ये अधिकृतरित्या सांगितले गेले की, सभागृहाच्या बाहेर जे काही घडले आहे त्याचे कव्हरींग पत्रकारांनी करता कामा नये. ते औचित्यपूर्ण होणार नाही, तो तुमचा अधिकार नाही. तुम्ही तुमच्या जागेवर बसून सभागृहातील कामकाजाचे कव्हरींग केले पाहिजे. ही बाब आणीबाणीच्या पलिकडची आहे. पत्रकारांना जे दिसते ते लिहिण्याचा अधिकार आहे, जे कळते ते लिहिण्याचा अधिकार आहे. ते जर खोटे असेल तर गोष्ट वेगळी. परंतु सभागृहामध्ये, सभागृहाच्या बाहेर पायरीवर जे काही चालले आहे ते पहाण्याचा आणि लिहिण्याचा त्यांना अधिकार आहे. जो हाडाचा पत्रकार आहे तो कानाकोपऱ्यामध्ये जाऊन माहिती घेईल. तो कुठेतरी एका भिंतीच्या कोपऱ्यामध्ये बसून पाहणार नाही. अशाप्रकारचे बंधन त्यांच्यावर घालणे हे लोकशाहीच्या विरुध्द



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर....

आहे, त्यांच्या हक्कावर गदा आणण्यासारखे आहे. एक वरिष्ठ पत्रकार म्हणून सांगतो की, त्यांच्या हक्कावर अशाप्रकारे गदा आणू नका. मला एक प्रसंग आठवतो की, आपल्या एका सदस्यांनी दुसऱ्या एका सदस्यांना लॉबीमध्ये लाथ मारली होती. त्यावेळी मोठा राडा झाला होता. याठिकाणी "राडा" शब्द सभागृहामध्ये वापरणे बरोबर नाही. सभागृहाबाहेर दंगल झाली होती. कुणी कुणाला मारले, कुणी कुणाच्या ऊरावर बसले याचे संपूर्ण कव्हरेज दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रामध्ये आले होते. तुमचे श्री. विलास लोणारे हे त्याठिकाणी होते. त्यावेळी एक वेगळे स्पिरिट नव्हते, त्यावेळी काही जरी घडले असले तरी ते वेगळे स्पिरिट नव्हते. ते स्पिरिट पत्रकारांना कळते. त्यामुळे कोठल्याही प्रकारे आपला कमीपणा होईल, किंवा आपल्या कार्यामध्ये विघ्न येईल अशाप्रकारचे रिपोर्टींग आपले पत्रकार कधी करीत नाहीत. त्यांना त्यांची जबाबदारी माहीत आहे. असे असतांना तुमच्या जागेवर बसून तुम्हाला जे दिसते तेच फक्त लिहायचे. आणि बाहेर तुम्हाला काय दिसले तर ते लिहायचे नाही अशाप्रकारचे बंधन त्यांच्यावर घालणे अत्यंत चुकीचे आहे. एक पत्रकार म्हणून आपणास विनंती करतो की, त्यांच्याकडून हिरावून घेतलेले स्वातंत्र्य आपण आपल्या खुर्चीमधून त्यांना पुन्हा बहाल करावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. नितीन गडकरी (पुढे सुरु...

मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, इमर्जन्सी लागली असेल तर गोष्ट वेगळी आहे. परंतु लोकशाहीमध्ये अशाप्रकारे पत्रकारांनी काही लिहून घ्यायचे नाही, असे सांगणे योग्य नाही. सिक्युरिटीचे अधिकारी येऊन तेथील पत्रकारांना सांगतात की, तुम्ही बाहेर जा, ते जे काही बोलतात ते छापू नका. आम्ही देखील सदस्य आहोत, सभागृहात आणि बाहेर असे कधी झाले नाही. आता याबाबतीत अत्यंत वाईट संदेश गेलेला आहे. लोकशाहीच्यादृष्टीने हे बरोबर नाही. मला मान्य आहे की, सभागृहाच्या आतमध्ये काय असेल आणि आपण काही सांगितले तर ही गोष्ट ठीक आहे. परंतु सभागृहाच्या बाहेर घडणाऱ्या घटनांची नोंद पत्रकार घेतात, त्याची नोंद घेण्याचा त्यांना अधिकार आहे. "Freedom of Press, Freedom of Speech" हे त्यांना अधिकार आहेत. त्याची नोंद करु नये असे सांगणे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. यामध्ये निश्चितपणे सुधारणा करणे गरजेचे आहे. ही आपल्याकडून अपेक्षा आहे. लोकशाहीच्यादृष्टीने ही सुधारणा करावी, अशी विनंती आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनामध्ये अप्रिय अशा घटना घडल्या. आम्हा सर्व सदस्यांचे असे मत झाले की, या पुढच्या कार्यक्रमात आम्ही भाग घेणे म्हणजे आमचा अपमान करुन घेण्यासारखे आहे. अशाप्रकारची आमची भावना झालेली आहे. म्हणून आम्ही सर्वजण बाहेर जाऊन बसलो. या सदनातील जवळजवळ 14 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यांचा निरोप समारंभ आपल्याशी चर्चा करुन, आजच प्रश्नोत्तराचा तास संपल्या नंतर ठेवला होता. खरे म्हणजे शासनाची जबाबदारी होती की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, या सदनाचे सन्माननीय नेते किंवा संसदीय कामकाज मंत्री हे उपस्थित राहून हा निरोप समारंभ व्यवस्थित पार पाडाव आणि आमचीही तशीच कल्पना होती. परंतु तसे घडले नाही. म्हणून आम्ही बाहेर जाऊन बसलो. जे सन्माननीय सदस्य निवृत्त होऊन जात आहेत, त्यांच्याबद्दल दोन शब्द बोलून त्यांना निरोप देणे हे आमचे कर्तव्य होते. म्हणून लॉबीमध्ये बसून त्यांच्याबद्दल बोलत होतो. आम्ही कोणाविषयी वाईट उद्‌गार काढले नाहीत. त्यांचे भविष्य उज्वल होवो, अशी परमेश्वरा चरणी प्रार्थना केली. या सगळया गोष्टी होत असताना, उत्स्फूर्तपणे त्या ठिकाणी पत्रकार आले. त्यांनी प्रश्न विचारले, परंतु आम्ही त्यांना काही सांगितले नाही. जे काही त्या ठिकाणी घडले ते उत्स्फूर्तपणे घडले. अशाप्रकारचे आदेश आपल्याकडून गेले असतील किंवा आणखी कोणाकडून गेले असतील. तशी वस्तुस्थिती घडली असेल तर लोकशाहीचा आधार स्तंभ म्हणून या सभागृहाचे लोकशाहीमध्ये सर्वोच्च स्थान आहे. या संदर्भात येथे जे घडते ते लोकशाहीला पूरक असले पाहिजे,ते लोकशाहीला मारक असता कामा नये, ही या मागची भावना आहे. यादृष्टीने आतापर्यन्तचे संपूर्ण वर्तन लोकशाहीला धक्का बसेल असे केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये सभागृहामध्ये निरोप समारंभ झाला, ही चांगली गोष्ट आहे. मी त्याबद्दल कोणाला दोष देत नाही. सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी आता जे भाष्य केले, त्या अनुषंगाने मलाही वाटते की, शेवटचा दिवस गोड व्हावा. या दृष्टीकोनातून आम्ही हा सगळा प्रयत्न केला. सदनाच्या बाहेर गेलो. म्हणून मी आपल्याकडे सहकार्याची अपेक्षा करतो. आपले 'सभापती' म्हणून सर्वोच्च स्थान आहे, आपल्या सर्वोच्च स्थानावरुन अपमानकारक वागणूक देणारा आदेश गेला असेल तर त्याचा आपण फेरविचार करावा. "One should always apply his second mind to the problem." तेव्हा त्याबाबतीत निर्णय घ्यावा अशाप्रकारीची विनंती करतो.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य श्री.नवलकर साहेबांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. कदाचित त्यांचा आणि सन्माननीय सदस्यांचा गैरसमज



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु....

झाला असावा, असे मला वाटते. सदनामध्ये काय चर्चा झाली, हे ऐकण्यासाठी आपण येथे उपस्थित नव्हता, बाहेर लॉबीमध्ये होता. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, माननीय सभापती महोदय,आपण आसनस्थ झाल्यानंतर त्या बाजूचे सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हतें,त्याचबरोबर पत्रकारांच्या गॅलरीमध्ये पत्रकार उपस्थित नव्हते.

यानंतर श्री.बरवड....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

एक दोन पत्रकार समोरच्या गॅलरीत उपस्थित असतील. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी असा उल्लेख केला की, पत्रकारांना धक्के देऊन बाहेर काढा, त्यांना आत थांबू देऊ नका असे आदेश सभापतींकडून आले. सन्माननीय सदस्य काय म्हणाले यापेक्षा सभापती महोदय, वस्तुस्थिती काय घडली ते मी सांगतो.

श्री. नितीन गडकरी : "सकाळ"च्या पत्रकाराला हात धरुन बाहेर काढले.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वास्तविक पाहता पत्रकारांनी लॉबीमध्ये येऊ नये. लॉबी पत्रकारांसाठी नाही. लॉबी ही सन्माननीय सदस्यांसाठी आहे. इलेक्ट्रॉनिक मिडियाचे काही कॅमेरामन लॉबीमध्ये होते. हे ज्यावेळी माननीय सभापतींच्या निदर्शनास आले त्यावेळी माननीय सभापतींनी नम्रपणे सांगितले की, त्यांना लॉबीमध्ये थांबता येणार नाही. वास्तविक त्यांना लॉबीमध्ये प्रवेश कोणी दिला ? ते कसे आले ? यापेक्षाही त्यांनी लॉबीमध्ये थांबू नये एवढेच माननीय सभापती बोलले. त्यानंतर लॉबीमध्ये किंवा त्या परिसरामध्ये काही चर्चा झाली असेल तर ती आपण प्रकाशित करु नये....

श्री. नितीन गडकरी : याचा अर्थ काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्यांनी मला बोलू द्यावे. ज्यावेळी सन्माननीय सदस्य लॉबीमध्ये बसले होते त्यावेळी मला समजल्यानंतर मी त्यांच्याकडे गेलो आणि संसदीय कार्य मंत्री म्हणून त्यांना विनंती केली की, आपण सभागृहामध्ये जाऊ या आणि सभागृहामध्ये हे कामकाज सुरु करु. मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना विनंती केली. त्या ठिकाणी उभे राहून त्यांची वक्तव्ये किंवा भाषणे चालली होती. त्या ठिकाणी निरोप समारंभ चालला होता. लॉबीमध्ये बसून हे सर्व चालू होते. मी त्यांना विनंती केली की, माननीय सभापतींनी आपल्याला बोलवले आहे. मी त्यांना सांगितले की, माननीय सभापती आलेले आहेत, आपण जाऊया. ते येण्याच्या मन:स्थितीत नव्हते. मी पुन्हा दुसऱ्यांदा विनंती केली. वास्तविक ज्यावेळी निरोप समारंभाचा कार्यक्रम असतो त्यावेळी सभागृहाचे नेते ....

श्री. नितीन गडकरी : आम्ही अशी विनंती केली होती की, सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, निरोप समारंभाचा ठराव सभागृहामध्ये झाला. त्यावेळी समोरच्या बाजूचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित असते तर त्याला चांगले स्वरुप आले असते. दुर्दैवाने सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित नव्हते. विधानसभा सभागृहामध्ये स्थगन प्रस्तावाची चर्चा चालू आहे आणि ते कारण मी आपल्याला सांगितले. विधानसभा सभागृहातील चर्चा बंद करता येत नाही. माझी एवढीच विनंती आहे की, हा प्रश्न पुढे वाढवू नये. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर हे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत. गेली अनेक वर्षे त्यांनी या सदनामध्ये सदस्य म्हणून, मंत्री म्हणून उत्तम पध्दतीने काम केलेले आहे. शेवटी निरोप समारंभाचा जो कार्यक्रम असतो तो प्रत्येकाच्या जीवनामध्ये महत्वपूर्ण कार्यक्रम असतो. परंतु दुर्दैवाने आज या सगळ्या गोष्टींमध्ये ते होऊ शकले नाही. माझी सदनाला विनंती राहणार आहे. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर मी त्यांच्याकडे गेलो आणि माननीय सभापतींनी फोटोसेशनसाठी बोलविले आहे असे सांगितले. मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांना विनंती केली. आपण खाली गेल्यानंतर त्यांची वाट पाहिली. ते येऊ शकले नाहीत. चहापाण्यासाठी त्यांना निमंत्रण दिले. त्यासाठीही ते येऊ शकले नाहीत. सन्माननीय सदस्य जे म्हणाले की, "त्यांना येथून हाकलून द्या, त्यांना धक्के देऊन बाहेर काढा," असे कोणतेही आदेश माननीय सभापतीनी दिलेले नाहीत.

श्री. मधुकर चव्हाण : ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी त्यांना विचारले की, त्यांना बाहेर काढण्यास तुम्हाला कोणी सांगितले ? तेव्हा सिक्युरिटी अधिकाऱ्यांनी सांगितले की, सगळ्यांना बाहेर काढण्याचे, त्यांचे कॅमेरे घेण्याचे आदेश माननीय सभापतींनी आम्हाला दिलेले आहेत. हे आमचे उद्‌गार नसून त्यांचे उद्‌गार आहेत.

श्री. अरविंद सावंत : माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे वक्तव्य केले त्यामध्ये सुध्दा त्यांनी मुलामा देत देत असे सांगितले असे निदेश दिले. ते छापू नका, प्रकाशित करु नका हे निदेश वरुन आले असे त्यांनी सांगितले. दोन्ही वाक्ये त्यांच्याच भाषणात आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी जो मूळ मुद्दा मांडलेला आहे त्याला मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे...

श्री. हर्षवर्धन पाटील : रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, "पत्रकारांना धक्का देऊन बाहेर काढा" अशा प्रकारचे वक्तव्य माननीय सभापतींनी मुळीच केलेले नाही...

श्री. नितीन गडकरी : मी आणि पत्रकार श्री. देशमुख आम्ही दोघे बोलत असताना सुरक्षा अधिका-याने माझ्या समक्ष श्री. देशमुख या पत्रकाराला हाताला धरुन बाहेर काढले. ही पध्दत योग्य आहे काय ? या सभागृहामध्ये हे काय चालले आहे ? कोण तो सुरक्षा अधिकारी ? त्याने माझा अपमान केला. बरे झाले, तो माझ्या हातून वाचला. त्याला एक झापड मारली असती..

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य आणि माजी विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी सुरक्षा अधिका-याच्या बाबतीत अशा प्रकारचे वक्तव्य करणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : ...माझे सदस्यत्व रद्द करा. ठराव आणून माझ्यावर कारवाई करा. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे त्यांच्या स्वीय सहायकाबरोबर लॉबीमध्ये बोलत असताना त्यांच्या स्वीय सहायकाला हाताला धरुन बाहेर काढले तर सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना कसे वाटेल ?

श्री. हर्षवर्धन पाटील : लॉबीमध्ये स्वीय सहायक कशाला येईल ?

श्री. नितीन गडकरी : लॉबीमध्ये कोणीही येतात. मी आणि पत्रकार बोलत असताना पत्रकाराला बाहेर काढण्यात आले. मी या सभागृहाचा सन्माननीय सदस्य आहे. मी काय येथे भीक मागायला आलो नाही.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, या सभागृहात काय आणि या सभागृहाच्या बाहेर काय, काही नियमबाह्य असेल तर ते मी समजू शकतो. परंतु कोणतीही गोष्ट नियमबाह्य नसेल तर ती छापता येणार नाही अशा प्रकारची दडपशाही आपण पत्रकारांवर करु शकत नाही. बाहेर चांगला समारंभ झाला. कोणीही अपशब्द बोलले नाही. सभापती महोदय, आणीबाणीमध्ये देखील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रमोद नवलकर..)

अशा गोष्टींना बंदी केलेली नव्हती. तेव्हा आपणाकडून अशा प्रकारचे आदेश गेले असतील तर ते रद्द करावेत. पत्रकारांनी जे पाहिले आहे ते लिहिण्याचे त्यांना स्वातंत्र्य आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी याबाबतीत सविस्तर विवेचन केलेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती.........**

मी अशा पध्दतीचा कोणताही आदेश दिलेला नाही. फक्त मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देतो की, इलेक्ट्रॉनिक मिडिया किंवा पत्रकार असतील, ज्या ज्यावेळी विधानसभेचे अधिवेशन सुरु होते त्यावेळेला इलेक्ट्रॉनिक मिडिया ही आपल्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक विशेष ठिकाण आहे त्याठिकाणी आपले जे विचार असतील ते समजून घेण्याकरीता थांबलेली असते. या सदनाच्या अनुषंगाने मी स्वत: सभापती या नात्याने आणि सन्माननीय विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेले जे स्थायी आदेश आहेत त्यादृष्टीने आपण सातत्याने ते पाळतो. पत्रकारांच्या बाबतीत सुध्दा याठिकाणी गॅलरी आहे त्या गॅलरीमध्ये त्यांनी यावे, सभागृहातील रेकॉर्ड बघावे, त्यानी काय लिहावे आणि काय लिहू नये याबाबत एक शब्द कधीही याठिकाणी यापूर्वी चर्चा झालेली नाही आणि आजही झालेली नाही. फक्त त्यांच्या बाबतीत सुध्दा एखादी मुलाखत घ्यावयाची असेल तर त्या मुलाखतीच्या दृष्टीने सुध्दा मुख्य प्रवेशद्वाराजवळ ठिकाण आहे तेथे मुलाखत घेतली जाते. लॉबीच्या अनुषंगाने विचार केला तर आपली जी लॉबी आहे किंवा सत्तारुढ पक्षाची जी लॉबी आहे त्याठिकाणी सन्माननीय सदस्य खुल्या पध्दतीने वावरु शकतील असे संकेत आहेत. त्याठिकाणी अन्य कोणी येणे हे आपण जे नियम केले त्या नियमामध्ये बसणार नाही. याठिकाणी पत्रकारांनी काय लिहावे, काय छापावे असे कोणतेही बंधन याठिकाणी बसून मी दिलेले नाही. फक्त त्यांना मी मघाशी एवढेच सांगितले की, आपण याठिकाणच्या कामकाजाच्या अनुषंगाने विविध वृत्तपत्राचे प्रतिनिधी म्हणून येता, त्यावेळेला जर अन्य काही माहिती घ्यावयाची असेल तर, सदन सुरु असताना आपले हे जे संकेत आहेत की, इलेक्ट्रॉनिक मिडियाने मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजुला यावे, प्रेस कॉन्फरन्स घ्यावयाची असेल आणि त्याला परवानगी दिली असेल तर प्रेस रुममध्ये घ्यावी. याठिकाणच्या लॉबीमध्ये आपण आपल्या कामकाजाच्या दृष्टीने कितीही वेळ बसू शकता. कोणत्याही पध्दतीची चर्चा आपल्या सहकाऱ्यांबरोबर करु शकता. पण अन्य कोणी तेथे येणे हे आपण निश्चित केलेले नियम आहेत, त्या नियमामध्ये बसण्याची शक्यता नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, इलेक्ट्रॉनिक मिडिया दोन मिनिटे बाजूला ठेवा. अनेक पत्रकार त्याठिकाणी होते. जे काही बोलले गेले, त्यांनी निरीक्षण केले, आकलन केले, नोंदही घेतली असेल त्यामध्ये काही आक्षेपार्ह नव्हते, अनुचित नव्हते, नियमबाह्य नव्हते. ते लिहिण्यासाठी त्यांना बंधन घालू नये.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांना मी सांगू इच्छितो की, आक्षेपार्ह यासंबंधी मी काही बोललो नाही. सदनाच्या अनुषंगाने सभागृह, सभागृहाची लॉबी आणि लॉबीच्या दृष्टीने जे नियम केलेले आहेत, ज्याचे आपण सतत पालन करतो, त्या लॉबीमध्ये आपले जे प्रतिनिधी आहेत, या सदनाचे सदस्य आहेत त्या सदस्यांच्या अनुषंगाने तेथे चर्चा करु शकतील. पण सत्तारुढ पक्षाच्या लॉबीमध्ये आणि विरोधी पक्षाच्या लॉबीमध्ये अन्य कोणी येणे योग्य नाही. एखादी अत्यंत महत्वाची गोष्ट आपल्याला मांडावयाची असेल, प्रेस कॉन्फरन्स घ्यावयाची असेल.........

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, याचा अर्थ असा की, लॉबीमध्ये जी चर्चा झाली ती छापायला त्यांना परवानगी आहे की नाही?

**सभापती** : जर कोणती गोष्ट सांगावयाची असेल, त्याबाबत निवेदन करावयाचे असेल व त्यासाठी आपण प्रेस रुममध्ये गेलात आणि आपण बोललात.....

श्री.प्रमोद नवलकर : कोणी प्रेस कॉन्फरन्स घेतली नाही. फक्त निरोपाचे भाषण झाले. कोणी निवेदन कले नाही.

(नंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : आपण या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. विधानसभेचा किंवा विधानपरिषदेच्या कोणत्याही चर्चेचा वृत्तांत असला तरी पत्रकारांना तो घेता येतो. वादग्रस्त शब्द असतील, अयोग्य शब्द असतील तर ते शब्द काढण्याचा अधिकार या सभागृहाचा सभापती या नात्याने मला आहे. माझे म्हणणे असे आहे की, लॉबीमध्ये सन्माननीय सदस्य जरुर केव्हांही आणि कितीही वेळ आपापसात चर्चा करु शकतात. त्याला माझे कसलेही बंधन नाही. सन्माननीय सदस्यांना जर पत्रकारांना अन्य कोणतीही माहिती द्यावयाची असेल तर ती आपल्याला प्रेस रुम मध्ये देता येते किंवा मेन-गेटवर ज्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मिडीयाला जागा राखून दिलेली आहे त्या ठिकाणी माननीय सदस्यांना माहिती देता येते. त्याला माझी कधीही हरकत राहत नाही. पत्रकारांनाही यासंदर्भातील जबाबदारी पूर्णपणे माहीत आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, पत्रकार योग्य असतील ते लिहितील, पत्रकारांना त्यांची जबाबदारी चांगल्या प्रकारे माहीत आहे. आम्ही लॉबीमध्ये आक्षेपार्ह असे काहीच बोललो नाही. त्यामुळे त्या ठिकाणी जे घडले ते लिहिण्याची मुभा पत्रकारांना देण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : पत्रकारांना त्यांची जबाबदारी पूर्ण माहिती आहे, जाणीव आहे. पत्रकारांवर मी एका शब्दानेही बंधन आणले नाही, आणणार नाही आणि पुढेही कधी आणणार नाही. मी लोकशाही मानणारा आहे. परंतु सभागृहाच्या प्रथा-परंपरा प्रमाणे पत्रकार लॉबीतील घटनांचे रिपोर्टींग करु शकत नाहीत. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना, तसेच विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना लॉबीमध्ये केव्हाही आणि कितीही चर्चा करता येते. तसेच जर सन्मानीय सदस्यांना पत्रकारांना काही माहिती द्यावयाची असेल तर ती ते प्रेस रुममध्ये किंवा मेनगेटवर जाऊन देता येते. म्हणून वरील ठिकाणावर माझे पत्रकारांवर कोठलेही बंधन नाही आणि नव्हते. मी पत्रकांरावंर कोठल्याही प्रकारचे बंधन घातलेले नाही. आपण आता नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करु या.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या चर्चेला सन्माननीय उपमुख्यमंत्री (गृहमंत्री) उत्तर देणार आहेत. परंतु विधानसभेत याच विषयावर स्थगन प्रस्तावावरील चर्चा सुरु आहे व या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....

स्थगन प्रस्तावाला माननीय उपमुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. त्या सभागृहातील माननीय उपमुख्यमंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर, ते या ठिकाणी उपस्थित राहू शकतील. तोपर्यंत जी काही या विषयावर चर्चा होईल, त्या चर्चेची नोंद माननीय शालेय शिक्षणमंत्री घेतील व मी मघाशी सांगितल्या प्रमाणे या चर्चेला माननीय उपमुख्यमंत्री उत्तर देतील.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, सकाळपासून असे निवेदन करण्यात येत आहे की, विधानसभेत चर्चा चालू आहे असे वारंवार निवेदन होत असल्यामुळे आम्हाला काही किंमत आहे की नाही? असे असेल तर आम्ही खालच्या सभागृहात जाऊन बसतो.

**सभापती** : आता नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करु या.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: भिवंडी येथे पोलिसांनी केलेला गोळीबार व पोलिसांवर केलेला प्रतिहल्ला

**मु.शी.**: भिवंडी येथे पोलिसांनी केलेला गोळीबार व पोलिसांवर केलेला प्रतिहल्ला या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, अरविंद सावंत, विलास अवचट, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी सूचना देणारे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"ठाणे जिल्हयातील भिवंडी शहराच्या कॉटरगेट परिसरात सुरु असलेल्या पोलीस स्टेशनचे बांधकाम तोडण्यास गेलेल्या सुमारे चार हजार लोकांच्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन व्यक्ती मृत होणे, जमावाने केलेल्या प्रतिहल्ल्यात दोन पोलीस उपायुक्त व दोन सहाय्यक पोलीस उपायुक्तांसह सुमारे 40 पोलीस अधिकारी व कर्मचारी जखमी होणे, जमावाने दोन पोलिसांची क्रुरपणे हत्या करणे, भिवंडी पब्लिक ॲक्शन कमिटी व रझा ॲकॅडमी यांचा सदर पोलीस चौकी बांधण्यात येणारी जागा ही कब्रस्थानची असल्याचा दावा असणे, दोन्ही दावेदारांच्या समर्थकांनी पोलिसांवर हल्ला करणे, सदर बांधकाम नियमानुसार होत आहे किंवा नाही हे बघण्याकडे प्रशासनाने केलेले दुर्लक्ष, जमावाने केलेल्या तोडफोडीमुळे सार्वजनिक मालमत्तेची हानी हाणे, सदर बाब गेल्या एक महिन्यापासून उपस्थित होऊन देखील शासनाने याकडे दुर्लक्ष करणे, शहरात घडलेल्या या घटनेमुळे राज्यातील सामाजिक वातावरण दूषित होण्याची शक्यता लक्षात घेऊन तसेच नागरिक व पोलीस कर्मचारी यांच्या जिविताला धोका पोहचण्याची शक्यता असल्याने राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता यावर शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी )**

श्री.नितीन गडकरी..........

सभापती महोदय, भिवंडीमध्ये जी घटना घडली ती राज्यातील सर्वांचे मन सुन्न करणारी आहे. भिवंडीमध्ये आक्रमक जमावाने 35 पोलीस अधिकाऱ्यांना जखमी केले, दोन पोलीस अधिकाऱ्यांचे कोथळे बाहेर काढले, ज्या क्रुरपणे पोलीस अधिकाऱ्यांची हत्या केली ही गोष्ट महाराष्ट्राला निश्चितपणे भूषणावह नाही. अशाप्रकारची घटना ही पुरोगामी महाराष्ट्राची मान खाली घालणारी आहे. ही घटना होण्यामागची मानसिकता काय आहे, हे प्रथम आपण समजून घेणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षात महाराष्ट्र हे अतिरेकी कारवाया करणाऱ्या संघटनांचे केंद्र बनले आहे. मुंबई असो वा संभाजीनगर असो अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर स्फोटके सापडली आहेत. त्यामुळे गेली 15-20 वर्षे मुंबई शहर होरपळून निघाले आहे. पाकिस्तानातील लष्कर-ए-तोयबा किंवा जैश-ए-मोहम्मद यासारख्या आतंकवादी संघटनांनी भारतात बॉम्बस्फोट घडवून आणले आहेत, हे अनेकवेळा सिध्द झालेले आहे. यामध्ये अनेकांचे बळी गेलेले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांचे बळी गेलेले आहेत. शिवसेना पक्षाच्या नेत्यांचे बळी गेलेले आहेत. सत्ताधारी पक्षाच्या काही नेत्यांना याचा सामना करावा लागला आहे. सभापती महोदय, मुंबईत आणि महाराष्ट्रात राज्य कोणाचे आहे ? हे राज्य खऱ्याअर्थाने सरकार चालविते की, दुबई किंवा कराची येथे बसून गुंड चालवित आहेत, हा माझ्या बरोबरच सर्वसामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे. भिवंडी येथे घडलेल्या घटनेतून सरकारने बोध घेतला पाहिजे. सभापती महोदय, पाश्चात्य देशामध्ये महमंद पैगंबरचे कार्टून काढले त्याचे पडसाद महाराष्ट्रामध्ये उमटले. लखौनामध्ये उमटले, देशभरात अनेक ठिकाणी उमटले. अनेक ठिकाणी हिंसाचार झाला. ज्याने कार्टून काढले त्याचा भारताशी काय संबंध ? त्याचे भारताशी कोणते नाते आहे ? परंतु महंमद पैगंबराचे जे कार्टून काढण्यात आले त्यामुळे भारतात अनेक ठिकाणी दंगे उसळले. उत्स्फूतपणे रि-ॲक्शन झाली. ही रिॲक्शन अतिशय चिंताजनक आहे. मुंबईत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री.जॉर्ज बुश आले होते. त्यावेळी आझाद मैदानावर लाखो लोक जमा झाले होते. नंतर या जमावाने टाईम्स ऑफ इंडियाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

कार्यालयाची मोडतोड केली. जाळपोळ केली. फक्त मुस्लिम समाजाची रिॲक्शन होती असे नाही. मुस्लिम समाजामध्ये एक सेक्शन असा आहे की, जो मालेगाव असो किंवा अन्य ठिकाण असो तो "लादेन झिंदाबादच्या" घोषणा देतो. तसेच लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद" यांच्याबद्दल सहानुभूती ठेवतो. हे सर्व ॲन्टी सोशल इलेमेंन्टस आहेत. त्यांचा पाकिस्तानच्या आय.ए.एस.बरोबर संबंध आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

अशा संघटनांच्या बाबतीत, अशा व्यक्तींच्या बाबतीत कठोर धोरण शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रामध्ये व्होट बँक पॉलिटीक्ससाठी वाट्टेल ते करण्याची तयारी आपण ठेवली, फक्त त्यांचे मन बिघडू द्यावयाचे नाही, म्हणून त्यांचे तुष्टीकरण करण्याची नीति अवलंबिली आहे. परंतु या सर्व घटना राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेला तडा देणाऱ्या आहेत. बुश याठिकाणी आल्यानंतर झालेली रिॲक्शन, महंमद पैगंबरांचे कार्टून काढल्यामुळे झालेली रिॲक्शन, काश्मीरमध्ये काय होत हे आपण पाहतच आहोत. त्याठिकाणी लाखो हिंदू निर्वासित होत आहेत. त्याठिकाणी अनेक हिंदू मुलींवर बलात्कार होत आहेत. कारण, ते फक्त हिंदू धर्मामध्ये जन्माला आल्यामुळे असे घडत आहे. मी जगातील बऱ्याच मुस्लीम देशामध्ये जाऊन आलो आहे. लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही दुर्दैवाने कुठल्याही मुस्लीम देशामध्ये राहिलेली नाही. त्याठिकाणी 51 टक्क्यांपेक्षा जास्त पॉप्युलेशन मुस्लीम समाजाची असून त्याठिकाणी लोकशाही, समजावाद आणि धर्मनिरपेक्षता संपते. खरे म्हणजे, ही गोष्ट चांगली नाही. मुस्लीम राष्ट्रात अन्य समाजाचे लोकसुध्दा आहेत की, त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती आहे. मुस्लीम समाजामध्ये विज्ञानाच्या शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे, या समाजाची आर्थिक उन्नती केली पाहिजे यासाठी अनेक संस्था व संघटना काम करतात. परंतु बहुसंख्य समाजाची भावना दुखावता कामा नये याचे गणित आपणांस माहीत आहे आणि हे सर्व फक्त व्होट बँकेसाठी चालले आहे. मुळामध्ये महाराष्ट्रातील आघाडी सरकारची मुस्लीमांच्या प्रश्नांकडे, त्यांच्या समस्यांकडे पाहण्याची जी वृत्ती आहे ती बोटचेपी आहे. "Justice with all, appeasement of none" सेक्युलरचा खरा अर्थ हा "सर्वधर्म समभाव" असा आहे. सेक्युलरचा अर्थ धर्मनिरपेक्षता असा नाही. असे नाही की, तुष्टीकरण म्हणजेच सेक्युलर. परंतु दुर्दैवाने असा आपण अर्थ काढता. अशा प्रकरचा अर्थ कॉँग्रेस आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाला अभिप्रेत आहे का ? अशा प्रकारचा संशय आज सामान्य माणसामध्ये निर्माण झाला आहे. यामध्ये कारण एकच आहे ते म्हणजे, व्होट बँक पॉलिटीक्स. याचा आपल्याला कदाचित 2-4 निवडणुकांमध्ये फायदा होईल, परंतु आपण लक्षात ठेवा की, आपण आगीशी खेळत आहात. याठिकाणी माझा सरकारला प्रश्न आहे की, ज्यावेळी रॅली निघाली, त्याबाबतीत आपण किती लोकांवर केसेस केल्या ? महाराष्ट्र टाईम्स बिल्डींगची तोडफोड करण्यात आली, त्याबाबतीत आपण किती लोकांवर गुन्हे नोंदविले ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

त्यावेळी बरीच वाहने फोडण्यात आली, त्याबाबतीत आपण किती लोकांना अटक केली ? यावेळी प्रेसवाल्यांनी जी भूमिका घेतली त्याचे मला आश्चर्य वाटले. त्यांनी निषेधाच्या बातम्या का दिल्या नाहीत ? आजकाल काही लोकांना असे वाटते की, हिंदूविरुध्द बोलणे प्रगतीशील आहे, पुरोगामित्वाचे आहे. याचा अर्थ असा नाही की, हिंदु धर्मावर बोलावे व त्यांच्यावर टीका करु नये. मुस्लीम समाजाबद्दल न बोलणे, त्यांच्याविरुध्द न छापणे, त्यांचे समर्थन करणे म्हणजे, ख-या अर्थाने सेक्युलॅरिझम, निधर्मीपणाचे आहे, असा आपण दुर्दैवाने अर्थ काढता. खरे म्हणजे, सगळया समाजांना समान न्याय असला पाहिजे. हा देश सगळयांचा आहे. या देशामध्ये जे मुस्लीम जन्माला आले आहेत, त्यांचाही हा देश आहे. त्यांच्या राष्ट्रीयत्वावर, राष्ट्रभक्तीवर संशय घेणे बरोबर नाही. परंतु जे क्रूरपणे कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे प्रकार करतात, जे लादेन झिं ादाबाद अशा घोषणा देतात, भारत-पाकिस्थान क्रिकेटची मॅच असेल त्यामध्ये भारत पराभूत झ ाला असेल तर फटाके फोडतात, अशी ज्यांची मानसिकता आहे, त्यांच्या बाबतीत कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी क्रिकेटमध्ये कैफ या खेळाडूने उत्तम खेळ करुन सेंच्युरी मारली, त्यावेळी सर्वांनाच आनंद झाला. जो खेळाडू चांगला खेळतो त्याचे भारतीय स्वागतच करतात.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी............

आपल्या येथील इतिहास आहे, छत्रपती शिवाजी महाराजांपासून आहे, मिलेटरीमध्ये आहे. हिंदुस्तान-पाकिस्तान यांच्यामध्ये युध्द झाले असतांना देशातील मुस्लिम तरुणांनी आपल्या जीवाचे बलिदान केले, असा इतिहास आहे. परंतु, याचे नेमके क्लासिफिकेशन नीट होत नाही. परवा भिवंडी शहरामध्ये जी घटना घडली ती सहज घडलेली घटना नाही. सातत्याने या समस्येकडे जे बोटचेपे धोरण सरकार घेते त्याचा परिपाक म्हणजे ही घटना आहे. लाखो लोक येऊन आझाद मैदानावर जमतात, इमारतींची तोडफोड करतात, गाडयांचे नुकसान करतात त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. पण बजरंग दल, हिंदुत्ववादी संघटनांनी थोडे कुठे काही केले तर कठोर कारवाई होते. याचे कारण राज्यकर्ते हिंदू आहेत. त्यांना असे वाटते की, मुस्मिमांबरोबर चांगले वागतो आहोत अशी आपली इमेज झाली पाहिजे, त्याकरिता हे तृष्टिकरण. परंतु, यामुळेच गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत. भिवंडी येथे घडलेल्या घटनेमागील कारण काय आहे ? पोलीस स्टेशन बांधावयास घेतले होते. ज्या जागेवर गृह विभागाने पोलीस स्टेशन बांधावयास घेंतले होते त्याबाबतीत कायदेशीर अडचण नव्हती. परंतु, त्या ठिकाणी ॲक्शन कमिटी आणि रझा अकादमी म्हणून ज्या संघटना आहेत त्यांनी त्या बांधकामाच्या बाबतीत आक्षेप घेतला. हे बांधकाम ब-याच दिवसांपासून सुरु आहे. या जिल्हयाचे पालकमंत्री, गृहमंत्री यांनी सेंन्सिटिव्ह एरिया आहे असे समजून चर्चेने हा प्रश्न सोडवावयास हवा होता. त्या संघटनांचे असे म्हणणे आहे की, या ठिकाणी कब्रस्तान आहे. त्यांना कब्रस्तानासाठी ही जागा हवी आहे. खरे पाहिले तर कब्रस्तानाची जागा ही शहराच्या बाहेर असते. स्मशानभूमी ही नेहमी वस्तीच्या दूर असते. अशा ठिकाणी कब्रस्तान पाहिजे असा आग्रह धरणे आणि त्यासाठी मोर्चे काढणे, हिंसक बनणे आणि पोलीस स्टेशनवर हल्ला करणे, हे कधीही मान्य होणारे नाही. त्या घटनेचे फोटो मी स्वत: पाहिले आहेत. 4 पोलिसांचे दात पाडले गेले, 35 पोलीस अधिकारी जखमी झाले. अशोक देशभ्रतार नावाचा नागपूरचा पोलीस अधिकारी जखमी झाला, शिंदे या कर्मचा-याचे दात पाडले गेले, एकदम पोलिसांवर युध्दासारखा आक्रमक हल्ला करण्यात आला. हा प्रीप्लॅन होतो किंवा काय हे सांगता येणार नाही. हल्ली त्यांना सगळयांना माहित झाले आहे की, कायदा हातात घेतला आणि यांना दाबले तरी हे सरकार आपल्या मताप्रमाणे वागते त्यामुळे अशी कृती त्यांनी केली असावी. या

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3U-2

SRR/ MAP/ KGS/ 17:20

श्री.नितीन गडकरी..........

सरकारची या घटनांकडे बघण्याची मानसिकता कशी आहे, हा खरा प्रश्न आहे. जे घडले ते अतिशय दुर्देवी आहे. या राज्यामध्ये पोलीस स्टेशनचे बांधकाम कुठे करावयाचे आहे हे ठरविणार कोण ? महाराष्ट्र सरकार, नगरविकास विभाग, गृह विभाग ठरविणार नाही तर रझा अकादमी ठरविणार आहे. हे या ठिकाणी ठरणार नाही. हा देश कोण चालवितो आहे ? हीच परिस्थिती राहिली तर आपण हे प्रश्न कसे सोडविणार आहोत ? या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडणार असतील आणि जेथे पोलीस सुरक्षित नाहीत त्या ठिकाणी सामान्य माणूस कसा सुरक्षित राहिल ? 35 पोलीस मार खातात, दोघांची कोथळी बाहेर निघतात, तेच जर सुरक्षित नाहीत तर सामान्य माणूस कसा सुरक्षित राहिल ? हिंसाचार, आक्रमकता ही जी मानसिकता निर्माण झाली आहे त्याचा मोठया प्रमाणावर विचार होण्याची आवश्यकता आहे. नागपूरलाही असेच झाले. महंमद पैगंबराच्या संबंधी परदेशात झालेल्या अपमानाबद्दल कस्तुरचंद पार्कवर एका बाजूचा समाज जमा झ ाला, तेथून चिटणीस पार्कवर आला, त्या ठिकाणी हिंदू-मुस्लिम एकमेकांसमोर जमा झाले, गाडया जाळल्या गेल्या, बसेस जाळल्या गेल्या, 50 मुले प्रवास करीत असलेली बस जाळण्याचा प्रयत्न झ ाला, सुदैवाने ही मुले वाचली. परदेशात जे घडले त्याचा नागपूरच्या लोकांशी, या देशाशी काय संबंध आहे ?

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 17:50

श्री.नितीन गडकरी .....

ज्यावेळी दंगल झाली त्यावेळी माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी मला फोन केला. त्यावेळी मी मुंबईला होतो. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांचा फोन असल्यामुळे मला झोपेतून उठविण्यात आले. त्यांनी मला नागपूरच्या घटनेबद्दल माहिती दिली. त्यांनी मला सांगितले की, श्याम टॉकीज जवळ हिंदू संघटनेचे लोक गोळा झालेले आहेत आणि ते आक्रमक आहेत. पोलिसांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही त्यातील काही लोकांशी बोललात तर ते लोक शांत होतील. मी म्हटले काही हरकत नाही. मी लगेच नागपूरला फोन केला. त्यांनी मला सांगितले की, घाटे मंदिरावर हल्ला करण्यात आला. मुलांची बस जाळण्याचा प्रयत्न केला. आम्ही शांत आहोत. आम्ही काहीही केलेले नाही. परंतु अशा प्रकारे अटॅक होऊ लागले तर लोक आमच्या घरात घुसून आम्हाला मारतील. मी त्यांना सांगितले की, पोलीस त्यांचे काम करीत आहेत. तुम्ही प्रकरण भडकविण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही घरी जा. ही गोष्ट रेकॉर्डवर आहे. त्यानंतर मला माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब आणि पोलीस कमिशनर यांनी फोन केला. त्यावेळी दंगा निवळला होता. ही कोणती मानसिकता आहे, हे आपण समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहात की नाही ? प्रश्न असा निर्माण होतो की, राज्य कोणाचे आहे ? सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब यांच्याबद्दल मघाशी विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर बोलले. त्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब हे बाळापूर येथून आलेले आहेत. तेथे 70 टक्के मुस्लीम लोक आहेत आणि 30 टक्के हिंदू लोक आहेत. सर्व समाजाला बरोबर घेऊन त्यांनी तेथे चांगले काम केलेले आहे. माननीय श्री.फुंडकर साहेबांनी असे गौरवोद्गार सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब यांच्याबद्दल काढलेले आहेत. मलाही माहीत आहे की, त्यांनी त्या ठिकाणी सामंजस्य ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ज्यावेळी अशा घटना घडतात त्यावेळी सामंजस्य ठेवणा-या माणसाला लोक मारावयास जातात. ज्यावेळी मुस्लीम समाजातील लोक असे प्रकार थांबविण्याचा प्रयत्न करतात ते मायनॉरिटीमध्ये येतात. पाकिस्तान जिंदाबाद, लादेन जिंदाबाद म्हणणारे लोक बहुमतात येतात आणि अशा प्रकारच्या घटना घडतात. आपल्याला ही मानसिकता थांबवावयाची आहे की नाही ? या प्रश्नाचा विचार आपण व्होट बँक पॉलिटिक्स म्हणून करणार आहात काय ? या गोष्टीचा विचार गंभीरपणे करण्याची आवश्यकता आहे. आझाद मैदानावर घडलेली घटना आणि भिवंडीमध्ये घडलेली घटना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/     प्रथम श्री.रोझेकर ........                    17:50

श्री.नितीन गडकरी .....

महाराष्ट्रातील जनतेला शोभा देणारी नाही. 2 उपायुक्त, 2 सहाय्यक आयुक्त, 4 पोलिस निरिक्षक, 35 पोलीस जखमी होताता ही गोष्ट माझ्या समजण्यापलिकडची आहे. ही कोणती आक्रमकता आहे ? ही कोणती मानसिकता आहे ? दंगेखोरांना आपण थांबविणार आहात की नाही ? चिथावणीखोरांना आपण थांबविणार आहात की नाही ? काल अबू आझमी भिवंडीला गेले होते. त्यांनी तेथील गेस्ट हाऊसवर मिटींग घेतली आणि लोकांना भडकविले, अशी माझी माहिती आहे. ते रात्रभर तेथे थांबलेले होते. अबू आझमी यांनी जर लोकांना भडकविले असेल तर आपण त्यांच्यावर कारवाई करणार आहात की नाही ? त्यांच्यावर कारवाई केली तर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मतांमध्ये फरक पडेल, म्हणून त्यांच्यावर कारवाई करणे योग्य होणार नाही. पोलिसांना कितीही मार खावा लागला, कितीही गोळया खाव्या लागल्या, पोलिसांचे कोथळे बाहेर काढले गेले तरी पोलिसांनी शांत राहिले पाहिजे, असा आदेश आपण देणार आहात काय ?

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. बोरले नंतर --- 17:55

श्री. गडकरी ...

दंगेखोराला जात-पंथ नसतो. निरपराध मुसलमानावर जो हिंदू हाती शस्त्र घेऊन आघात करतो तो हिंदू नाही तसेच जो मुसलमान निरपराध हिंदूवर शस्त्रानिशी हल्ला करतो तो मुसलमान नाही. सभापती महोदय, मी माझ्या भागातील मुस्लिमांचा नेता आहे, अगदी पॉप्युलर मुस्लीम लीडर आहे. मी त्यांना नेहमीच सांगतो की, तुम्ही कॉम्प्युटर शिका, विज्ञान शिका, इंजिनिअर व्हा, खूप ज्ञान मिळवा, तंत्रज्ञान शिका. इतकेच नाही तर 'अग्निपंख' नावाचे डॉ. अब्दुल कलाम यांचे जे पुस्तक आहे ते वाचण्यास देखील मी त्यांना सांगतो. कारण आता भविष्य आहे ते कॉम्प्युटर शिकलेल्यांना, तंत्रज्ञान शिकलेल्यांना. मी स्वत: जेव्हा नागपूरचा पालकमंत्री होतो तेव्हा अंजुमन इस्लाम शाळेला संगणक दिले आहेत. पण तरीही तेथील इतर मुसलमान सांगतात की,बीजेपी वाले बहुत खतरनाक है. वे चुन कर आएंगे तो मुस्लिमों को कटवा देंगे. पाकिस्तान भेज देंगे. सुरक्षित रहना हो तो काँग्रेस पार्टी के चुनाव चिन्ह पर ठप्पा लगाओ.हे आमच्याबद्दल जेवढे विष ओतणार तेवढे त्यांचे हेतू साध्य होणार आहेत. त्यातून मग त्यांना मते मिळणार आहेत. अशा प्रकारे आयती 20 टक्के मते मिळाली की यांचे सरकार आले आणि मग आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांचे नाव घेऊन त्यांचे धंदे जोरात सुरू राहणार. ही एक त्यांची यशस्वी कहाणी आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस या दोघांचीही ही एक यशस्वी कहाणी आहे. त्यांची कार्यपद्धती एकच आहे, दलितांच्या आणि मुस्लिमांच्या मनामध्ये हिंदूद्वेष निर्माण केला की, सगळे काही बरोबर साधले जाते.आप मेरी बात से सहमत होंगे. काँग्रेस पार्टी ने 55 सालों में मुस्लिमों को क्या दिया ? चाय की दुकान दी, पान का ठेला दिया, कबाड़ी की दुकान दी, ट्रक ड्राईवर बनाया, क्लीनर बनाया और रिक्षावाला बनाया. ये 6 धंधे दिए. क्या आपको सातवाँ धंधा दिया गया ? इंजीनियरिंग कॉलेज आपको नहीं मिलेगा. आपको प्रायमरी स्कूल मिलेगा, मदरसा मिलेगा. क्या आपका लड़का मदरसे में जाकर प्रगति कर पाएगा ? मैं अपने लड़के को विज्ञान सिखा रहा हूं, कम्प्यूटर सिखा रहा हूं, अंग्रेजी सिखा रहा हूं. मैं यह चाहता हूं कि मुस्लिम समाज के लड़के भी विज्ञान सीखे, कम्प्यूटर शिक्षा हासिल करें, अंग्रेजी सीखे.

सभापती महोदय, बहुधा माझे विचार सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना फार काही मानवत नाहीत. मी एकंदरीत विरोध करणारा नाही. पण येथे जे आक्रमक आतंकवादी आहेत, ज्यांना भारताबद्दल, भारताच्या सार्वभौमत्वाबद्दल कोठलेही प्रेम नाही, ज्यांनी पोलिसांवरदेखील

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ...

हल्ला, प्राणघातक हल्ला केलेला आहे त्यांना रोखण्यासाठी शासन काही कठोर असे धोरण आखणार आहे की नाही ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, काल भिवंडीमध्ये घटना घडली आहे, या पूर्वी आझाद मैदानावर जे काही घडले होते, त्यावेळीच तुम्ही कठोर कारवाई केली असती तर कोठे तरी मेसेज गेला असता. परंतु आज हे आतंकवादी असलेले लोक, ज्यांचे लष्कर-ए-तोयबाशी संबंध आहे, ज्यांचे जैश-ए-मोहम्मदशी संबंध आहेत, जे डायरेक्ट पोलिसांना आव्हान देतात, त्यांच्यावर हल्ला करतात, त्यांना जखमी करतात तरीही पोलिस शांत आहेत. तशात आपण त्यांना 'सांभाळून घ्या' म्हणून सांगितले जाते. म्हणजे मुस्लिमांचे तुष्टीकरणामध्ये देखील आपली स्पर्धा आहे. काँग्रेसची गोष्ट वेगळी आणि राष्ट्रवादी काँग्रेसची गोष्ट वेगळी आहे. दलित आणि मुस्लिम तुम्हाला मते देत नाहीत, ती सारी काँग्रेसची पक्की व्होट बँक आहे. तरीही तुम्ही प्रसंगी त्यांची पांढरी टोपी घालून त्यांच्याबरोबर जाता, त्याचे फोटो मग आम्ही पाहतो. सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही कितीही एकावर एक टोपी घातली तरी हे मुस्लिम मतदार राष्ट्रवादीला टोपी घालणार हे निश्चित आहे. कारण ती काँग्रेसची व्होटबँक आहे. ते सारे काँग्रेसकडेच जाणार. परंतु तरीही मतांसाठी या दोन्ही काँग्रेसमध्ये स्पर्धा आहेच. आता भिवंडीत ही जी घटना घडली आहे ती अतिशय दुर्दैवी आहे. आता तरी गृह विभागाने आपला परिचय तेथे दिला पाहिजे. आतंकवादी, पाकिस्तान धार्जिणे जे आहेत, जे तेथे जाऊन तेथील मुस्लिम समाजाला चिथावतात त्या अबू आझमी यांना आता तरी आपण अटक करणार आहात की नाही ? मी आताच म्हणालो की, तेथील जी रझा अकादमी आहे, ती पोलीस स्टेशन कोठे असावे, कबरस्तान कोठे असावे, हे ठरविणार आहे का ?

( यानंतर श्री. सरफरे .... 3एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

हे जर ते ठरविणार असतील तर आम्हाला माहीत आहे की, त्यांच्या दबावाखाली तुम्ही पोलीस स्टेशनचे काम थांबवाल. ते पोलीस स्टेशन पूर्ण करण्याची हिंमत तुमच्यामध्ये नाही असा मला 100 टक्के विश्वास आहे. या महाराष्ट्राचा खरा मर्द गृहमंत्री म्हणून कायदेशीररित्या सुरु झालेले गृह विभागाच्या पोलीस स्टेशनचे बांधकाम बांधून पूर्ण करण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे काय? असेल तर ते तुम्ही बांधून पूर्ण कराल. तसे न करता आपण ते थांबवाल हे आम्हाला माहीत आहे. त्याकरीता लढण्यासाठी आपल्याजवळ शक्ती असायला पाहिजे. आपल्या पक्षाची व्होट बँक पॉलिसी असल्यामुळे ते शक्य होणार नाही. आज महाराष्ट्रातील वातावरण बिघडत चालले आहे. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट होत आहेत, दारुगोळा सापडत आहे. नागपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर अतिरेक्यांचा हल्ला झाला आहे. त्यामुळे आज लोकांची मानसिकता वेगाने बदलत चालली आहे. आणि हे सरकार चूपचाप या परिस्थितीकडे बघणार असेल तर मला वाटते की, या महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची वाट लागेल. आज हिंदुस्थानच्या अखंडतेला व सार्वभौमत्वाला आवाहन केल्याशिवाय राहणार नाही अशाप्रकारची गंभीर मानसिकता निर्माण झाली आहे. तिला हात घालण्याचे धाडस सरकार दाखविणार आहे की नाही हा माझा प्रश्न आहे? याबाबतीत आपण गंभीर विचार केला पाहिजे. पोलिसांचे मनोबल वाढले पाहिजे. काल पोलिसांनी मार खाल्ला ही गोष्ट आपल्याला भूषणावह नाही, अधिकाऱ्यांनी मार खाल्ला ही गोष्ट आपल्याला भूषणावह नाही. ही गोष्ट पोलिसांची प्रतिमा खराब करणारी आहे.येत्या काळात आपण पोलिसांना कशा सूचना देणार आहात हा प्रश्न आहे. यासंबंधी आपण व्होट बँक पॉलिसीचे धोरण राबविण्याचा विचार न करता देशाच्या हिताच्या दृष्टीने खंबीर धोरण स्वीकारणार आहात की नाही हा खरा प्रश्न आहे. हा विषय आपण गंभीरपणे हाती घेतला पाहिजे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज सकाळी मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती व त्यावर भाष्य केले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर नियम 97 अन्वये चर्चा दुपारनंतर घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे हा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे.

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे माननीय उपमुख्यमंत्री, या महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री सभागृहामध्ये येऊन बसले आहेत. मला वाटते की, खालच्या सभागृहामध्ये या विषयावर वादळ निर्माण झाल्यानंतर त्या वादळाला तोंड देऊन ते याठिकाणी आले आहेत. परंतु त्यांना माहीत आहे की, या सभागृहामध्ये तशाप्रकारचे वादळ कधीही निर्माण होत नसते. या सभागृहामध्ये महत्वाचे मुद्दे मांडले जातात. त्या मांडलेल्या मुद्दयांना आपल्याला उत्तर द्यावयाचे असते. वादळी चर्चेला वादळासारखे बोलून उत्तर देता येते. परंतु महत्वाच्या मांडलेल्या मुद्दयांना उत्तर देतांना विचारपूर्वक उत्तर द्यावे लागते. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. देशहिताचा निर्णय घेतांना जात-पात बघून घेतला जाणार कां? एकगठ्ठा मतांकडे पाहून घेतला जाणार काय? त्या विभागाची गरज लक्षात घेऊन घेतला जाणार काय? ज्या पोलिसांवर हल्ला झाला, त्यांचे मनोधैर्य कसे वाढेल हे पाहून निर्णय घेतला जाणार काय? ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. काल भिवंडी येथे जो प्रकार घडला तो शासनाच्या डोळयामध्ये अंजन घालणारा आहे. शासनाच्या जागेवर पोलिसांची इमारत बांधावयास सुरुवात झाली. ती हे काम आज नाही तर गेल्या महिनाभरापासून चालू होते. त्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक ती शासकीय मंजूरी घेतली होती. हे सर्व झालेले असतांना कालचा प्रकार कां घडला? जवळ जवळ 2 हजार मुस्लिमांचा मॉब त्याठिकाणी येतो, तो काम थांबविण्याचे आदेश देतो. आणि तुम्ही काम थांबविले नाहीतर तुम्हाला दुष्परिणामांना तोंड द्यावे लागेल, असा इशारा उपस्थित असलेल्या पोलिसांना दिला जातो. ही भयानक घटना आहे. कुणाचे खाजगी बांधकाम असेल तर समजू शकतो. परंतु शासकीय बांधकाम कुठे करावयाचे हे शासनाने ठरवावयाचे असते. त्यासाठी निधी कोठून आणावयाचा याचा निर्णय शासनाने घ्यावयाचा आहे. असे असतांना चालू असलेले बांधकाम बंद करा, अन्यथा गंभीर परिणाम होतील अशी धमकी दिली जाते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधु□र सरपोतदार (पुढे सुरु...

पोलीस सां□□ात □, ही जा□ शास□य माल□ची आहे,त्या ठि□□ पोलीस चौ□ हो□र आहे, हे पोलिसांतर्फे □म चाललेले आहे. □पा □रु□आप□ येथू□परत जा. परंतु जमाव ऐ□यला तयार □ही, त्यां□ पोलिसांवर हल्ला □ला ही अतिशय दुर्दैवाची □ष्ट आहे. माझ्या□डे दै. "लोकमत"मध्ये आलेली बातमी आहे. मी प्रत्य□त वस्तुस्थिती पाहिलेली □ही. वस्तुस्थिती □पहाता यावर मला भाष्य □रता ये□र □ही, हे मला □ळते. परंतु आलेल्या बातमीवरु□ दिसते □ त्या ठि□□ची परिस्थिती भया□□ होती. मी ती बातमी वाचू□ दा□वितो. "दुपारी 2.15 वाजता बांध□म सुरु असलेल्या ठि□□स मुस्लीम जमावाचा घेराव. 2.45 वाजता जमाव प्र□ुब्ध. लाठीमार व अश्रूधुराचा वापर दुपारी 3-05 वाजता जमाव आटोक्यात आ□□यासाठी □ळीबाराच्या 25 ते 30 फैरी हवेत. दुपारी 4.15 वाजता पोलीस आयुक्त डी. शिवा□द□ घट□स्थळी. सायं□ळी 6-30 वाजता पोलीस उपायुक्त □र्यालयावर जमावाचा हल्ला. सायं□ळी 7-00 वाजता जमावाला □□यंत्र□त आ□□यासाठी □ळीबार, संचारबंदी जारी." हा स□ळा घट□□म "लो□मत" या वर्तमा□पत्रामधू□ दिलेला आहे. सभापती महोदय, आप□ ही बातमी वाचली असेल. ही बातमी "साम□" या दै□□मध्ये आली असती तर त्याला वे□ळा रं□दिला □ला असता. "लो□मत" या दै□□□ "आझ□मी यांच्या सभे□तर भड□" या मथळ्या□ाली म्हटलेले आहे □, "रात्री उशिरा, समाजवादी पार्टीचे □ते अबू आझमी भिवंडीत दा□ल झाले. त्यांची सभा आटोपताच दं□□□आ□□ उ□रुप धार□ □ले. जमावा□धाम□□र □क्यावरील पोलीस चौ□वर हल्ला □रु□ती□ □ड्या पेटवू□ दिल्या. वंजारपट्टी भा□तही ती□ □ड्यां□ आ□ लावल्या. परि□मी संचारबंदीत आ□□ वाढ □र□यात आली आहे. या घट□ ए□पाठोपाठ होऊ□ □ल्या. ही या मा□□र□मिमांसा आहे. स□मा□□य उप मु□यमंत्री आपल्या□डू□दुसरी □□तीही अपे□ □ही, या स□ळ्यात 'राष्ट्रवाद' ही महत्वाची □ष्ट आहे. राष्ट्राच्या हिताचे असेल तर आम्ही □ही पावले उचल□र आहोत. वर्तमा□पत्रमध्ये लादे□ची बातमी आली, □□ल्या तरी देशामध्ये महंमद पैगंबराचे व्यं□चित्र काढले म्हणून मोर्चा काढला. यामध्ये आपल्या देशाचा □ही संबंध □ही. परंतु त्यां□ रा□व्यक्त करण्यासाठी आझाद मैदा□वर मोर्चाने जमाव जमला आणि त्याचा □षेध □ला. त्यानंतर टाईम्स ऑफ इंडियाच्या □चेरीवर त्यांनी हल्ला □ला. रस्त्यावर उभ्या असलेल्या □डया तोडल्या, गाडया जाळ□याचा प्रयत□ □ला. या संबंधा□□ □त्या□जातपात विसरु□□रवाई □रायला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु.....

पाहिजे होती. मतांकडे पाहू□ चालत □ाही. परंतु त्या □ु□ि□ारां□ा प□डले □ाही. त्यां□ी दं□ल □र□यासाठी ही जा□ा □िवडली, त्याचे दुष्परि□ाम भो□ावे ला□तील. दंगल करणाऱ्या ए□ही मा□साला प□डले □ाही, त्यांच्यावर □ेसेस घातल्या □ाहीत. त्यामुळे त्या समाजामध्ये असा मेसेज □ेलेला आहे □ी, □ाही □ोंधळ घातला तरी आताचे राज्य□र्ते आमच्या विरोधामध्ये □ो□तीही □ारवाई □र□ार □ाहीत, त्यांच्यात तेवढी ता□दच □ाही.

या□ंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

मी ज्या भागामध्ये राहतो तो भाग मुस्लिम डॉमिनेटेड आहे. माननीय सभापती महोदय, आपल्यालाही ते माहीत आहे. त्या समाजातील व्यक्तींशी कशा प्रकारे वागावे लागते याची मला कल्पना आहे. आपण अधिकारावर आल्यानंतर या गोष्टीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न कराल अशी माझी कल्पना होती. आतापर्यंत कोणतीही दंगल झाल्यानंतर मुसलमान की हिंदू असा विचार करण्याची वेळ आल्यानंतर हिंदू हे जातीय आणि मुस्लिम हे निधर्मी असे म्हटले जाते. त्यांना मुस्लिम नव्हे तर निधर्मी म्हटले जाते. या दंगलीमध्ये भाग घेणारे जे मुस्लिम होते ते निधर्मी होते काय ? या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. खतिब आहेत, ते खरे निधर्मी आहेत. अशी माणसे मुस्लिम समाजामध्ये असती तर त्यांच्याबद्दल आदर वाटला असता. सन्माननीय सदस्य श्री. खतिब यांच्यामध्ये बदल होणार नाही. कारण स्वभावाने ते तसेच आहेत. त्यांच्या बाबतीत कोणतीही रिॲक्शन होणार नाही. आम्ही अशा मुस्लिमांच्या शोधात असतो. त्या ठिकाणी जे सापडले ते कोण लोक आहेत ? ते खरोखर या देशाचे हित पाहणारे, समाजाचे हित पाहणारे, समाजावर संस्कार कसा करावयाचा हे पाहणारे, समाजाला शिक्षण मिळाले पाहिले असे म्हणणारे आहेत काय ? मुस्लिम समाजातील गरीब महिलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी लोक आमच्याकडे येतात. आम्ही त्यांना सहकार्य करतो आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये ॲडमिशन मिळवून देण्याचा प्रयत्न करतो. हा देश सुधारण्यासाठी काही मूलभूत गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. हिंदू आणि मुस्लिम समाजातील दरी न वाढता ती कमी कशी होईल याचा विचार करावा. मुस्लिम समाजातील जी अतिशय आक्रमक प्रवृत्ती आहे, जी गुन्हेगारी प्रवृत्ती आहे, जी देशविघातक शक्ती आहे, त्याला प्रतिबंध करण्याच्या बाबतीत शासनाने अभ्यास गट निर्माण करुन त्यावर इलाज करण्यासाठी काही तरी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. भिवंडीमध्ये आपण काय केले ? भिवंडीतील 1984 सालची दंगल मला आठवते. 1984 साली त्या ठिकाणी दंगल झाली. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत म्हणून मी हे विषय मांडत आहे. हायकोर्टाच्या निर्णयानुसार आपण उपमुख्यमंत्री नसला तरी आपण राज्याचे गृहमंत्री आहात. त्यामुळे आपल्यावर जबाबदारी आहे. आम्ही आपल्याकडे गृहमंत्री म्हणूनच बघतो. आम्ही आपल्याला उपमुख्यमंत्री म्हणूनच मानतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य चुकीचा अर्थ लावत आहेत. हायकोर्टाने जो निर्णय दिला त्यामध्ये ते उपमुख्यमंत्री नाहीत असा निर्णय दिलेला नाही. क्वासीज्युडिशिअल फंक्शन करताना त्या ठिकाणी उपमुख्यमंत्री असा उल्लेख करु नये असे हायकोर्टाने म्हटले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : म्हणजे लग्न करा परंतु वारसदार म्हणून तुमच्याकडे मूल जन्माला यावे असा नियम नाही असे म्हणण्यासारखे आहे. आम्ही जे एकतो, जे वाचतो त्यासंदर्भात बोलतो. आम्हाला एका गोष्टीचे दुःख आहे. जो माणूस काम करतो त्या माणसाला काम करण्याची संधी मिळाली पाहिजे. दुर्दैव असे आहे की, जो माणूस काम करतो त्याला काम करण्याची संधी मिळत नाही. त्यांच्या मार्गात अनेक विघ्ने निर्माण केली जातात. भिवंडीची दंगल ही तुमच्यासाठी कसोटी आहे. त्या ठिकाणी पोलिसांना ठेचून मारले व त्यांचा मेंदू बाहेर काढला. त्यांना जाळण्याचा प्रयत्न झाला. हे कोण गुन्हेगार आहेत ? पोलिसांवर हल्ला करण्यापर्यंत, त्यांचा कोथळा बाहेर काढण्यापर्यंत त्यांची मजल जात असेल तर त्या गुन्हेगारांना शोधून काढावे लागेल आणि त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी लागेल. त्या ठिकाणी एका डीसीपीचे दात पाडले. आज त्यांना हिंदुजा हॉस्पिटलमध्ये आणले आहे. ते सिरीयस आहेत. आपल्याला याबाबत जास्त माहिती आहे. डीसीपीसारख्या एका अधिकाऱ्यावर, आयुक्तांसारख्या अधिकाऱ्यांवर हल्ले व्हावयास लागले आणि हीच माणसे नेस्तनाबूत झाली तर अशा दंगलीच्या वेळी सर्वसामान्य जनतेचे रक्षण कोण करणार ? मुस्लिम समाजातील जी सर्वसामान्य जनता आहे त्यांचे रक्षण कोण करणार ? हिंदू आणि अन्य समाजाचे रक्षण कोण करणार ? मागे झालेल्या दंगलीच्या वेळी पोलीस पळाले असताना आमच्या सैनिकांनी मदत केली.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:15

(श्री. मधुकर सरपोतदार....)

त्यांनी सर्व रसद नेऊन पोहोचविली. अशा वेळी पोलिसांच्या पाठिमागे सैनिक उभे राहिले. 1968, 1991 आणि 1992मध्ये दंगली झाल्या त्यावेळी पोलिसांच्या बरोबरीने सैनिक उभे राहिले म्हणून त्यावेळी शासन जनतेला तोंड तरी दाखवू शकले. अन्यथा त्यावेळी शासनाच्या तोंडाला काळे फासण्याची वेळ आलेली होती. हा प्रश्न माननीय गृहमंत्र्यांनी अतिशय गांभीर्याने घ्यायला पाहिजे. ही जी घटना घडली त्याचे वर्तमानपत्रातील वर्णन वाचताना वाईट वाटते. वर्तमानपत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, "रात्री उशिरा दोन पोलिसांची भोसकून हत्या करण्यात आली. हल्लेखोरांनी त्यांचा मेंदू बाहेर काढला आणि त्या दोघांना जाळण्याचा प्रयत्न केला. हवालदार गांगुर्डे आणि हवालदार जगताप अशी त्या दोघांची नावे आहेत." ही माहिती माननीय गृहमंत्र्यांकडे आलेलीच असेल. 1991-92च्या दंगलीमध्ये नंदकुमार या सबइन्स्पेक्टरला गोळया घालून मारण्यात आले. भिवंडीमध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात मलिक आणि कुरेशी हे ठार झाले. ते कोण आहेत हे मला माहीत नाही. अशा प्रकारच्या दंगलीमध्ये जे बळी जातात त्यांना शासन बक्षिस देते आणि त्यामुळे दंगलखोराना दंगली घडवून वातावरण खराब करण्याचे प्रोत्साहन मिळते. कुणालाही अशा प्रकारची मदत देत असताना त्याच्या मागील पार्श्वभूमी तपासून पाहिली पाहिजे. त्या व्यक्तीने कशासाठी दंगली केली ? तो का मारला गेला ? हे सारे तपासले पाहिजे. दंगलीमध्ये मेलेल्या माणसाला एक लाख रुपये दिले की, लोकांची बोंबाबोंब कमी होते आणि हे शासन चांगले आहे अशी भावना निर्माण होते. शासन किती चांगले आहे यापेक्षा प्रशासन किती चांगले आहे, त्यांचा दरारा किती आहे याला महत्व आहे. पोलिसांचे अस्तित्व जनता मानते की नाही याला फार महत्व आहे. पोलीस आल्यावर जनतेमध्ये कोणते मतपरिवर्तन होते याला महत्व आहे. आपण शांतता कमिट्या, मोहल्ला कमिट्या नेमलेल्या आहेत. त्या कमिट्यांमध्ये पोलिसांनी गुन्हेगारांनाच घेतलेले आहे. त्याचे कारण असे की, त्यांच्याकडूनच पोलिसांना विघातक कृत्यांची माहिती मिळते. सभापती महोदय, या दंगलीमध्ये 35 पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले आहेत. भिवंडी पब्लिक ॲक्शन कमिटी आणि रझा अकादमीच्या कोणी इसाक यांनी सभा घेतली. त्यानंतर तेथे दोन-तीन हजार लोकांचा मोर्चा आला आणि त्या मोर्चाला दंगल करायला त्यांनी प्रोत्साहन दिले. तेथील सर्व परिस्थितीची माहिती घेऊन ती माननीय गृहमंत्र्यांनी ॲनलाईझ करावी. ही घटना का घडली ? कोणी घडविली ? कोणी प्रोत्साहन दिले ? काय घडले ? याबाबतची सर्व माहिती त्यांनी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार..)

घ्यावी. या देशातील हा समाज प्रतिदिन आक्रमक बनतोय. औरंगाबादमध्ये पोलिसांनी आरडीएक्स, शस्त्रास्त्रे पकडली. मालेगावमध्येही शस्त्रास्त्रे पकडली, माणसे पकडली. अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रातून रोज वाचायला मिळतात. त्यामुळे या महाराष्ट्रामध्ये गृह खाते अस्तित्वात आहे की नाही हे कळत नाही. गृह खात्याच्या पोलिसांनी चांगली कामे केलेली आहेत हे देखील सत्य आहे. आपल्या राज्यातील पोलिसांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल इतर राज्यांनीही बक्षिसे दिलेली आहेत. एका चोरीचा शोध लावणा-या पोलिसांना कर्नाटक सरकारने बक्षिस दिलेले आहे. जे पोलीस चांगले काम करतात त्यांना बक्षिस दिले पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होणार नाही याकडे माननीय गृहमंत्र्यांनी कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. पोलिसांचे मनोधैर्य ज्या दिवशी संपेल त्या दिवशी राज्यात गुंडांचे राज्य सुरु होईल. तसे राज्य सुरु झालेले आहे की काय असा प्रश्न आमच्या समोर उभा आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 18:20

श्री.मधुकर सरपोतदार.........

हे पाकिस्तानी एवढे मोकाट सुटले आहेत. देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये कोणी कुठून येतो, शस्त्रे आणतो. एके 47 घेऊन येतो, गोळया घेऊन येतो, काहीही करतो, हे काय चालले आहे? या पोलीस दलाची भिती यांना का वाटत नाही? आमची सुध्दा काळजी घेणारी, आमच्यावर लक्ष ठेवणारी यंत्रणा आहे. खरे म्हणजे पोलिसांची यंत्रणा अशा पध्दतीने हवी की, कुठे काय घडते हे त्यांना अगोदर कळले पाहिजे. त्यांना बातमी कळल्याबरोबर धाडी घालून शोध घेतला पाहिजे. मुळावर हल्ला करुन या गोष्टी संपविल्या पाहिजेत. परंतु तपास सुरु होतो आणि नंतर कुठेतरी जाऊन थांबतो. आम्हाला आपल्याकडून एवढीच माहिती पाहिजे, ही पोलीस चौकी कधी बांधावयाला घेतली, यासाठी शासनाने किती निधी मंजूर केला, ही पोलीस चौकी केव्हा पूर्ण होणार होती, या पोलीस चौकीचा उद्देश काय होता? शासनाचा भूखंड आहे हे मान्य आहे. परंतु किती दिवसात पूर्ण करण्याची योजना होती, या पोलीस चौकीवर हल्ला करण्यासाठी कोणी प्रोत्साहन दिले, कोणी पुढाकार घेतला? पोलीस चौकीवर हल्ला करण्यासाठी दोन हजाराचा मॉब कोणी आणला? दोन पोलिसांचा मेंदू बाहेर काढणारे गुन्हेगार कोण आहेत? याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. केवळ अफझलखानाचा कोथळा बाहेर काढल्याचे चित्र रंगविणाऱ्या कवठेकर यांच्यावर तुम्ही पोलीस केसेस दाखल करता. आता ज्यांनी या पोलिसांचे कोथळे बाहेर काढले, त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात? पोलिसांचे कोथळे या मुस्लीम गुंडांनी काढले असे मी म्हटले तर त्याचा अपप्रचार होईल, याला जबाबदार कोण? मला हे कळत नाही, जे सत्य आहे, जो इतिहास आहे तो नजरेआड करता येणार नाही. आमच्या महाराष्ट्रात नेहमी ठरलेली नावे आहेत तेवढीच घेतली जातात. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांचे नाव घ्यायचे आणि वाटेल ते धंदे करायचे, हे जे चालले आहे ते कुठेतरी थांबले पाहिजे. हे महान पुढारी होते. या सगळया घटना पाहून याठिकाणी ज्या तसबिरी लावल्या आहेत त्यांना काय वाटले असेल? त्यांच्याच पक्षातील राज्यकर्ते होते. या राज्यात असेच चालले आहे आबा! आपण अभ्यासू आहात. इतकी वर्षे मी आपल्याला ओळखतो. हा माणूस जिद्दी आहे. डळमळणार नाही. परंतु आपल्या मार्गात अडचणी निर्माण करतील. डान्सबारमध्ये नाच करायला लावतील. आपल्या कर्तृत्वापासून आपण दूर जाल असे मला वाटत नाही. शेवटी मनुष्यस्वभाव एखादे काम करण्यास पक्का असला पाहिजे. केवळ शो करणारी माणसे मुंबईत होर्डिंग लावतात. मुंबईच्या रस्त्यावर

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 18:20

श्री.मधुकर सरपोतदार.........

फिरुन पहा. रस्त्यावरील होर्डिंगवर ज्यांचे फोटो असतात ते आमच्या देशातील महान पुढारी समजायचे. सभापती महोदय, या दृष्टीकोनातून या दंगलीच्या निमित्ताने मी सन्माननीय गृहमंत्र्यांना एकच गोष्ट सांगू इच्छितो की, हिंदू-मुस्लीम अशाप्रकारचा कोणताही रंग लागणार नाही याची दक्षता घ्यायची जबाबदारी आपल्यावर आहे. गुंड मुस्लीम आहेत, चांगल्या मुस्लीमांबद्दल मी बोलत नाही. मुस्लीमांमध्ये वाईट काम करणारी माणसे आहेत तशी चांगली माणसे सुध्दा आहेत. मी एक उदाहरण दिले आहे. जे दंगलीच्या विरोधात काम करतात, त्यांचे खून झाले. 1992 च्या दंगलीमध्ये आमच्या खेरवाडी भागात गुलाब शेख हा काँग्रेसचा कार्यकर्ता होता, केवळ शांतता फेरीमध्ये सामील झाला म्हणून त्याची मर्डर केली गेली. किती गुंड मारले गेले? कोणत्याही जातीय दंगलीमध्ये किती हिंदू मारले गेले, किती मुस्लीम मारले गेले याचा हिशोब घेतला जातो आणि दंगलीची डिग्री ठरविली जाते हे बरोबर नाही. मुळात शोध घेण्याची आवश्यकता आहे. तो शोध आपल्या खात्याकडे आहे. पोलीस खात्याकडे सगळी माहिती असते. परंतु ती सुध्दा सप्रेस केली जाते. त्यामुळे पुढील निष्कर्ष चांगले येत नाहीत. मला मुद्दाम विनंती करावयाची आहे की, मी ज्या दोन-चार गोष्टी सांगितल्या, तसे भिवंडी हा दंगलीच्या दृष्टीकोनातून अतिशय नाजूक भाग आहे. 1984 मध्ये दंगल झाली, त्यानंतर भिवंडीमध्ये दंगल घडली नव्हती.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, भिवंडीत आता चांगले वातावरण तयार झाले होते. चांगले वातावरण खराब करण्याचे काम कोण करतो हे बघण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणचे आमच्या पक्षाचे आमदार श्री. योगेश पाटील यांनी भिवंडीच्या वातावरणाच्या संदर्भात काही सूचना केल्या होत्या परंतु त्याच्या सूचना शासनातर्फे धुडकावण्यात आल्या. त्यामुळे त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनावर विचार होण्याची आवश्यकता आहे. भिंवडीत दंगल भडकविणा-या लोकांसापासून सर्वसामान्य लोकांना त्रास होणार नाही, त्यांचे दैनंदीन जीवन दुषित होणार नाही याची काळजी शासनाने घेणे आवश्यक आहे. जे लोक दंगलीसाठी जबाबदार आहेत अशा दंगलखोरांना कडक शासन करावे वेळ पडली तर अशा दंगलखोरांना गोळया घातल्या तरी काही हरकत नाही. महाराष्ट्रातील वातावरण जे लोक दुषित करीत आहेत त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. जे लोक भारतात राहून पाकिस्तानच्या घोषणा देतात, महाराष्ट्राचे वातावरण बिघडविण्याचे काम करतात त्यांना जरब बसेल अशी शिक्षा झ ाली पाहिजे. ज्या दंगलखोरांना शासनाने मोक्का लावला होता त्यांना सोडून देण्यात यावे यासाठी मालेगावचे आमदार श्री. निहाल अहमद यांनी मोर्चा काढला होता त्यांच्या विरुध्द मात्र शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. इतर वेळेस शासन आमदारांवर कारवाई करते मग निहाल अहमद यांच्यावर का कारवाई करण्यात आली नाही? जे लोक अतिरेक्यांचे समर्थन करतात मग ती व्यक्ती कोणीही असो, आमदार असो त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. ज्या लोकांमुळे चांगले वातावरण दुषित होते, ज्यांच्या पासून सामान्य लोकांना त्रास होतो, जनतेला त्रास होतो, पोलिसांना त्रास होतो अशा लोकांवर कडक कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे माझी आपल्याकडून योग्य त्या न्यायाची अपेक्षा आहे. भिवंडीतील पोलिसांना आणि जनतेला न्याय द्यावा. भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे काम पूर्वी ज्या पध्दतीने सुरु होते त्या पध्दतीने पुन्हा सुरु करण्यात यावे, या ठिकाणी शांतता लवकरात लवकर निर्माण करावी व या ठिकाणी जे पोलीस कर्मचारी मृत पावले आहेत त्यांना मदत द्यावी व पोलिसांना न्याय मिळवून द्यावा. तसेच भिवंडी येथील पोलीस चौकीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : या चर्चेला सुरुवात करण्या अगोदर श्री. अबु आझमी यांना त्वरीत अटक करण्यात यावी अशी माझी पहिली मागणी आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी जे मुद्दे मांडले त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार नाही. परंतु भिवंडी येथील विश्रामगृहावर सायंकाळी 6.30 वाजता बैठक घेतली जाते आणि 7.00 वाजता 2 हजाराचा जमाव हातात शस्त्रास्त्रे घेऊन ज्या ठिकाणी पोलीस चौकीचे काम चालू आहे त्या ठिकाणी हल्ला करतो हे कशाचे द्योतक आहे? या ठिकाणी मी दोन तीन गोष्टींची आपल्याला आठवण करुन देणार आहे. आज या दंगलखोरांची जी काही प्रवृत्ती वाढलेली आहे ती शासन कर्त्यांनीच वाढवलेली आहे. मी आपल्याला आठवण करुन देतो की, परवा मुहम्मद पैगंबराचे व्यंगचित्र काढल्यामुळे आपल्या येथील मुसलमान बांधवांची माथी भडकणे हे स्वाभाविक आहे. कारण मुहम्मद पैगंबर हे मुस्लीमांचे प्रेषित आहे अशा वेळेस लोकांच्या भावना भडकल्या तर त्यात काही गैर नाही. परंतु दुस-या देशातील म्हणजे पॅलेस्टीन येथील "अलअक्सा" मस्जिद पाडली गेली तेव्हा त्या घटनेशी आपला काहीही संबंध नव्हता तरी सुध्दा त्यावेळी करीम लालाच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पण त्यावेळी सुध्दा करीम लालावर काही कारवाई या शासनाने केली नव्हती. आपण काहीही केले तरी आपले काही होत नाही ही जी प्रवृत्ती आहे ती या प्रकारामुळे वाढीस लागलेली आहे. भिवंडीच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये 1960 पासून पोलीस चौकीची जागा पोलिसांच्या ताब्यात होती. या जागेवर ऊर्दू शाळा सुरु करावी अशी येथील काही मुस्लीम बांधवाची मागणी होती परंतु या ठिकाणी अगोदरच उर्दू शाळा आहे व ही उर्दू शाळा व्यवस्थीत सुध्दा चालत नाही, या ठिकाणी उर्दू शाळेचे विद्यार्थी मिळत नाहीत त्यामुळे या ठिकाणी उर्दू शाळेची मागणी करणे हे योग्य नव्हते तरी सुध्दा या ठिकाणी उर्दू शाळेची मागणी करण्यात आली. तसेच या ठिकाणची जागा कब्रस्तानासाठी देण्यात यावी अशी काही मुस्लीमांची मागणी होती, परंतु या ठिकाणी कब्रस्तानासाठी अगोदरच मोठी जागा आहे. तरी सुध्दा ही जागा कमी पडत असेल तर तुम्ही दुसरी कडची कोणतीही जागा दाखवा ती जागा उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. तरी सुध्दा या मुस्लीम बांधवानी या ठिकाणच्या जागेची मागणी सोडली नाही. सभापती महोदय, मृत्यूनंतर चिरशांती मिळावी या मताचा मी देखील आहे परंतु आम्ही मागू तीच जागा मिळाली

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

पाहिजे, आम्ही जे करतो तेच बरोबर आहे, आम्ही हायकोर्टाचा निर्णय मानणार नाही, आम्ही हिंदुस्थानचा कायदा मानणार नाही, आम्हाला जी जागा पाहिजे तीच जागा आम्ही घेऊ असे म्हणणे हे काही योग्य नाही. शहा बानूचे प्रकरण ज्यावेळेस कोर्टात गेले होते त्यावेळेस कोर्टाने पोटगी देण्याचा निर्णय दिला होता परंतु हा निर्णय आम्ही मानणार नाही कारण पोटगी देण्याचा अधिकार कोर्टाला नाही असे काही मुस्लिम मंडळीचे म्हणणे होते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

त्यावेळी किती मानवतावादी आणि समाजवादी संघटना पुढे आल्या. त्यावेळी काही धर्मांध मुस्लिमांनी सांगितले की, हा जो निर्णय घेण्यात आलेला आहे तो आमच्या धर्माला मान्य होणारा नाही त्यावेळी सरकारने सरळ सांगावयास पाहिजे होते की, आम्ही कोणत्याही परिस्थीत न्यायालयाचा निर्णय बदलणार नाही. परंतु त्यावेळी त्यांच्याविरुध्द काही बोललात नाहीत. तुम्ही त्या महिलेला 14 व्या शतकात नेले. सभापती महोदय, आम्ही हिंदू कधीही अतिरेकी नाही. तिकडच्या बाजुचे सदस्य म्हणतील की, मग अयोध्या येथील बाबरी मशिद हिंदूनी का पाडली ? त्याठिकाणी मशिद नव्हती. 50 वर्षे त्याठिकाणी नमाज पडण्यात आला नाही. सभापती महोदय, भिवंडीमध्ये जी घटना घडली त्याठिकाणी मुस्लिम बांधवांनी महिलांना पुढे केले. पोलीस त्यांच्यावर हल्ला करणार नाहीत याची त्यांना कल्पना होती. सर्वसाधारपणे महिलांचा मोर्चा असेल मग तो कोणत्याही जातीचा असो पोलीस शक्यतो त्यांच्यावर लाठीमार करीत नाही. नेमका याचा फायदा घेऊन त्यांनी पोलिसांवर हल्ला केला आणि पुढील रामायण घडले.

सभापती महोदय, याठिकाणी माजी विधानसभा सदस्य श्री.निहाल अहमद यांचा उल्लेख करण्यात आला. मालेगाव येथे त्यांच्या विरुध्द किती खटले दाखल करण्यात आले ? त्यांना 24 तास तरी चॅप्टर केसमध्ये ठेवले का ? आम्ही महागाई विरुध्द मोर्चा काढायला गेला किंवा जनहिताची मागणी करायला गेलो तर आमदाराला, नगरसेवकाला सोडत नाही. एन्रॉन प्रकरणी शिवसेना आणि भाजपाच्या आमदारांवर 10-10 वर्षे केसेस सुरु आहेत. परंतु अशाप्रकारच्या दंगल करणाऱ्यांना मात्र सोडले जाते. ही प्रवृत्ती का वाढली ? याचा विचार केला पाहिजे. सभापती महोदय, मुस्लिम समाजाने सैन्यामध्ये रिझर्व्हेशन द्यावे, आय.पी.एस.मध्ये रिझर्व्हेशन द्यावे अशी मागणी केली नाही. परंतु 20-25 टक्के मते आपल्या बाजुला रहावीत म्हणून देशाच्या संरक्षण मंत्र्यांनी सैन्यामध्ये मुस्लिमांचे प्रमाण किती हे सांगण्याचा प्रयत्न केला. जी गोष्ट परकीयांनी केली नाही ती स्वकीयांनी केली आहे. ही प्रवृत्ती पोसण्यामुळे, मतांसाठी हाजीहाजी करण्यामुळे आज पोलिसांचे दात पाडून त्यांचा मेंदू बाहेर काढून त्यांना जाळण्याचे काम होत आहे. सभापती महोदय, जर एखादे धर्मस्थळ, शाळा किंवा एखादी बिल्डींग पाडण्यात येत असेल अशावेळी जमाव

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

जमतो. जी घटना घडली त्याठिकाणी जमावाकडे फावडे, तलवारी, चॉपर मिळाले. याचा अर्थ हा पूर्वनियोजित कट होता. तेव्हा गुन्हेगारांना अटक करण्यात आली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्याही धर्मियांच्या महापुरुषांची टिंगळटवाळी करणे योग्य नाही. माणूस भाकरीवर जगतो तसा तो भावनेसुध्दा जगतो. परंतु या देशामध्ये चित्रकार हुसैन यांनी हिंदू देवदेवतांची टिंगल केली म्हणून त्यांचेवर खटला भरला गेला नाही आणि तशी कोणाकडून मागणीही आली नाही. सभापती महोदय, 1983 मध्ये बोरीवलीमध्ये माझ्या मतदारसंघातील एका नगरसेवकाने बेकायदेशीर मशिद आहे असे सांगितल्यामुळे त्याने प्रक्षोभक भाषण केले असे कारण सांगून त्याच्यावर कारवाई करण्यात आली. त्याच्यावर खटला भरण्यात आला. पुढे तो निर्दोष सुटला. सभापती महोदय, मी याठिकाणी सरकारला विचारु इच्छितो की, कोणाच्या सांगण्यावरुन पोटा कायदा रद्द करण्यात आला. कोणाला खूष करण्यासाठी पोटा कायदा रद्द करण्यात आला ? हा कायदा एका ठराविक धर्मियांसाठी केला असे समजून सरळ सरळ मोर्चे काढले गेले. कोणताही कायदा संसदेने वा राज्य विधिमंडळाने पास केला असेल, त्या कायद्यामध्ये हा कायदा हिंदूसाठी आहे, मुस्लिमांसाठी आहे, ज्यूंसाठी आहे असा कुठेही उल्लेख नसतो. म्हणजे तुम्ही या देशातील कायदे न मानणाऱ्या प्रवृत्ती पोसायच्या, धर्मांधता पोसायची.

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

याठिकाणी खरेच मदरसा असता, तो पोलिसांनी तोडला असता व जनप्रक्षोभ झाला असता तर तो मान्य आहे. परंतु भिवंडीच्या दंगलीमध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर आपण कठोर कारवाई करावी. यामध्ये तथाकथित समाजवादी आणि मानवतावादी निघू शकतील. नागपूर संघ कार्यालयावर हल्ला झाला. त्यावेळी कोळसे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक सत्यशोधक समिती नेमण्यात आली. त्या समितीने असे सांगितले की, त्याठिकाणी हल्ला झालाच नाही, पोलिसांना एकही गोळी लागली नाही. केवळ काही मुस्लिमांना बदनाम करण्यासाठी त्याठिकाणी अतिरेकी म्हणून आणले गेले व संघ कार्यालयासमोर मारले गेले. अशा प्रकारचा काळा अहवाल कोळसे-पाटील यांनी दिला होता. बरे झाले की, महाराष्ट्र शासनाचे गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी त्या अहवालास केराची टोपली दाखवली. मला माहीत आहे की, एक-दोन महिन्यांनी या दंगलखोरांना शासनाने पकडल्यानंतर त्यांना सोडवण्यासाठी अनेक मानवतावादी, मानवाधिकारी लोक पुढे येतील. या देशामध्ये हिंदुंना मानवाधिकार नाहीत, या देशात हिंदुचे अपमान होत नाहीत का ? त्यामुळे याबाबतीत आपण अतिशय कठोरपणे कारवाई करावी व माझी अशी मागणी आहे की, दंगल भडकवल्याबद्दल व प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल अबू आझमी यांना त्वरित अटक करावी, एवढी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

-----

**तालिका सभापती** : सर्वच सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपल्यासमोर जो विषय ठेवण्यात आलेला त्यावरच बोलावे, त्या व्यतिरिक्त बोलू नये. आता सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपल्यापैकी काही जणांना कल्पना असेल, परंतु फार कमी प्रमाणात लोकांना कल्पना आहे की, भिवंडीमध्ये ज्यावेळी सन 1984 साली दंगल झाली होती, त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राच्या आणि भारताच्या पोलीस दलामध्ये भिवंडीमधला जातीय एकतेचा पॅटर्न "हा एक आमची शान आहे" अशा पध्दतीने गृह विभागाने त्याचे डॉक्युमेंटेशन केले होते. दिनांक 8 डिसेंबर,2005 रोजी गेल्या वर्षीच्या नागपूर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या संपूर्ण भिवंडी येथील पोलीस अधिकाऱ्यांनी तेथील ऊर्दू व मराठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन प्रचंड मोठी परिषद घेतली होती. दुर्दैवाने आज दंगलीमध्ये जे श्री.रावसाहेब शिंदे, श्री.राठोड आणि इतर अधिकारी जखमी झाले आहेत यांनी हिंदु, मुस्लीम अशा सर्व नॅशनल हयुमन राईटस्च्या लोकांना एकत्रित करुन त्यावेळी एक परिषद घेतली होती. त्यांनी वस्त्या-वस्त्यांमध्ये जाऊन सर्वांना एकत्रित करुन शांतता कशी राहील याबद्दल 1984 पासून ते 2006 पर्यंत जवळपास 22 वर्षे प्रयत्न केले. त्यावेळी ते अभिमानाने सांगत होते की, जगामध्ये अनेक ठिकाणी दंगल झाली, मालेगांवात, सोलापूरमध्ये, नगरमध्ये दंगल झाली परंतु भिवंडीमध्ये कशी दंगल झाली नाही. अशा पध्दतीने जे शांतताप्रेमी लोक जे एकत्रित काम करीत होते त्या सगळया लोकांच्या मुस्काडात या अतिरेक्यांनी मारलेली आहे. औरंगाबादमध्ये ज्यावेळी दंगल झाली, त्यावेळी पोलिसांच्या वसाहतीवर काही धर्मांध गुंडांनी दगडफेक केली व त्यांच्यावर ॲक्शन घेतली म्हणून त्यावेळचे पोलीस महासंचालक, श्री.अरविंद इनामदार यांच्यावर अन्याय करुन पदावरुन दूर करण्यात आले. त्यावरील एक शेवटचा नियतीने दिलेला न्याय म्हणजे, आज भिवंडीमध्ये या बाटलीतील अतिरेकी राक्षसांनी पोलिस दलाच्या तोंडावर परत एकदा तमाचा मारला, असे मला वाटते. मला येथे सांगितले पाहिजे की, दंगलीमध्ये जे जखमी झालेले अधिकारी आहेत, त्यातील काही अधिकाऱ्यांशी मी फोनवरुन बोलून जेवढी शक्य आहे तेवढी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यावरुन मला एक महत्वाचा मुद्दा दिसून येतो. दुर्दैवाने याठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित नाहीत. त्यांच्या बाबतीत आम्हाला असा अनुभव येतो की, काहीवेळा विधानसभेमध्ये त्यांनी जे भाषण केलेले असते ते तसेच्या तसे भाषण विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांचे मुद्दे लक्षात न घेता, मधून मधून कधी गडकरी साहेबांचे नांव तर कधी सरपोतदार

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गोऱ्हे.....

साहेबांचे नांव घेऊन ते तसेच्या तसे विधानसभेतील भाषण याठिकाणी येऊन करतात. ते भाषण अगोदरच प्रेसला गेलेले असते, चॅनेलवरही येऊन गेलेले असते. ठीक आहे, हरकत नाही. याठिकाणी माझा असा मुद्दा आहे की, कब्रस्थानच्या जमिनीवरुन हा सगळा वादंग उठला.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.निलम गो-हे.........

मला पहिला मुद्दा असा उपस्थित करावयाचा आहे की, राज्यातील कब्रस्तानाच्या जमिनीचे कशा पध्दतीने नियमन करणार आहात ? क-हाड येथील इदगाह मैदानाचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी हिंदुंची, मुस्लिमांची किती लोकसंख्या आहे ? इदगाह समितीने असे सांगितले की, 180 एकर जमीन त्यांची आहे. आज परिस्थिती अशी आहे की, ज्या ज्या जमातीमध्ये, हिंदुंमध्ये प्रेते जाळली जात नव्हती त्यांची दफनभूमि मुस्लिमांच्या शेजारी असावयाची. त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, मातंग, रामोशी, भिल्ल याचीही जमीन आहे. क-हाड येथे 10 एकर जमीन उत्तर लक्ष्मीदेवी मंदिराची आहे. इदगाह मैदान, उत्तर लक्ष्मीदेवी मंदिराच्या जागेसाठी कुंपण बांधण्याकरिता नगरपालिकेने पैसे दिलेले आहेत. इचलकरंजी येथे असाच प्रश्न आहे. आणि अशाच एका प्रश्नाचा भिवंडीमध्ये स्फोट झालेला आहे. संघटना म्हणतात की कब्रस्तानाची जमीन आहे, पोलीस म्हणतात पोलीस स्टेशनची जागा होती. महार वतनाच्या जमिनी सरकारने वेळोवेळी ताब्यात घेतल्या आहेत, वतन जमिनी देखील घेतल्या आहेत, मग वक्फ मंडळाकडे कब्रस्तानाच्या ज्या अतिरिक्त जमिनी आहेत त्या सरकारने ताब्यात घेतल्या तर चूक की बरोबर आहे याबाबत चर्चा होऊ शकते. परंतु, सरकारी कामासाठी जमीन देणे ही कायद्याने सगळयांचीच जबाबदारी आहे. वक्फ बोर्डाचा कायदा असला तरी पोलीस स्टेशनसाठी सरकार जमीन ताब्यात घेत असेल तर जमीन देता येणार नाही असे एखाद्याने म्हटले तर कायद्यातही बदल करण्याचा विचार करावा लागेल. ज्यावेळी जनतेच्या कामासाठी जागा मागितली जाते त्यावेळी सुध्दा जर लोक अशा प्रकारे कायदा हातात घेत असतील तर यामध्ये 3 प्रकारचे लोक मला दिसून येतात. मागील काळात मुंब्रा येथे दंगल झाली, नगर येथे दंगल झाली, मी आणि सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते आम्ही दंगल क्षमल्यानंतर त्या भागाला भेट दिली होती. मी दंगल क्षमल्यानंतर यासाठी म्हणाले की, कदाचित काही लोक असा आरोप करतील की, हे नेते त्या ठिकाणी दंगल भडकविण्यासाठी गेले होते. आम्ही ज्यावेळी त्या ठिकाणी भेट दिली त्यावेळी असे लक्षात आले की, सरळ सरळ त्या ठिकाणी पुढारी जातात, पोलिसांच्या उपस्थितीत लोकांसमोर भाषणे करुन म्हणतात की, तुमच्यात हिंमत असेल तर आम्हाला पकडून दाखवा. अबु आझमीसारखे नेते ज्या ज्या ठिकाणी अशा दंगली होतात त्या ठिकाणी जातात. या माणसाला अटक केली तर हा फार मोठा लिडर होईल, असेही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

डॉ.निलम गो-हे..........

सांगितले जाते. परंतु, अशा प्रकारे भाषणे करुन पोलिसांना डिमॅारलाईज करण्याचे काम हे नेते करतात. म्हणून मी असे म्हणाले की, अशा घटनांमागे किंवा अशा घटनांमध्ये 3 प्रकारचे लोक आहेत. या घटनेमागील जे सूत्रधार होते, म्हणजे ज्यांनी मोर्चाबाबत आगाऊ सूचना दिली असेल किंवा सरकारला निवेदन दिले असेल, आंदोलनाचा इशारा दिला असेल त्यांना घटनेमागील सूत्रधार म्हणून 120 ब या कलमानुसार अटक केली पाहिजे. अशा सूत्रधारांना अटक केली आहे काय ? त्याचप्रमाणे त्या ठिकाणी सध्या असलेल्या पोलीस अधिका-यांची बदली होता कामा नये. याचे कारण असे आहे की, अशा पध्दतीने जे लोक कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांची जर बदली करणार असाल तर पोलीस असे म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था सांभाळून आमच्यावर ही पाळी आली तर त्यांचे त्यामध्ये काय चुकले ? प्रश्न असा आहे की, भिवंडीसारख्या शहरात जे घटनेच्या चौकटीत काम करणारे आहेत, निस्पृहपणे काम करणारे आहेत अशा शिवानंदन किंवा अर्चना त्यागींसारख्यांची नेमणूक करण्यात आली होती. अशा ठिकाणच्या पोलीस अधिका-यांच्या बदल्या या घटनेनंतर करणे योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी जे कब्रस्तान आहे त्याचा सर्व्हे केला पाहिजे. खरोखर कब्रस्तानासाठी किती जमिनीची गरज होती ? जर सरकारने पोलीस स्टेशनसाठी जागा मागितली असेल तर ती जागा संबंधितांनी दिलीच पाहिजे, ते जर देत नसतील आणि काही कायदेशीर अडचणी असतील तर कायद्यामध्ये बदल केला पाहिजे. त्याचप्रमाणे संबंधितांवर 120 ब सारखी कलमे लावून गुन्हा दाखल केला पाहिजे. या ठिकाणी ज्याप्रमाणे अशा प्रकारचे विध्वंसक लोक आहेत त्याचप्रमाणे सामान्य, निरपराध नागरिकही आहेत, ज्यांचा या घटनेशी संबंध नाही. पण हे लोक आज भितीयुक्त वातावरणात रहात आहेत. मी काही गृहमंत्री नाही. परंतु, मला असे वाटते की, या भागामध्ये पोलिसांचे संचलन झाले पाहिजे. जेणेकरुन जो सामान्य नागरिक आहेत ते भयमुक्त होतील. अशा प्रकारे जे विध्वंसक लोक असतात त्यांच्या मनामध्ये अशी भावना असते की, "देखों चोरों को कैसे भगा दिया" अशा प्रकारे पोलिसांची आय-माय काढली जात असेल तर पोलीस कशा प्रकारे शांतता प्रस्थापित करण्याचे काम करणार आहेत ? हा केवळ भिवंडीचा प्रश्न नाही तर ज्या ज्या ठिकाणी भडकविणारे लोक आहेत ते असे म्हणतील की, आम्ही देखील पोलिसांचे दात काढू

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.निलम गो-हे............

शकतो, आम्ही देखील असे वागू शकतो. म्हणून त्या ठिकाणी असलेल्या कोणत्याही पोलिसाची बदली होता कामा नये. त्याचप्रमाणे कब्रस्तानच्या जागेचा सर्व्हे करावयास पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी वाद आहेत, क-हाड येथे वाद आहे, त्या ठिकाणी पोलिसांना उन्हातान्हात बसून लक्ष्मीदेवी मंदिराचे रक्षण करावे लागते. म्हणून मी त्या ठिकाणी अडीच लाख रुपये माझ्या आमदार फंडातून पोलीस चौकी बांधण्यासाठी देणार होते.

यानंतर श्री.बोरले................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.निलम गो-हे ..........

कराड नगरपालिका आणि साता-याचे महसूल प्रशासनाकडून पोलीस चौकी बांधण्यासाठी परवानगी मिळत नाही. आता आषाढ महिना सुरु होईल, आषाढ महिन्यामध्ये लोक तेथे जाऊन देवाची पूजा करतात. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, मतांसाठी मुस्लिमांचा अनुनय करण्यात येतो. आपण प्रत्येक वेळी अनुनय विचारात घेऊन वागावयास लागलो तर असे होईल की, जे शांतताप्रेमी नागरिक आहेत ते बाजूला ढकलले जातील. तसेच आणखी एका गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे असे मला वाटते. अशा घटनांमध्ये तीन प्रकारचे लोक असतात, असे मी यापूर्वीच म्हटले आहे. त्यामध्ये मला एक ग्रुप सातत्याने दिसतो. दुर्दैवाने अनेक लोक फिल्म इंडस्ट्रीमधील आहेत. त्यांचे चित्रपट जर आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, या चित्रपटांमध्ये पोलीस कसे मुर्ख आहेत, पोलिसांचे गुन्हेगारांशी कसे संबंध आहेत अशा प्रकारचे चित्रिकरण केलेले असते. पोलीस सद्‌गुणांचे पुतळे आहेत, असे मी म्हणणार नाही. परंतु पोलिसांबद्दलचे डीमिस्टीफिकेशन आणि डीमॉरलायझेशन होईल, पोलिसांचे नितीधैर्य खच्ची होईल असा संदेश सिनेमातून देणारा एक ग्रुप आहे. दुसरीकडे मला असे चित्र दिसते की, ज्या पोलिसांना चांगले काम करावयाचे आहे त्यांना तेथून हलविले जाते. तसेच, ज्यांना ससपेंड केलेले असते त्यांना रिइन्स्टेट केले जाते. त्यामुळे अशा घटना घडल्यानंतर तेथील पोलीस अधिका-यांची बदली न करता त्यांना तेथेच ठेवावयास हवे. असे केले तर हे अधिकारी न डगमगता, लोकांना बरोबर घेऊन पुढील काळात चांगली भूमिका बजावू शकतील. मला सन्माननीय सदस्य, श्री.योगेश पाटील, तेथील शाळा/महाविद्यालयांच्या प्राध्यापिका आणि विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी भेटले. त्यांच्याशी बोलण्यातून माझ्या हे लक्षात आले की, त्यांच्या मदतीने भविष्यात घटना घडू नये म्हणून प्रयत्न करावयास हवेत. यातील तिसरा महत्वाचा भाग असा आहे की, भिवंडीमध्ये बाहेरुन आलेल्या लोकांचे जर धागेदोरे पोलिसांनी शोधले तर एक फार मोठे इनव्हिजिबल जाळे, चक्र वेगवेगळया ठिकाणी ऑपरेट होते आहे असे लक्षात येईल. त्यांना जर रोखावयाचे असेल तर पोलिसांच्या पाठीमागे उभे राहण्याची गरज आहे, पोलिसांना बॅकिंग देण्याची गरज आहे. पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी पोलीस स्टेशनचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याचे उद्‌घाटन

...2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.निलम गो-हे ..........

करण्यासाठी आम्हा सर्व आमदारांना बोलाविले तर आम्ही तेथे येण्यास तयार आहोत. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेशी केलेला खेळखंडोबा खपवून घेतला जाणार नाही, अशा पद्धतीची भूमिका शासनाने घेतली पाहिजे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

--------

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, भिवंडीमध्ये काल जे काही घडले ते चिंताजनक आहे. सर्वप्रथम मी असे सांगू इच्छितो की, मी अखिल भारतीय खिलापत कमिटीचा चेअरमन आहे. माझ्याकडे अनेक संस्था आहेत. आमच्याकडे मायनॉरिटी संस्था असल्या तरी त्यामध्ये 20 टक्के हिंदू कॅन्डीडेटचा आम्ही समावेश करतो. महात्मा गांधीजींनी स्थापन केलेली ही संस्था आहे. औरंगाबादमध्ये मी भाषण करतांना तेथील मुस्लिमांना सांगितले की, आपण शीव जयंती साजरी केली पाहिजे. शिवाजींचे चरित्र आपल्यासमोर आहे. भिवंडीमध्ये काल जी घटना घडली त्यासंदर्भात मी माननीय गृहमंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की, भिवंडीमध्ये दंगल झ ाालेली आहे. माननीय गृहमंत्र्यांनी मला असे सांगितले की, मला यासंदर्भात अजून काही माहिती मिळालेली नाही. सभापती महोदय, भिवंडीमधील ही जी जागा आहे त्यासंबंधी मी आपल्याला थोडीशी माहिती देतो. सन्माननीय सदस्या डॉ.निलम गो-हे म्हणाल्या की, ही जागा कब्रस्तानची आहे किंवा नाही याबाबत चर्चा होऊ शकते. त्या ठिकाणी कब्रस्तानच्या जागेवर पोलीस स्टेशन बांधण्याचे काम चालू होते. त्याला स्थानिक लोकांकडून विरोध झाला. वक्फ बोर्डातील श्री.आर.डी.शिंदे यांना मी असे सांगितले की, त्यांना तेथे पोलीस स्टेशन बांधू द्या. तो पूर्ण परिसर वक्फ बोर्डाचा आहे. मी असे सांगितले की, त्यांना तेथे बांधकाम करु द्या. त्यांना फक्त असे सांगा की, कब्रस्तानसाठी थोडी जागा सोडा आणि मध्ये थोडे अंतर ठेवा. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याबद्दल मला आदर आहे. ते अभ्यासू आहेत. मी बाहेर लोकांना असे सांगतो की, ते अभ्यास करुन बोलतात. म्हणून त्यांना बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु जे घडले ते कसे घडले याचा आपल्याला विचार करावा लागेल. या घटनेचा शेवट काय झाला ते आपण पाहिले पाहिजे. हा गोंधळ कसा झाला ते मी आपल्याला सांगतो. मी तेथे जाऊन आलो. मी तेथे भाषण केले की, जे झाले ते झाले. आता तुम्ही सर्व गुपचूप बसा. माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले आहे की, आपण याची चौकशी करु आणि जे दोषी असतील त्यांना सजा देऊ.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 18:50

डॉ. अझिज ...

तेथे काल साडेतीनच्या सुमारास पाऊस जास्त होता. लोकांनी तेथे अजान दिली. ती देताना काही लोक तेथे जमा झाले. अजान देणाऱ्या त्या इसमाच्या हातावर तेथील पोलिसाने मारले. मी स्वत: तेथे गेलो होतो तेव्हा ते पाहिले आहे की, त्याच्या हातावर त्या माराचे वळ होते. तेथून पुढे तो वाद सुरू झाला. खूप लोक जमा झाले. काही बायकासुद्धा तेथे गेल्या. त्यांनी तेथे जी स्लॅब लावली होती तिच्या खालच्या फळ्या काढल्या. तेथे त्यांनी काहीही उद्ध्वस्त केलेले नाही. तेथे एक पोलीसवाला होता. तो तेथे काही लेक्चर वगैरे द्यायचा. त्यातून हे सारे सुरू झाले. बरेचसे लोक तेथे जमा झाले. दगडफेक झाली. शिंदे देखील तेथे होते. ते लोक पळाले. त्यानंतर काही लोक तेथे गोळा झाले. खरे म्हणजे त्यांनी तेथे सांगावयास पाहिजे होते की, वादग्रस्त जागा आहे, तुम्हाला नको आहे तर आम्ही येथे काही बांधत नाही. तेथे लोकांनी मोर्चादेखील काढला. तेथे यासाठी मुस्लिमच विरोध करीत होते असे नाही. इतरही लोक याला विरोध करीत आहेत. तरीही मी त्यांना सांगितले की, तुम्ही तेथे बांधा. मात्र मध्ये 50 फूट जागा सोडा. तेथील नगरपालिकेची परवानगीदेखील 50 फूट जागा सोडून बांधकाम करण्यासाठीच आहे. त्याला वगळता दोन फूटाच्या आत कबरस्तानच्या आत जाऊन भिंत बांधण्याचा तेथे प्रयत्न केला. त्याच्यामुळे हा वाद झाला. सभापती महोदय, पोलिसांच्याबद्दल मला आदर आहे. पोलिसांचे मॉरल हे डाऊन होता कामा नये, ते राहिले पाहिजे. पण माझ्याकडे तेथील सारे फोटो आहेत. मी आपल्याला ते फोटो दाखवू शकतो. पोलिसांनी जो गोळीबार केला आहे त्यामध्ये एकाच्या डोक्यामध्ये गोळी लागली आहे. तो इसम 26 वर्षाचा होता. त्यानंतर दुसऱ्या इसमाच्या मानेमध्ये गोळी लागली, तो 22 वर्षांचा होता. यानंतर तेथील परिस्थिती बिघडली. त्यानंतर तेथे जे काही घडले ते आपल्यासमोर आलेले आहे. तेव्हा प्रथमत: तुम्ही तेथे नेमके काय झाले हे पहा, कशामधून हे सारे घडले ते जाणून घ्या. मी आमच्या समोरच्या मंडळींना सांगतो की, आम्ही तुमच्याकडे अगदी आदराने पाहतो. तुम्हीही या घटनेकडे आणि अन्य साऱ्याच घटनांकडे दोन्ही बाजुंनी पहा. मी तर पुढे जाऊन म्हणेन की, पोलिसांनी हा वाद अगोदर सुरू कशासाठी केला ? ही वादग्रस्त जागा होती तर तुम्ही त्याबाबत सबुरीने घ्यायला पाहिजे होते. पण तुम्ही तेथे रात्रंदिवस काम चालू केले. त्यानंतर ही घटना काल घडली आहे. ही सारी वस्तुस्थिती आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी ही सारी वस्तुस्थिती सांगितली आहे. त्यांना यातील बरेचसे माहीत नव्हते. त्यांनी सांगितले आहे की, आपण

....... 4एच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अझिज .....

याची चौकशी करू. यामध्ये कब्रस्तानच्या जागेचा जो भाग आहे त्याबाबतीत मी परवानगी दिली होती. तसेच नगरपालिकेकडून देखील त्यासाठी परवानगी मिळाली आहे. तरीही पोलिसांनी कारण नसताना हे केले आणि त्यामुळे पुढील दुर्घटना घडली. या संबंधी चौकशी निश्चितपणे व्हावी. तेथे पोलिसांवर जो हल्ला झाला तो व्हायला नको होता. तसेच त्यापूर्वी जे काही झाले तेही व्हायला नको होते एवढेच मला येथे सांगावयाचे आहे. धन्यवाद.

*****

....... 4एच 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, भिवंडी येथे काल झालेल्या दंगलीच्या बाबतीत येथे गंभीर चर्चा सुरू आहे. गेल्या कित्येक दंगली शमविण्यासाठी धडपड करणारा मी एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता आहे. या सगळ्या गोष्टींच्या मुळाशी जाण्याचा मी प्रयत्न केला आणि त्यातून जी माहिती मला मिळाली ती आणि आजवरचा माझा अनुभव मी या निमित्ताने या ठिकाणी मांडू इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्री स्वत: उपस्थित आहेत. त्यांनी या गोष्टींचा बारकाईने विचार करावा. सभापती महोदय, या ठिकाणी जी बरीचशी चर्चा झाली त्यात शासन त्यांच्याबाबतीत कसे वागते याचा उहापोह झाला, पण मी त्यात जाऊ इच्छित नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे ...... 4आय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब...

परंतु मला आपल्याला दोन गोष्टी प्रामुख्याने सांगितल्या पाहिजेत. अशाप्रकारच्या दंगली मुंबई, ठाणे व महाराष्ट्र राज्यामध्ये घडत आहेत याच्या पाठीमागची पार्श्वभूमी आपण बघितली किंवा तिचा नीट सखोल अभ्यास केला तर दोन गोष्टी प्रामुख्याने नेहमी आपल्या निदर्शनास येतात. पोलीस खात्याने त्याचा पूर्ण तपास केला आहे. त्यांच्याकडे विश्वसनीय माहिती आहे की, कशाप्रकारे या दंगली घडवून आणल्या जातात? मध्यंतरी जे अतिरेकी पकडले गेले, त्यांच्याकडून माहिती मिळाल्यानंतर या दोन गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यापैकी एक म्हणजे पोलिसांचे मनोधैर्य खच्ची केले पाहिजे, किंवा त्यांना मारले पाहिजे, किंवा खोटया नाटया गुन्हयामध्ये त्यांना अडकविले पाहिजे. अशाप्रकारचे अतिरेकी संघटनांचे डावपेच असतात. सर्व मुस्लिम वाईट आहेत असे माझे बिल्कुल म्हणणे नाही. माननीय सदस्य डॉ. अझिझ यांनी ज्या गोष्टी सांगितल्या त्याच्याशी मी सहमत आहे.त्यांचा मुस्लिम समाजावर चांगल्या प्रकारे पगडा आहे. परंतु बऱ्याच प्रमाणात असे काही मुस्लिम या महाराष्ट्रामध्ये राहतात ते कोणत्याही चांगल्या नेत्याला मानीत नाहीत. त्यांचे काम दंगल घडविणे, या देशाची अर्थव्यवस्था खराब करणे, आणि पाकिस्तान जे डावपेच रचत आहे ते यशस्वी करणे हे त्यांचे काम आहे. अशाप्रकारच्या संस्था महाराष्ट्रामध्ये जागो जागी आहेत. 20-25 वर्षापूर्वी भिवंडी येथे दंगल झाली होती, ती अख्ख्या महाराष्ट्राने अनुभवली आहे. काही वर्षापूर्वी मोहम्मद अली रोडवर दंगल झाली. ही दंगल घडविण्यामागील उद्देश असा असतो की, सुरुवातीला पोलिसांना मार देऊन त्यांचे मनोधैर्य खचले, ते डिमॉरलाईज झाल्यानंतर बाकीच्या लोकांवर,राज्यकर्त्यांवर दबाव आणणे अतिशय सोपे असते. आपल्या समाजाची ताकद दाखवून बाकीच्यांना घाबरविणे सोपे असते. अशाप्रकारचे डावपेच दंगलीमध्ये वारंवार दिसून येत असल्यामुळे या दंगली घडविणारे कोण आहेत त्यांचा शोध घेणे गरजेचे आहे. या दंगलीचा पूर्ण इतिहास बघितल्यानंतर तर या सभागृहातील सर्व आमदारांना आवाहन करतो की, एखाद्या मुस्लिम वस्तीमध्ये आमदार फंडामधून एखादी पोलीस चौकी बांधण्याचा आपण प्रयत्न करा. यामुळे किती त्रासाला सामोरे जावे लागते हे मी स्वत: अनुभवले आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी निर्मल नगर, भारत नगर आणि बेहरामपाडा याठिकाणी आपल्या फंडामधून पोलीस चौक्या बांधल्या. आतापर्यंत कोणत्याही ठिकाणी अगदी सहजपणे पोलीस चौकी बांधली गेलेली नाही. याचा मी स्वत: अनुभव घेतला आहे. प्रत्येक माननीय सदस्यांनी असा प्रयत्न केला तर त्यांना कळेल की, अशा वस्त्यांमध्ये चौकी बांधणे किती कठीण आहे. म्हणून मी आपल्याला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब....

खात्रीपूर्वक सांगतो की, त्या जागेवर दुसरे कसलेही बांधकाम केले असते तर ही दंगल झाली नसती. तसेच, या राज्यामध्ये अशा देखील काही वस्त्या आहेत त्याठिकाणी पोलीस चौकी झाली पाहिजे अशी तेथील लोकांची मागणी असते. परंतु ज्या वस्त्यांमध्ये समाजकंटक राहतात, ज्यांचा अतिरेक्यांशी संबंध जोडलेला आहे, जे बरेच लोक त्याठिकाणी समाजविघातक कार्य करतात अशा बऱ्याच लोकांना त्याठिकाणी पोलीस चौकी नको असते. आणि म्हणून आमदार फंडामधून चौकी बांधल्यानंतर किंवा शासनाने चौकी बांधायला घेतल्यानंतर कसा त्रास होतो हे आपण अनुभवतो. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटल्याप्रमाणे पोलीस चौकी बांधायला गेल्यानंतर त्याठिकाणी जाणुनबुजून विघ्न आणले जाते. त्याच्या मागे दंगल घडविण्याची पार्श्वभूमी असण्याची शक्यता आहे. तेव्हा आता सभागृहामध्ये मागणी केल्याप्रमाणे श्री. अबू आझमी याना अटक झाली पाहिजे. त्यांचे अशा ठिकाणी नेहमी कां जाणे होते? त्याठिकाणी गेल्यानंतर नेहमी दंगली कां उसळतात? समाजामध्ये आपले महत्व वाढविण्याचा ते प्रयत्न करीत असतात. ही दंगल घडविण्यामागील पार्श्वभूमी आहे. डॉ. अझिझ यांचे लोक ऐकत नाहीत, त्यांनी शांततेचे आवाहन केल्यानंतरही काही ठिकाणी गडबड झाली. बऱ्याचशा गोष्टींना पोलिसांचा अतिरेक देखील कारणीभूत असतो याबद्दल वाद नाही. पोलिसांचा अतिरेक वाढल्यानंतर देखील महाराष्ट्रामध्ये दंगली घडतात. तेव्हा या घटनेच्या मुळापर्यंत जाण्याची गरज आहे. अशाप्रकारच्या घटना घडवून जाणुनबुजून शांतता बिघडविण्याचा प्रयत्न काही संघटना दुर्दैवाने या महाराष्ट्रामध्ये करीत आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अ□ल परब (पुढे सुरु...

त्यां□ पू□□ अभय मिळत आहे, संर□□ मिळत आहे. श्री.आबु आझमी म्ह□ात □, पोलिसांमध्ये हिंमत असेल तर मला अट□ □रावी. हे महाराष्ट्र शास□ला आव्हा□ दिलेले आहे, महाराष्ट्राच्या □ह □त्याला आव्हा□ दिलेले आहे. परंतु त्यांच्याबाबतीत सरकार □ही □रु श□त □ही, ही दुर्दैवाची □ष्ट आहे. अशा लो□वर □रवाई झाली पाहिजे. अशाप्र□रे दं□ली घडवू□आणल्यानंतर 15 दिवसां□ त्यांच्यावर जामीनपात्र □न्हा घालायचा आणि 10-15 मुलांवर □न्हा घालायचा, त्यांना स□ळी अट□ □रायची आ□ दुपारी सोडू□ द्यायचे. म्हणजे पुन्हा ते दं□ल □रायला मो□ळे. अशाप्र□रे पोलीस अंडरस्टँडीं□ त्यांना अट□ करतात आणि □तर त्यांना दुपारी सोडतात. यामुळे □न्हे□रांचे बळ वाढते आणि मग ते पुढे हेच □न्हे□र पोलिसांचे दात पाडतात. डीसीपींचे दात पाड□ ही महाराष्ट्रामध्ये दुर्दैवाची □ष्ट आहे. पोलीस □न्स्टेबलचा □थळा □ढला गेला, 35 पोलीस यामध्ये ज□मी झाले. □ळीबारामध्ये मृत झालेल्या लो□□ 1 ला□ रुपयाची मदत आ□ ज□मी झालेल्यां□ 50 हजाराची मदत जाहीर □ली जाते. अशाप्र□रचा मेसेज दुसऱ्या मोहल्ल्यामध्ये जातो. दं□ल □र□ऱ्यांबद्दल शास□ □शाला सहा□भूती दा□विते, हे □ळत □ही. त्यां□ रस्त्यावर येऊ□ दं□ल □ली, घरातील मा□साला □ळी ला□ली □ही. ते पोलिसांचा □थळा □ढतात, अशा लो□□ □ळी ला□ली. म्ह□□ही □ष्ट □भीरप□□ घे□याची आवश्य□ता आहे. या घडलेल्या दं□लीतू□ महाराष्ट्र शास□ला संदेश द्यायचा आहे. मा□च्या वेळी दं□ल झाली त्यामध्ये मृत पावलेल्यांच्या □तेवाई□□ ए□□ ला□ रुपये मिळाले. परंतु त्यांची मा□ची पार्श्वभूमी □य आहे, हे तपासले आहे □य ? □□ मिसा□ली होते □□ ताडा□ली होते, त्यापैकी कोणावर ए□सअे □ली केस होती. दंगल □र□रे ज□मी झाले तरी त्यां□ 50 हजार रुपये, त्यापै□ मृत झाले तर त्यां□ 1 ला□ रुपये शास□ देते, परंतु □र्जबारी होऊन आत्महत्या करणाऱ्या शेत□ऱ्यांच्या कुटुंबियांना पैसे दिले जात □हीत, त्यां□ बॉ□ दिले जातात. त्यांचे □टे पंच□मे □ले जातात. परंतु या घटनेमध्ये पंच□मे □ □रत □ही ? हे रस्त्यावर □शासाठी आलेले होते, त्यां□ □शा परिस्थितीमध्ये □ळी ला□ली ? त्या मा□साला घरी बसू□ □ळी ला□लेली □ही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमा□ ज्यांचे हातावर पोट आहे, जे □रीब मुसलमा□ आहेत, ते दं□लीच्या विरोधात आहेत. □रीब लो□च या दं□लीमध्ये होरपळले जातात, ते दं□लीचे समर्थ□ □रत □हीत. □र□ त्यांचा धंदा हा हिंदू वस्तीवर अवलंबू□

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ॲड.अनिल परब (पुढे सुरु....

असतो. म्ह□ू□ त्यां□ या दं□ली □□ असतात. परंतु त्यांचे म्ह□□ ऐ□ले जात □ही, ते बिचारे भरडले जातात. त्यांचा फायदा घेऊ□ आबू आझमीसार□ □ी स्वत:ची पोळी भाजू□ घेतात. शिवसे□ प्रमु□□ अ□ले□ लिहिला म्ह□ू□ त्यांच्यावर खटला दाखल केला गेला. त्याचवेळेला सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांना अटक झाली. ज्यांना काही मदत केली नाही, असे मुस्लीम लोक त्यांना सोडविण्यासाठी पोलीस कमिशनरकडे गेलेले होते, असेही लोक आहेत. परंतु सरकारला जे आव्हान करुन सांगतात की, हिम्मत असेल तर आम्हाला अटक करुन दाखवा, त्यांच्या विरोधात तक्रार लिहिली जात नाही. आपल्याकडे इंटेलिजन्सची विंग आपल्याकडे आहे. त्यांच्यामार्फत आज कोठे, कोणाची सभा आहे, त्या ठिकाणी कोण बोलले, काय बोलले, कोणकोण लोक त्यांना भेटले, या सगळा रिपोर्ट घेतला जातो. तो रिपोर्ट सरकारकडे असेल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब.....

परंतु हा रिपोर्ट फक्त तुमच्या स्वार्थासाठी, राजकीय गोष्टींसाठी वापरला जातो. अन्यथा त्याचा वापर केला जात नाही. अशा प्रकारचा रिपोर्ट आपण देऊ नका असा दम पोलिसांना दिला जातो. अशा प्रकारच्या लोकांना अटक केली तर आपोआप दंगल शमेल. दंगलीची कारणे काहीही असतील, एखादे भांडण असेल, एखादा वाद असेल तर कोणत्याही परिस्थितीमध्ये तो वाद निवळला जाऊ शकतो. चर्चा करुन तो वाद मिटवला जाऊ शकतो. परंतु अतिरेक्यांकडून प्रशिक्षण घेऊन आलेले जे मुस्लिम या राज्यामध्ये आहेत, ज्यांच्या माध्यमातून हजार किलो आरडीएक्स महाराष्ट्र शासनाला मिळाले आहे, त्यांचे लागेबांधे काही राजकीय नेत्यांशी आहेत, त्या लोकांवर कारवाई करण्याचे धाडस शासन या निमित्ताने दाखवणार आहे की नाही ? हा खरा यातील महत्वाचा मुद्दा आहे. माझी शासनाला विनंती आहे. त्या ठिकाणी केवळ दंगलीचे गुन्हे दाखल करु नका. त्या ठिकाणी दंगलीचे गुन्हे दाखल केले जातील. सकाळी 9.00 वाजता त्यांना कोर्टासमोर उभे केले जाईल. त्यांच्यावर अदखलपात्र गुन्हे दाखल केले जातील आणि ते सर्व लोक सुटतील. माझी शासनाकडे मागणी आहे. श्री. अबू आझमी यांनी त्या ठिकाणी काल जे भाषण केले त्या भाषणामध्ये त्यांनी लोकांना कसे भडकवले ? त्या ठिकाणी त्यांनी कसे वर्तन केले ? याची सखोल चौकशी करुन प्रक्षोभक भाषण केल्याबद्दलचा गुन्हा त्यांच्यावर दाखल करावा. त्या ठिकाणी डमी आरोपीना हजर करुन घेऊ नका. जे खरेखुरे आरोपी आहेत, ज्यांनी डीसीपीचे दात तोडले, ज्यांनी डीसीपीवर हल्ला केला त्यांना पकडावे. माझी अशी माहिती आहे की, त्या ठिकाणी डीसीपीच्या डोक्यावर वार झाला. पोलिसांनी मनात आणले तर अशा गुन्ह्यासाठी 307 कलम लावतात. श्री. छगन भुजबळ साहेबांच्या घरावर हल्ला झाला त्यावेळी श्री. भुजबळ साहेबांना साधे खरचटले सुध्दा नव्हते तरीही त्या ठिकाणी 307 कलम लावले. कारण ते शिवसैनिक होते. सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट हे त्यातील एक आरोपी आहेत. अशा वेळी जर पोलिसांनी मनात आणले ते असे करु शकतात. ही संघटित गुन्हेगारी आहे. पोलिसांनी डमी आरोपींना न पकडता खऱ्या आरोपींना पकडले तर त्यांची पार्श्वभूमी कळेल. त्या संघटित गुन्हेगारांना मोक्काखाली अटक केली पाहिजे. माननीय गृहमंत्र्यांना माझी विनंती आहे. ही जी माहिती मी सदनाला दिलेली आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ....

त्याबाबत आपण सखोलपणे चौकशी करावी. या संघटित गुन्हेगारी टोळ्या आपल्या स्वार्थासाठी, आपल्या धेय्यासाठी गुन्हे करतात. सर्वसामान्य मुस्लिमांना बदनाम करुन तशा प्रकारचे काम काही ठराविक मुस्लिम संघटना करीत आहेत. त्याचा छडा लावून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, भिवंडीमध्ये जो प्रकार झाला त्यासंदर्भात या सदनामध्ये नियम 97 अंतर्गत गंभीर चर्चा सुरु आहे. भिवंडीमध्ये जो काही प्रकार घडला तो अत्यंत दुर्दैवी आहे. त्या ठिकाणी पोलीस अधिकाऱ्यांसह इतर पोलीस जखमी झाले. तीन लोक ठार झाले. काही तरुण जखमी झाले. एकूणच हा प्रकार चिंताजनक आहे, दुर्दैवी आहे असे या ठिकाणी सांगावेसे वाटते. समाजकंटकांना धर्म नसतो, जात नसते असे आपण वारंवार म्हणतो. पण वागताना आणि व्यवहारामध्ये मात्र आपण त्या त्या गुंडांना, त्या त्या समाजकंटकांना धर्माचे नाव चिकटवून धार्मिक व्देष निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो, हे आपले फार मोठे दुर्भाग्य आहे. तसे पाहिले तर त्या ठिकाणी जो प्रकार झाला त्याला जातीय दंगता म्हणता येणार नाही. पोलीस आणि एका समुदायामध्ये झालेला हा संघर्ष आहे. तुम्ही त्याला दंगल म्हणा, रायट म्हणा परंतु ती जातीय दंगल नाही. हा संघर्ष आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

ही सांप्रदायिक दंगल नाही, जातीय दंगल नाही आणि सजातीय दंगलही नाही. माननीय सदस्य डॉ.अझीज यांनी सांगितल्याप्रमाणे वक्फ बोर्डाने पोलीस स्टेशन बांधण्यासाठी विशिष्ट जागेची परवानगी दिली असताना केवळ कब्रस्तानच्या एका छोट्याशा जागेवरुन वाद निर्माण झाला आणि तो प्रतिष्ठेचा प्रश्न केला गेला. अशा वेळी ज्यांनी शहाणपण दाखवायला पाहिजे त्यांनी ते न दाखवता अतिरेकाचा वापर केला आणि त्यामुळे अशा प्रकारचा दुर्दैवी प्रसंग निर्माण झाला. महाभारतातील दुर्योधनाने आणि कौरवांनी वनवासातून आलेल्या पांडवांना "तुम्हाला सुईच्या टोकावर मावेल इतकीही जागा मिळणार नाही" असे सांगितले आणि त्यामुळे महाभारत घडले. याठिकाणी कब्रस्तानच्या जागेवरुन महाभारत घडले. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी पोलिसांनी थोडासा शहाणपणा दाखविला असता तर बरे झाले असते. Mob of many heads but no mind. अल्पसंख्यांक समुदायाबद्दल वॉरफेर निती दाखविली जाते. मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या विरोधात मुंबईच्या आझाद मैदानावर मुंबईतील डॉक्टरांनी मोर्चा काढला आणि तो मोर्चा सरळ राजभवनावर गेला. तो मोर्चा पांगविण्यासाठी आमच्या पोलिसांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तेव्हा त्यावेळी पोलिसांच्या विरोधात आगपाखड करणारी मंडळी आपणच होता. युतीचे शासन असताना रमाबाई आंबेडकर नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाली त्यावेळी त्याच्या निषेधार्थ जेव्हा आंदोलन झाले त्यावेळी बेछूटपणे गोळीबार करुन 11 भीमसैनिकांचे, 11 निरपराध दलितांचे मुडदे पाडणा-या पोलिसांचे समर्थन करण्यात आले. अशी किती तरी उदाहरणे याठिकाणी सांगता येतील. तेव्हा सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. काल समोरच्या मंडळींकडे सत्ता होती त्यावेळी त्यांच्या पुढे शहाणपण चालत नव्हते. आता ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांच्या पुढे शहाणपण चालत नाही. सत्ता आणि शहाणपण यांचा काही संबंध नाही. पण जेव्हा शहाणे लोक सत्तेवर येतात तेव्हा निश्चितपणे गुणात्मक फरक पडत असतो आणि तो फरक आज दिसत आहे.

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 19:15

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

आणि म्हणून सभापती महोदय, या सर्व प्रकरणामधून एक दिसते, दलितांची आंदोलने असोत, त्यांच्यावर ठपके लावले जातात. अल्पसंख्याकांच्या अधिकाराचा प्रश्न असेल मग पाकिस्तानी, लादेन, अमुक तमूक अशा प्रकारचे आरोप करुन देशातील अल्पसंख्याक समुदायाचे, कधी तुष्टीकरणाच्या नावाखाली, कधी आणखी कोणत्या नावाखाली, देशद्रोहाच्या नावाखाली अशा प्रकारचे बिनबुडाचे आरोप करुन या देशातील अल्पसंख्यांक समाजाच्या राष्ट्रभक्तीवर प्रश्नचिन्ह उभे कले जाते. सभापती महोदय, देशभक्तीचा ठेका काही विशिष्ट जातीच्या लोकांनी घेतला आहे. उलट आमच्या देशामध्ये राष्ट्रद्रोह्याचे आज देखील गुन्हे ज्यांनी केले त्यामध्ये बहुसंख्य समाजाची संख्या जास्त आहे. सभापती महोदय, हिटलरचा आदर्श जे लोक सांगतात त्यांनी बाकीचे बोलायची गरज नाही. म्हणून या भिवंडीच्या प्रकरणामध्ये जी बाब घडली त्यामध्ये शासनाने आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. आमच्या पोलीस खात्याचे गुप्तहेर खाते काय करीत होते? एकाएकी हे घडलेले नाही. अनेक दिवसाचा साचत आलेला असंतोष आहे, त्या असंतोषाची परिणती या भयंकर दुर्दैवी प्रकारामध्ये झाली. तेव्हा आम्ही कुठे कमी पडलो, आमची यंत्रणा कुठे कमी पडली. अर्थात जे आरोपी आहेत, गुन्हेगार आहेत त्यांना कोणत्याही प्रकारची माफी देण्याचे, सवलत देण्याची गरज नाही, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. हा सर्व उपद्रव घडविण्यासाठी ज्या व्यक्ती कारणीभूत ठरल्या, जी परिस्थिती कारणीभूत ठरली त्याची चौकशी होऊन न्यायनिवाडा होणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, भिवंडीमध्ये जो प्रकार घडला त्याचे निमित्त करुन या देशातील किंवा आपल्या राज्यातील सर्वच अल्पसंख्याक समुदायाना आरोपीच्या, अपराध्याच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा जो प्रयत्न केला जातो ही बाब निश्चितच उचित नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री सरपोतदार, नितीन गडकरी तेच म्हणाले. या माध्यमातून वागण्यातून आणि बोलण्यातून हळूहळू अशा पध्दतीने डेव्हलप केले जाते की, संपूर्ण समाज हा देश विघातक आहे. देश विघातक कार्यात गुंतलेला आहे. नांदेडमध्ये इरिगेशन कॉलनीमध्ये आरडीएक्स सापडले त्याची चर्चा होत नाही. ते प्रकरण दडपले जाते. जे नोन आतंकवादी आहेत, पाकिस्तानातून आलेले आतंकवादी आहेत, देश मोहब्बत किंवा आणखी कोणती संघटना असेल त्यांचा नायनाट करण्यासाठी आमचे भारत सरकार सक्षम आहे. ते सक्षम होते म्हणूनच संघ कार्यालयावर नागपूर येथे हल्ला करण्यासाठी अतिरेकी आले तेव्हा आमच्या पोलीस खात्याने बहादुरी दाखविली आणि

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

त्यांना नेस्तनाबूत केले. या संदर्भात नांदेडच्या इरिगेशन कॉलनीमध्ये जो आरडीएक्स, शस्त्रसाठा, बॉम्ब सापडले त्याची देखील चौकशी करण्याचे काम शासनाचे आहे. आपला तो बाळया आणि दुसऱ्याचा तो कार्टा ही प्रवृत्ती आता थांबली पाहिजे. दूध का दूध और पानी का पानी झाले पाहिजे. भिवंडीमध्ये संघर्ष झाला त्या संदर्भात..........

(नंतर श्री.जुन्नरे......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ......

माझी मागणी आहे की, शासनाने यासंदर्भात शक्य असेल तर निश्चित चौकशी करावी व यामध्ये जे कोणी उपद्रव करणारे असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. शासनाने या ठिकाणच्या दंगेखोरांविरुद्ध कडक कारवाई केली तर भविष्यात अशा प्रकारचे साहस करण्याचा कोणीही प्रयत्न करणार नाही. जरब बसेल अशा प्रकारची कारवाई शासनाने करावी. भिवंडीतच नाही तर इतर कोठेही अशी घटना घडणार नाही, हिंमत करणार नाही याची दक्षता घ्यावी एवढी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, काल भिवंडीत जी घटना घडली ती तेथील पोलीस चौकीच्या जागेवरुन घडलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे या पोलीस चौकीला माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांनी त्यांच्या आमदार फंडातून काही निधी दिलेला आहे. ज्यावेळेस आमदार फंडातून जी काही कामे होत असतात तेव्हा त्या कामांना सुरुवात करण्यापूर्वी सर्व एनओसी उपलब्ध करुन द्याव्या लागत असतात. त्यामुळे सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यानंतरच या पोलीस चौकीचे काम सुरु झाले होते. दोन महिन्या पूर्वी या पोलीस चौकीचे उद्‌घाटन माननीय डावखरे साहेबांनी केले होते. या ठिकाणच्या पोलीस चौकीच्या जागेला विरोध हा कब्रस्तानसाठी नव्हता तर त्या ठिकाणी जी मस्जीद आहे त्या मस्जीदच्या जवळ पोलीस चौकी झाली तर आपल्याला चूकीच्या कामासाठी प्रार्थनास्थळाचा वापर करता येणार नाही अशी काही लोकांची त्या पाठीमागची भावना होती त्यामुळेच या ठिकाणच्या पोलीस चौकीला विरोध होता. परंतु अशा प्रकारच्या भावनेला जे लोक सहानुभूती देतात तेच खरे दोषी असतात असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. ज्यावेळेस अन्याय होतो तेव्हा मोर्चे हे पोलीस स्टेशन किंवा कमिशनर ऑफिसवर काढले जातात परंतु या ठिकाणी पोलीस स्टेशन किंवा कमिशनर ऑफिसवर जमाव गेला नाही तर विवादीत पोलीस चौकीच्या जागेवर गेला व त्या ठिकाणी तोडफोड करुन पोलिसांवर हल्ला करण्यात आला. त्यामुळे हा जमाव विवादीत जागेवर का गेला याचेही उत्तर मिळण्याची आवश्यकता आहे. या जमावाने त्या ठिकाणच्या पोलिसांवर अगोदर हल्ला केला. या दंगलीची दाहकता एवढी होती की, त्यांनी रस्त्यावरील बसेस जाळल्या नाहीत,डेपोतील बसेस जाळल्या नाहीत तर बस डेपोमधील बसेस पुलावर आणून त्या जाळण्यात आल्या. त्यामुळे या दंगलखोरांची हिमत कोठपर्यंत गेली होती ते आपल्याला समजून येईल.

डॉ. एम.ए.अझिझ : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी बसेस एस.टी. डेपोतून आणून जाळण्यात आल्या असे नव्हे तर पुलावर ज्या खाजगी लक्झरी बसेस उभ्या होत्या त्या जाळण्यात आल्या. मस्जिदजवळ पोलीस चौकी येते म्हणून विरोध नव्हता कारण पोलीस चौकी आणि मस्जिद यामधील अंतर 50 फूट आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, भिवंडी फ्लॉय-ओव्हरवर बसडेपोतून बसेस आणून जाळण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी डीसीपीवर हल्ला झालेला आहे, पोलिसांवर हल्ला झालेला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे......

आहे. दंगल झाल्यानंतर सरकारतर्फे श्री. बाबा सिद्दीकी, राज्यमंत्री हे त्या ठिकाणी गेले आणि त्यांनी मृत पावलेल्या व्यक्तींना 1 लक्ष रुपये तसेच जखमी झालेल्या व्यक्तींना 50 हजार रुपये देण्याचे जाहीर केले. ज्या मुस्लीम भागात अशी घटना घडते त्या प्रत्येक वेळेस त्या ठिकाणी मुस्लीम मंत्रीच गेला पाहिजे असे काही बंधन आहे काय? श्री. बाबा सिद्दीकी यांचा त्या ठिकाणी जाण्याचा काही सुध्दा संबंध नव्हता. श्री. बाबा सिद्दीकी हे त्या जिल्हयाचे अथवा त्या ठिकाणचे पालकमंत्री सुध्दा नाहीत. खरे म्हणजे या ठिकाणी गृहमंत्र्यानी जाणे आवश्यक होते. परंतु ही जी पध्दत या शासनाने सुरु केलेली आहे ती घातक आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. श्री. बाबा सिद्दीकी यांचा या खात्याशी दुरान्वयाने सुध्दा संबंध येत नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..........

ते त्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत का ? त्यांना त्याठिकाणी का पाठविण्यात आले? त्याठिकाणी दोन कॉन्स्टेबल मृत झाले, डी.सी.पी.चे दात पाडले. ही वाईट गोष्ट आहे. सभापती महोदय, जैन प्रकरणी आमच्या पक्षाचा मोर्चा निघण्याच्या अगोदरच आमच्यावर लाठीमार करण्यात आला. परंतु भिवंडी येथे आरामात मोर्चा निघाला होता. सरकार अशी दुटप्पी भूमिका का घेत आहे ? भिवंडी येथील घटनेमध्ये पोलिसांचा कोथळा बाहेर काढण्यात आला, डी.सी.पीं.चे दात तोडण्यात आले. चित्रकार श्री. एम.एफ.हुसैन यांनी हिंदू देवदेवतांची विटंबना करणारी चित्रे काढल्याबद्दल आम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास गेलो. तेव्हा तेथे असलेला एक सिनियर इन्स्पेक्टर मला म्हणाला की,"तावडे साहेब मला कशाला अडचणीत आणता ? तुम्ही दुसरीकडे तक्रार नोंदवा. आम्ही निदर्शने केल्यानंतर आमची तक्रार नोंदविण्यात आली. परंतु आजतागायत श्री.एम.एफ.हुसैन यांना अटक करण्यात आलेली नाही. ते मुंबईत आले नाहीत असेही नाही. त्यांनी मुंबईत येऊन एका मासिकाला मुलाखत सुध्दा दिलेली आहे. तरी सुध्दा त्यांना अटक झालेली नाही. तसेच कोणत्या तरी देशात एका कार्टुनिस्टने महंमद पैंगबरांचे कार्टून काढले म्हणून मुस्लिम समाजाच्या लोकांनी येथे मुंबईत आझाद मैदानाजवळ मोर्चा काढला आणि टाईम्स ऑफ इंडियांच्या कार्यालयावर हल्ला करुन कार्यालयाची मोडतोड केली. गाड्यांची जाळपोळ केली. या प्रकरणी सरकारने किती लोकांवर केसेस दाखल केल्या ? याप्रकरणी कोणालाही अटक झाली नाही. या घटनेबाबत चित्रपटक्षेत्रातील जे तथाकथित लोक, जे स्वत:ला सेक्युलर म्हणवितात त्यांचेकडून कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. "दा विंची कोड" या विदेशी इंग्रजी चित्रपटावर बंदी घालण्यात आली. पण त्याही बाबतीत त्यांचेकडून कोणतेही भाष्य करण्यात आले नाही.

सभापती महोदय, या सभागृहात लोकमान्य टिळक यांचे तैलचित्र लावलेले आहे. सन 1896 मध्ये त्यांनी "दंगली" वर एक अग्रलेख लिहिला होता. त्या अग्रलेखात त्यांनी म्हटले होते की, "दोन समाजातील दंगलीमध्ये दोन बाजू असतात आणि सरकार नावाची तिसरी बाजू असते. सरकारची इच्छा शक्ती काय आहे ? त्या सरकारच्या इच्छा शक्तीवर दंगली विषयीची भूमिका ठरलेली असते."

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..........

सभापती महोदय, सन 1992 मध्ये नागपूरला दंगल झाली. त्या दंगलीमध्ये पोलीस महासंचालक श्री.इनामदार हे थोडक्यात वाचले. तेथील दंगल आटोक्यात आणण्यासाठी तत्कालीन सरकारने त्यांना फ्री हॅन्ड दिला तेव्हा त्यांनी अर्ध्या तासामध्ये दंगल आटोक्यात आणली. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, सरकार मालेगाव, भिवंडी यासारख्या संवेदनशील भागामध्ये पोलिसांना अशाप्रकारचे फ्री-हॅन्ड का देत नाही ?

सभापती महोदय, मुंबईत पाणी पुरवठा कपात होण्याचे कारण भिवंडी येथे पॉवरलूमसाठी आकडे टाकून वीज चोरी होत असल्यामुळे पांजरपोळ येथे लोडशेडींग होते असे महानगरपालिका प्रशासनाने दिले आहे. तेव्हा भिवंडी येथील वीज चोरी करणाऱ्यांना अटक करण्याची हिम्मत सरकार का दाखवित नाही ? ही मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. भिवंडी येथे झालेल्या पोलिसांच्या हत्येतून सरकार शहाणे होणार आहे की नाही ? त्याठिकाणी डी.सी.पी.चे दात तोडण्यात आले. डी.सी.पी. हा शासनाचा अधिकारी आहे. तो शासनाचे प्रतिनिधीत्व करतो. त्या डी.सी.पी.चे दात पाडले नसून आबासाहेब तुमचे दात पाडलेले आहेत. शासनाचे दात पाडलेले आहेत या भूमिकेतून कारवाई होणे महत्वाचे आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 19:30

श्री.विनोद तावडे...

माननीय गृहमंत्री, आपण आपले शारीरिक वजन कमी करीत आहात, त्याचे अनुकरण आम्हीही केले पाहिजे. मी तर केलेच पाहिजे. परंतु आपल्या खात्यावरील आपले वजन कमी होत चालले आहे. मुंबईतील दोन डी.सी.पीं.च्या आपण बदल्या केल्या, परंतु महिना झाला तरी ते आपली जागा सोडत नाहीत. अनेक पेपरांमध्ये हे छापून आललेले आहे. ते कमिशनरच्या गाडयामधून फिरत होते. त्यांना वरुन सपोर्ट असल्याचा संशय निर्माण होतो, त्यामुळे हे होऊ नये, या ढिलाईबाबत व या सर्व गोष्टींच्या बाबतीत आपण ठोस अशा प्रकारची कृती, कारवाईचे दर्शन येत्या 48 तासांमध्ये दाखवावे. आज आपल्या पोलीस अधिकाऱ्यांचे दात पडले आहेत, माननीय गृहमंत्र्यांचे दात पडले आहेत, त्यामुळे याबाबतीत आपण कठोर कारवाई करावी व एकप्रकारे महाराष्ट्रामध्ये संदेश द्यावा. तसेच, महाराष्ट्रामध्ये जी अनागोंदी चालली आहे, ती आपण थांबवावी, ही विनंती. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

------

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना एक वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे आहे त्यांनी ते करावे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आमदारांचा संबंध अतिरेक्यांशी जोडण्याचा केलेला प्रयत्न यासंबंधी श्रीमती फौजिया खान यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, जे या सभागृहाचे जेष्ठ व आदरणीय सदस्य आहेत. त्यांच्याबद्दल मला खूप आदर आहे. त्यांनी दिनांक 4.7.2006 रोजी औचित्याच्या मुद्दांद्वारे असा मुद्दा उपस्थित केला की, महाराष्ट्रापुढे दहशतवाद्यांचे आव्हान अशा दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रातील आलेल्या बातमीचा संदर्भ देऊन अतिरेकी स्फोटके बाळगून आमदार निवासात येऊन गेले होते, याची पोलीस सावधानतेने तपासणी करीत आहेत. विधान परिषद सदस्या श्रीमती फौजिया खान, दुसरे विधान परिषद सदस्य श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी आणि तिसरे विधान सभा सदस्य श्री.रशिद शेख या तिघांच्या खोलीत ते अतिरेकी गेले होते का ? याचा तपास पोलीस करीत आहेत, असा सभागृहात आरोप करुन दहशतवाद्यांना आमदारांचे साहाय्य मिळत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे, याबाबतीत कोणताच खुलासा करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, मुळात, माझ्यावर आरोप करताना मला नियम 35 अन्वये पूर्व सूचना देणे आवश्यक होते. आपणही यासंदर्भात सभागृहात तसा उल्लेख केलेला आहे. याप्रकरणी मी खालीलप्रमाणे वैयक्तिक स्पष्टीकरणे करीत आहे.

महोदय, आमदार निवासातील अतिरेक्यांचा माझा निवासाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न अत्यंत-अत्यंत दु:खदायक असून, हे निराधार आरोप माझ्यावर करण्यात आलेले आहेत. देशद्रोही कोणत्याही पातळीवरील असला तरीही कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तीकडून वा या मातीशी नाते सांगणारा प्रत्येक व्यक्ती त्याचा निषेधच करील. आमचे कुटुंब हे देशभक्ती आणि चारित्र्याचे एक उत्तम उदाहरण असून समाज त्याचा दाखला देतो. मी अशा देशभक्तीपर कुटुंबात जन्म घेतलेला आहे. मी ज्या कुटुंबातून आले आहे ते कुटुंब सुसंस्कृत, सभ्य, उच्चशिक्षित आणि देशभक्त आहे.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान....

त्याशिवाय मागच्या पाच वर्षापासून मी सभागृहात वेळोवेळी सर्वसामान्य व्यक्तीच्या विरुध्द होणारा अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार व दहशतवाद्यांविरुध्द निर्भयपणे व पोटतिडकीने आवाज उठविला आहे. मी व माझ्या पक्षाची यासंदर्भातील भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. ज्या पध्दतीने माझे बॅकराऊंड न बघता माझे अतिरेक्यांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न जाणूनबूजून केला जातो ही बाब निषेधार्य असून मला व्यक्तीशः अत्यंत वेदना देणारी आहे. It is my character assassination of the lowest possible degree.

ज्यादिवशी तथाकथित अतिरेकी आमदार निवासात थांबल्याचे सांगितले जात आहे, त्यादिवशी मी परभणी येथे होते. आकाशवाणी आमदार निवासात माझ्या नावावर 2 सदनिका असून एका सदनिकेत माझा स्वीय सहायक श्री.शंकर निकम व अभ्यागत थांबत असतात. स्वीय सहायकाच्या सदनिकेत माझ्या संपर्क कार्यालयातून पत्र घेतल्याशिवाय कोणीही जाऊ शकत नाही आणि...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.........

सदनिकेत राहणा-या सर्व व्यक्तींचे रेकॉर्ड माझ्या स्वीय सहाय्यकाकडे असते. हे रेकॉर्ड जरी काळजीपूर्वक बघितले तरी त्या दिवशी माझ्या सदनिकेत कोणीही संशयास्पद इसम आला नव्हता हे सिध्द होते. इत:परही माझा अतिरेक्यांशी संबंध जोडण्याचा जो घृणास्पद प्रकार झाला आहे त्याचा मी तीव्र निषेध करीत आहे. माझा अतिरेक्यांशी दुरान्वयानेही संबंध नाही असा खुलासा मी सादर करीत आहे. ठोस पुराव्याशिवाय असे सभागृहात सांगणे चुकीचे आहे. कदाचित मी मुस्लिम असल्यानेच हे षडयंत्र माझ्याविरुध्द रचले किंवा कसे असेच मला वाटते. अत: अतिरेक्यांशी माझ्या आमदार निवासातील निवासाचा कोणताही संबंध नसून माझा हया संपूर्ण बाबीशी काही संबंध नाही हे मी स्पष्ट करु इच्छिते. हे स्पष्टिकरण करण्याची परवानगी आपण मला दिली याबद्दल आपले व या सभागृहाचे मी आभार मानते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या, श्रीमती फौजिया खान यांनी जे निवेदन केले आहे ते जर माझ्या सभागृहातील वक्तव्याचे रेकॉर्ड पाहून केले असते तर त्यांच्यावर अशा प्रकारे खुलासा करण्याची पाळी आली नसती. अधिवेशनपूर्वी 15/20 दिवस अगोदर या सभागृहातील माझ्या सहका-यांबद्दल वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. या सदनातील सदस्यांबद्दल अशा प्रकारची बातमी येते आणि त्यांच्या निवासस्थानी अतिरेकी थांबले अशा प्रकारचा पोलिसांकडून माहिती घेतल्याचा उल्लेख बातमीत होतो त्यावेळी मी असे म्हटले की, असे संबंध असतील तर ती बाब गंभीर आहे. अतिरेक्यांशी संबंध असलेले आमदार या सदनामध्ये बसणे योग्य नाही. अशा प्रकारे आमदारांचा संबंध नसेल, ते निष्पाप असतील तर तेही जाहीर झाले पाहिजे आणि त्यांच्यावरील ठपका गेला पाहिजे. सन्माननीय सदस्य, प्रा.कवाडेसाहेबांनी, सन्माननीय सदस्या, श्रीमती फौजिया खान या खुलासा करीत असतांना 'शेम-शेम' अशी घोषणा दिली. त्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी हे सर्व बघितले असते तर बरे झाले असते. ज्यावेळी ही बातमी आली त्याचवेळी संबंधित वर्तमानपत्राकडे खुलासा करुन आमदारांसंबंधीची भूमिका स्पष्ट करावयास हवी होती. मी तुमच्याबद्दल कटकारस्थान केले, आरोप केले अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. परंतु, आम्हाला काय करायचे आहे ? महाराष्ट्रामध्ये एवढे षडयंत्र रचले जात आहे, सन 1992 च्या बॉम्बस्फोटामध्ये नव्हते एवढया मोठया प्रमाणावर आरडीएक्स देशात आले

..2.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

अशा प्रकारचे चित्र आम्ही बघतो आहोत. या सभागृहातील दोन सहका-यांबद्दल छापून येत असेल तर त्यांना निष्कलंक करणे हे जर षडयंत्र असेल तर तुमच्या भल्याकरिता मी ते केले आहे, असे आपण समजावे. माझे सभागृहातील भाष्य बघितले असते तर तुमच्या लक्षात आले असते की, तो तुमच्याबद्दल आरोप नव्हता, कारस्थान नव्हते, केवळ यासंदर्भातील खुलासा व्हावा, अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्त केली होती. यामुळे जर आपल्या भावना दुखावल्या गेल्या असतील, दुःख झाले असेल तर त्याचा माझ्याशी संबंध नाही तर वर्तमानपत्रातील त्या बातमीशी आहे. आपल्या निवासस्थानी अतिरेकी थांबले असावेत, अशा प्रकारची बातमी पोलिसांच्या माध्यमातून संबंधित वृत्तपत्राने दिली आहे. यासंबंधीचा शोध घेण्याचे काम माझे नाही, तो शोध गृह विभाग घेईल. आपल्या भावना दुखावण्याची किंवा आपल्याला अतिरेकी ठरविण्याची भूमिका माझी त्यावेळी नव्हती आणि आजही नाही आणि संबंध असले तर मी थांबणारही नाही. तुमच्या बाबतीत तुम्ही खुलासा करणे योग्य आहे, एवढेच मी म्हणेन. धन्यवाद.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी वर्तमानपत्रात बातमी आली असल्याचे जे सांगितले ते खरे आहे. त्यानंतर गुप्तचर विभागाने चौकशी केल्यानंतर जो अहवाल दिला होता तोही मी वर्तमानपत्रामार्फत सांगितला आहे.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ......... 19:40

श्री.आर.आर.पाटील ............

सभापती महोदय, त्या ड्रायव्हरने औरंगाबादमध्ये असे सांगितले की, मी गाडी घेऊन आमदार निवास जवळ गेलो होतो. तो ड्रायव्हर पोलिसांना शरण आला होता. त्याने पोलिसांना सांगितले की, ही गाडी मी चालवित होतो. पोलिसांचे लक्ष विचलीत करण्यासाठी किंवा तपासाची दिशा बदलावी म्हणून अनेक वेळा असे घडते. हे अतिरेक्यांचे कटकारस्थान असू शकते. तो कोणत्या खोलीमध्ये गेला होता हे अजून सिद्ध झालेले नाही. जी नावे वर्तमानपत्रामध्ये आली होती, त्याची आम्ही चौकशी केली. ज्या लोकांचा काडी मात्र संबंध नव्हता अशा लोकांची नावे वर्तमानपत्रामध्ये आली, ही खेदजनक गोष्ट आहे. पहिली बातमी आल्यानंतर मी यासंदर्भात खुलासा केला होता. आपण पहिली बातमी लक्षात ठेवली कारण ती बातमी सोईस्कर होती. अनेक चॅनलवर हा खुलासा दाखविण्यात आला होता. अनेक वर्तमानपत्रांमध्ये यासंदर्भात बातम्या आल्या होत्या. आपल्याला सोईस्कर तेवढी बातमी आपण लक्षात ठेवली. परंतु शासनामार्फत जे सांगितले गेले ते मात्र आपण सांगितले नाही, यावरुन आपला हेतू स्पष्ट होतो. एखाद्याच्या संपूर्ण आयुष्यावर घाला घातला जात असेल, देशभक्तीबद्दल साशंकता निर्माण केली जात असेल, तर असे आरोप करतांना आपल्या हातामध्ये पुरावे पाहिजेत, अधिकृत माहिती पाहिजे. देशद्रोहाचे आरोप करीत असतांना वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीवर झालेला खुलासा विचारात न घेता बोलणे बरोबर नाही. सभापती महोदय, आपण सभागृहामध्ये सदस्यांना याबाबत निदेश दिले पाहिजेत. प्रसार माध्यमांना मी याबाबतची माहिती दिली होती.

( काही सन्माननीय सदस्य एकच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी कोणालाही बोलण्यास परवानगी देत नाही. श्रीमती फौजिया खान यांच्या नावाचा उल्लेख औचित्याच्या मुद्याद्वारे 4 जुलै रोजी सभागृहात झाला होता. नियम 35 प्रमाणे ज्या व्यक्तीचा, ज्या सदस्याचा अशा प्रकारे सदनामध्ये उल्लेख केला जातो त्याला नोटीस देणे आवश्यक असते. त्या दिवशी मी असे सांगितले होते की, अशी नोटीस त्यांना दिलेली नसल्यामुळे मी त्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्याची संधी देईन. त्याप्रमाणे श्रीमती फौजिया खान यांनी वैयक्तिक स्पष्टीकरण केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी यासंदर्भात आपले विचार मांडले. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी देखील आपले विचार मांडले. यापुढे या विषयावर कोणतीही चर्चा होणार नाही.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ......... 19:40

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आमदार निवासामध्ये अतिरेकी ........

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे आपण खाली बसावे. मी तुम्हाला बोलण्यास परवानगी दिलेली नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी चर्चेवर बोलण्यास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3/-

**पृ.शी.**: भिवंडी येथे पोलिसांनी केलेला गोळीबार.

**मु.शी.**: भिवंडी येथे पोलिसांनी केलेला गोळीबार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, अरविंद सावंत, विलास अवचट, डॉ. निलम गो-हे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, डॉ. दिपक सावंत, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अप्लकालीन चर्चा.

( चर्चा पुढे सुरु ..........

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, जेव्हा सारी मुंबई पावसात भिजली, महाराष्ट्र पुरामध्ये लोटला होता तेव्हा 25 वर्षे अशांत असलेल्या भिवंडीमध्ये मात्र रक्ताच्या धारा निघत होत्या. मुंबईमध्ये दुपारी पुन्हा पाऊस सुरु झाला होता, लोक पाण्यामध्ये अडकतील याची आम्ही चिंता करीत असतांना एक बातमी आली की, भिवंडीमध्ये रक्ताच्या धारा वाहू लागल्या आहेत. डॉ.एम.ए.अझिज यांचे मी मनापासून कौतुक करतो, स्वागत करतो. परंतु दुर्दैव असे आहे की, तुमच्या विचारांचे समर्थन करणारी माणसे तुमच्यात नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे .......

KBS/ MHM/ SBT/ श्री. बोरले नंतर --- 19:45

श्री.अरविंद सावंत ....

मी आपल्याला सांगू इच्छितो की, डॉ.अझिज साहेब आपण मघाशी बोलताना सांगितले की, याची सुरूवात अजान मधून झाली. पण अजान ही मशिदीमध्ये पुकारली जाते. पोलीस ठाण्यामध्ये नाही, तेथे मोर्चा नेऊन ती होत नाही. .... आपण मघाशी सांगितले की, अजान पुकारणाऱ्याच्या हातावर पोलिसांनी दांडा मारला आणि त्याचे वळ मी स्वत: पाहिले आहेत. म्हणूनच मी बोललो. सभापती महोदय, ज्या जमिनीच्या संदर्भात हे सारे घडले आहे तेथे पोलीस चौकी बांधण्याचे काम अगोदरच सुरू होते. आपण त्याबद्दल म्हटले की, त्यासाठी मी वक्फ बोर्डाची परवानगी दिली. पण मी आपल्याला विचारू इच्छितो की, त्यासाठी परवानगी देणारे तुम्ही कोण ? ही जमीन कोणाची आहे? मी आपल्याला सांगू इच्छितो की, 1960 सालापासून ही जमीन शासनाची आहे आणि ती पोलिसांच्या ताब्यात होती. तसेच या ठिकाणी पूर्वी पोलीस कार्यालय व कॅम्प कार्यालय अस्तित्वात होते. यासंबंधात नेमकी परिस्थिती काय होती हे मी आपल्याला वृत्तपत्रात आलेल्या बातमीतून वाचूनच दाखवितो. त्यात म्हटले आहे की, "दंगलीस कारणीभूत ठरलेली जागा शासकीय असून पोलिसांच्याच ताब्यात होती. तसेच या ठिकाणी पूर्व पोलीस कार्यालय व कॅम्प ऑफिस अस्तित्वात होते. या जागेवर 1960 पासून पोलीस अधिकाऱ्यांची निवासस्थाने होती. म्हणून तेथे शासनाच्या परवानगीनुसार दोन पोलीस ठाणी आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयाच्या बांधकामास सुरूवात झाली आहे." सभापती महोदय, मी सांगत असलेली माहिती जर असत्य असेल तर तसे सन्माननीय सदस्यांनी आणि मंत्री महोदयांनी देखील सांगावे. तेथे त्या जागेवर 50 फूट जागा सोडून बांधकाम करण्यास वक्फ बोर्डाने परवानगी दिली होती असे जे सन्माननीय सदस्य डॉ.अझिज यांनी सांगितले आहे त्यासंबंधात मी ही माहिती दिली आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी पुढे जाऊन सांगितले की, जेव्हा जेव्हा अशा प्रकारे पोलीस चौकी बांधण्याचा प्रयत्न होतो, खस करून अशा वसाहतींमध्ये, तेव्हा तेव्हा त्याला विरोध होतो. त्यांनी याबाबतीत निर्मल नगर येथील अनुभव सांगितला तसेच आणखीही दोन तीन अनुभव सांगितले. इतकेच काय पण सन्माननीय सदस्य श्रीमती गोऱ्हे यांनी कराड येथील, सातारा येथील उदाहरण या संदर्भात सांगितले आहे. तेथेही पोलीस चौकी बांधण्यास विरोध कसा होत होता तेही त्यांनी सांगितले. तेव्हा आपण त्याचाही विचार करा, तेही चित्र समोर आणा. सभापती महोदय, आमचे मित्र बोलता बोलता असेही आमच्याबद्दल म्हणाले की, आम्हाला कोठल्याही समाजाबद्दल,

...... 4एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धर्माबद्दल प्रेम नाही. मला कोणत्याही धर्माबद्दल वा समाजाबद्दल येथे बोलावयाचे नाही. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमचा पक्ष जातपात न मानणारा आहे, धर्म-पंथ न मानणारा आहे. केवळ राष्ट्रधर्म मानणारा आमचा पक्ष आहे आणि त्याचे नाव आहे 'शिवसेना'. देशावर आक्रमण झाले तर आक्रमण करणाऱ्यांवर आक्रमण करणारा आमचा पक्ष आहे. देशद्रोह्यांवर आक्रमण करणारा, त्यांना विरोध करणारा आमचा पक्ष आहे. पण असे असतानाही आमच्या पक्षाबद्दल सारखे जातीयवादी विष पसरविणारे विचार आपल्या मनात कसे येतात याचेच मला आश्चर्य वाटते. आमच्या मित्रांनी, सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांनी आमच्यावर आरोप करताना म्हटले होते की, एका विशिष्ट समाजाबद्दल आम्ही नेहमी बोलतो ...

( सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे काही बोलू इच्छितात ... )

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांना मी सांगू इच्छितो की, कृपा करून आपण खाली बसावे. मी रेकॉर्ड पाहून घेतो आणि जे अनावश्यक असेल, अयोग्य असेल ते रेकॉर्ड वरून काढून टाकीन.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, खरे तर सन्माननीय प्रा.जोगेंद्र कवाडे यांचेबद्दल मी अत्यंत आदर राखूनच बोलतो. मला त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे. मी त्यांच्याशी खाजगीमध्ये देखील असेच बोलतो. आपण एका विशिष्ट वर्गाबद्दल सातत्याने मांडत राहता, हे बोलण्यासाठी ठीक आहे. पण आम्ही त्याही पलिकडे जाऊन, देशाबद्दल बोलतो. आपल्याला मी एवढेच सांगतो की, मालेगाव येथे श्री.निहाल अहमद यांनी लादेनचा फोटो काढून मोर्चा काढला होता. म्हणूनच त्या मोर्चामध्ये आणि आपण, डॉ. अझिज यांच्या काल निघालेल्या मार्चाची तुलना होऊ शकत नाही. डॉ.अझिज यांचा मोर्चा निघाला त्यावर दंडुके मारले गेले त्यामध्ये ही फरक आहे. म्हणून या ठिकाणी मी सांगेन की, अल्पसंख्यांक समाजाबद्दल आमचे एवढेच म्हणणे आहे की, ते कोठलेही बाहेरचे नाहीत पण कोठे तरी अमेरिकेमध्ये तुमच्या धर्माबद्दल, तुमच्या पवित्र गोष्टीबद्दल काही तरी छापून येते म्हणून तुम्ही ज्या प्रकारे संतापून मोठ्या संख्येने एकत्र जमता, आंदोलन करता. तीच माणसे अशा घटनांबद्दल एकत्र जमली तर आम्ही त्यांना आमच्या छातीला लावू. ...

( यानंतर श्री. सरफरे .....4टी 1 ...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

याचा आम्हाला सुध्दा अभिमान वाटेल. परंतु दुर्दैव असे की, ज्या वस्तीमध्ये हे प्रकार घडतात त्याठिकाणी लोक पुढे येण्यास भितात. नाशिकचे अनकाई डोंगर उघडे, बोडके आहे. त्याठिकाणी अतिरेकी सापडले, दारुगोळा सापडला. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीबद्दल आपल्याला पोलिसांचा गौरव वाटला कां? परंतु या ठिकाणी पोलिसांवर हल्ला करीपर्यंत दंगेखोरांची मजल गेली. पोलिसांनी बांधकाम सुरु केले म्हणून पोलिसांचे दात पाडले. त्यांनी पोलिसांचे दात पाडले नाही तर या सरकारची बत्तीशी पाडली. असे होत असतांना तुम्ही काय करता? तुम्ही त्या ठिकाणी हिंमत दाखवा. श्री. अबू आझमीने केलेल्या भाषणाच्या कॅसेट आपण ऐका. त्या ऐकण्यासाठी मी तुमच्यासोबत यायला तयार आहे. आणि मग त्यांची भूमिका बरोबर आहे की आमची भूमिका बरोबर आहे हे समोरा समोर होऊन जाऊ द्या. तेव्हा विरोध कशाला आहे ते आपल्याला कळले पाहिजे. पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी आपण कशाला विरोध करता? कशासाठी 50 फूट जागा सोडावयाची? त्याठिकाणी असलेल्या कब्रस्तानची जागा पुरेशी आहे असे पोलिसांचे म्हणणे आहे, नगरपालिकेचे म्हणणे आहे की, ही जागा पोलीस स्टेशनसाठी आरक्षित केली आहे. तेव्हा या दंगलीच्या मुळाशी आपण गेले पाहिजे आणि या सर्व प्रकरणाची आपण माहिती घेतली पाहिजे. यामागे अतिरेक्यांचा डाव आहे काय? होय. परंतु यामध्ये जे सर्वसामान्य मुस्लिम बांधव आहेत त्यांची फरफट होत असते, त्यांना दंगल नको आहे. अमरावती येथे महाले याचे स्मारक बांधण्यास विरोध झ ाला होता. तेव्हा मला शेवटी एवढेच म्हणावयाचे आहे की, या दंगलीच्या मुळाशी आपल्याला जावयाचे असेल तर आज या देशाची घटना आपण माना. आज आम्ही कुटुंब नियोजन पाळतो, तुम्ही पाळत नाही. इथून खरी विषमतेला सुरुवात होते. मशिदीचा होणारा विकास हे सुध्दा आपण लक्षात घ्या. या प्रश्नाच्या मुळाशी गेल्यानंतर आपल्याला राग कशासाठी येतो? माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब माझा आपल्याला प्रश्न आहे की, या राज्यातील जेवढी मंदिरे आहेत, मशिदी आहेत, चर्चेस आहेत त्यांचे रेकॉर्ड आपण जाहीर करा. आणि त्यानंतर ती मशिद केव्हापासून बांधली ते सांगा, त्यानंतर तिचा होणारा विकास सांगा. त्यांना वाढीव एफ.एस.आय. कुणी दिला?. करोडो रुपये खर्च करुन त्यांचे बांधकाम केले जाते. वाईट एका गोष्टीचे वाटते की, मशिदीच्या बांधकामासाठी आपल्याकडे पुरेसा पैसा आहे, परंतु उर्दू शाळेच्या बांधकामासाठी आपण तो पैसा खर्च करणार नाही. तो पैसा मुस्लिम समाजाच्या विकासासाठी खर्च केला जात नाही, तो पैसा मुस्लिमांच्या बेरोजगारीसाठी वापरला जात नाही. आज मदरशामध्ये वेगळया प्रकारची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

शिकवणूक कां दिली जात आहे? याचा आपण कुठेतरी खोलात जाऊन अभ्यास केला आहे काय? वाईट एका गोष्टीचे वाटते की, कुठेतरी एखादी दंगल उद्‌भवल्यानंतर आपण ताबडतोब मदत जाहीर करता. या दंगलीमध्ये दोन पोलीस मृत्युमुखी पडले आहेत. त्यांना एक लाख रुपयांची मदत करुन त्यांची बोळवण केली. त्याचबरोबर मृत दंगेखोरांच्या नातेवाईकांना देखील 1 लाख रुपयांची मदत दिली. अशाप्रकारे आपण दोघांना समान न्याय दिला. दंगे करणारे आणि पोलीस हे एकाच दर्जाचे समजता? त्या पोलिसांच्या कुटुंबातील एकाला आपण नोकरी देणार काय? मला वाईट कोणते वाटत असेल तर आपण या बांधकामाला स्थगिती दिली आहे. पोलीस स्टेशनच्या बांधकामाला स्थगिती दिल्यामुळे त्या पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होते ही सुध्दा अत्यंत दुःखद गोष्ट आहे. कायदा व सुव्यवस्था टिकविण्यासाठी पोलीस स्टेशन बांधण्याची आवश्यकता असतांना आणि कब्रस्तानला पुरेशी जागा असतांना पोलीस स्टेशन बांधले जाऊ नये अशाप्रकारची भूमिका आपण कां घ्यावी? काल परवा नवाझ शरीफ यांचे एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्या पुस्तकामध्ये मुशर्रफ यांचेवर आरोप करण्यात आले आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की, मुशर्रफ शेजारच्या देशावर अणुबॉम्ब टाकण्याच्या तयारीत आहे. देशामध्ये आतंक माजविण्यासाठी त्यांची कशी तयारी सुरु आहे, त्यांचे अतिरेक्यांशी कसे लागेबांधे आहेत हे सर्व त्या पुस्तकामध्ये आहे.

सभापती महोदय, कालपरवा सापडलेले आरडीएक्सचे साठे, आणि पकडण्यात आलेले अतिरेकी यांचे मूळ दंगलीशी आहे. आणि म्हणून या दंगलीच्या निमित्ताने मी मागणी करतो की, या दंगलीमध्ये जे पोलीस मृत्युमुखी पडले आहेत त्यांना आपण अधिक पैश्याची मदत करावी.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

त्यांच्या कुटुंबातील एका वारसाला नोकरी द्यावी, तसेच त्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनची इमारत बांधण्याचे काम तातडीने सुरु करावे, या घटनेच्या चौकशीमध्ये वेळ घालवू नये, दंगलीमध्ये भाग घेणाऱ्यांना झोडपून काढावे, म्हणजे 25 वर्षापूर्वी त्या ठिकाणची जी शांततेची परिस्थिती होती,तशी आता देखील शांत होईल. तसे करावे अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी काल भिवंडीमध्ये घडलेल्या घटनेबद्दल सरकारचे आणि सदनाचे लक्ष वेधावे म्हणून महत्वपूर्ण गोष्टीवर चर्चा उपस्थित केलेली आहे. सभापती महोदय, ही सगळी घटना पाहिली तर एक अतिशय गंभीर स्वरुपाची घटना भिवंडीमध्ये घडलेली आहे. त्या ठिकाणी पोलीस स्टेशनचे बांधकाम चालू असताना एक जमाव येऊन दगडफेकीला सुरुवात करतो. यामध्ये काही पोलीस जखमी झाल्यानंतर पोलिसांना स्वसंरक्षणार्थ गोळीबार करावा लागतो. सभापती महोदय, सगळया घटनेची पार्श्वभूमी पाहिली तर सर्व्हे क्रमांक 573 या जागेवर 1958 पर्यन्त सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्टोअर होते. त्यानंतर 1956 ते 1966 पर्यन्त पोलीस अधिकाऱ्यांचे क्वार्टर्स बांधण्यात आली. पोलीस अधिकाऱ्यांचे क्वार्टर्स निकामी झालेल्या होत्या. भिवंडी येथील पोलीस स्टेशनची परिस्थिती पहाता, त्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन बांधलेले नाही. ते भाड्याच्या जागेमध्ये आहे. गेल्यावर्षी पावसाळ्यामध्ये पूर आल्यानंतर त्या पोलीस स्टेशनमध्ये 11 फूट पाणी साचलेले होते. दोन-तीन वर्षातून एकदा जोराचा पाऊस पडल्यानंतर त्या पोलीस स्टेशनमध्ये पाणी साचते. त्या ठिकाणचे रेकॉर्ड वाचविण्याकरिता प्रत्येक वेळी पोलिसांना धावपळ करावी लागते. त्या ठिकाणची लोकसंख्या 16-17 लाख झालेली आहे. त्यामुळे काही प्रमाणात पोलिसांची संख्या वाढली. ज्या ठिकाणी पोलीस स्टेशन आहे त्या ठिकाणी मासळीबाजार आहे, त्याच ठिकाणी भाजी बाजार आहे, त्यामुळे तेथे इतकी दुर्गंधी सुटते की, तेथे कोणी थांबू शकत नाही. त्या ठिकाणच्या पोलिसांचे आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणून सी.पीं.नी निधीची मागणी केली होती. ज्यावेळेस गृह खात्यावर चर्चा होते, त्यावेळी दंगलीच्या संदर्भ देऊन चर्चा केली जाते आणि त्यामध्ये एखाद्या पोलीसाचा बळी देऊन चर्चा संपते. मूळ प्रश्नाकडे आमचे लक्ष जात नाही. असे वर्षानुवर्ष घडत आहे. म्हणून मला सांगावयाचे आहे की, पोलिसांची कार्यालये अनेक ठिकाणी नाहीत त्यामुळे पोलीस खूप मोठ्या अडचणीला तोंड देत असतात. पोलीस आयुक्त श्री.डी.शिवानंद हे चांगले अधिकारी आहेत.ते तेथे आयुक्त म्हणून गेल्यानंतर पोलीस कल्याण निधीमध्ये बऱ्यापैकी त्यांनी लोकवर्गणी मिळविली. मी एका कार्यक्रमाला गेलो असताना, त्यांनी माझ्याकडे आग्रह धरला की, आमदार निधीसाठी आपण शब्द टाकला तर सन्मानीय उप सभापती श्री.डावखरे साहेब नाही म्हणणार नाहीत, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड नाही म्हणणार नाहीत. या भागातील भाजपचे आमदारही नाही म्हणणार नाहीत. तुम्ही यासाठी शब्द टाकावा, अशी मला त्यांनी विनंती केली. सभापती महोदय, ठाणे पोलीस आयुक्तालया अंतर्गत जी पोलिसांची कार्यालये येतात, त्यांच्या दुरुस्तीसाठी, नवीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.आर.आर. पाटील (पुढे सुरु...

बांधण्यासाठी प्रत्येक आमदारांनी पक्षाभिनिवेश विसरुन कोणी 5 लाख, कोणी 10 लाख असा निधी उपलब्ध करुन दिला. त्या पैशामधून हे पोलीस स्टेशन बांधले जात आहे. त्यासाठी शासनाने एक कवडीसुध्दा मंजूर केलेली नाही. त्यांनी 1 कोटी 94 लाख रुपये जमविले. त्यामध्ये भिवंडी महानगरपालिका, सन्माननीय श्री.वसंतराव डावखरे, कॉंग्रेसच्या एका सन्माननीय आमदारांनीही पैसे दिले, शिवसेना पक्षाच्याही सन्माननीय आमदारांनी पैसे दिले. या सगळयांच्या कॉन्ट्रीब्युशनमधून नियोजित पोलीस स्टेशन बांधण्याचे काम चालले होंते.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ......

अध्यक्ष महाराज, ज्यावेळी हे नियोजन झाले आणि त्या ठिकाणी असलेल्या इमारती पाडून नवीन पोलीस स्टेशन बांधण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी फारशा मोठ्या नसलेल्या तीन संघटना वेगवेगळ्या पध्दतीने विरोध करण्यासाठी पुढे आल्या. त्यामध्ये पहिली संघटना आहे भीमशक्ती संघटना. या संघटनेचे अध्यक्ष श्री. पयंतर शेख यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली की, या जागेच्या संदर्भात काही वाद आहे आणि शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था राहण्याच्या दृष्टीने, सद्भाव राहण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी पोलीस स्टेशन बांधले जाऊ नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या अर्जावर स्थगिती कळविली. पोलीस स्टेशनचे कामकाज काही दिवसांसाठी थांबले. परंतु अध्यक्ष महाराज, ठाणे पोलीस आयुक्तालयाने आणि डी.जी.नी माननीय मुख्यमंत्र्यांना हे पटवून दिले की, ही जागा शासनाची आहे, शासनाच्या असलेल्या जागेवर आपण हे पोलीस स्टेशन बांधत आहोत आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे भिवंडीमध्ये पोलीस स्टेशन बांधण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यानंतर स्थगिती उठली. ही स्थगिती उठत असताना भिवंडी पब्लिक ॲक्शन कमिटी नावाच्या दुसऱ्या संघटनेने जिल्हा कोर्टामध्ये धाव घेतली. ही कमिटी जागेच्या संदर्भातील दावा सिध्द करुन शकली नाही त्यामुळे कोर्टाने त्यांचा दावा फेटाळला. त्यानंतर इमारतीच्या कामाला सुरुवात झाली. माननीय मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना रोज ब्रिफीग होत असते. आम्हाला स्टेट इंटेलिजेंसकडून थोडीशी कल्पना आली होती की, आझाद मैदानामध्ये रझा ॲकेडमीचे लोक धरणे आंदोलन करण्याच्या विचारात आहेत. ही बाब पोलिसांशी संबंधित असल्यामुळे काल सकाळी त्यांना कल्पना दिली की, त्यांना आपले म्हणणे सांगण्यासाठी यावयाचे असेल तर वेळ देईन. त्यांचे म्हणणे कायदेशीर असेल तर कायद्याप्रमाणे निर्णय घेऊ. काल दुपारी साडेचार वाजताची वेळ त्यांना दिली होती. त्या संघटनेचे प्रमुख नेते आझाद मैदानावरुन मला भेटण्यासाठी आले होते. 2.20 वाजताच्या दरम्यान म्हणजे साधारणत: नमाज संपल्यानंतर "काम बंद करा" अशा घोषणा देत ज्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु होते त्या पोलीस स्टेशनच्या दिशेने एक मॉब आला. मी विधानसभा सभागृहातील चर्चा ऐकलेली आहे तसेच या सभागृहातील चर्चा ऐकलेली आहे. त्यामध्ये सर्व अल्पसंख्यांक समाज इन्व्हॉल्व्ह होता असे गृहीत धरुन सन्माननीय सदस्य बोलले. भिवंडीमध्ये पाहिले तर मुस्लिम समाजाची संख्या साधारणत: 6 ते 7 लाख आहे. काल

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. आर. आर. पाटील .......

पोलीस स्टेशनकडे जे लोक आले होते ते जास्तीत जास्त 250 ते 300 लोक होते. त्या इमारतीचे भूमिपूजन माननीय श्री. डावखरे साहेबांच्या हस्ते झाले. सगळ्या पक्षांचे नगरसेवक त्या ठिकाणी हजर होते तसेच अल्पसंख्यांक नगरसेवक सुध्दा भूमिपूजनाला हजर होते. नगरपालिकेने त्या इमारतीला ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. इमारत बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याने तेथील गरज लक्षात घेऊन पोलीस स्टेशन बांधण्यास परवानगी दिलेली आहे. अशा स्थिती मध्ये हे काम असताना, या राज्यातील मागील दोन दिवसातील पावसाची परिस्थिती पाहिली तर आमच्या अशा सूचना होत्या की, मागच्यावेळी पुरामध्ये खूपमोठी हानी झालेली आहे, आपण सगळे लोक पूरपरिस्थिती कंट्रोल करण्याकडे आणि लोकांना मदत करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पोलीस खात्याचा प्रमुख म्हणून पोलीस दलाचा मला अभिमान वाटतो. अजिबात विश्रांती न घेता 24 तास माणसे रस्त्यावर होती. त्यांना निवारा नव्हता. लोकांकडून मागून दिलेले प्लास्टिकचे पिवळे कागद डोक्यावर घेऊन या दलातील लोक रस्त्यावर काम करीत होते. त्यांना साधे रेनकोट सुध्दा विकत घेऊन दिलेले नाहीत. कोणत्या तरी कंपनीकडून मागून आणलेले रेनकोट दिलेले होते. कोणतीही तक्रार न करता मुंबई, नवी मुंबई, ठाणे आयुक्तालय, ठाणे ग्रामीण येथे गेल्यावर्षी ज्या ठिकाणी पूर आला होता त्या ठिकाणी सगळीकडे लोक रस्त्यावर होते. त्या ठिकाणी काम सुरु होते. सगळे लोक पूरपरिस्थितीसाठी रस्त्यावर असल्यामुळे त्या ठिकाणी फारसा बंदोबस्त ठेवण्याचा प्रसंग नव्हता. महत्वाचे म्हणजे स्टेट इंटेलिजेंसचे चुकले काय ? गुप्तचर विभागाचे चुकले काय ? माहिती का मिळाली नाही ? प्रश्न विचारणे सोपे असते. काही वेळा घटना घडल्यानंतर अंदाज येतो. त्या ठिकाणी पोलीस स्टेशन होऊ नये म्हणून या अगोदर जे मोर्चे निघाले होते ते शांततेने निघाले होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.बरवड 20:05

(श्री. आर.आर.पाटील...)

धरणे आंदोलने झाली होती तीही शांततेने झाली होती. त्यालाही लोकांचा फारसा प्रतिसाद नव्हता. मोर्चे अतिशय शांततेने निघत होते. मोर्चे काढून निवेदन देऊन जाणे अशी अगोदरची परिस्थिती होती. त्यामुळे त्या दिवशी मॉब इतका आक्रमक होईल अशी शंका घ्यायला स्कोप नव्हता. 1982-83मध्ये भिवंडीमध्ये दंगल झाली होती. त्यानंतर तेथील नागरिकांनी निर्णय घेतला की, दंगलीमध्ये काही फायदा नाही. 1992-93मध्ये संपूर्ण देशभर दंगल उसळी होती त्यावेळी भिवंडीमध्ये शांतता होती. एक सामंजस्याचे वातावरण त्या शहराने जोपासले होते. त्यामुळे लोक अशा प्रकारची आततायीपणाची भूमिका घेतील असे पोलिसांना वाटले नाही. परंतु जेव्हा दगडफेक सुरु झाली त्यावेळी तेथे पोलिसांची संख्या अपुरी होती. जेव्हा पोलिसांची संख्या अपुरी असते आणि मॉब जास्त असतो त्यावेळी पोलिसांना स्वसंरक्षणासाठी नेहमी तीव्र हत्यार वापरावे लागते. एखाद्या ठिकाणी एखादा कॉन्स्टेबल असेल आणि शे-पाचशे लोक चालून येत असतील तर अशा वेळी तो कॉन्स्टेबल हातात लाठी घेऊन येत नाही तर त्याला त्यावेळी रायफल पुढे करावी लागते. त्याठिकाणी स्टाफ कमी होता आणि मॉब घोषणा देत आलेला होता. इमारतीची मोडतोड सुरु झाली होती. अशा परिस्थितीत ती इमारत वाचावी, मॉबने पुढे येऊ नये म्हणून तेथे असलेल्या पोलीस अधिका-यांनी लाठीचार्ज करण्याचा प्रयत्न केला. परंतु लाठीचार्जला न जुमानता लोक आणखी पुढे यावयास लागल्यामुळे त्याठिकाणी आणखी पोलीस तैनात करण्यात आले. त्यांच्यावरही दगडफेक करण्यात आली. मी या घटनेची पूर्णपणे माहिती घेतल्यानंतर सांगू इच्छितो की, पोलिसांनी पूर्णपणे संयमाने परिस्थिती हाताळली. परंतु जमावाने घेतलेली आक्रमक भूमिका आणि करीत असलेली दगडफेक यामुळे पोलीस जखमी व्हायला लागले. आज पर्यन्त घडलेल्या अशा कोणत्याही घटनेमध्ये पोलीस एवढया प्रमाणावर जखमी झालेले नाहीत. सभापती महोदय, जर पोलीसच जखमी व्हायला लागले, अतिशय मार खायला लागले तर जनतेला कोण वाचवणार, हा प्रश्न आहे. पोलिसांनी अतिशय संयमाने परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. डीसीपींचे चार दात पडले, बाकीचे पोलीस अधिकारी आणि कॉन्स्टेबल जखमी झाले. एक नाही, दोन नाही तर 34 पोलीस कर्मचारी जखमी झाल्यामुळे परिस्थितीनुरुप पोलिसांना फायरिंग करावे लागले. पोलिसांनी लोकांना मारण्यासाठी फायरिंग केले नाही. लोकांना मारण्यासाठी पोलिसांनी फायरिंग केले असते तर फायरिंग केलेल्या 28 राऊंडमध्ये 28 माणसे मेली असती. लोकांना मारणे हा पोलिसांचा इरादा

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

नव्हता, तर मॉब डिस्पर्स करणे हा पोलिसांचा इरादा होता. पोलिसांनी 28 राऊंड पैकी 26 राऊंड हवेत फायर केले आणि 2 राऊंडमध्ये दोन लोक मृत्यूमुखी पडले, हे कोणालाही नाकारता येणार नाही. ते फायरिंग पोलिसांनी केले होते आणि त्यामध्ये दोघांचा मृत्यू झालेला आहे. तीन साडेतीनच्या सुमारास ही घटना तेथे घडत होती. तेथे कोणती घटना घडत आहे हे याठिकाणी विधान भवनामध्ये देखील कोणाला माहीत नव्हते. कोणी सांगत होते एक माणूस मेला तर कोणी सांगत होते तीन माणसे मेली. साधारणत: 4च्या सुमारास सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए. अझिजसाहेब हे काल सकाळी रझा अकॅडमीच्या लोकांना घेऊन माझ्याकडे आले होते. लोकशाहीमध्ये चर्चेसाठी दरवाजे नेहमीच खुले ठेवले पाहिजेत. त्या घटनेची ना मला पूर्ण कल्पना होती ना माझ्याकडे आलेल्या रझा अकॅडमीच्या पुढा-यांना होती. सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए. अझिज, सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री. बाबा सिद्दीकी, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे माझ्याकडे आले होते. सन्माननीय सदस्य श्री. सचिन अहिर हे देखील एका दुस-या कामासाठी माझ्याकडे आले होते. आम्ही 15-20 लोक चर्चा करीत होतो. मी त्यांना विचारत होतो की, तुम्ही पोलीस स्टेशनला विरोध का करता ? एक तर अलीकडच्या काळात पोलीस चौक्या मागितल्या जातात ही वस्तुस्थिती आहे. जी भीमशक्ती संघटना माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेली होती त्या संघटनेकडे कोणताही रेकॉर्ड नव्हता. वक्फ बोर्डाने रझा अकॅडमीला असे सांगितले की, ती जागा कब्रस्तानची आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/पूर्वी श्री.शिगम 20:10

श्री.आर.आर.पाटील.........

सभापती महोदय, काल सायंकाळी 5.00 च्या दरम्यान माझ्या दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये मी स्पष्टपणाने सांगितले की, जागा जर मुस्लीम समाजाची असेल, कब्रस्तान असेल तर तेथे अतिक्रमण करुन पोलीस स्टेशन बांधावे या मताचा मी नक्की नाही. परंतु तुमचे पुरावे कोर्टात देत नाही, मुख्यमंत्र्यांकडे देत नाही. एवढे करुन माझ्यावरही विश्वास ठेवू नका, परंतु तुमच्याकडे असलेले पुरावे मुख्य सचिव आणि महसूल सचिवांकडे द्या. त्यात थोडे जरी तथ्य असेल तर आम्ही लोकांना सांगू, जागा त्यांची आहे, आमची चूक झाली. पोलीस स्टेशन बांधू नका. जागेबाबत एन.ओ.सी. देताना नगरपालिकेने कार्यवाही केली, मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला, कोर्टाने निकाल देताना तपासले आणि तुम्ही पुरावे दिले नाही तर पोलीस स्टेशन बांधण्याच्या आड तुम्ही येता उपयोगाचे नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करता उपयोगाचे नाही ही गोष्ट त्यांनी मान्य केली. त्यावेळी मी हेही सांगितले, हे सगळे करण्यासाठी 8 दिवस काम थांबविण्याची माझी तयारी आहे. यापुढच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडता उपयोगाचे नाही. या सगळया गोष्टीला मान्यता झाली. त्यानंतर आजपर्यंत जिथे दंगल झाली, दंगलीत पोलीस गोळीबारात काही लोक मेले, तेथे अनेक ठिकाणी आपण मदत दिली. सभापती महोदय, मागील अधिवेशनात अमरावतीला कॅनॉल शेतकरी फोडत होते, त्यावेळी पोलिसांनी विरोध केला. पोलिसांवर दगडफेक होत असताना काही पोलीस जखमी झाले. पोलिसांनी गोळीबार केला, त्यामध्ये एका तरुण शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. आग्रह झाल्याने पोलिसांवर हल्ला केला असताना, शेतकरी मेला असताना सुध्दा मदत देणे सदनामध्ये भाग पडले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एकही पोलीस जखमी झालेला नाही, पोलिसांना दगड लागलेला नाही.

श्री.आर.आर.पाटील : मी पटलावर माहिती ठेवतो. सभापती महोदय, हिंजवडी येथे 3 लोकांचा मृत्यू झाल. तेथेही मदतीसाठी आग्रह धरण्यात आला. सरकार म्हणून एका ठिकाणी एक न्याय आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरा न्याय अशी भूमिका घेता येत नाही.....(अडथळा)... या सदनामध्ये बोलण्याचा अधिकार सन्माननीय श्री.रावतेसाहेब, फक्त तुम्हाला एकट्यालाच का? तुमचे भाषण सुरु असताना या बाजूचे कोणी उठतात का? का असा व्यत्यय आणीत आहात, तुम्हाला काय विचारावयाचे असेल ते शेवटी विचारावे. सभापती महोदय, पोलिसांची भूमिका दोन्ही बाजूंनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/पूर्वी श्री.शिगम 20:10

श्री.आर.आर.पाटील.........

टीकेची बनते. परवा लॉबीमध्ये मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना एक घटना सांगितली. मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आरक्षणासाठी कोणतीही पूर्वसूचना न देता राजभवनाजवळ रास्ता रोको केला. राजभवन हे राज्याच्या प्रमुखांचे निवासस्थान आहे. मोस्ट प्रोटेक्टेड एरिया आहे. अशा ठिकाणी विद्यार्थी घुसू शकले तर राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राहिली नाही हा संदेश देशभर गेला असता. आझाद मैदानावर आंदोलन केले, कोणी दखल घेत नाही म्हणून विद्यार्थी उठले आणि राजभवनावर जाऊन अचानकपणे आंदोलन केले. पोलिसांनी लाठीचार्ज केला. तीन दिवस माध्यमांनी ठोकून काढले. लाठीचार्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली म्हणून आम्ही त्यांना सस्पेंड केले. कारण वेगळे असले तरी अधिकारी सस्पेंड झाला. चार दिवसांपूर्वी विल्सन कॉलेजमध्ये आठवले नावाच्या प्राध्यापकाला एनएसयुआय या विद्यार्थी संघटनेने स्टाफ रुममध्ये जाऊन सिनिअर माणसांसमोर तोंडाला काळे फासले. त्याची काही चूक होती तर त्यासाठी पोलीस स्टेशन होते. कोणाच्या तोंडाला काळे फासण्याचा त्यांना नक्की अधिकार नव्हता. खालच्या बाजुला पोलीस होते. विद्यार्थी काळे फासत होते. गळ्यात चपलाचा हार घालत होते. दुसऱ्या बाजुने मागणी केली जाते की, पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली म्हणून सस्पेंशन करा. सभापती महोदय, नेमके काय केले पाहिजे. कारवाई केली म्हणून सस्पेंशन आणि कारवाई केली नाही म्हणून सस्पेंशन. शासनाच्या बाबतीत सुध्दा कधीकधी आपण सगळे मिळून भूमिका घेतो. काल 4.00 वाजता काही पोलीस जखमी झाले होते. पण तेथील 2 मुस्लीम कार्यकर्ते ठार झाले होते. अशा वातावरणामध्ये आम्ही चर्चा करावयास बसलो होतो. मदतीच्या विषयी आतापर्यंत जो सगळयांना न्याय लावला तोच न्याय लावू अशा प्रकारचे आश्वासन माझ्याकडून देण्यात आले. एका गोष्टीबद्दल विचारले जाते..........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

त्या ठिकाणी श्री. बाबा सिद्दीकी, अबू आझमी गेले होते तेथे ते काय बोलले होते, त्याबद्दल मी आता भाष्य केले तर ते योग्य होणार नाही. कारण यासंदर्भात जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत मी यासंदर्भातील मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. मी आता जर यासंदर्भात विचार व्यक्त केले तर या ठिकाणी चौकशी करणा-या अधिका-यावर मी माझे मत लादतो असे होईल. सभापती महोदय, माझ्या दालनात माननीय डॉ. अझिझ, माननीय बाबा सिद्दीकी तसेच काही रझा अकादमीचे लोक सुध्दा आले होते. मी त्यांना सांगितले की, भिवंडीत दंगल झाली तर ती महाराष्ट्राला परवडणार नाही. दंगलीतून कोणाचाही फायदा होणार नाही त्यामुळे तुम्ही येथून जा आणि तेथे तुमच्या माणसांना समाजवून सांगा. जोपर्यंत तेथील परिस्थिती शांत होत नाही, परिस्थिती निवळत नाही तोपर्यंत तेथून बाहेर जाऊ नका, असे मी त्यांना सांगितले होते. त्यामुळे सर्व लोक तिकडे जाण्यास निघाले. त्या दरम्यान मला सीपीचा फोन आला, त्यांनी सांगितले की, अबू आझमी इकडे येत आहेत, त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, अबु आझमी येण्यामुळे दंगल उसळेल असे वाटत असेल तर अबू आझमी तेथे पोहचणार नाही अशी व्यवस्था करा आणि अबू आझमी येण्यामुळे दंगल उसळणार नाही असे वाटत असेल तर त्यांना येऊ द्या, पोलीस अधिका-यांशी त्यांना जर भेटावयाचे असेल तर त्यांना भेटू द्यावे. यासंदर्भातील सर्व निर्णय मी सीपीवर सोपविला होता. अबू आझमीने पोलिसांना भेटण्यास हरकत नाही, कार्यकर्त्यांना भेटण्यास हरकत नाही परंतु अबू आझमी यांना पब्लीक बरोबर मिटींग घेता येणार नाही असे सांगितले होते. परंतु काही लोक आपल्या राजकीय स्वार्थ्यासाठी फायदा घेत असतात, हे लोक अल्पसंख्याकामधीलच असतात असे नाही तर हिंदू लोकांमध्ये सुध्दा असतात. खरे म्हणजे गुन्हेगाराला जात आणि धर्म नसतो. कुठल्याही धर्मातील चांगले लोक अशा गोष्टीचे समर्थन करणार नाहीत. आतापर्यंत या सदनात मी जे काही निर्णय सांगितलेले आहेत ते अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. म्हणून मी सदनाला विश्वासात घेऊन सांगू इच्छितो की, कोठल्याही धर्मातील अतिरेकी असो त्यांना ठेचून काढण्याचे काम महाराष्ट्रातील पोलीस दल करेल. गोरगरीब माणसाला धमकावणारे, सामान्य माणसाला त्रास देणारे, मालमत्तेचे नुकसान करणारे, लोकांना धमकावणारा यांच्या विरुध्द शासन कठोर कारवाई करेल. शांत बसून बघ्याची भूमिका शासन स्वीकारणार नाही. अशा गुन्हेगारांना जरब बसविण्याचे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

काम महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्राचे पोलीस केल्या शिवाय राहणार नाही. भिवंडी येथील हा प्रकार थांबल्यानंतर संध्याकाळी एक हवालदार आणि एक कॉन्स्टेबल सिव्हील ड्रेस घालून मोटरसायकलवर जेवन करण्यासाठी निघाले असतांना त्यांच्यावर जमावाने हल्ला करुन सु-याने मारले व दगडाने त्यांना ठेचून काढले आणि फेकून देण्यात आले. हे पोलीस सिव्हील ड्रेसवर असतांना या पोलिसांवर हल्ला झाला याचा अर्थ या पोलिसांना त्या जमावातील लोक चांगल्या प्रकारे ओळखत असावे. कारण बाकीच्या मोटरसायकलवर जाणा-या लोकांवर या जमावाने हल्ला केला नाही. सभापती महोदय, पालीस दलाच्या दृष्टीने ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. पोलिसांवर हात टाकणे हे कधीही सहन केले जाणार नाही, हे आम्ही कृतीने सिध्द करुन दाखवू. ज्या लोकांनी पोलीस अधिका-याचे दात पाडले, त्यांनी फक्त पोलीस अधिका-याचे दात पाडले असे मी समजत नाही तर त्यांनी शासनालाच ठेचले आहे, असे मी मानतो. ते या शासनाला आणि पोलीस खात्याला आव्हान देण्याचा प्रयत्न करीत असतील तर

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4Z-1

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 20:20

श्री.आर.आर.पाटील.....

अशी कोणतीही शक्ती असली तरी तिचे लाड सहन केले जाणार नाहीत याची मी ग्वाही देतो. महाराष्ट्राच्या पोलीस दलाने अशाप्रकारची अनेक आव्हाने पेललेली आहेत. आज ही घटना घडली. परंतु जर कोणी सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते सहन केले जाणार नाही. सहा-सात लाख लोकवस्ती असलेल्या भागात दोन-अडीचशे लोकांचा जमाव येतो हा कोणत्याही प्रकारचा जातीय संघर्ष असू शकत नाही. परंतु आज तेथे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबत योग्य अशी कारवाई करण्यात येईल. त्या ठिकाणी जे दोन पोलीस कॉन्स्टेबल मयत झाले त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी साडेसात लाख रुपयांची मदत देण्यात येईल. यापूर्वी राज्य शासनाने अशी मोठ्या प्रमाणावर कधीही मदत केलेली नाही. तसेच सर्व नियम बाजुला सारुन त्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावरील सर्व लाभ तीन महिन्याच्या आत देण्यातील येतील. ज्यांनी पोलिसांना ठेचून मारले त्यांच्या बाबतीत शासन काय करु शकते हे शासन कृतीने सिध्द करुन दाखवेल. एका बाजुला अशा गोष्टी घडत असताना दुसऱ्या बाजुला सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. कारण जेथे आग असेल तेथे कोणता उद्योगपती आपला उद्योग निर्माण करेल, जर उद्योगधंदे आले नाही तर लोकांना रोजगार कसा मिळेल ? मुंबईत झालेल्या दंगलीचे चटके अजून लोकांना बसत आहेत. नव्या दंगली राज्याला परवडणाऱ्या नाहीत. जर कोणी सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते सहन केले जाणार नाही. सभापती महोदय, जर भिवंडी येथील ती जागा कब्रस्थानासाठी असेल तर केवळ आमच्याकडे दंडुकेशाही आहे म्हणून ती जागा बळकावून त्याठिकाणी पोलीस स्टेशन उभारणार नाही. तसेच ती जागा कब्रस्थानसाठी आहे, असे आढळून आल्यास दिलगिरी व्यक्त केली जाईल आणि पोलीस स्टेशनसाठी दुसरी जागा दिली जाईल. परंतु सर्व जनतेला पटेल अशाप्रकारचा पुरावा देण्यात आला पाहिजे. जर अशाप्रकारचा पुरावा देण्यात आला नाही तर पोलीस स्टेशनचे काम जलद गतीने केले जाईल आणि या कामासाठी काही आमदारांकडून पाच-दहा लाख रुपये मदत घेऊन पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

सभापती महोदय, याठिकाणी सातत्याने उल्लेख करण्यात आला की, मतासाठी मुस्लिमांचा अनुनय केला जातो. जर अशाप्रकारचा अनुनय केला असता तर दिलेला स्टे माननीय मुख्यमंत्र्यांनी उठविला नसता आणि ही जागा पोलीस स्टेशनसाठी देण्यात आली नसती. जर आम्हाला कोणाचा अनुनय करावयाचा असता तर त्याठिकाणी पोलीस स्टेशन उभारण्याची भूमिका घेण्यात आली असती का ? याचा स्पष्ट अर्थ आहे की, आम्ही कोणाचेही अनुनय केलेले नाही. येथे कायद्याप्रमाणे कृती केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितिन गडकरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजपर्यंत मुस्लिमांना सहा धंदे देण्यात आलेले आहेत. सातवा धंदा त्यांना देण्यात आलेला नाही. याबाबतीत आपण सर्वांनीच आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. प्रा.जोंगेद्र कवाडे यांनी सांगितले की, ही जातीय दंगल नव्हती. त्याठिकाणी हिंदू आणि मुस्लिम समोरासमोर आले असे घडलेले नाही. गैरसमजुतीतून हा भडका उडाला आहे. ज्यावेळी दंगल होते त्यावेळी गरीब माणूस भावनेच्या आहारी जाऊन पोलिसांच्या गोळीबारात आणि लाठीहल्ल्यात सापडतो. परंतु या दंगलीच्या मागे ज्या कोणाचा मेंदू काम करीत असतो तो मात्र कुठेतरी कोपऱ्यात सुरक्षित बसलेला असतो. तो कुठेही ठेचला जात नाही.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

06-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 5A-1

SSP/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 20:25

श्री.आर.आर.पाटील...

मी यानिमित्ताने इतकेच सांगेन की, हे घडवण्याच्या पाठीमागे पडद्या आडून जर कोणी भूमिका बजावीत असेल किंवा अशा प्रकारे कोणी भडकाविण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांच्यापर्यंत पोहचण्याची भूमिका घेतली जाईल, त्यांनासुध्दा उघड पाडले जाईल. महाराष्ट्रामध्ये दंगल करणे सोपे नाही, हेसुध्दा सिध्द केले जाईल. या प्रकरणाच्या बाबतीत कुठेच गैरसमज पसरणार नाही व दोन्ही समाजामध्ये सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्यासाठी सदनाने पोलीस दलाला व गृह विभागाला मदत आणि सहकार्य करावे, अशाप्रकारचे आवाहन मी यानिमित्ताने करतो. याबाबतीत प्रसार माध्यमांनीही आपली भूमिका चांगल्या प्रकारे बजावली, त्याबद्दल त्यांनाही मी मनापासून धन्यवाद देतो. या राज्यामध्ये सामंज्यस्याचे वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने आपण आपले योगदान देऊन राज्यावर आणि देशावर प्रेम सिध्द करावे, अशा पध्दतीचे मी आवाहन करतो. याठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले, त्या सर्वच प्रश्नांची उत्तरे दिली जाऊ शकत नाहीत. परंतु याठिकाणी ज्या सूचना करण्यात आल्या आहेत, त्यांचा विचार पुढील धोरण ठरविताना केला जाईल, हा विश्वास मी यानिमित्ताने देऊ इच्छितो.

धन्यवाद !

-------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी यानिमित्ताने जे उत्तर दिले, त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. तसेच, त्यांनी जे सामाजिक सदभावना टिकावी व त्याकरिता सभागृहाने सहकार्य करावे असे म्हटले त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. त्यांनी पुढे असेही म्हटले की, पोलीस खात्याचे मनोबल वाढले पाहिजे. ही गोष्ट खरी आहे की, त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पोलीस जेव्हा एखाद्या घटनेबद्दल कारवाई करतात तेव्हा त्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात येते, तसेच एखाद्या घटनेच्या बाबतीत पोलिसांनी कारवाई केली नाही तर त्याबाबतीतही पोलिसांना निलंबित करा अशा प्रकारची मागणी करण्यात येते. अशा प्रकारे पोलिसांची कुचंबणा अनेक वेळा होते. परंतु यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी काही गोष्टींना स्पर्श केलेला नाही. आपण मेंदूची गोष्ट करीत आहात. मला वाटले होते की, या घटनेच्यासंदर्भात आपल्या काही लक्षात आले असेल, परंतु अजूनही आपल्या एक गोष्ट लक्षात आली नाही. परंतु ती इंटेलिजेंस विभागाला लक्षात आली असेल. आपल्या मंत्रिमंडळातील एक मंत्री श्री.बाबा सिध्दीकी हे त्या घटनास्थळी गेले होते. ते त्याठिकाणी काय-काय बोलले याबाबतचा इंटेलिजंस विभागाचा रिपोर्ट आपण गृहमंत्री असल्यामुळे आपल्याला तो प्राप्त झाला असेलच. त्याठिकाणी ते काय बोलले याची आपण माहिती घेतली आहे काय ? आपल्याच मंत्रिमंडळातील एखाद्या मंत्री, जो सगळया महाराष्ट्रातील जनतेच्या, सर्व समाजाचे प्रतिनिधीत्व करतो, ते मंत्री तेथे जाऊन काय बोलले, त्यांनी तेथे जाऊन कोणत्या प्रकारची भूमिका घेतली, ते इंटेलिजंसला माहीत असेलच, मलाही माहीत आहे परंतु मुद्दाम मी ते याठिकाणी वाचून दाखवले नाही. आपल्याला त्याची माहिती आहे का ? याबाबतीत आपल्याच मंत्रिमंडळातील मंत्र्याने फारच वेगळी व वाईट भूमिका घेतली आहे. माननीय गृहमंत्री महोदय आपण म्हणता की, शांतता निर्माण केली पाहिजे, सामंज्यस्याची भूमिका ठेवली पाहिजे, हे बरोबर आहे. परंतु दुसऱ्या बाजूला आपलेच सहकारी कसे वागतात, याचा इंटेलिजंस रिपोर्ट आपण पहावा. त्याठिकाणी जाऊन ते जे काही बोलले ते शोभेसे नाही. माननीय आर.आर.पाटील साहेब, आपण स्पष्ट आणि मोकळे बोलता. परंतु कृती करतेवेळी आपली लेखणी थांबते. पूर्वी सभागृहामध्ये खामगांवच्या एस.पी.च्या बाबतीत एक प्रश्न विचारला होता, त्यावेळी आपण प्रामाणिकपणे आवाहन देऊन सांगितले होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील एस.पी.च्या

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

बदलीच्या बाबतीतही आम्ही अनेकवेळा मागणी केली, त्यावेळी आपण पॉलिसी सांगितली, आम्ही ती मान्य केली. याबाबतीत आपल्याला राजकीय अडचण असू शकते किंवा इतर कोणती अडचण असू शकते. परंतु याठिकाणी आपल्या मंत्रिमंडळातील जे सहकारी मंत्री श्री.बाबा सिध्दीकी आहेत, त्यांनी त्याठिकाणी जाऊन जी भूमिका घेतली त्याबाबतचा इंटेलिजंस रिपोर्ट आपल्याकडे उपलब्ध आहे का ? त्यावर आपण काय कारवाई करणार ? भिवंडी येथे रझा अकादमी आणि पब्लीक ॲक्शन कमिटी आहे, या घटनेमध्ये सर्वसामान्य समाजातील लोकांना कुठल्याही प्रकारचा दोष देण्यास काहीही अर्थ नाही. काही मोजके लोक असे प्रकार घडवत असतात. याठिकाणी आपण या संबंधीच्या त्या जागेच्या मालकी हक्कांची सगळी कागदे तपासली.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ प्रथम श्री.पुरी....... 20:30

श्री.नितीन गडकरी...............

सभापती महोदय, माझे तर शासनाला असे सांगणे आहे की, अजूनही कुणाचे काही म्हणणे असेल तर ते त्यांनी ऐकून घ्यावे. परंतु, त्या ठिकाणी स्ट्रक्चर असतांना, त्या ठिकाणी बांधकाम सुरु असतांना, यापूर्वीच टायटल क्लिअर झाले असतांना सन्माननीय गृहमंत्री खंबीर भूमिका का घेत नाही ? सन्माननीय गृहमंत्री असे म्हणतात की, "जर एखाद्याने अतिक्रमण केले असेल तर त्याचीही चौकशी करु." अशा प्रकारे डिपेंडिंग भूमिका ते का घेत आहेत ? माझे असे सांगणे आहे की, तुम्ही अशी भूमिका घेऊ नका. त्या जागेची मालकी ही पोलीस खात्याची आहे हे 101 टक्के खरे आहे, निर्विवाद आहे. त्यामुळे त्यामध्ये After thought येतच नाही. ॲक्शन कमिटीकडे किंवा रजा अकादमीकडे एकही पुरावा नाही. न्यायालयानेही त्यांचे म्हणणे फेटाळून लावले आहे. त्यामुळे सन्माननीय गृहमंत्र्यांनी संदिग्ध भूमिका मांडण्याऐवजी हे अधिवेशन समाप्त होण्याच्या आत सदरची जागा कुणाची आहे यासंबंधीची सर्व कागदपत्रे पाहून जर ही जागा सरकारची असेल तर ताबडतोब बांधकाम सुरु होईल, असे नि:संदिग्ध आश्वासन आम्हाला दिले पाहिजे. अशा प्रकारचे आश्वासन सन्माननीय गृहमंत्री देणार आहेत का ? कारण, सध्या बांधकामाला स्थगिती मिळालेली आहे. जरुर तुम्ही यासंबंधीचे सर्व पुरावे तपासा, सगळयांचे म्हणणे ऐकून घ्या. परंतु जर पुन्हा बांधकाम सुरु केले नाही तर लोकांमध्ये चुकिचा मेसेज जाईल, हेही आपण लक्षात ठेवा. हे सर्व तपासण्यासाठी आम्ही आपल्याला 8 दिवसांचा वेळ देतो. परंतु, मी तुम्हाला ठामपणे सांगू इच्छितो की, ही जागा 101 टक्के सरकारची आहे. तेंव्हा, पोलीस स्टेशनचे बांधकाम एक आठवडयाच्या आत सुरु होईल का ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आगीत तेल ओतण्याचे काम काही लोकांकडून झाले आहे आणि यासंबंधीचा गुप्तचर विभागाचा अहवाल माननीय गृहमंत्र्यांना मिळाला आहे, अशी माझी माहिती आहे. ज्यांनी आगीत तेल ओतले ते तुमच्याच मंत्रीमंडळाली एक मंत्री, श्री.बाबा सिध्दिकी हे आहेत. त्यांनी त्या ठिकाणी केलेल्या वक्तव्याबाबतचा पुरावा तुमच्याकडे आलेला आहे. त्यामुळे त्यांचाही यामध्ये रोल आहे. तेंव्हा, तुम्ही त्यांच्याविरुध्द कारवाई करणार काय ?

..2.....



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितिन गडकरी...........

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आणखी एक नेते, श्री.अबु आझमी हे देखील त्या ठिकाणी गेले होते. त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांना तेथे जाण्यापासून पोलिसांनी का रोखले नाही ? त्यांना अगोदरच थांबविले जाणे आवश्यक होते. हे वृत्त 'लोकमत' या दैनिकात आले होते आणि माझ्याकडेही तशी माहिती आहे. त्यांनी त्या ठिकाणी बैठक घेतल्यानंतर लोक भडकले. चौकशीअंती जर हे सिध्द झाले की, श्री.अबु आझमी यांनी लोकांना भडकविले तर त्यांच्यावर तुम्ही कोणती कारवाई करणार आहात ? या तीन प्रश्नांची उत्तरे जर माननीय गृहमंत्र्यांनी दिली तर त्यांनी जे स्पिरिट आपल्या भाषणातून दाखविले आहे ते कृतीमध्ये उतरले असे म्हणता येईल. सन्माननीय गृहमंत्र्यांबद्दल आता असा अनुभव येतो आहे की, त्यांच्या भाषणात अतिशय स्पिरिट असते व कृती करतांना मात्र ते हतबल होतात आणि यामुळेच त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचतो आहे. तुमचे मित्र तुम्हाला सबोटेज करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सत्तेमधील तुमचे जे सिनियर आहेत त्यांना तुम्ही अडचणीत आला की बरे वाटते. म्हणून माझी सन्माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या भाषणातून जे स्पिरिट दाखविले ते जर कृतीत उतरवावयाचे असेल तर मी उपस्थित केलेल्या या तीन प्रश्नांची त्यांनी उत्तरे द्यावीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. भिवंडीमध्ये जी दंगल झाली त्यासंदर्भात माझ्याकडे निश्चित माहिती नसल्यामुळे मी या चर्चेत भाग घेतला नव्हता. परंतु, सन्माननीय गृहमंत्र्यांनी केलेले भाषण ऐकून माझ्या जे लक्षात आले ते अतिशय क्लेषदायक आहे. त्यांनी त्यांच्या भाषणात अमरावती येथे झालेल्या दंगलीचा संदर्भ दिला. अमरावती येथे पाण्यासाठी मोर्चा निघाला होता आणि आंदोलन झाले होते. कुठेही पोलिसांवर दगडफेक झाली नव्हती किंवा दंगल झाली नव्हती आणि त्यामध्ये कुणीही पोलीस जखमी झाला नव्हता. त्यावेळी पोलिसांची अशी समजूत झाली होती की, पाण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चातील लोक धरण फोडण्यासाठी निघाले आहेत. या गैरसमजातून गोळीबार झाला. पोलिसांचे नितिधैर्य खचू नये म्हणून आम्ही त्यावेळी हा प्रश्न गंभीरतेने घेतला नाही. परंतु, विदर्भामध्ये पाण्यासाठी झालेल्या आंदोलनाची तुलना भिवंडी येथे झालेल्या दंगलीशी कृपा करुन करु नये, अशी माझी सन्माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला तुलना करावयाची नव्हती, केवळ घडलेल्या घटना सांगावयाच्या होत्या. सन्माननीय सदस्य, श्री.नितिन गडकरी यांनी या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. मी माझ्या भाषणातही सांगितले आहे की, मी स्वत:हून रझा ॲकॅडमीच्या नेत्यांना आणि इतर अल्पसंख्यांक कार्यकर्त्यांना लोकांची समजूत काढण्यासाठी व दंगल वाढू नये म्हणून पाठविले होते.

यानंतर श्री.बोरले............

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-20 अधिका-यांसमोर ही चर्चा झाली होती. शासनाला मदत व्हावी म्हणून मी त्यांना तेथे पाठविले होते. ते तेथे काय बोलले याची मी इंटेलिजन्सकडून माहिती घेतलेली नाही. ज्यावेळी पोलिस कमिशनर यांच्या बरोबर बैठक झाली, त्यावेळी त्यांनी पॉझिटीव्ह भूमिका घेतली. वातावरण शांत होईल असे त्यांनी मला रात्री 11.00 वाजता सांगितले. शासनाची जागा असेल तर बांधकाम करणार काय ? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, शासनाची जागा असेल तर 101 टक्के बांधकाम केले जाईल. काल 4.30 वाजता बैठक झाली त्यावेळी पोलिसांवर हल्ला झालेला नव्हता. त्यांचेच दोन लोक मरण पावले होते. 15 दिवसाच्या आत त्यांना जागेचे पुरावे द्यावे लागतील. 15 दिवसाच्या आत पुरावे दिले नाहीत तर काम चालूच राहील. 15 दिवसांची मुदत कालच ठरविण्यात आलेली आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, तेथे बांधकाम विभागाचे स्टोअर आणि पोलिसांचे निवासस्थान होते असे कालच सांगण्यात आले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण केलेले आहे असा आक्षेप आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाचे धोरण घोषित करणार आहे. नांदेड येथे वक्फ बोर्डाच्या जागेवर अनेक कार्यालये आहेत. सातारा येथे पोलिस स्टेशनच्या जागेवर मशीद, मंदिर आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाचे धोरण जाहीर करतो की, ज्यांच्या ताब्यात जी जागा असेल मग वक्फ बोर्डाची जागा पोलिसांच्या ताब्यात असेल किंवा पोलिसांच्या जागेवर मंदिर किंवा मशीद असेल त्या जागा कोणाच्या नावावर आहेत यावरुन आता नवीन वाद घालत बसावयाचे नाही. आहे ती परिस्थिती सर्व बाबतीत कायम ठेवली जाईल.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 10 जुलै, 2006 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

दुपारी 12.00 ते 2.00 वाजेपर्यंत आज सकाळी नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या शिक्षण विषयक प्रस्तावावर चर्चा व शिक्षण मंत्र्यांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी सुरु होईल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 38 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 10 जुलै, 2006 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही